स. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. २९६९



# युद्ध जिज्ञासा

(माजी) ले. कर्नल भा. त्र्यं. परांजपे

REFBK-0018178

संदर्भ
८८४०६

संदर्भ
~~इतिहास~~ निबंध
~~८८०७६~~
११।२।७२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

7 DEC 1977

[कृ. मा. प.]

# युद्ध जिज्ञासा

(माजी) ले. कर्नल भा. त्र्यं. परांजपे

प्रस्तावना : डॉ. वि. भि. कोलते, कुलगुरु, नागपूर विद्यापीठ, नागपूर

REFBK-0018178

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
क्रं. १८१७८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

स्पार्टन प्रकाशन

प्रथमावृत्ति, १९७१

प्रकाशक :
म. वा. चिंचवडकर
स्पार्टन पब्लिशर्स,
१८८०, सदाशिव,
नातुबाग, पुणें – ३०

प्रथमावृत्तिचे सर्व हक्क
प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रण :
रवीन्द्र प्रिंटींग इन्डस्ट्रीज
सुपर मार्केट जवळ
सीताबर्डी, नागपूर

मुखपृष्ठ व सजावट
व्ही. फुलझेले,
नागपूर – २

मूल्य रु. १०/–

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ..... दि: .....
क्रमांक ..... नोंद दि: .....




तुम्हा समचि आमुची तनुहि देश कार्यी पडो ।

# अनुक्रमणिका


पृष्ठ

युद्धाचा वंश–वृक्ष १
अथातो युद्ध–जिज्ञासा । ११
राजकारण आणि संरक्षण १८
सैनिकीकरण, राष्ट्रीयीकरण आणि हिंदवीकरण ३०
युद्ध साहित्य – चतुरंग सेना ३३
अ स्थल सेना ४५
आ जल सेना ४७
इ वायू सेना ४८
ई जन–सेना ५५
सहवीर्यं करवावहै । ६४
युद्धाची मूलतत्त्वे–रणचंडीच्या अष्टभुजा ७७
मोहिमेची आखणी ८८
युद्धाचे आदेश ९७
डावपेच आणि व्यूह १०५
विनी–आघाडी–पिछाडी–गस्त १११
हल्ला–बचाव–मोर्चेबंदी–माघार १२२
हेरगिरी १३२
युद्धाचे अदृश्य शस्त्र १३९
कालच्या आणि उद्याच्या महायुद्धाचे निर्णायक शस्त्र १४८
गनीमी युद्ध


---

टीप : ग्रंथाचे मुद्रण भारत–पाक युद्धाच्या धामधुमीच्या काळात केले आहे. कमीतकमी अवधीत ग्रंथ वाचकांच्या हाती देण्याची घाई, सतत येणाऱ्या युद्धवार्तांमुळे सतत वाढणारी उत्कंठा, प्रकाशबंदीचा अंमल इत्यादि कारणामुळे मुद्रणाकडे पुरेसे लक्ष देणे शक्य झाले नाही. अनवधानाने बरेचसे मुद्रणदोष राहून गेले आहेत. वाचकांनी त्याबद्दल क्षमा करावी, ही विनंती.

## अल्पसे निवेदन

आज राष्ट्राला युध्दविषयक साहित्याची नितांत गरज आहे. त्या दृष्टीने 'युध्द जिज्ञासा'चे प्रकाशन हे आमच्या संकल्पाचे पहिले चरण होय.

मराठीच्या साहित्यात म्हणा वा साहित्यशास्त्रात म्हणा, युद्धातील अनुभव, सैनिकी जीवनाचे वर्णन, युध्दशास्त्र विषयक लिखाणाचे दालन रितेच आहे. ही परिस्थिती बदलावी, ह्या रित्या दालनात काही भर घालावी, वाचकांना ह्या विषयाची गोडी वाटावी व त्याबाबत त्यांना सम्यक् ज्ञान प्राप्त व्हावे ह्या हेतूने युद्धविषयक साहित्य मुद्दाम लिहवून घेऊन प्रसिध्द करण्याचा आमचा संकल्प आहे.

माजी ले. कर्नल भा. त्र्यं. परांजपे ह्यांनी लिहिलेला 'युध्द जिज्ञासा' हा प्रस्तुत ग्रंथ युध्दासंबंधी सर्वस्पर्शी माहिती देण्यास समर्थ ठरेल, असा विश्वास वाटतो. ह्या ग्रंथाचे हिंदी भाषांतर प्रसिध्द करण्याचा आमचा मानस आहे. प्रसिध्दीपूर्वीच हृया ग्रंथाने वाचकवर्गात निर्माण केलेली जिज्ञासा पाहून वाचकांच्या आवडीची, युयुत्सु वृत्तीची व निकडीची कल्पना येते.

विविध अंगांनी विनटलेलें व बुध्दीखाद्य पुरविणारे युद्धविषयक साहित्य समाजाला सादर करण्याची एक अभिनव योजनादेखील आम्ही आंखली आहे. ती लवकरच कार्यान्वित करण्यास आम्ही प्रयत्नशील आहोत.

नागपूर विद्यापीठाचे विद्वान कुलगुरु व ख्यातनाम संशोधक डॉ. वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते यांनी प्रस्तुत ग्रंथाला मोठी मार्मिक प्रस्तावना लिहून दिली. त्याच प्रमाणें ख्यातनाम साहित्यिक प्रा. वा. कृ. चोरघडे हृयांनी हृया ग्रंथाला पुरस्कार दिला. उभय मान्यवरांचे आम्ही कृतज्ञ आहोत.

नागपूरचे तरुण चित्रकार श्री. व्ही. फुलझेले हृयांनी अल्प वेळात मोठे अर्थवाही व आकर्षक मुखपृष्ठ चित्रित करून दिले. आभारी आहोत.

प्रस्तुत 'युध्द जिज्ञासा' हा ग्रंथ आजच्या परिस्थितीत व भविष्यातही केवळ बोधकच नव्हे तर प्रेरकही ठरावा !

— म. वा. चिंचवडकर

# प्रस्तावना

डिसेंबर १९७१. या महिन्यातील पहिला पंधरवाडा युध्दाच्या वातावरणाने पूर्ण भरून गेलेला होता. पाकिस्तानचे स्वयंप्रतिष्ठित अध्यक्ष जनरल याह्याखान यांनी पूर्वीच्या पूर्व पाकिस्तानात लोकतंत्राची गळचेपी करुन नृसंशहत्याकांड आरंभिले होते. मार्च महिन्यापासून हा नरसंहार चालू होता. विस्थापितांचे अनेक लोंढे भारतात आले. मानवतेच्या दृष्टीकोनातून भारताने त्यांना आश्रय दिला. ते लोंढे एकसारखे येत राहिले. त्यातून निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे पूर्व पाकिस्तानातील लोकांनी स्वतंत्र बंगला देश निर्माण करण्याचा संकल्प केला. त्यातून मुक्तिवाहिनी निर्माण झाली. तिने गनिमी काव्याच्या लढाईस सुरुवात केली. त्यामुळे बंगला देशातील राज्यव्यवस्था खिळखिळी होऊन हा प्रदेश आपल्या हातातून निसटणार या कल्पनेने जनरल याह्याखान आणि त्यांचे सल्लागार गडबडून गेले. ह्या प्रश्नाकडून जगाचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी पाकिस्तानने भारताच्या पूर्व आणि पश्चिम अशा दोन्ही आघाडयांवर आधी छुपे हल्ले सुरु केले आणि नंतर दिनांक ३ डिसेंबर रोजी भारताविरुध्द युध्द पुकारले. या परिस्थितीला तोंड देणे अवश्य होते. भारताने या दोन्ही आघाडयांवर सशस्त्र प्रतिकार सुरु केला. युध्दाला तोंड लागून दोन्ही आघाडयांवर भारतीय सैन्य लढू लागले, तोफांचा गडगडाट सुरु झाला, शत्रूंच्या रणगाडयांचा नाश करीत आपले रणगाडे पुढे सरकू लागले. आकाशात लढाऊ विमाने घरघरु लागली. शत्रूंच्या विमानांचा वेध घेऊन त्यांचा नायनाट करु लागले. आपल्या वैमानिकांचे शत्रूच्या देशातील सैनिकी तळांवर, विशेषत: विमानतळांवर जोराचे बाँब हल्ले सुरु झाले. आणि त्याच वेळी योजनाबध्दतेने भारतीय नौदलाने पाकिस्तानच्या युध्दनौकांची ससेहोलपट करून काहींना सागरतळ दाखविला. शत्रूच्या बंदरांची त्यांनी पूर्ण नाकेबंदी केली पश्चिम आणि पूर्व समुद्रामधे गस्त घालून शत्रूची रसद तोडली. पूर्वेकडे बंगला देशातील सरहद्दीवरील महत्वाची शहरे मुक्तिवाहिनी आणि भारतीय सैन्य यांनी यांनी एकामागून एक काबीज केली. शेवटी दिनांक १६ डिसेंबर रोजी बंगला देशातील पाकिस्तानी जनरलने शरणागती स्वीकारली. डाक्यावर स्वतंत्र बंगला देशचा ध्वज फडकला. पश्चिमेकडेही छंब विभागाचा थोडा भाग सोडल्यास भारतीय सेनेने अनेक प्रदेश आणि ठाणी काबीज केली. बंगला देश स्वतंत्र होताच भारताने युध्दविरामाची घोषणा केली. दोन्ही आघाडयांवर फजित पावलेल्या जनरल याह्याखानने अखेर ती निमूटपणे स्वीकारली आणि युध्द विराम पावले. या सर्व घटना भारतीयांच्या मनात अगदी ताज्या आहेत. या विजयामुळे भारताची मान ताठ झालेली आहे. अंत:करणे विजयानंदाने भरुन निघाली आहेत. याच काळात आपल्या राष्ट्रपतींनी भारतात

आणिबाणीची परिस्थिती घोषित केली. संरक्षण–व्यवस्थेसाठी निरनिराळे प्रयत्न सुरु झाले. शत्रूंच्या विमानहल्यापासून बचाव करण्यासाठी मोठमोठ्या शहरात प्रकाशबंदी सुरू झाली. देशात सर्वत्र युध्दाचे वातावरण निर्माण झाले. भारतीय नभोवाणीवरून तासातासाला येणाऱ्या बातम्या लोक कान देऊन ऐकू लागले. आपापल्या परीने सर्व भारतीय युध्द प्रयत्नांना मदत करू लागले.

युध्दाच्या ह्या वार्ता ऐकतांना अंत:करणात जी आंदोलने निर्माण होत होती त्यांचे वर्णन करणे अशक्य आहे. विजयाच्या वार्ता ऐकतांना अंत:करणे उचंबळून जात असत यात शंका नाही. तथापी प्रत्यक्ष आघाडीवर युध्द कसे लढले जात आहे याची माहिती आपणाला नव्हती. आमचे बहुतेक नागरिक या बाबतीत अज्ञानात आहेत. ' युध्दस्य कथा रम्या ' हे खरे, पण ते युध्द कसे होते. त्यात भाग घेणारे आपले संरक्षण विभाग कोणते, प्रत्येक संरक्षण विभागाची रचना कशी आहे, त्याचे युध्दतंत्र कोणते आहे इत्यादी संबंधी सर्वसामान्य नागरिकांना फारशी माहिती नसते. ती माहीत असणे आवश्यक नाही का ? त्यावाचून युध्दाची खरी कल्पना आपणाला येऊ शकत नाही. ही कल्पना आल्यानेच त्याच्या प्रचंडत्वाची यथार्थ कल्पना येऊ शकेल आणि त्यामुळे अशा प्रसंगी प्रत्येकाचे कर्तव्यकर्म काय, जबाबदाऱ्या कोणत्या इत्यादी संबंधीचा विचार त्याच्या मनात येऊ शकेल. ही माहिती एकत्र देणारी पुस्तके आपल्याकडे फारशी नाहीत. या दृष्टीने आज प्रसिध्द होणाऱ्या ' युध्द जिज्ञासा ' या ग्रंथाचे महत्व फार मोठे आहे.

या ग्रंथाचे लेखक ले. कर्नल परांजपे हे या क्षेत्रातील एक तज्ञ म्हणावयाला हरकत नाही. १९२६ मधे टेरिटोरियल फोर्स मधे एक साधे शिपाई म्हणून त्यांनी प्रवेश केला. चार वर्षांनी म्हणजे १९३० मधे स्थलसेनेत त्यांना कमिशन मिळाले. मराठा लाईफ इन्फन्ट्रीमधे त्यांची नेमणूक झाली. तेथे असतांनाच दुसरे महायुध्द सुरू झाले. त्यावेळी प्रत्यक्ष लढाईत भाग घेण्याची संधी त्यांना मिळाली. १९३९ ते १९४७ पर्यंत रणक्षेत्रात ते प्रत्यक्ष काम करीत होते या निमित्ताने आफ्रिका, वायव्य सरहद्द, आसाम इत्यादी प्रदेशात त्यांना काम करावे लागले. या सर्व ठिकाणी त्यांना युद्धतंत्राचा चांगला अनुभव मिळाला. १९४७ मधे भारत स्वतंत्र झाला. त्यावेळी स्थलसेनेतून त्यांची मुक्तता झाली. पण त्यांचे कार्य संपले असे नाही. स्पेशल आर्मड् फोर्समधे कमांन्डट म्हणून त्यांची नेमणूक झाली. भारतापुढे नवीन समस्या निर्माण झाल्या. पूर्वीच्या हैद्राबाद संस्थानात रझाकारांनी जे हत्याकांड चालविले होते त्यामुळे भारत संरकारला तेथे 'पोलीस ॲक्शन' घेणे भाग पडले. त्यात ले. कर्नल परांजपे यांना कार्य करण्याची संधी मिळाली. नंतर काही काळ नागालँडमधे चालू झालेल्या संघर्षात भाग घेण्यासाठी त्यांनी योजना झाली. अशा रीतीने कार्य करीत असतांना १९५६ मधे ते सेवानिवृत्त होऊन नागपूरमधे स्थायी झाले.

यावरुन दिसून येईल की कर्नल परांजपे यांना या विषयाचा प्रात्यक्षिक अनुभव आहे. साध्या शिपाईगड्यापासून तो उच्च अधिकारी म्हणून त्यांनी काम केलेले आहे. त्यामुळे युद्धासंबंधी आवश्यक असलेल्या लहानसहान बाबीपासून तो मोठमोठ्याबाबीपर्यंतचा त्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळालेला आहे आणि म्हणून या विषयावर लिहिण्याची त्यांची विशेष पात्रता आहे. याशिवाय आमच्या तरुण वर्गास युद्ध तंत्राचे ज्ञान होऊन त्यांची मने संस्कारित व्हावी अशी त्यांना तळमळ आहे. ह्या तळमळीतून आतापर्यंत त्यांनी अनेक लेख निरनिराळ्या वृत्तपत्रातून लिहिले आहेत. त्यातूनच प्रस्तुत ग्रंथाचे लेखन झालेले आहे ही आनंदाची गोष्ट होय. १९४७ मधे भारत स्वतंत्र झाला. त्यामुळे अनेक जबाबदाऱ्या आपल्यावर येऊन पडलेल्या आहेत. त्यातच मिळालेल्या स्वातंत्र्याचे संरक्षण ही फार मोठी जबाबदारी होय. या स्वातंत्र्याच्या निर्मितीक्षणीच भारतावर नवनिर्मित पाकिस्तानच्या आकस्मिक आक्रमणाचा आघात झाला. त्यावेळी आपल्या गैरसावधपणामुळे काश्मीरचा काही भाग आपण गमावून बसलो; काही वर्षांनी चीनने आपल्यावर आक्रमण केले. त्याही वेळी आपण हतबल ठरलो आणि बराचसा प्रदेश गमावून बसलो. पुन्हा काही वर्षांनी पाकिस्तानने पश्चिम आघाडीवर आपल्यावर आक्रमण केले. यावेळी आपल्या शत्रूंना आपल्या सैन्याने जबरदस्त तडाखा दिला. परंतु रणांगणावर जो विजय आपण मिळविला, तो ताश्कंद कराराने निर्माल्यवत ठरला. जिंकलेली काही महत्वाची ठाणी आपण परत केली. भारत द्वेषाचा वसा घेतलेल्या कृतघ्न पाकीस्थानी राज्यकर्त्यांच्या अंतःकरणात भारताविषयीचा द्वेष आणि आकस वाढत गेला आणि त्यातूनच या वर्षीचे पाकिस्तानचे आक्रमण पुन्हा झाले. हा इतिहास भारतातील तरुणांनी नीट समजावून घेतला पाहिजे. नुसता इतिहास समजावून घेऊन चालणार नाही, तर देशाच्या संरक्षणासाठी सदैव जागरुक आणि सिद्ध राहिले पाहिजे. आपणाला शांती पाहिजे हे खरे आहे. पण त्या शांतीसाठी युद्धाची तयारी आवश्यक आहे. 'If you want peace understand war' हे क. परांजपे यांनी उद्धृत केलेले लिडल हार्टचे वचन यथार्थ होय. देशाच्या संरक्षणासाठीं युद्धनिर्मितीचे राजकारण आणि प्रत्यक्ष युद्धाचे तंत्र अभ्यासण्याची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवरच त्यांनी लिहिलेल्या या ग्रंथाची आवश्यकता आणि महत्व लक्षात येते.

युद्धे अनेक प्रकारची असतात. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असे तुकोबांनी म्हटले आहे ते केवळ आध्यात्मिक क्षेत्रातच नाही तर जीवनाच्या सर्व क्षेत्रात खरे आहे. प्रत्यक्ष युद्धाप्रमाणेच शीतयुद्धाचा एक प्रकार आहे. राष्ट्रांच्या राजकारणात अशी शीतयुद्धे सतत चाललेली असतात आणि त्यातून पुढे रणांगणांवर खेळल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष युद्धाची निर्मिती होते. या दृष्टीने देशाच्या संरक्षणात राजकारणाचा भाग फार महत्वाचा असतो,

'राजकारण म्हणजे रक्तपाताशिवाय लढाई, आणि लढाई म्हणजे रक्तपाताचे राजकारण' हे माओचे वचन समर्थक नाही असे कोण म्हणेल ? या शीतयुद्धात भाग घेणारे देशाचे नेते चांगले राजनीतिज्ञ असले पाहिजेत. आपल्या संस्कृत वाङमयात राजनीतीचे शिक्षण देणारे अनेक ग्रंथ आहेत. कथांच्या रुपाने लहान मुलांच्या अंतःकरणात राजनीतीचे बीज पेरणाऱ्या 'पंचतंत्र' या ग्रंथाची या या ठिकाणी आठवण झाल्याशिवाय राहत नाही, 'मित्रसंधी' कसे करावे व 'मित्रद्रोह' असे घडवून आणावे यासंबंधीच्या त्यातील कथा उद्‌बोधक आहेत. दंडीच्या 'दशकुमार चरित्रा'तील सर्व चरित्रे याच नीतीने भरलेली आहेत आणि कौटिल्य मुनीचे 'अर्थशास्त्र' या ग्रंथात तर या राजकीय कूटनीतीचे अत्यंत सुक्ष्मपणे दिग्‌दर्शन केलेले आहे. देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने जागतिक राजकारणाची इत्थंभूत माहिती राजकीय नेत्यांना असली पाहिजे. लोकशाही पद्धतीत सत्तेवर येणाऱ्या मंत्रीमंडळाला ही दृष्टी असतेच असे नाही. सत्तेवर आल्यानतर यांची माहिती करुन घेणे त्यांना अशक्यप्राय होते. त्यासाठी राजकारणात पडणाऱ्या व्यक्तींनी आपल्या तारुण्य दशेपासूनच यांचा वारकाईने अभ्यास करायला पाहिजे. म्हणून आमच्या तरूणांनी त्या शिक्षणाची आपल्या विद्यार्थीदशेपासूनच ओळख करुन घेतली पाहिजे.

युद्धाचा दुसरा प्रकार म्हणजे रणांगणावर खेळले जाणारे युद्ध. त्याचेही अनेक प्रकार आहेत. स्थानिक युद्ध आणि सर्वंकष युद्ध असे त्यांचे प्रमुख भेद करता येतील. या दोन्ही प्रकारच्या युद्धासाठी सशस्त्र संरक्षण दलांची आणि त्यांच्या अधिकाऱ्यांची कर्तव्यकुशलता जशी महत्वाची असते तसे मंत्रीमंडळ आणि सेनापती यांचे परस्पर सहकार्यही अत्यंत महत्वाचे असते. या दोहोमधे एकसूत्रता नसल्याने चीनच्या आक्रमणाच्या वेळी आपला फज्जा उडाला. उलट त्याच्या एकसूत्रतेमुळे या वर्षी पाकिस्तानाविरुद्ध झालेल्या युद्धात आपणाला विजय मिळाला हे लक्षात घेण्यासारखे आहे. या दृष्टीनें 'राजकारण आणि संरक्षण' हे या ग्रंथातील दुसरे प्रकरण फार उपयुक्त ठरेल. प्रत्यक्ष लढाईचा प्रसंग आलेला असो किंवा नसो, राष्ट्राने आपली सेना सदैव सज्ज ठेवली पाहिजे. यासाठी राष्ट्राच्या सैनिकीकरणाची फार मोठी आवश्यकता आहे. प्रत्यक्ष संरक्षण विभागात समाविष्ट झालेल्या तरुणाव्यतिरिक्त सैनिकीकरणाचे इतरही प्रकार आहेत. उदा. होमगार्डस्. हे प्रमुख सेनेत नसतात, परंतु युद्धाला सुरुवात झाल्यानंतर सेनेत जाण्यासाठी त्यांची योग्य ती तयारी आधीच झालेली असते. ही वृत्ती तरुणांच्या ठिकाणी निर्माण होण्यासाठी 'राष्ट्रीय छात्र सेना' निर्माण झालेली आहे. पूर्वी या राष्ट्रीय छात्रसेनेत निवडक विद्यार्थी घेतले जात असत, पण चीनच्या आक्रमणानंतर सर्व तरुणांना किमान सैनिक शिक्षण मिळावे या हेतूने देशात छात्रसेनेचे शिक्षण सर्वत्र आवश्यक करण्यात आले. साधनसामुग्रीच्या अभावी ते पूर्णपणे यशस्वी होऊ शकले नाही हे खरे

आहे. तथापी त्यामुळे त्याची उपयुक्तता नाहीशी झाली असे म्हणता येत नाही. अलीकडे अनेक विद्यापीठांनी छात्रसेनेचे शिक्षण वैकल्पिक केले आहे. त्यातील हेतू असा आहे की, विद्यार्थ्यांनी आपणहून छात्रसेनेत प्रवेश केल्यास त्यांना त्याचे महत्व अधिक जाणवेल आणि त्यातील जबाबदाऱ्या ते अधिक निष्ठेने पार पाडतील. विद्यार्थ्यांना छात्रसेनेचे महत्व पटवून देऊन त्यांत प्रवेश करण्यासाठी त्यांनी उत्तेजन देण्याचे कार्य अध्यापक आणि पालकवर्ग यांनी केले पाहिजे. या छात्रसेनेमुळे देशाच्या संरक्षणासाठी तरुणांची एक नवीन फळी तयार होत असते. या सर्व गोष्टीचे महत्व वेळीच लक्षात घेणे इष्ट होईल.

आपल्या संरक्षण दलांची माहिती करुन देण्यासाठी 'युद्ध साहित्य–चतुरंग सेना' हे प्रकरण ले. कर्नल परांजपे यांनी लिहिलेले आहे. स्थलसेना, जलसेना आणि वायुसेना या तिन्ही अंगांची आवश्यक ती प्राथमिक माहिती या प्रकरणात आलेली आहे. स्थलसेनेतील पायदळ, चिलखती दळ, तोफखाना, संदेश सैनिक विभाग, इंजिनिअर्स, सेवाकार्य विभाग, वस्त्रशस्त्र सज्ज विभाग, सेना सेवा विभाग, वैद्यकीय विभाग, यांत्रिकी आणि विद्युत विभाग अशा कितीतरी विभागांचा केवळ एका स्थल सेनेत अंतर्भाव होतो. त्यांची निरनिराळी कार्ये लक्षात घेतली म्हणजे हा व्याप किती प्रचंड आहे याची कल्पना येईल. जलसेनेची माहिती करुन देतांना आमच्या आरमारातील साधनसामुग्री संबंधी ले. कर्नल परांजपे यांनी जे लिहिले आहे ते स्थूलमानाने खरे असले तरी अद्यावततेच्या दृष्टीनें त्यात बरीच भर घालता येण्यासारखी आहे. आमची लढाऊ जहाजे म्हणजे दुसऱ्या देशातून घेतली आहेत हे खरे आहे, पण ती 'आडगिऱ्हाईकी' मात्र म्हणता येणार नाही. त्यांची कार्यक्षमता संपण्याच्या जवळपास आली आली आहे असेही ले. कर्नल परांजपे म्हणतात. पण या वर्षी आरमारी युद्धात त्यांनी केलेली नेत्रदीपक कामगिरी लक्षात घेतली असता या विधानाचाही पुनर्विचार करणे आवश्यक वाटेल. जग सर्वच बाबतीत पुढे जात आहे, नवनवीन शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असे आरमार आपण उभारणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने आपण इतर देशाच्या फार मागे आहोत हे मान्य केले पाहिजे. तथापी आपल्या युद्धनौका इंग्लंड, अमेरिका आणि रशिया या देशाकडून आपण 'सरळ गिऱ्हाईकीनें' विकत घेतल्या आहेत, 'आडगिऱ्हाकीने' नव्हे. युध्दनौका बांधण्याचे कार्यही आपण आपल्या देशात सुरु केले आहे. मुंबई आणि कलकत्ता येथे आपण छोट्या लढाऊ बोटी बांधीत आहोत. मुंबईला बांधलेली मोठी युध्दनौका येत्या वर्षसहा महिन्यात आरमाराच्या लढाऊ काफील्यात दाखल होईल असे दिसते. दुसरी युध्दनौका सुध्दा आधुनिक क्षेपणास्त्रांनी सुसज्ज राहणार आहे. वृत्तपत्रातील माहितीवरुन असे दिसते की या युध्दात अमेरिकेनें पाकिस्तानला उसनी दिलेली 'गाझी' सबमरीन ही भारतात बांधलेल्या एका छोट्या युध्दनौकेनें तर बुडविली नसेल ना? नव्हे तर

आपली सर्व संरक्षण दले सुसज्ज करण्यात आपण पुढे पाऊल टाकत आहोत यात शंका नाही. देशात उभारण्यात आलेले विमाने बांधण्याचे कारखानेही या गोष्टीची साक्ष देतील. भारतात तयार झालेल्या ' मिग् ' आणि 'नॅट' विमानांनी शत्रूंच्या रणगाड्यांचा कसा धुव्वा उडविला हे आपण उचंबळलेल्या अंत:करणाने ऐकत होतोच ना?

प्रस्तुत ग्रंथाच्या उत्तरार्धातील प्रकरणे प्रत्यक्ष युध्दाच्या तंत्राला वाहिलेली आहेत. ती अतिशय उद्‌बोधक आहेत. ' युध्दाची मुलतत्वे–रणचंडीच्या अष्टभुजा ' या प्रकरणात या तत्वांचे स्पष्टीकरण आलेले आहे. युध्दाचे उदिष्ट कायम ठेवणे, आक्रमक कार्यांचा अंगीकार करणे, अनपेक्षिततेचा वापर करणे, आपली सुरक्षितता सांभाळणे, योग्य वेळी शक्तीचे केंद्रीकरण करणे, शक्तीचा जितका मितव्यय करता येईल तितका करुन देखील गतिमानता साधणे आणि सर्व साधन सामुग्रीचे सहकार्य साधणे ही युध्दाची मूलतत्वे ध्यानात ठेवून त्या दृष्टीने मोहिमेची आखणी कशी करावी याचे विवेचन त्यापुढील प्रकरणात करण्यात आलेले आहे. युध्दाचे आदेश कसे, कोणत्या हेतूने आणि कोणत्या पध्दतीने द्यावे, अंतर्गत व्यवस्था आणि संपर्क व्यवस्था कशी सांभाळावी, डावपेच आणि व्यूह कसे रचावे, बिनी, आघाडी व पिछाडी कशी सांभाळावी, गस्त कशी घालावी, हल्ले कसे चढवावे, बचाव कसा करावा, मोर्चेबंदी कोणत्या पध्दतीने करावी, प्रसंग पडल्यास माघारीचे तंत्र का व कसे अवलंबावे, इत्यादी महत्वाच्या गोष्टींचा विचार चांगल्या रीतीने केलेला आहे. हेरगिरीचे प्रकरण हे विशेष महत्वाचे होय. पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक महायुध्दांत निरनिराळ्या राष्ट्रांनी केलेल्या हेरगिरीच्या रोमहर्षक कथा आपण वाचतो. त्यावरुन युध्दाच्या राजकारणात हेरगिरीचे महत्व किती आहे याची चांगली कल्पना येते. ' भवेत्स्वपरराष्ट्राणां कार्याकार्यावलोकते । चारचक्षुर्महीभर्तुर्यस्य नास्त्यन्ध एव स: ' या सुभाषिताची येथे आठवण होते. आपल्या देशात ही यंत्रणा आहे किंवा नाही, असल्यास ती कसे कार्य करीत आहे याची माहिती आपणाला नाही. हेच आपल्या या व्यवस्थेची यशस्विता दाखविण्यास पुरेसे आहे. आपणही हेरगिरी करीत आहोत हे जर जनतेला माहीत झाले तर तिची गुप्तता ती काय राहिली? म्हणूनच की काय या ग्रंथकाराने या महत्वाच्या कार्याचे विवेचन सर्वसामान्य रीतीने केले आहे. हेरगिरीची व्यवस्था केवळ सेनापतीलाच आवश्यक असते असे नाही, मुत्सद्यांनादेखील तिची गरज असते. त्यातून मिळालेल्या माहितीच्या आधारेच युध्दाचे डावपेच आखता येतात. शत्रूच्या रणभूमीवरील भौगोलिक माहिती मिळवणे जसे आवश्यक असते, त्याचप्रमाणे त्यांचे डावपेच, कागदपत्र, नकाशे, हुकूम, सूचना, परवलीचे शब्द, सांकेतिक भाषा इत्यादी बाबींची माहितीही आवश्यक असते. ती काढण्यासाठी प्रसंगी प्राण पणाला लावून काम करणारे हेर पाहिजेत. शत्रूकडील हेर आपल्या

देशात निरनिराळ्या वेषात वावरत असण्याचा संभव लक्षात घेऊन आपली माहिती गुप्त राखण्याची जबाबदारी आपणा सर्वांच्यावर फार मोठी असते, हे सांगायला पाहिजे काय ?

युध्दकालात ज्या बातम्या प्रसारीत केल्या जातात ते एका दृष्टीने युध्दाचे अदृश्य शस्त्र होय. या बातम्यांचा उद्देश माहितीचा प्रसार करायचा असतो, प्रचार नव्हे. तथापी प्रसार करीत असतांना शत्रूसैन्य आणि शत्रू देश यांचे मनोधैर्य खच्ची करणे, आपल्या सैन्याचे आणि देशाचे मनोधैर्य वृध्दिगत करणे, अन्य देशांची सहानुभूती आणि साह्य मिळविणे, शत्रूच्या मित्रांना फोडणे, इत्यादी अनेक गोष्टी यामुळे साध्य झाल्या पाहिजेत. तथापि हा प्रसार करतांना तो सत्य माहितीच्या आधारे करण्याची शक्य ती सावधगिरी बाळगणे अवश्य आहे. पाकिस्तानच्या रेडिओवरुन प्रसारीत झालेल्या वार्तांनी पाकिस्तानमधील लोकांना शेवटपर्यंत कसे अंधारात ठेवले आणि त्यामुळे युध्दविरामानंतर जनता कशी खवळून उठली याच्या वार्ता आपण आज वर्तमानपत्रातून वाचीत असतो.

'उद्याच्या महायुध्दातील निर्णायक शस्त्र' कोणते राहील यासंबंधी काही विचार ग्रंथकाराने प्रगट केले आहेत. आधुनिक विज्ञानाच्या साह्याने अद्ययावत शस्त्रास्त्रांची निर्मिती प्रबळ राष्ट्रे करीत असतात हे आपण जाणतोच. अमेरिका, रशिया, चीन इत्यादी राष्ट्रांकडून संहाराच्या नवनवीन शस्त्रास्त्रांच्या निर्मीतीबावत जणू स्पर्धाच चाललेली आहे. अण्वस्त्रे तयार होत आहेत. त्यांची संहारशक्ती जितकी वाढविता येईल तितकी वाढविण्यासाठी विज्ञानातील नवीन संशोधनांचा आश्रय घेतला जात आहे. त्यांच्या साह्याने पुढे एखाद्या काळी युध्द झाल्यास ते मानवाच्या संहाराला मोठया प्रमाणात कारणीभूत होईल यात शंका नाही. तथापी एखाद्या राष्ट्राजवळ अण्वस्त्रे आहेत ही माहिती देखील अशा प्रकारचे युध्द टाळण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांना पूरक ठरते. सध्या काही बडचा राष्ट्राजवळ ही अस्त्रे आहेत. त्यांच्या साह्याने लहान राष्ट्रावर ते आपल्या प्रभुत्वाचा पगडा बसवीत आहेत. जागतिक राजकारणाचे रंग लक्षात घेतले असता भारताला अण्वस्त्रसज्ज होण्यावाचून गत्यंतर नाही असे स्पष्ट दिसू लागले आहे. या संहारक शस्त्राची माहिती देऊन शेवटी गनीमी युध्दाची माहिती देऊन ग्रंथकर्त्यांनी आपला ग्रंथ पुरा केला आहे.

युध्दशास्त्रावर मराठीत फार थोडी पुस्तके आहेत. जनतेला सुबोधपणे सर्वांगीण माहिती देणारी पुस्तके तर जवळ जवळ नाहीतच असे म्हटले तरी चालेल. या दृष्टीने ले. कर्नल परांजपे यांनी लिहिलेल्या या ग्रंथाचे महत्व मला विशेष वाटते आणि तो या युद्ध प्रसंगी प्रसिद्ध व्हावा यात फार मोठे औचित्य आहे. सध्या देशात युद्धाचे वातावरण निर्माण झालेले आहे. युद्धविराम झालेला असला तरी ते पुन्हा केव्हा डोके वर काढील हे सांगता येत नाही. पाकिस्तानचे नवे अध्यक्ष श्री भुत्तो युद्धाच्या डरकाळ्या फोडत

आहेत. अशा स्थितीत भारताने गैरसावध राहून चालणार नाही. या वेळी सर्वसामान्य जनतेला देखील युद्धाचे मूकप्रेक्षक किंवा श्रोते न बनता त्यासंबंधीची प्राथमिक स्वरुपात का होईना पण सर्वांगीण माहिती मिळवून जाणतेपणाने आणि जागरुकतेने दक्ष असणे अवश्य आहे. त्यासाठी ले. कर्नल परांजपे यांच्या या ग्रंथाचा चांगला उपयोग होऊ शकेल. माझ्याप्रमाणेच सर्व मराठी वाचक या ग्रंथाचे मनःपूर्वक स्वागत करतील या विषयी माझ्या मनांत शंका नाही.

एका गोष्टीचा निर्देश अवश्य वाटतो. ग्रंथकर्त्याने अनेक ठिकाणी काँग्रेसच्या अहिंसात्मक राजकारणाचा कुचेष्टेने मर्मभेदक उल्लेख केलेला आहे. शस्त्रसज्ज ब्रिटिशांच्या पारतंत्र्यात आपण असतांना शस्त्रांच्या साह्याने काही क्रांतीकारकांनी उठाव केला. तो त्यांच्या स्वातंत्र्यप्रेमाची तीव्रता व्यक्त करणारा असला तरी शेवटी परिणामकारक ठरला नाही हे आपल्याला ठाऊक आहे. ज्यांच्या हातातून शस्त्रे काढून घेण्यात आली होती अशा जनतेला परकीय राज्यकर्त्याशी अहिंसेच्या शस्त्रानेच लढा देणे त्यांना अपरिहार्य होते. देशकालपरिस्थिती लक्षात ठेऊनच या मार्गाचा अवलंब आपल्या नेत्यांनी केला होता. अहिंसा हे देखील एक शस्त्र आहे, त्याचे देखील काहीएक तंत्र आहे. त्याचा अवलंब करुनच परकीयांशी लढा देणे शक्य झाले हे विसरता येत नाही. आम्हाला स्वातंत्र्य मिळाले ते असहकारितेच्या आणि सत्याग्रहाच्या साह्याने ही गोष्ट नाकारून चालणार नाही. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच नव्हे तर त्यापूर्वीही स्वतंत्र देशाच्या संरक्षणासाठी केवळ अहिंसेचा उपयोग होईल ह्या गोष्टीवर काँग्रेसच्या नेत्यांचाही विश्वास नव्हता. खुद्द या तत्वाचे प्रवर्तक महात्मा गांधी यांचाही नव्हता. हे त्यांच्या अनेक उद्गारावरून दाखवून देता येईल. पण त्याचे विवेचन या प्रस्तावनेच्या मर्यादेत करणे शक्य नाही. लेखकाने हे उल्लेख टाळले असते तर बरे झाले असते.

ले. कर्नल परांजपे यांनी आपला हा ग्रंथ सुंदर भाषेत लिहिला आहे. वाङमयकलेचे ते चांगले जाणकार आहेत हे अनेक ठिकाणी त्यांनी दिलेले दृष्टांत व उध्दृत केलेली वचने यांवरुन दिसून येईल. " एखादा गायक गात असलेल्या रागाचा स्वरविस्तार मोठ्या कौशल्याने आणि कलात्मक रीतीने करीत असतो, परंतु त्याला ठराविक मात्रांनी समेवर यावेच लागते. त्याचा ताला चुकला तर त्याच्या कलेचे कलेवर होते. शास्त्र आणि कला दोन्हीही स्वैर असू शकत नाही (?) ( पान ५ )" "आपल्या राजस्थानच्या सीमेशी भिडलेल्या पाकिस्तानकडून असले 'गोग्रहणाचे' प्रकार केंव्हा केंव्हा होत असतात." ( पान १३ ) " नाटक हे संसाराचे चित्र आहे असे समजले जाते, देशाच्या संसारात युद्ध हा मोठा गंभीर आणि महत्वाचा नाट्य प्रसंग असतो

.. ............. 'जेत्याच्या' एका डोळ्यात आनंदाश्रु असतात. परंतु दुसऱ्या डोळ्यात दुखाःश्रुहि तरळत असतात, संसाराच्या नाट्यात नवरस खेळतात. युध्दनाट्यात फक्त एकच रौद्ररस थैमान घालीत असतो. नवरसात 'शृंगार आणि वीर' हे दोन रस सर्वांनाच अधिक आवडत असतात. युद्धाच्या रोमांचकारी वीरकथा सर्वांनाच रम्य वाटतात परंतु त्यात रौद्ररसाचे प्राबल्य असते आणि भीषणनाही असते." ( पान १५ ). असे सुंदर लेखन अनेक ठिकाणी आढळते. त्यामुळे हा ग्रंथ वाचकांना जसा उद्बोधक तसाच मनोरंजकही वाटेल. असे ग्रंथ जितके अधिक निर्माण होतील तितके पाहिजे आहेत. कर्नल परांजपे यांचे हा ग्रंथ लिहिल्याबद्दल मी पुन्हा एकदा मनःपूर्वक अभिनंदन करतो. आपल्या जीवनानुभूतीतून साकार झालेली त्यांची ही साहित्यसेवा ही एका दृष्टीने राष्ट्रसेवाच होय. त्यांच्या या ग्रंथातून आमच्या तरुणांना प्रेरणा प्राप्त होऊन राष्ट्रसेवेसाठी सदैव सज्ज राहण्याची स्फूर्ती प्राप्त होईल याविषयी माझ्या मनात शंका नाही.

वि. भि. कोलते

# पुरस्कार

माजी ले. कर्नल श्री. भा. त्र्यं. परांजपे यांचे 'युद्ध–जिज्ञासा' हे पुस्तक मोठ्या उचित वेळी वाचकांना; उपलब्ध होत आहे. कर्नल साहेब निवृत्त झाले असले तरी सध्याच्या युद्धाभिमुख अवस्थेत त्यांच्याने स्वस्थ बसवले नाही. त्यांची देशनिष्ठा दिसून येते.

सर्व सामान्य माणूस युद्धाचा मंत्र व त्याचे तंत्र जाणून काय करणार ? असा प्रश्न आज तरी कोणी करील असे मला वाटत नाही. सैनिक लढतो तो शस्त्राने हे त्यांचे स्थूल दृष्य ! तो मनाने लढतो, मानाप्राणाने लढतो. त्याचे हे मन जोपासण्यासाठी देशाच्या सैनिकेतर प्रत्येक नागरिकाने सुजाणपणे त्याच्या आधाराला उभे ठाकून त्याचे मनोधैर्य सबल संगीन केले पाहिजे.

युद्धाची जाण, समज असल्याशिवाय हा सहकार क्रियाशील होणार नाही या प्रामाणिक उद्देशाने कर्नल साहेबांनी सहज सुबोध, अर्थवाही भाषेत ही 'युद्ध जिज्ञासा' पूर्ण केली आहे. केवळ करमणूक म्हणून हे पुस्तक न वाचता औषध म्हणून ते वाचले जावे, प्रत्येकाने ते वाचावे असे मला मनापासून वाटते. अयुक्त बुद्धी, अयुक्त जीवन व अयुक्त मरण ही आज परवडणार नाहीत.

या 'युद्ध जिज्ञासा' ला माझ्या सदिच्छा !

वामन कृष्ण चोरघडे

३०–१२–७१

" आधी गाजवावे तडाके । मग भूमंडळ धाके ।
ऐसे न होता धक्के । राज्यासी होती "

श्री समर्थ रामदास

माझी कैफियत !

स्वतंत्र हिंदुस्थानची **संरक्षण प्रबोधिका** खडकवासला येथे महाराष्ट्रात आहे. परंतु महाराष्ट्र तिच्यात नाही. सैन्य आणि त्याचा अस्तित्व–हेतु युद्ध या विषयी जिज्ञासा उत्पन्न होऊन त्याचे यथार्थ ज्ञान मिळविण्याची पांढरपेशा सुशिक्षित मराठी मनात इच्छा उत्पन्न व्हावी व महाराष्ट्र हिंदुस्थानचा **खड्गहस्त** बनावा हा पुस्तकाचा हेतू आहे.

मी जे काही अल्पस्वल्प केले, अनुभवले, पाहिले व वाचले आणि त्यातले जे काही मला समजले ते माझ्या कुवतीप्रमाणे मी वाचकासमोर ठेवले आहे. यातल्या त्रुटींची मला जाणीव आहे. कोणत्याही राजकीय पक्षावर टीका करण्याचा माझा उद्देश नाही.

यातली काही प्रकरणे 'महाराष्ट्र' 'तरुण भारत' आणि 'केसरी' यांतून प्रसिद्ध झालेल्या माझ्या लेखावरून तयार केली आहेत. त्या लेखांचा उपयोग करु दिल्याबद्दल तिन्ही संपादकांचा मी आभारी आहे.

हे पुस्तक नजरेखाली घालून योग्य त्या सूचना दिल्याबद्दल नागपूर जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण अधिकारी श्री. ना. गो. दिक्षीत यांचा मी आभारी आहे.

डॉ. वि. भि. कोलते, कुलगुरू नागपूर विद्यापीठ यांनी प्रस्तावना लिहिल्याबद्दल त्यांचे जितके उपकार मानावे तितकेच थोडेच आहेत. विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष, नामवंत साहित्यिक, प्राध्यापक वामन कृष्ण चोरघडे यांनी हे पुस्तक वाचून त्याची भलामण केली. त्यांचेहि मी अतिशय आभार मानतो.

या पुस्तकाचे मुद्रण, सजावट व प्रकाशन इत्यादी सर्व जबाबदारी माझे मित्र श्री म. वा. चिचवडकर यांनी ध्येयवादी दृष्टीने आपल्या अंगावर घेण्याचे साहस केल्याबद्दल त्यांना धन्यवाद !


शेवटी "नेटके लिहिता येना । वाचिता चुकतो सदा । अर्थ तो सांगता येना । बुद्धी दे रघुनायका ।।" अशी समर्थांच्या शब्दात प्रार्थना करतो.

अगत्य असो द्यावे. ही विनंती.

नागपूर
१ जानेवारी १९७२

भा. त्र्यं. परांजपे

# युद्धाचा वंशवृक्ष


युद्ध
रूढ
( Conventional )
विशिष्ठ
( unconventional )
साधारण
( General )
सीमित
( Limited )
स्थानिक
( Local )
सर्वंकष
( Total )
( या सर्व युध्द प्रकारात गनीमी तंत्राचा उपयोग होतो )
लष्करी ( गरम युध्द )
( Military Operation )
थंडे युध्द
( Non Military – Cold war )
सहोत्थायी
( Partisans )
क्रांती
( Revolution )
यादवी
( Civil )
बंड
( Mutiny )
विशेष सैनिकी
( Special Forces )
( या सर्व युध्द प्रकारात गनीमी तंत्राचा उपयोग होतो )
आर्थिक – वर्गकलह
राजकीय – पक्षीय
मानसिक – बुध्दीभेद ( इझम )
उत्पात, विध्वंस
किसान, कामगार
ठराव, बिले, निषेध, दडपणे
निवडणुकी
मताधिक्य
दहशत लुटालूट खून
(यात गनिमी तंत्र येते)
संप बंद,
घेराव, धरणें
विशिष्ठ – खरे अथवा काल्पनिक हक्क
करबंदी वगैरे
प्रचार – खरा, खोटा
गुप्त वा उघड
मानसिक दडपण
( Brain washing, Indoctrination )
विशिष्ठ मतप्रणालींची
बीज केंद्रे – Cells

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१९७८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# अथातो युद्ध जिज्ञासा !

"Peace or successful waging of Armed Conflict does not hinge on Government agencies alone"

C. Dale - Fuller
( - International Relations )

"If you want peace understand War"- *Liddle Hart.*

मनुष्य प्राणी आहे तसाच, त्रिगुणात्मक आहे तोपर्यंत, म्हणजे त्याच्यातील तमाचे संपूर्ण उच्चाटन होऊन तो फक्त सात्विक आणि राजस असा शिल्लक उरत नाही तोपर्यंत, संघर्ष–युद्ध अटळ आहे. मोठ मोठ्या तत्ववेत्त्यांना, धर्म संस्थापकांना, साधु संतांनाहि युद्ध करावे लागते. बुद्धधर्म संस्थापक गौतम बुध्दाला माराशी अविरत युद्ध करावे लागले. बौद्ध वाङमयात या युद्धांची रसभरित वर्णने दिलेली आहेत. "रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग" असे म्हणण्याचा तुकारामासारख्या संतश्रेष्ठावरही प्रसंग आला होता. अर्थात ही युद्धे सर्वार्थाने वेगळी होती. परंतु सामान्यांची युध्दे रक्तपात विरहित असू शकत नाहीत. श्रीकृष्णानी मोहवश अर्जुनाला शेवटी रक्तलांछित युध्दाचेच त्याचे कर्तव्य पटवून दिले. "तू सांगशील ते करीन" असे अर्जुनाने वचन देताच कृष्णाने एक अक्षरही जास्त सांगितले नाही. गीता तेथेच संपली. कारण युध्द हेच गीतेचे प्रयोजन आहे

धर्माकरिता, अन्यायाच्या प्रतिकाराकरिता, नीतीच्या प्रतिष्ठेकरिता, हक्काच्या रक्षणाकरिता, स्वातंत्र्याकरिता युध्द आवश्यक असते. युध्द आणि शांतता या दोन परस्पर विरोधी अवस्था आहेत. शांतता हे प्राणिमात्राचे अंतिम आणि सर्वकालीन ध्येय आहे. शांती मुक्ती इतकीच बहुमोल आहे. परंतु कोणी व्यक्तिशः 'मुक्त' झाले असले; तरी शाश्वत शांती, सार्वत्रिक शांती कोणालाहि साध्य झाली नाही. टिकवून धरता आली नाही. शांती आणि युध्द परस्परविरोधी आणि कॅव्हाही एकत्र नांदू न शकणारी असली, तरी काट्याने काटा काढावा तद्वत्, अशांतता मोडून शांतता प्रस्थापित करण्याकरता, युध्दच करावे लागते. आणि युध्द बंद करण्याकरताहि युध्दच करावे लागते. War to end War, या दृष्ट चक्रात जग कायमचे गुरफटून गटंगळ्या खात आहे. त्यातून सोडवणूक शक्य नाही.

कोणतीही आणि कितीही राक्षसी महत्वाकांक्षा बाळगणारी व्यक्ती, व्यक्ती समूह किंवा विस्तारवादी देश शांती नको असे कधीच म्हणत नाही- म्हणणार नाही. आपले ईप्सित युध्दाशिवाय, शांती न विघडता साध्य झाले; तर ते प्रत्येकालाच हवे असते. जय्यत तयारी आणि जयाची खात्री असली, तरीही अन्य मार्गांनें इच्छा पूर्तीची शक्यता नसेल, तरच कोणीही युध्दाला उभा राहील. कित्येक वेळी नुसत्या आवेशानेहि कार्यभाग होऊ शकतो. परंतु हे नेहमी घडत नाही. युध्द हाच अखेरचा उपाय ठरतो. केवळ युध्दाकरिताच युध्द झाल्याचा इतिहासात दाखला नाही. युद्धाचे निर्णायक कारण म्हणजे प्रतिकार. तो जर झाला नाही तर युद्ध होणार नाही. जर्मन लष्करी-तज्ञ लेखक- क्लॉट्विट्झ म्हणतो "War is the continuation of the policy of a nation by other means." देशाची राजनीती आपल्या इच्छेनुसार रेटीत नेण्याचा युद्ध हा दुसरा मार्ग असतो. साम, दाम, भेद इत्यादी चालेनासे झाले तर 'दंड' म्हणजे युद्ध हा एकच उपाय राहतो. 'War is a Biological necessity' युद्ध ही प्राणिशास्त्राची गरज आहे. म्हणजे अफाट मनुष्य संख्येला मर्यादा घालण्याकरता युद्धातील मनुष्य संहार अवश्य असतो. असेहि म्हटले जाते. ते काहीहि असले, तरी युद्ध अटळ असते. कोणतिही व्यक्ति अथवा संस्था युद्ध कायमचे बंद करू शकणार नाही. युध्दाला पर्याय आणि त्यावरील उपायही युद्धच आहे.

ब्रिटिशांच्या अंमलाखालील १८५८ ते १९४७ या एकूण नव्वद म्हणजे जवळ जवळ एका शतकाच्या पारतंत्र्याच्या काळात भारतीयांच्या होऊन गेलेल्या पिढ्यांना क्षात्रवृत्तीचा किंचित्‌ही परिचय होऊ न देण्याची आपल्या राज्य- कर्त्यांची कसोशीची खटपट होती. त्यांच्या सेवेत राबणारी काळी हिंदी फौज हा त्याला अपवाद होता. ती सशस्त्र होती. तरी देखील ती गोऱ्या सैन्यापेक्षा निकृष्ट राखण्याची त्यांनी खबरदारी घेतली होती. ती आपल्या साम्राज्य-तृष्णे- करता त्यानी राबवून घेतली. हिंदुस्थानच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी ब्रिटिश राज्यकर्त्यांवर होती. त्या काळांत हिंदुस्थानवर कोणतेहि परदेशी संकट आले नाही. हिंदी जनता निर्धास्त होती. या काळात इंग्रजी साम्राज्याची चढती कमान होती. त्याच्याकडे वक्रदृष्टीने कोणीही पाहू शकत नव्हता. हिंदुस्थान वरील ब्रिटिश अधिसत्तेला 'ईश्वरी कृपा' मानणारे काही महाभाग सुरुवातीच्या काळात निर्माण झाले होते. हातातली तलवार जाऊन कानावरची कारकुनी लेखणी मोठया दिमाखाने मिरवू लागली. (अजूनही हा वारसा चालूच आहे.)

पहिल्या महायुद्धाचे वेळी एका जर्मन पाणबुडीने (**एमडेन**) हिंदुस्थानच्या किनाऱ्याला एक धावती भेट दिल्यामुळे, आणि युद्ध मेसेपोटेमियात येऊन येऊन पोहचल्यावर काही लोकांना हिंदुस्थानवर परचक्र येण्याची भीती व शंका वाटू लागली. परंतु ती व्यर्थ ठरली. अ पले इंग्रज मालक फार दूरदर्शी मुत्सद्दी होते. हिंदुस्थानचे रक्षण मध्य पूर्वेत सुरु होते. Defence of India begins

in the Middle East ) हे त्यांनी आधीच हेरून ठेवले होते. मध्य पूर्वेतच लढाई देऊन त्यांनी हिंदुस्थानचे रक्षण केले. म्हणून त्या वेळी आम्हाला युद्धाची ओळख झाली नाही. दुसऱ्या महायुद्धाचे वेळी हिंदुस्थानच्या सरहद्दीच्या आंत आसाममध्ये युद्ध आले होते. तरी ते घनदाट अरण्यात झाल्यामुळे लोकांना ते समजले नाही व जाणवलेहि नाही. दोन्ही महायुद्धांचे वेळी त्यात प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या सैनिकांशिवाय दुसऱ्या कोणासही युद्धाचा परिचय झाला नाही. दोन्ही महायुद्धात आम्हाला कळले, दिसले, अनुभवावे लागले ते म्हणजे 'रंग्रुट भरती', 'अनेक प्रकारच्या नोकऱ्यांची संधी', 'थोडी महागाई' आणि 'काही आवश्यक वस्तूंची टंचाई'. याशिवाय आम्हाला कोणत्याही प्रकाराने युद्ध जाणवले नाही; आणि समजलेही नाही.

परंतु आपल्या स्वातंत्र्याच्या उषःकालीच पाकिस्तानने काश्मीरवर आक्रमण करुन युद्ध आपल्या घरात आणले. नंतर चीनने आक्रमण केले व पाकिस्तानने आपल्याशी दुसरे युद्ध केले. परंतु ही युध्दे स्थानिक (Localised) होती. त्या युध्दात काश्मीरी जनता, आसामातील गौंहत्ती विभागातील घबराट आणि पंजाब सरहद्दीवरील आपल्या पंजाबी बांधवांना दिसलेले थोडेसे युध्दाचे स्वरुप, या व्यतिरिक्त युध्द समजण्यासारखे काहीहि घडले नाही. तात्पर्य हेच की युद्धात भाग घेणाऱ्या सैनिकांशिवाय इतर कोणालाहि युद्धाची ओळख वा जाणीव झाली नाही. एका शतकाच्या शांतीनंतर आपल्या स्वातंत्र्याच्या गेल्या तेवीस वर्षाच्या काळात पाकिस्तान आणि चीन यांच्याशी झालेली युद्धे इष्टापत्तीच ठरली आहेत. कारण स्वातंत्र्य प्राप्तीच्या आनंदात अतिरेकी, अदूरदृष्टी, अहिंसावादी श्रेष्ठींना सैन्याची गरज वाटेनाशी झाली होती. मिळालेले स्वातंत्र्य अहिंसक सत्याग्रहानेच मिळाले असल्याच्या त्यांच्या आत्मसंतुष्ठ, फसव्या आणि खोटया कैफात ते दंग होते. स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवाच्या सोहाळयात इतर मनोरंजनाच्या प्रकारासारखा फक्त 'सलामी' करताच सैन्याचा उपयोग यापेक्षा सैन्याची जास्त मातब्बरी आणि महत्व त्याना वाटेनासे झाले होते. परंतु हा भ्रमनिरास होण्यास पाकिस्तानच्या आक्रमणाने सुरुवात करुन दिली. आणि अहिंसेचा कैफ उतरविण्यास मदत केली. परंतु भल्याभल्यांनाहि अजून युद्धाचा समज व उमज पडला नाही ही खरोखरीच मोठी चिंतास्पद स्थिती आहे. युद्ध समजले नाही; तर ते यशस्वीपणे लढता येणार नाही. आणि फलस्वरुप देशाचे संरक्षणही होऊ शकणार नाही,

पाकिस्तान आणि चीन यांच्याशी झालेली आपली युद्धे संपली नाहीत. ती तूर्त स्थगित झाली आहेत. पाकिस्तानने काश्मीरचा गिळलेला आपला भाग, जो पर्यंत आपण परत घेत नाहीं; आणि आजपर्यंतचे सर्व करार, अटी, समझौते त्याला तंतोतंत पाळायला लावले जात नाहीत; तसेच चीनने हस्तगत केलेली आपली 'इंचइंच भूमी'–मग तेथे गवताची काडी उगवो अथवा न उगवो–आपण

त्याचेपासून हिसकावून घेऊन, त्याला त्याच्या सरहद्दीच्या आंत पिटाळून लावीत नाहीं तोपर्यंत ही युद्धे चालूच राहणार आहेत. आपल्या तशाच 'सरकारी घोषणा' आहेत. आपले राज्यकर्ते 'वचनबद्ध' आहेत. आपण शांती करता कितीही आतुर झालो, तरी याशिवाय ती आपणास मिळणार नाही. या प्रकारणाच्या शिरोभागी उद्धृत केलेल्या लिडल हार्ट याच्या सुभाषिताप्रमाणे शांततेकरता युद्ध समजून घेतले पाहिजे. व्याकरण शिकल्याने हे शुद्ध कां ? व हे अशुद्ध कां ? हे जसे समजते; तसे युद्ध समजाऊन घेतल्याने हे श्रेय (स्वातंत्र्य) का व ते (पारतंत्र्य) घृणास्पद का हे समजेल. कारण युद्धानेच स्वातंत्र्य मिळत असते व मिळालेले स्वातंत्र्य युद्धानेच टिकते. म्हणून प्रत्येकाने युद्धाची ओळख करून घेतली पाहिजे. युद्ध हा फक्त सैनिकांचाच विषय राहिलेला नाही.

युद्ध हे शास्त्र आहे की कला आहे असाहि एक तात्विक वाद आहे. शास्त्राचा हेतू ज्ञान मिळविणे, जुने सिद्धांत पडताळून पाहून नवे सिद्धांत काढणे असा प्रगतीपर असतो. निर्भेळ आनंद, सत्यं, शिवं, सुंदरम् यांचा साक्षात्कार, उत्कट भावनांचा आविष्कार आणि अंतर्मनाचा उत्कर्ष हा कलेचा हेतु असतो. कला निर्हेतुक असून 'कले करताच कला' असेहि म्हटले जाते. युद्ध हे शास्त्र असो वा नसो; शास्त्रीय ज्ञान, विज्ञान युद्धाला फार उपयुक्त ठरले आहे. इतकेच नव्हे तर सर्व वैज्ञानिक शोध युद्धाकरताच लावले गेले आहेत असेहि म्हणता येईल. उदाहरणार्थ, अणुबाँबचा शोध. अणुपरमाणुंच्या स्फोटाने कल्पनातीत संहारशक्ती निर्माण करता येते हे सिद्ध झाल्यावरोबर त्याचा प्रथम प्रयोग दुसऱ्या महायुद्धात केला गेला. किंबहुना केवळ युद्धाकरिताच अणुशक्तीचा शोध झाला. अणुशक्तीच्या उपकारी सामर्थ्याची भाषा ( नुसतीच भाषा–एका पेक्षा एक वरचढ असे अण्वस्त्र बनविण्याची शर्यंत चालू आहे ) नंतर सुरु झाली. हिंदुस्थानही अणुशक्ती निर्माण करु शकतो. परंतु "तिचा उपयोग फक्त 'अहिंसक' गोष्टी करताच आम्ही करुं. आक्रमणाकरता नव्हे; तर स्वसंरक्षणा-करताही आम्ही कालत्रयी करणार नाही" अशी अनाहूत आणि अकारण दवंडी आम्ही पिटीत असतो.

युद्धाची–मग ते शास्त्र असो अथवा कला असो–कांही मूलतत्त्वे आहेत, सिध्दांत आहेत आणि प्रमेये आहेत. परंतु ती दोन आणि दोन चार अशी गणिती व अपरिवर्तनीय नाहीत. विज्ञानाच्या प्रगती बरोबर परिस्थित्यनुरुप, मुल-तत्वांना धरुनच त्याच्या उपयोगाच्या पद्धतीत डोळसपणाने बदल करावा लागतो. हे भारतीय राज्यकर्त्यांनी आणि सेनापतींनी ओळखले नव्हते. म्हणून परकीय आक्रमणांची आणि त्यात झालेल्या आपल्या पराभवांची परंपरा सुरु झाली व शेवटी तिचे पर्यवसान ब्रिटिशांच्या गुलामगिरीत झाले. युद्ध तत्वांचा वापर तर्कशास्त्राला धरुन, मानसशास्त्राच्या अनुरोधाने, आणि पूर्वानुभवाच्या भांडवलावर शांत आणि स्थिर चित्ताने व सूत्रबद्ध पद्धतीने करावयाचा असतो.

लढाईच्या धुमश्चक्रीत मशीनगन्स्, तोफा, रणगाडे यांच्या हलकल्लोळात, आगीच्या मुसळधार पावसात, भोवती रक्ताचे पाट वाहत असतांना, पडणाऱ्या प्रेतांचे रक्त दिसत असतांना, जखमी सैनिकांचा आर्त आक्रोश हृदयाचे पाणी करीत असतांना, कित्येक तासातच नव्हे, तर प्रसंगी दिवसातही, अन्नाचा कण किंवा पाण्याचा थेंबही पोटात गेला नसतांना, यत्किंचितही विश्रांती मिळालेली नसतांना, अत्यंत हाल अपेष्टा, किमान गरजांच्याहि पूर्ण अभावात, शरीरावर आणि मनावर असह्य ताण आणि जबरदस्त जबाबदारीचे अहोरात्र दडपण असताना, निर्णय घेणे, योजना आखण, आदेश देणे, मिळालेले आदेश तंतोतंत पाळणे, या करता चित्ताचा किती समतोल लागत असेल याची दुसऱ्या कोणालाहि कल्पना येणे शक्य नाही. यापेक्षा 'स्थितप्रज्ञता' दुसरी कोणती ? आणि 'योग' तरी दुसरा कोणता? घाईने, अदूरदृष्टीने, अविचाराने आणि अजाणता घडलेल्या क्षुल्लक प्रमादाचे दुष्परिणाम फार दूर पोहोचतात. त्याने दुसऱ्या योजना उधळल्या जातात, पराभव होतो, देशाच्या नरडीलाही नख लागू शकते.

युद्ध समजण्याकरता ते शास्त्र आहे की कला आहे हा काथ्याकूट निरर्थक आहे. निशाणबाजीच्या जागतिक स्पर्धेत अजिंक्य ठरलेला, स्पर्धक उत्तम सैनिक ठरेल असे नाही. तसेच जेमतेम निशाण मारणारा सैनिक कुचकामाचा असतो असेही नाही. 'संगीनी लढाईच्या कलेतील' ( Art of Bayonet fighting ) तरबेज जवान प्रत्यक्ष हातघाईच्या बेहोशीच्या अवस्थेत शत्रूच्या छाताडात आपली संगीन 'कलात्मक' रीतीने खुपशीत असेल काय ? एखादा गायक गात असलेल्या रागाचा स्वर-विस्तार मोठ्या कौशल्याने आणि कलात्मक रीतीने करीत असतो. परंतु त्याला ठराविक मात्रांनी समेवर यावेच लागते. त्याचा ताल चुकला तर त्याच्या कलेचे 'कलेवर' होते. शास्त्र आणि कला दोन्हीही स्वैर असू शकत नाहीत. तरीपण त्यांना नवे प्रयोग करता येतात. प्रगतीचा अथवा परागतीचा आढावा घेता येतो. चुका दुरुस्त करून पुन: प्रयोग करता येतात. परंतु हे युद्धाला लागू पडत नाही. युद्धाचे सर्व शिक्षण आणि ज्ञान व युद्ध सदृश कृत्रिम परंतु बिनधोक परिस्थितीत केलेला अभ्यास व सराव या सर्वांचे प्रयोग व परीक्षा एकाच ठिकाणी एकदमच होत असते. ते ठिकाण रणभूमी हे होय. एका लढाईत तो जिवंत राहून धडधाकट राहिला आणि दुसऱ्या लढाईत लढू शकला तरच त्याला आपले ज्ञान पुन: कसोटीला लाऊन पाहता येईल. पुष्कळ वेळा उर्वरित हयातभरही त्याला दुसरी संधी मिळत नाही. शांततेचा कालखंड दीर्घ असला आणि देश युद्धात उतरला नाही, तर त्या देशाच्या सैनिकांच्या कित्येक पिढ्यांनाहि युध्दाचे प्रयोग करता येणार नाहीत आणि त्यांची परीक्षाही होणार नाही, आणि म्हणूनच देशाचे सैन्य प्रशिक्षित, सुसज्ज, अद्ययावत, आणि अहोरात्र जय्यत तयार असले पाहिजे. बेसावधपणा, बेफिकीर

वृत्ती किंवा स्वप्नरंजन हा आत्मघात होईल. आत्मघात हा गुन्हा असला तरी आत्मघातक्याला त्याच्या गुन्ह्याची शिक्षा होत नाही. कारण शिक्षा भोगायला तो शिल्लकच नसतो. तरीपण त्याच्या गुन्ह्याचे दुष्परिणाम इतर अनेकास भोगावे लागतात. व्यक्तीच्या आत्मघातापेक्षा आत्मसंतुष्टता व स्वप्नरंजन यांच्यामुळे होणारा देशाचा घात, जगातील सर्व गुन्ह्यात मोठा गुन्हा होईल.

विज्ञानाच्या प्रगतीबरोबर युध्दे अधिकाधिक संहारकारी होत आहेत. आणि आता युध्द सर्वस्पर्शी, सर्वंकष (Total War) होणाच्या शेवटच्या टप्यावर येऊन पोहोचले आहे. या प्रकारच्या युध्दात कोणत्याहि बाबीवर कोणतीही मर्यादा असू शकत नाही. त्यात वर्ज्यावर्ज्य, युक्तायुक्त असे काहीही नसते. आता पर्यंतच्या युध्दात तटस्थ आणि अलिप्त देशांना तोशीस लागली नाही. त्यांना स्वसंरक्षणाची विशेष व्यवस्था करावी लागली नाही. इतकेंच नव्हे तर युध्दयमान देशांनाहि आप आपल्या सर्व प्रकारच्या साधन संपत्तीचा आणि सामर्थ्याचा निकराचा उपयोग (All out effort) करावा लागला नाही. कारण त्यांचे स्वरुप व परिणाम मर्यादित होते. त्या देशांच्या जीवन मरणाचा अखेरचा असा प्रसंग उभा राहिलेला नसे. परंतु आता परस्परांच्या सर्वनाशाकरताच सर्वंकष युध्द लढले जाईल. (Total War for Total Destruction)

आता राष्ट्राराष्ट्रांत रक्तलांछित युध्दाव्यतिरिक्त एक नवा अहिंसक थंडचा युद्धाचा (Cold War) पर्याय उपलब्ध झालेला आहे. पूर्वीप्रमाणे आता युद्ध पुकारावे लागत नाही. ते एकदमच सुरु होते. थंडे युद्धही पुकारले जात नाही. रक्तलांछित (गरम) युद्धाचे परिणाम तावडतोब आणि उघड दिसतात. थंडे युध्द सुरु झाल्याचे समजण्याला बराच वेळ लागतो व त्याचे चर्मचक्षूला दिसणारे परिणाम होत नाहीत. थंडचा युध्दातली आणि गरम युध्दातली परस्पर शत्रूंची मर्मस्थाने आणि 'लक्ष्य' अगदी वेगळाली असतात. थंडचा युध्दाचा येवढाच उल्लेख येथे पुरा होईल.

सर्वंकष युध्दात सर्वनाश (शत्रूचा) आणि संपूर्ण जय (स्वत:चा) अनुस्यूत असतो. शत्रूचा सर्वनाश (Total Destruction) झाला. तरी पुरत नाही. जेत्याला स्वत: करता संपूर्ण विजय (Total Victory) हवा असतो सर्व साधारण युध्दात जय मिळालेल्या पक्षालाहि आपल्या जयाची जबरदस्त किंमत द्यावी लागते आणि त्यालाहि युध्द-पूर्व स्थितीत परत येण्याला कष्ट पडतात आणि त्यात काही काळही जात असतो. आणि असे होईपयंत जागतिक राजकारणाला निराळीच कलाटणी मिळत असते. राजकारणाचा प्रवाह संथ आणि ठराविक मर्यादांनी आखलेल्या मार्गाने कधीच वाहत नाही. गेल्या महा-युध्दात, दोस्तांपैकी इंग्लंडला मिळालेला जय भयंकर महाग पडला. त्याची अंतर्गत आर्थिक आणि औद्योगिक सुदृढता भंग पावली. इतकेच नव्हे, तर

ब्रिटिश साम्राज्य, राष्ट्रकुटुंबाच्या खालच्या पातळीवर आदळले. याच्या तुलनेत अमेरिकेला हा जय निराळ्या दृष्टीने मानवला. तिला दुसऱ्या छोटया देशांच्या अंतर्गत व्यवहारात तोंड खुपसून ढवळाढवळ करण्याची संधी मिळाली. पराजित आणि दुभंगलेला जर्मनी आणि आता जपान सामरिक सामर्थ्याच्या बरोबरी व्यतिरिक्त दुसऱ्या क्षेत्रातही पूर्वी सारखेच बलवान झाले. दुसऱ्या महायुध्दात जर्मनी आणि जपान यांचा सर्वनाश (Total Destruction) झाला नाही. आणि जेत्या ग्रेट ब्रिटनला संपूर्ण विजय ( Total Victory) मिळाला नाही.

सर्वंकष युध्दात सूक्तासूक्त वर्ज्यावर्ज्य असे काहीच राहणार नसले तरी तशा अधर्म–युध्दाची सुरुवात दुसऱ्या महायुध्दात अमेरिकेने केली. व सर्वंकष युध्दाची एक 'झलक' दाखवून दिली. जपान मधील हिरोशीमा आणि नागासाकी या बिनलष्करी 'लक्ष्या'वर अणुबॉंब टाकून जो विध्वंस केला गेला तो एक प्राथमिक नमूनाच होता. आता त्याच्या सहस्त्रावधी पट भयंकर अशा संहारकारी शस्त्रांचे मोठे देश साठे (Stock Pile) करीत आहेत आणि नवी नवी शस्त्रे निर्माण करण्याची शर्यत खेळत आहेत. पहिल्या महायुध्दात ऱ्हीम्स्च्या प्रार्थना मंदिराचा जर्मनीकडून विध्वंस झाला तेव्हा सर्व जगाने त्याच्यावर शिव्या-शापांचा वर्षाव केला. दुसऱ्या महायुध्दात वैमानिक हल्यामुळे उभय पक्षी अशा गोष्टी घडू लागल्या तेव्हा हे प्रकार अपरिहार्य गणले गेले. हिंदुस्थानातही परधर्मीय आक्रमकांनी आणि नंतर येथेच स्थाईक होऊन तख्त-नशीन झालेल्या परधर्मीयांनी हिंदूंची मंदिरे आणि पवित्र स्थाने उध्वस्त केली. परंतु तो युध्दाचा भाग नसून ते धर्मवेडाचे थैमान होते.

परस्पर शत्रूविषयी द्वेष व घृणा उत्पन्न करण्याकरता अपप्रचाराची पराकाष्ठा करणे, त्याला दुष्ट, पतित, पातकी आणि मानवतेचा मारेकरी असा रंगविणे हे एक नवे तंत्र आता युद्धात सुरु झाले आहे. शत्रूने, जगातील सर्व सत्य, न्याय, नीती, यांचा बेगुमान विध्वंस करण्याचे षड्यंत्र रचले आहे; म्हणून केवळ कर्तव्यदृष्टीनें आपण हे युद्ध आपल्या अंगावर घेतले आहे आणि शांती प्रस्थापित करण्याकरता आणि युद्ध बंद व्हावे म्हणून (War to end war) आपण लढत आहोत; असा कांगावखोर कंठशोष युद्धयमान राष्ट्रे करीत असतात. जर्मन आर्यवंशच सर्वश्रेष्ठ आहे. म्हणून मानवतेला नीच वंशीयांच्या जुलमी जोखडातून मुक्त करण्यास नियतीने आपणास नियुक्त केले आहे असे हिटलर सांगत असे. युद्धाची अशी उदात्त कारणे आणि हेतू घोषित केल्यावर शत्रूचा पूर्ण निःपात करणे क्रमप्राप्त आहे. आता युद्धात जय होतो तो तथाकथित सत्याचा आणि न्यायाचा जय होत असतो ! पराभूत देश सर्व नैतिक मूल्यांचा शत्रू ठरवून ' गुन्हेगार ' घोषित केला जातो. अर्थात गुन्ह्याला शासन मिळालेच पाहिजे ! विजयी दोस्तांनी पराभूत जर्मनीतल्या सैनिक आणि अधिकाऱ्यांनाच नव्हे तर युद्धाशी काहीहीं संबंध नसणाऱ्या मुत्सद्दी, शास्त्रज्ञ,

विद्वान् आणि साधे नागरीक अशा जर्मनांना **युद्ध गुन्हेगार** म्हणून आपल्याच न्यायासनासमोर खेचून आणून, त्यांना भयंकर शिक्षा ठोठावल्या. हिटलरला जय मिळाला असता तर त्याने काय केले असते ? या प्रश्नाचे उत्तर सहजा–सहजी देता येत नाही. या चित्राशी शिकंदर आणि पोरस यांच्या चित्राची तुलना करण्यासारखी आहे. विजयी शिकंदराने पराजित पोरसला " तुला कसे वागवावे अशी तुझी इच्छा आहे " या विचारलेल्या प्रश्नाला पोरसाने " राजा सारखे " असे उत्तर दिले होते आणि शिकंदराने ते मान्य केले होते. अशी कथा आहे.

युद्ध करावे लागले तर ते आपल्या देशाच्या सरहद्दीच्या आंत, आपल्या भूमीवर होऊं देऊं नये. शत्रुला शक्य तितके दूर थोपवून धरुन, त्याच्याशी झुंज दिली पाहिजे. हे युद्धाचे एक तत्व आहे. पहिल्या महायुद्धाचे वेळी मध्य पूर्वेत लढून हिंदुस्थानच्या ब्रिटिशांनी केलेल्या संरक्षणाचा वर उल्लेख आला आहे. पहिले महायुद्ध संपल्यावर, ब्रिटिशांनी मोठ्या दूर दृष्टीने सिंगापूरचा आरमारी तळ उभारुन, शत्रूला दूर थोपवून धरण्याची योजना करुन ठेवली होती. परंतु दुसऱ्या महायुद्धात ही योजना अयशस्वी ठरली; हा भाग वेगळा. प्रत्येकाची प्रत्येक योजना नेहमीच यशस्वी ठरत नसते. १९४७ मधे आपण स्वतंत्र झाल्यावर आता पर्यंत आपली तीन युद्धे झाली. व ही तिन्ही तूर्त स्थगित झालेली युद्धे, आणि पुढील सर्व युद्धे, आपल्या भूमीवर लढली जाणार आहेत. आणि आपल्या सरहद्दीची **लक्ष्मणरेषा** आम्ही केंव्हाही ओलांडणार नाही. परंतु त्याने आपल्या देशाचे सर्वोत्तम संरक्षण होणार नाही. हल्ला हाच सर्वोत्तम बचाव ' असतो Attack is the best Defence हे युद्धाचे तत्व आम्ही व्यवहारात आणणार नाही. हल्ला, आक्रमण हे आमचे ब्रीद नाही ! आम्ही हल्ला केलाच तर शत्रू आमच्या हद्दीत घुसल्यावर; आणि तो आमच्या भूमीवर उभा असेल तेंव्हाच करुं. त्याचा पराभव झाल्यावर त्याला जे आम्ही पिटाळून लाऊ, ते देशाच्या वेशीपर्यंतच. त्याचा पाठलाग आम्हाला वर्ज आहे. हेच राजकारण आणि हीच मुत्सद्देगिरी आमच्या देशात चालू राहील, तो पर्यंत, युद्धाच्या तत्वानुसार आमचे ' सर्वोत्तम संरक्षण ' आम्ही करुं शकणार नाही,

आपल्याला 'आक्रमक-कृत्य' (offensive action) करावयाचे नसले तरी किमान पक्षी आक्रमक दृष्टी ( offensive out look ) निर्माण करुन ती अंगात–मनात बाणवली पाहिजे. त्या शिवाय 'लढाऊ वृत्ती' ( offensive spirit ) उत्पन्न होणार नाही. पारतंत्र्याच्या काळात ही दृष्टी व वृत्ती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्यात आली होती. त्यातूनही काही उरली, ती पुढे अहिंसेच्या अवास्तव आणि अप्रयोजक पूजेमुळे लुप्त झाली. पाकिस्तान आणि चीन या आमच्या अकारण शत्रूंनी आमच्यावर आक्रमणे करुन आम्हाला डिवचले असले, तरी आम्ही पूर्ण जागे झालो आहोत; असे म्हणता येत नाही.

आम्हालाहि शांतताच–खरी शांतताच हवी आहे. आमच्या ओठात एक व पोटात एक असे दुटप्पी नाही. आम्हाला जी शांतता हवी आहे ती विजयी शांतता ( Victorious peace ) हवी आहे. नुसती नेभळट, कर्तव्यशून्य मुर्दाड स्मशान शांतता नको आहे. काही मदोन्मत्त देशांना आपल्या 'इझम'च्या प्रसाराकरता गनीमी युद्धापासून तो सर्वंकष युद्धापर्यंत 'विजयी युद्धे' ( Victorious war ) लढावयाची महत्वाकांक्षा आहे. हे हरघडीला आज दिसते आहे. आम्हाला युद्ध उकरुन काढावयाचे नाही. आक्रमण करावयाचे नाही. कोणत्याही 'गटात' सामिल व्हायचे नाही. म्हणूनच आम्ही स्वयंसिद्ध, समर्थ आणि बलवान बनले पाहिजे. तरच आमच्याविषयी धाक उत्पन्न होईल. शांततेचे कालखंड अल्पकालीन अथवा दीर्घकालीन ठरणे, हे परस्परांविषयी शंका, धाक आणि भीती, यावर अवलंबून असते. जितके सामर्थ्य अधिक तितका धाक अधिक; आणि जितका धाक अधिक तितका शांततेचा कालखंड प्रदीर्घ. असे या तिहीचे विचित्र परस्पर संबंध आहेत. असे जरी असले तरी युद्धाचा भडका केंव्हा, कोठे आणि कसा उडेल, हे कोणी सांगू शकणार नाही. जागतिक परिस्थिती इतकी भयंकर स्फोटक झालेली आहे. युद्ध झाले तर ते सध्या चालू असलेल्या काही स्थानिक आणि मर्यादित युध्दा–सारखे असणार नाही. किंवा ठिकठिकाणच्या चालू युध्दातूनही पुढचें महा–भयंकर युध्द निर्माण होण्याची संभाव्यता दृष्टीआड करता येत नाही.

आधुनिक शस्त्रास्त्रांचीं आणि युध्दसहित्याची माहिती, युध्दाच्या मूलतत्वांचा परिचय, डावपेंच व लष्करी हालचाली, लष्करी इतिहास, भूगोल भौगोलिक राज्यशास्त्र ( Geo-Politics ) देशाचे सामरिक सामर्थ्यं ( War Potential ) आणि मनुष्यबळ, औद्योगिक आणि वैज्ञानिक प्रगति आर्थिक मजबुती, परराष्ट्रीय सबंध आणि राजकारण, वांशिक, धार्मिक, आणि सांस्कृतीक मूल्यांवर आधारित असलेले भेदाभेद, इत्यादी अनेक दृष्टीकोनातून युध्द समजाऊन घेता येते. आणि ते समजावून घेण्याची निकड अधिकाधिक वाढते आहे. कारण आता युध्दाच्या परिणामातून कोणीही बचाऊ शकत नाही. आता युध्दे सैन्या–सैन्यातली नसतात. ती देशातील यच्चयावत् नागरिकांत असतात. मग तो नागरिक शस्त्रधारी व गणवेशधारी असो वा नसो. विद्वान, विचारवंत, शास्त्रज्ञ, कलावंत, मुत्सद्दी, प्रशासक, यांचेपासून तो सामान्य नागरिकापर्यंत प्रत्येकाला युध्दाचा 'अर्थ' कळणे आवश्यक झाले आहे. धैर्य, वीर्य, साहस, कष्ट, अपेष्टा, त्याग, कर्तव्यबुध्दि या गोष्टी प्रत्येक स्तरावरील नागरिकापासून अपेक्षित आहेत. असे तयार नागरिक असण्यावरच त्या देशाचे संरक्षण आणि स्वातंत्र्य निर्भर राहील. परंतु हे सर्व एका रात्रीतून उत्पन्न होऊ शकत नाही. ही एक 'तपस्या' आहे. साधना आहे. ती साध्य होण्याकरता युध्दाची प्रत्येक नागरिकात जिज्ञासा उत्पन्न झाली पाहिजे. ती प्रज्वलित करुन

शक्य तितक्या बाजूने युध्द समजून घेतले गेले पाहिजे. त्याकरता एक सोपा हमखास आणि अनिवार्य उपाय म्हणजे लहानापासून थोरापर्यंत प्रत्येकाला त्याच्या ( आणि तिच्या ) शक्तीनुसार वयाच्या काही विशिष्ट कालात निरनिराळ्या स्तराप्रमाणे सैनिकी सेवा आवश्यक करून, सैनिकी जीवनाचा परिचय व सराव करविला पाहिजे. अमेरिकेसारख्या महाबलाढ्य देशातही प्रत्येक नागरिकाला विशिष्ट सैनिकी–सेवा आवश्यक केली गेली आहे. आपल्याही देशात तसे करून प्रत्येक नागरिकाला युध्द समजण्याची व संकट–समयी देश रक्षणासाठी तयार राहण्याची संधी दिली गेली पाहिजे. तरच आपल्याला विजयी शांतता ( Victorious Peace ) प्राप्त होऊ शकेल. लिडल हार्ट च्या, या प्रकरणाच्या शिरोभागी उध्दृत् केलेल्या " शांती हवी असेल तर युध्द समजाऊन घ्या " If you want **Peace** understand **War** या वचनाचे मर्म ध्यानात घेऊन युध्द म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे.

---

# राजकारण आणि संरक्षण

**हे धूर्तपणाची कामे राजकारण करावे नेमे। ढीलेपणाच्या संभ्रमे जाऊ नये ॥**

**— समर्थ रामदास**

युध्दाचे मुख्य प्रकार दोन आहेत. एक रूढ प्रकार ( Conventional war )आणि दुसरा विशिष्ट (unconventional war) प्रकार. रुढ प्रकारात व्याप्तीनुरुप तीन भेद आहेत. एक सर्वसाधारण युध्द, ( General war ) म्हणजे महा-युध्द, ज्यात अनेक देश भाग घेतात. दुसरे सीमित युध्द ( limited war ) उदाहरणार्थ अरब–इस्त्रायल युध्द. आणि तिसरे स्थानिक ( local war ) युध्द जसे काश्मीर बाबतीतले हिंद—पाक युध्द. विशिष्ट प्रकारात आता सर्वंकष ( Total war ) युध्द हा मुख्य प्रकार होणार आहे.

रूढ प्रकारची युध्दे लढली जाण्याचा काळ निश्चित आगाऊ अंदाजता येत नाही. भोवतालच्या राजकीय परिस्थितीवर, व देशांच्या अंतस्थ महत्वाकांक्षेवर युध्द होणे न होणे अवलंबून असते व युध्द चालत राहण्याचा काळ, युध्द्मान देशांच्या सामर्थ्यावर मुख्यत: अवलंबून असतो. यात त्या त्या देशांच्या स्वत:च्या अंतर्गत, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा, निर्णायक भाग असतो. गेल्या महायुध्दात, इटाली आणि जर्मनी, या दोन्ही देशांची अंतर्गत घडी, फारच बिघडून गेलेली होती. सत्तारुढ बलवान पक्षाला आतूनच विरोध होऊ लागला; व्यक्ती पूजेचे माहात्म्य ओसरले; आणि परिणामत:, सामर्थ्यंही क्षीण होत गेल्याने त्याना शरणागती पत्करावी लागली. हे युध्द, कमीत कमी जपान विरूध्द तरी बराच काळ चालेल, असे दोस्तांना वाटत होते, परंतु दोन अणुबाँबच्या फेकीमुळे, युध्द अचानक संपले. ही अणुबाँबफेक रुढ नसून अगदी अनपेक्षित आणि अकल्पित होती. **जपानची शरणागती अप्रतीम मुत्सद्देगिरीची ठरली.**

युरोपांत ‘ सात वर्षाचे ’ ‘ तीस वर्षाचे ’ ‘ शंभर वर्षाचे ’ अशी युध्दे झाली आहेत. पहिले महायुध्द चार वर्षे चालले. दुसरे आठ वर्षे चालले. केवळ अठरा दिवसात अठरा अक्षौहिणी सैन्य गारद होणाऱ्या कौरव–पांडव युध्दा- इतके, थोडया काळात इतकी मनुष्यहत्या झालेले, जगात दुसरे एकही युध्द झालेले नाही. काश्मीर व पाकिस्तानने आक्रमण करून सुरु केलेल्या युध्दाला, आता जवळ जवळ चोवीस वर्षे होत आहेत. ते युध्द अजून संपले नाही. कारण

त्याने बळकावलेला संपूर्ण प्रदेश आपण त्याच्यापासून हिसकाऊन घेतला नाही. तो आपण परत घेणारच; हा आपला निर्धार कायम असल्याने, तो आपण परत आपल्या ताब्यात घेईपर्यंत, हे युद्ध चालू आहे; असे समजावयास पाहिजे. ज्या दिवशी हे आपण करू, त्या दिवशी आपल्याकडून हे युध्द थांबवले जाईल. व नंतर या युध्दाची काल–मर्यादा निश्चित होईल. सारांश हाच, की युध्द पूर्णपणे थांबले; तहनामे करार अटी वगैरे ठरुन, त्यांची अम्मल बजावणी झाली; म्हणजे ते युध्द संपते. परंतु दुसऱ्या एकाद्या युध्दाचे बीजारोपणही तेव्हांच होत असते.

पहिले महायुध्द, 'व्हर्साय'च्या तहाने संपले असले, तरी त्याच तहनाम्याने, आगामी युध्दाचे बीजारोपणही झाले. तहनाम्यावर पराजित देश, सुखासुखी कधीच सही करीत नाही. साधारणपणे तह करणे,हा युध्द थांबविण्याचाही शेवटचा उपाय असतो. इतर सर्व मार्ग बंद झाले, म्हणजे आपले विशिष्ट हेतू तडीस नेण्याकरता निर्वाणीचा उपाय म्हणजे युध्द. हा मुत्सद्देगिरीचा प्रांत असतो.तसेच युद्ध थांबविणे यालाही मुत्सद्देगिरीच लागते.गेले महायुध्द दोन अणुबाँब पडताच जपानने थांबविले, ते जपानचे सर्व सामर्थ्य संपले होते,म्हणून नव्हे तर आपले उरलेले सामर्थ्य, जसे चे तसेच राखले जावे; व पुन: योग्य संधी येताच आपले राजकीय उद्दिष्ट साध्य करण्याकरता, जरूरी प्रमाणे पुन: युध्दाच्या आखाड्यात उतरता यावे, म्हणून जपानने शरणागती पत्करली. गेल्या महायुध्दातल्या तीन राष्ट्रांनी युध्दे संपविली, हत्यारे खाली ठेवली, ती वेगवेगळ्या तीन प्रकारांनी. जर्मनीचा प्रकार अंतस्थ राजकीय परिस्थिती, हिटलरच्या चुका, आणि जर्मनीचा शक्तीक्षय, हा होता, इटालीत सुरूवातीपासूनच जनतेच्याच नव्हे, तर सेनेच्याही मनात उत्साहाचा अभाव, स्वत:च्या सामर्थ्यांच्या चुकीच्या कल्पना, आणी नि:कृष्ट युध्द साहित्य, असा होता. जपानची फार दूरदृष्टीची मुत्सद्देगिरी होती. पैकी इटाली अजूनही जसाच्या तसाच आहे. त्याचा नव्या जोमाचा पुनर्जन्म झालेला नाही. देशाची तोडमोड होऊनही, जर्मनी अतिशय थोड्या वेळात, पुन: शक्तिशाली झाला. आज त्याची लष्करी शक्ति बाहेर दिसत नसली, तरी पूर्वी सारखीच वर्धिष्णू आहे. जपानचे काहीच नुकसान झाले नाही. या उलट ब्रिटिश जेते असूनही त्यांचे साम्राज्य कोसळून पडले. आणि आज जगाच्या मुत्सद्दीपटावर त्याला विशेष महत्वाचे स्थान उरलेले नाही. बिकट प्रसंगी नको ते तह करून आपली सोडवणूक करून घेण्यात फार श्रेष्ठ दर्जाची मुत्सद्देगिरी शिवाजी महाराजांनी लढविली होती. त्यानी तह केले, ते मोडण्याकरताच केले असे म्हणणे भाग आहे, सारांश युध्द सुरू करणे तसेच बंद करणे हा मुत्सद्यांचा प्रांत आहे. प्रत्यक्ष युध्दाची सुरूवात, एकाद्या लहानशा कारणानेही होऊ शकते. परंतु त्याच्या पोटी खोल मुत्सद्देगिरी असते. महाभारतातील उत्तर गोग्रहणाचा प्रसंग, हा कौरवांचा राजकीय डाव होता. पांडवांना अज्ञातवासातून बाहेर काढण्यासाठी, हा गुरे पळविण्याचा प्रकार घडवला गेला. नाही तर त्यात भीष्माचार्यांपासून सर्व मोठ-

मोठे कौरव सेनापती सामिल झाले नसते. मोरोपंतांची या प्रसंगावर एक फार सुंदर आर्या आहे. "तो गुरु, तो गुरु–नंदन, तो कृप, तो कर्ण, तो पितामह रे ।। यांही धेनु वळाव्या, शिव शिव गोपाल रामकृष्ण हरे ।। कौरवांचा तेथे पराजय झाल्याने, पुढच्या युध्दावर काहींच परिणाम झाला नाही. एकाद्या लढाईतल्या पराजयावरून, युध्दाचा अंतिम निर्णय लागत नसतो. आपल्या राजस्थानच्या सीमेशी भिडलेल्या पाकिस्तानकडून, असले 'गोग्रहणाचे' प्रकार केंव्हा केंव्हा होत असतात. आता कोणच्याहि देशाचे, चार दोन सैनिक सीमांवर मारले पकडले गेले तरी तेवढयाने युध्द सुरू होत नाही. युध्द बंद करण्यात तटस्थ राष्ट्रांचाहि हात असतो व त्यात त्या राष्ट्रांनीही मुत्सद्दे गिरीच लढविलेली असते.

आता अनियंत्रित एकमुखी सत्तेचा काळ संपलेला आहे. राजनीती ठरवणे, दुसऱ्या देशांशी तह–करारनामे करणे, आर्थिक धोरण व योजना ठरवणे, संरक्षण व्यवस्था करणे, युध्दाचा निर्णय घेणे, सेनेचे नियंत्रण करणे आणि देशाची युध्द-नीती (War Strategy) ठरविणे, हे लोकशाहीत मंत्रिमंडळ करीत असते. लोकशाही म्हणजे अनियंत्रित सत्ता व अधिकार नाही. आणि लोकशाही म्हणजे पक्षशाही असली, तरी एकच पक्ष नेहमीच सत्ताधिष्टित राहील असे नाही. सत्ताधिष्टित मंत्रीमंडळ जरी युद्धाचे सर्व निर्णय घेते, तरी त्यापैकी कोणालाहि ज्ञान नसते. प्रत्यक्ष युद्धाची कोणालाही कल्पना नसते. युद्ध कोणत्या कारणामुळे का असेना ? ते आपण सुरु केलेले असो, किंवा आपल्यावर लादले गेले असो; हा मोठा गंभीर विषय असतो आणि विशेषत: जर ते अनिच्छेने ओढवले असेल, तर त्याचे गांभीर्य अधिकच होत असते. कारण त्याकरता पूर्वतयारी नसते. आणि एकदा युद्ध सुरू झाल्यावर तयारी करणे अत्यंत कठीण होते.

अत्यंत दूरदर्शी आणि धोरणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या ब्रिटिश सरकार विषयीं एका ब्रिटिश सेनापतीनेच काढलेले उद्‌गार मोठे मार्मिक आहेत दुसऱ्या महायुद्धातल्या सेनापती वेव्हेलच्या संबंधात ते उद्‌गार आहेत. हा ब्रिटिश सेनापती जनरल पर्सिव्हल म्हणतो. "युद्धाच्या सुरुवातीस ब्रिटिश सेनेत, कधीहीं सेनापती-पद मिळू नये. कारण सुरुवातीस इंग्लंडचा हमखास पराभव होतो व पराभवाचे खापर सोईस्कर रीतीने त्या अपेशी सेनापतीच्या डोक्यावर फोडण्यात येते. गेल्या महायुद्धात सुरुवातीस, मोठमोठे ब्रिटिश सेनापती अपेशी ठरले व त्यामुळे त्यांना निवृत्त व्हावे लागले. तयारी झाल्यावर व सर्व गोष्टी जुळून आल्यावर, दुय्यम दर्जाचे सेनापती सर्व मानमरातब मिळवून जातात. सेनापती वेव्हेल असाच एक दुर्दैवी सेनापती आहे. त्याला 'अपेशी' 'नालायक' अशी दूषणे दिली गेली आहेत. रोमेलविरुध्द आणि जपान्याविरुध्द, त्याला माघार घ्यावी लागली; याचे कारण अपूर्ण आणि तुटपुंजी तयारी हे होय. पहिल्या 'लीबियम मोहिमे' नंतर, ग्रीस वरील जर्मन स्वारीकरता, त्याचेकडील तीन डिव्हिजन सैन्य, बहुतेक रणगाडे,आणि आधीच तुटपुंज्या असलेल्या विमान दलातील बहुतेक विमाने काढून

घेण्यात आली होती. दोष सेनापती वेव्हेलचा नसून तो ब्रिटिश सरकारचा होता. कारण सरकारची तयारीच नव्हती." पहिल्या महायुध्दाच्या वेळचे असेच एक उदाहरण आहे. जर्मन सेनापती हिंडेन बुर्गने टॅननबर्गच्या लढाईत रशियाचा न भूतो न भविष्यति असा धुव्वा उडविला होता. नंतर पुढे काही वर्षांनी एका प्रसंगी, एका महिलेने हिंडेन बुर्गला, त्या असाधारण यशाचे सर्व श्रेय कोणाला दिले पाहिजे, असा खोचक प्रश्न विचारला असता,त्या थोर आणि धूर्त सेनापतीने मोठे मार्मिक उत्तर दिले. तो म्हणाला "मादाम! ती लढाई कोणी जिंकली, हे नीटसे सांगता येत नाही. परंतु जर का तेथे जर्मनीचा पराभव झाला असता, तर कोणाला जबाबदार धरले गेले असते हे मात्र मला निश्चित माहीत आहे" या दोन्ही उदाहरणांचा निष्कर्ष हाच आहे की राजनैतिक चुकांमुळे, पूर्व-तयारीच्या अभावामुळे, सेनापतीच्या गरजा योग्म रीतीने न पुरविल्या गेल्यांमुळे, परराष्ट्रीय धोरण आणि युध्द नीती, (War Strategy) सेनाप्रमुखांना विश्वासात घेऊन, त्यांच्या सल्लामसलतीने, न ठरविल्यामुळे पुष्कळ अनवस्था प्रसंग ओढवतात. इतकेच नव्हे तर, युध्द सुरु झाल्यावर सेनेच्या रणभूमीवरील हालचालीं, आणि कामगिरीसारख्या गोष्टीतही, अनाभिज्ञपणे ढवळाढवळ केल्याने, अनर्थकारी आणि नामुष्कीचे प्रसंग ओढवतात.

सामर्थ्यसंपन्न देशाचे लष्करी धोरण आणि राजनैतिक धोरण वेगळे असू शकत नाही. आणि ही दोन्ही धोरणे परस्परपूरक असलेला देशच सामर्थ्यवान बनू शकेल. कारण कोणत्याही राष्ट्राची पत,त्याच्या युध्द सामर्थ्यावरच अवलंबून असते. दुर्बलाबद्दल 'करुणा' वाटली, तरी 'आदर' वाटत नाही. खरे पाहिले असता कोणालाहि कोणाचा खरा आदर कधीच वाटत नसतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात 'आदर' म्हणजे 'भीती' 'दहशत.' दहशतीचा काही उपयोग झाला नाही, तर प्रत्यक्ष युध्दाचा अवलंब करण्याची तयारी असणे, हा राजनैतिक धोरणाचा कणा आहे. नुसत्या शुध्द हेतुच्या 'जपा'ने आणि 'स्वप्नरंजनात' गुरफटून गेल्याने सामर्थ्य संपादनाकडे दुर्लक्ष होते. देशाचे राजकारण, फक्त निर्भेळ राजकारणी लोकांनी चालविण्याविषयी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष 'जनरल द् गॉल' यांनी अतिशय मार्मिक व अर्थगर्भ उद्‌गार काढले आहेत. तो म्हणतो "Politics is too serious a business to be left to politicians." म्हणून देशाचा राज्यकारभार विशिष्ट उच्च ध्येयनिष्ट आणि अव्यवहार्वता, या वाळूच्या ढिगात ऑस्ट्रिच पक्षा-प्रमाणे तोंड खुपसून बसणाऱ्या, आणि आपणहून आंधळे बनणाऱ्या, मुत्सद्द्यांच्या हाती असणे, हे देशाला हानीकारक होत असते. त्याचप्रमाणे उलट बाजूनेही, हिटलर मुसोलीनी सारखे रक्त-पिपासू, राक्षसी महत्वांकाक्षा उराशी बाळगून एकमुखी सत्तेमुळे, देशाला संकटात टाकणारे हुकुमशहा हें दुसरे टोक असते.

नाटक हे संसाराचे चित्र आहे असे समजले जाते. देशाच्या संसारात,

युध्द हा मोठा गंभीर आणि महत्वाचा नाटच–प्रसंग असतो. जुन्या भारतीय नाटच शास्त्रानुसार, नाटक दु:खांत असू नये असा दंडक होता. परंतु आता तो कालबाह्य ठरला आहे. कारण संसारात सुखापेक्षा दु:खच अधिक प्रत्ययाला येत असते. 'युद्धनाटच' मात्र ढोबळ मानाने दु:खान्तच असते. जित दोन्ही डोळचांनी दु:खाश्रु गाळतात. युद्धात कामास आलेल्यामुळे, आपले आप्तेष्ट सगेसोयरे यांच्या वियोगामुळे, युद्ध कालात भोगाव्या लागलेल्या हाल अपेष्टामुळे, आणि झालेल्या हानीमुळे, 'जेते'हि दु:खीच होतात. परंतु जेत्याच्या सुख–दु:ख अशा संमिश्र भावना असतात. 'जेत्याचश' एका डोळचात आनंदाश्रु असतात. परंतु दुसऱ्या डोळचात दु:खाश्रुही तरळत असतात. संसाराच्या नाटचात नवरस खेळतात युद्ध-नाटचात फक्त एकच रौद्ररस थैमान घालीत असतो. नवरसात 'श्रृंगार आणि वीर' हे दोन रस सर्वांचें अधीक आवडते असतात.युद्धाच्या रोमांचकारी वीरकथा सर्वांनाच 'रम्य' वाटतात.परंतु त्यात रौद्ररसाचे प्रावल्य असते. आणि भीषणताही असते आणि हेच ठीक आहे. नाही तर या 'आवडीचा' अतिरेक झाला असता. अमेरिकन सेनापती 'ली' युद्धाच्या भीषणतेविषयी म्हणतो. "It is fortunate war is so terrible, otherwise man would love it too much."

युद्ध हाच सेनेचा अस्तित्व हेतू असतो. युद्धात सैनिक लढतो, तो आपल्या देशावरील अलोट प्रेमामुळे, आपली मायभूमी, आपली संस्कृती, आपला इतिहास आपली ध्येये, आपली मूल्यें आणि तत्संबंधी आपली कर्तव्यें इत्यादी उच्च मनो-भूमिके वरून आणि त्या सर्वांचे रक्षण व्हावे म्हणून लढतो पूर्वी याच्या भरीला, स्वधर्म आणि स्वामिनिष्ठा ही दोन महान तत्वे असत. आता 'धर्मा' करता युद्धे होणे बंद झाले असले तरी युद्धात उत्तेजन आणि प्रोत्साहन मिळावे म्हणून धर्मा-भिमान मिसळून दिला जातो व युद्धात 'जिहाद' आणला जातो. जेंव्हा छत्रपती शिवाजी महाराजासारखे ध्येयनिष्ठ, धर्मनिष्ठ राज्यकर्ते, रणांगणावर सेनेचे स्वत: मार्गदर्शन करून, स्वत: तलवार चालवीत असत (फ्रेड्रिक दि ग्रेट, राणा प्रताप अशी ही उदाहरणे होऊन गेली आहेत.) त्या काळात 'स्वामिनिष्ठा' हा सैनिकाचा स्थायीभाव ठरून गेला होता. परंतु आता तो जमाना बदलला आहे. लोकशाहीत स्वामीनिष्ठेला स्थान असत नाही. आणि राजनिष्ठाहि नसते. आता असते 'राष्ट्रनिष्ठा,' 'राष्ट्राभिमान', मातृभूमीवरील प्रेम, आणि तज्जन्य कर्तव्य-निष्ठा ! आता कोणीही कोणा व्यक्तीकरता, सेनापतीकरता लढत नसतो. आपल्या स्वतंत्र हिंदुस्थानच्या कोणत्याही युद्धात कोणीही गांधी, नेहरू, किंवा शास्त्री, यांच्या करता लढले नाही. हे जरी खरे असले, तरी आज्ञापालन आणि शिस्त हाच संरक्षण दलाचा पाया असल्या कारणाने, नेहरू आणि शास्त्री यांनी युद्ध थांबविण्याचे दिलेले आदेश निमूटपणे तात्काळ पाळले गेले. मुत्सद्द्यांच्या हातात युद्ध सूरु करणे आणि ते थांबवणे अशा दोन्ही गोष्टी असतात.

आपल्या घटनेप्रमाणे आपले राष्ट्रपती आपल्या तिन्ही संरक्षण दलांचे

'सर सेनापती' ठरविले गेले आहेत. राष्ट्राच्या सर्वांगीण कारभाराची धुरा, आणि जबाबदारी राष्ट्रपतीकडे आहे. ही जबाबदारी पार पाडण्यास मदत म्हणून देशाचे मुत्सद्दीमंडळ (Cabinet) आहे. आणि महामंत्री त्या मंडळाचा नेता व प्रवक्ता असून, राष्ट्रपतीला मदत व सल्ला देण्याकरता ही व्यवस्था केलेली आहे. यात संरक्षणासारख्या सर्वांत महत्वाच्या विषयावरही 'अतज्ञ' मंत्रीमंडळ, तज्ञांशी विचार विनिमय न करता, त्यांना विश्वासात न घेता, निर्णय घेते. आणि प्रसंग विशेषी राष्ट्रपतीलाही न सांगता न विचारता त्या निर्णयाची अम्मल बजावणी करण्याचे सेनाधिकाऱ्यांना आदेश दिले जातात. आपल्या देशात असे प्रसंग नुकतेच घडले आहेत. चिनी युद्ध सुरु झाल्यावर, गोळीबार न करता शत्रूला सीमेवरुन जायला भाग पाडा' असा सैन्याला आदेश देऊन नेहरू परदेश प्रवासाला निघून गेले. ते राष्ट्रपतींना विचारून सांगून गेले होते काय? ताश्कंदला जाऊन पाकीस्तानशी चाललेले आपले युद्ध शास्त्रींनी थांबवले. तेंव्हा राष्ट्रपतीला विचारले होते काय? आणि या दोन्ही प्रसंगी सेना प्रमुखांशीं विचारविनिमय झाला होता काय ? या तीन प्रश्नांच्या उत्तरावर राजकारणातील राष्ट्रपतीचे स्थान, आणि देशाच्या युद्ध नीतीचे (War Strategy) मुत्सद्यांना किती महत्व वाटते व ती नीती ठरवितांना तज्ञांच्या मताची किती आवश्यकता वाटते; यावर योग्य तो प्रकाश पडेल. असे प्रसंग आताच उद्भवले असे नाही. ब्रिटिशांचे वेळी कर्झन आणि किचनेर आणि अमेरिकेत अायसन हॉवर आणि मॅक आरथर यांच्यातील मतभेद आणि गैरसमज जगजाहीर आहेत. त्यांच्यात मतभेद होते. यात विचारविनिमय गृहित धरता येईल. परंतु आपल्या देशात मतभेदाचा प्रश्नच नव्हता. कारण सेनापतीला कोणी विचारलेच नाही. विश्वासात घेतले नाही; आणि काय होणार आहे याची त्यांना कल्पनाही करता आली नाही. मुत्सद्दी म्हणजे लेखणी आणि सेनापती म्हणजे तलवार. 'लेखणी श्रेष्ट की तलवार श्रेष्ट' या विषयावर शाळकरी मुलेहि वाद-विवाद करतात; आणि निबंध लिहीत असतात. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी एका श्रेष्ठ साहित्यिक व्यासपीठावरून लेखकांना आपल्या 'लेखण्या मोडून तलवारी घेण्याचे' आवाहन केले होते. त्यावेळी त्यांच्यावर टीकेचा भडीमार झाला होता. त्यांचा अभिप्राय त्यावेळी मोठमोठ्यांना समजला नाही. लेखणीच्या बडे-जावात तलवारीचे विस्मरण होता कामा नये; आणि लेखणी तलवारीला धारदार बनवू शकते, हेही विसरले जाऊ नये. त्यावेळी देश पारतंत्र्यात होता व रणावीण स्वातंत्र्य मिळत नसते; म्हणून लेखण्या बाजूस ठेवाव्या असा त्यांच्या आवाहनाचा अर्थ होता.

नुसत्या लेखणीने स्वातंत्र्य मिळत नाही. मिळाले तरी टिकत नाही. लेखणी शेजारी' 'तळपती तलवार' सज्ज असलीच पाहिजे. नुसतीच मुत्सद्देगिरी फार काळ यशस्वी होऊ शकत नाही. तलवारीच्या पाठबळाशिवाय मुत्सद्देगिरी यशस्वी होत नसते. मुत्सद्देगिरी म्हणजे नुसत्या आकर्षक मोठमोठ्या ध्येयवादी शब्दांच्या

आणि घोषणांच्या वावडचा नव्हे. हे आपल्या देशातील गेल्या २४ वर्षाच्या स्वातंत्र्योत्तर काळात सिद्ध झालेले आहे. आपली एक आगळचा प्रकारची लोकशाही असून, आपल्या घटनेत अनेक देशातील घटनांपैकी चांगल्या चांगल्या बाबी समाविष्ट केलेल्या आहेत. आपली घटना जशी पूर्ण फेडरल (Federal) नाही तशीच ती पूर्णपणे 'युनिटरीहि (Unitary) नाही. आपले अर्थकारणही संमिश्र आहे म्हणून आपले मुत्सद्दीमंडळही (Cabinet) संमिश्र असावे. लोकशाहीत बहुमतवाला पक्षच जरी कॅबिनेट बनवित असला, तरी त्यात निदान संरक्षणासारख्या जिव्हाळचाच्या प्रश्नाकरता, पक्षनिरपेक्ष 'तज्ञ' असलाच पाहिजे, असे घटनेनेच ठरविले जावे. देशाची अर्थव्यवस्था कोणत्याही तत्वावर आधारलेली असो, व्यापार 'खुला असो वा नसो' या गोष्टीत मतभेदाला जागा आणि वाव दिला गेला; तरी देशाचे संरक्षण हा पक्षभेदातीत, सर्वोच्च 'राष्ट्रीय हिताचा' आणि परम पवित्र विषय असल्याने राजकीय मतभेदांपासून तो सर्वस्वी अलीप्त असला पाहिजे. आणि यावर तज्ञांचा अभिप्राय आणि त्यांच्याशी कमीत कमी विचारविनिमय करण्याचे 'घटनात्मक बंधन' कॅबिनेटवर ठेवले गेले पाहिजे. म्हणजे या प्रश्नाची तांत्रिक बाजू, तज्ञांच्या दृष्टीकोनातून मुत्सद्दीमंडळासमोर, विचाराकरता मांडली जाऊ शकेल.

मुत्सद्दी म्हणजे लेखणी, आणि सैनिकी व संरक्षणतज्ञ म्हणजे तलवार, यांचा समन्वय हाच मध्यम मार्ग देशाचे तारण आणि रक्षण करतो. राजकारण आणि संरक्षण यांची फारकत, परस्पराविषयीची उदासीनता, बेपर्वाई हा देशाच्या नाशाचा हमखास मार्ग होय.

---

# सैनीकीकरण, राष्ट्रीयकरण, आणि हिंदवीकरण.

"ज्या देशाला भूतकाल नाही, त्या देशाला भविष्यकाळ नाही." असे एक सुप्रसिध्द वचन आहे. आपल्या देशाला फार पुरातन, सहस्त्रावधी वर्षाचा भूतकाल आहे. सहस्त्रावधी वर्षांच्या प्रगल्भ आणि श्रेष्ठ संस्कृतीचे आपण वारस आहोत. इतकी पुरातन आणि प्रगल्भ संस्कृति असलेला दुसरा एकही देश, आजच्या जगात अस्तित्वात नाही. जशी आपली संस्कृति पुरातन आणि सर्वश्रेष्ठ आहे; तसाच आपला इतिहासही उज्वल आहे. अर्थात या इतिहासात असेहि कालखंड येऊन गेले आहेत, की ज्यांच्या स्मरणाने लज्जित होऊन मान खाली घालावी लागते; हेहि कबूल करणे भाग आहे. हिंदुस्थान अनेकांची शिकार बनला; आणि परदास्याच्या श्रृंखला ल्यायला, या अपमानित परदास्यातून मुक्त होण्याचे भगीरथ प्रयत्न वेळोवेळी झालें. आणि सरते शेवटी ता. १५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री आपण स्वतंत्र झालो. आणि १६ आगस्ट १९४७ च्या उगवत्या सूर्याला स्वतंत्र भारतीय म्हणून आपण पहिले वंदन केले. तेंव्हा आपल्या देशाच्या वर्तमान काळाला सुरुवात झाली; व भविष्यावर आपली आशायुक्त नजर खिळाली. नव्या हिंदुस्थानच्या नव्या जीवनपथातली चोवीस वर्षांचेवर वाटचाल आतापर्यंत स्वातंत्र्यसूर्याने केली आहे.

१८५७ च्या समरप्रसंगाच्या समाप्ती पासून ब्रिटिश राजघराण्याकडे आपल्या देशाची सार्वभौम सत्ता गेली– नव्हे आपणच ती त्याच्या पदरात टाकली; ती त्याला मिळवून दिली. त्या सत्तेचा विकास आणि जोपासना केली; व तिच्यावर सूर्य नेहमीच तळपत राहावा म्हणून आपले रक्तही सांडले. हे राज्य सुरु होईपर्यंत, आपल्या हातात तलवार होती. ती कोणाहि वर, आणि केव्हाहि उपसता येत होती. आणि ती आपण स्वतःच्याच बंधु–बांधवावर सुध्दा उपशीत होतो. परंतु त्या अनुसंधानात, कित्येकांनी आपल्या तलवारी, या ना त्या कारणानी म्यान केल्या. कित्येकांनी त्या कंपनी सरकारच्या पुढे ठेवल्या, आणि शेल्याने हात बांधून ते महाराणीच्या मुजऱ्याला सादर झाले. आपल्या इतिहासातला सर्वात काळाकुट्ट दिवस तो, की ज्या दिवशी '**मलिका मा अझमा** व्हिक्टोरिया हिंदुस्थानची अभिषिक्त सम्राज्ञी होऊन् यच्चयायत् भारतीयांनी, तिला मानाचे मुजरे करुन देशाच्या आकाशांत तिचे 'युनियन जॅक' उभारले. परंतु पुरे एक शतक लोटायच्या आतच १५ ऑगस्ट १९४७ या शुभदिनी 'युनियन जॅक' खाली उतरले. आपला **अशोक चक्रांकित 'तिरंगा**'वर चढला; आणि आपल्या इतिहासातला सर्वात उज्वल आणि तेजःपुंज दिवस उगवला. हे दोन दिवस आपल्या इतिहासातील अविस्मरणीय दिवस आहेत. पहिल्याने आपल्या माना खाली झाल्या. गुलामीमुळे

जगाने आपल्याला तुच्छ लेखले. दुसऱ्याने आपल्या माना ताठ झाल्या. जग आपल्याकडे कौतुकाने पाहू लागले. आपण स्वतंत्र झालो. इतकेच नव्हे तर अनेक गुलाम देशांचे 'स्फूर्तिस्थान' झालो. आणि जे साम्राज्य आमच्यामुळे वाढले ते साम्राज्य आमच्याचमुळे गुंडाळलेही गेले. पहिल्या दिवसाने आमचे शस्त्र हिसकाऊन घेतले. आमच्याजवळ राखायला संभाळायला काहीच उरले नव्हते. मग तलवारीची तरी काय गरज उरली ? आणि शिवाय आमचे मालक आपल्या गुलामांचे, तसेच गुलामीचेहि "रक्षण" वाटल्यास, व जरुर पडल्यास करणार होतेच ! परंतु दुसऱ्या दिवशी आमचे सर्वस्व, आमचे स्वातंत्र्य आम्हाला परत मिळाले आणि ते राखू शकणारी आमची तलवारही परत आमच्या हातात आली. परंतु त्यावेळी असेहि काहीं महाभाग उभे राहिले, की ज्यांना या तलवारीचे ओझे वाटत होते. तिची गरज त्यांना वाटली नाही. ही रक्त काढणारी तलवार पेलणारे, परजणारे, स्वातंत्र्य रक्षणाकरता जीव घेणारे–देणारे सैन्यही नकोच ! अशी त्यांची भावना होती. चरख्यावर आणि टकळीवर सूत कातीत असतांना मुखाने 'रघुपती राघव राजाराम । सबको सन्मति दे भगवान्' अशी करुणा भाकल्यावर आपल्या विरुध्द कोणाचीही मती विपरीत होईलच कशी ? आशाळभूत दिवा–स्वप्नात ते रंगून गेले होते.

काश्मीरवर पाकिस्तानने हल्ला केला तेंव्हा आपल्या या विकलांग देशावरचा स्वातंत्र्य सूर्य नुकताच कोठे उगवला होता. या आक्रमणांमुळे हे दिवा-स्वप्न भंगले नाही. थोड्याच अवधीत, 'भाईभाईच्या ललकाऱ्या' हवेत विरल्या नाही तोच चीनने आणि पाठोपाठ पाकिस्तानने आक्रमणे केली. तेंव्हां डोळे उघडून आपण समोवार पाहू लागलो. आणि आता जागे झालो आहोत. राणीच्या राज्याचा पहिला दिवस उजाडताच आपण दिपून गेलो. 'राणीचे राज्य' ही परमेश्वरी कृपा हा' "ईश्वरी संकेत" असा विलक्षण 'साक्षाकार' काही काही 'थोरां'ना झाला. ही परमेश्वरी कृपाच झाली; अशी भावना उत्पन्न झाली. स्वातंत्र्य या शद्बाचा, त्याच्या मागच्या भावनेचा अर्थं समजेनासा झाला. परंतु क्रमाक्रमाने ही धुंदी उतरत गेली. दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक यांच्या साख्या लोकोत्तर पुरुषांनी स्वातंत्र्य म्हणजे काय ते आपल्याला सांगितले, शिकवले आणि पटवून दिले. हा 'जन्मसिध्द' हक्क आम्ही मिळविणारच अशी प्रतिज्ञा लोकमान्यांनी आमच्या तोंडून वदवली. गांधीनी ती उचलून धरली, पुढे चालविली, आणि शेवटी खंडित हिंदुस्थानवर स्वातंत्र्य सूर्य उगवला. या दरम्यानच्या उण्यापूऱ्या शतकात लंडनच्या टेम्स नदीच्या पुलाखालून अलोट पाणी वाहून गेले; तसे ते आमच्या गंगा, यमूना. सिंधू, ब्रह्मपुत्रा इत्यादी नद्यांतूनही वाहून कालसागराला मिळाले.

स्वातंत्र्य प्राप्तीच्या खडतर आणि संकटग्रस्त प्रवासात, गेलेला एक एक हक्क परत मिळविणे, ब्रिटिश साम्राज्यातल्या इतर गोऱ्या नागरिकाइतका

'किमान' दर्जा काळ्या हिंदी नागरिकानाही भांडून झगडून प्राप्त करुन घेणे, हा एक टप्पा होता. राज्यकारभारात जशी सारखी भागीदारी मिळावी तशीच ती संरक्षणाच्या प्रश्नातही मिळावी; आणि हिंदी लोकांना सैन्यात ब्रिटिशांच्या बरोबरीचे स्थान मिळावे, हा एक महत्वाचा भाग होता. हातातली तलवार जाऊन कानावर चढलेल्या कारकुनी लेखणीचे एकमात्र 'लेणे' हौसेने आणि अभिमानाने वागविणे असह्य होऊन सैन्यातही हिंदी लोकांना गोऱ्या सारखी समान संधी मिळावी, नालायकीचा जबरदस्तीचा वृथा कलंक पुसला जावा, आणि लष्करी व बिनलष्करी असा कृत्रिम, खोडसाळ, खोटा आणि कपोल–कल्पित भेद नष्ट व्हावा, म्हणून स्वाभिमानी विचारवंतांचे प्रयत्न सुरू झाले. क्रमशः सँडर्स्टच्या लष्करी महाविद्यालयाच्या दरवाज्यात, बारिकशी फट पाडण्यात यश मिळाले. काळा हिंदी, गोऱ्या इंग्रजाप्रमाणे 'राज पत्रांकित अधिकारी, ( Kings Commissioned Officer ) होण्यास सर्वस्वी आणि सर्वकाळ अपात्र नसल्याची सरकारी कबूली, प्राप्त झाली. व गोगलगाईच्या गतीने प्रगती होऊन डेहेराडूनच्या लष्करी महाविद्यालयाची स्थापना झाली व सैन्याच्या हिंदीकरणाला ( Indianisation ) आरंभ झाला. पण त्याच बरोबर सँडहर्स्टचे दरवाजे बंद झाले. आणि हिंदी अधिकारी गोऱ्या अधिकाऱ्याप्रमाणे, नुसता " राजपत्रित अधिकारी " न राहता, तो 'राजपत्रित हिंदी अधिकारी ( King's Commissioned Indian Officer ) बनवला गेला. म्हणजेच त्याला ब्रिटिश अधिकाऱ्यापेक्षा 'हिंदी,' या शद्वाने खालचे स्थान दिले गेले. हा श्रेष्ठ–कनिष्ठतेचा सूक्ष्मभेद, आणि श्लेष मोठ्या चातुर्याने निर्माण केला गेला. आणि त्यानुसार सोई–सवलती, वेतन, भत्ता, यांतही अर्थातच तफावत ठेवली गेली. व दोहोतले अंतर कायम ठेवले गेले. लढाऊ आणि बिन–लढाऊ हा भेद व वर्गीकरण तसेच अखेर पर्यंत कायमच राहिले. मध्यंतरी दोन महायुध्दे झाली. दोहोतही हिंदी सैन्याने आणि अधिकाऱ्यांनी आपल्या पराक्रमाची शर्थ करुन, आपली श्रेष्ठता सिध्द केली. आणि ती प्रामाणिक गोऱ्या सेनापतींनी मान्यही केली. युद्धाच्या वेळी, रणांगणावर लढणारे हिंदी सैनिक 'जंग बहादुर' ठरले आणि इकडे सरकारी युद्धप्रयत्नात (War effort) श्रमाची, मदतीची उचल करणारे सरकारने 'रावबहादुर' 'खानबहादुर बनविले. पहिल्या महायुद्धाचेवेळी, लोकमान्यांनी लष्कर भरतीला मदत देण्याचे कबूल केले. परंतु ते सर्व प्रकारच्या सारख्या दर्जाच्या शर्तीवरच फक्त ! ते दूरदृष्टीचे, विचारवंत, ज्वलज्जहाल देशभक्त होते. 'तुझी अडचण ती माझी संधी' (Your difficulty is my opportunity) हे त्यांच्या राजकारणाचे सूत्र होते. दुसऱ्या महायुद्धाचे वेळी, गांधीनीही रंग्रूट भरती आणि दुसऱ्या सर्व प्रकारांनी सरकारला मदत देण्याचे मोकळ्या मनाने बिनशर्त कबूल केले होते. ते संत होते. कोणाच्या अडचणीचा फायदा घेणे, हे

चूक आहे. 'पाप' आहे; असे मानणारे अजातशत्रु संत होते. ब्रिटिश त्यांचे मित्र होते. मित्राची अडचण भागविणे त्यांच्या सौजन्याला अनुरुप होते. (पुढे परिस्थिती चिघळली)

हिंदी सेनेला जगातली सर्वात मोठी "स्वयंसेवक सेना" (The largest Volunteer Army in the world) असे पुष्कळ इंग्रज आणि अमेरिकांनी म्हटलेले आहे. कारण लढायांच्यावेळी किंवा केंव्हाही, हिंदुस्थानात सक्तीची लष्कर भरती केली गेली नव्हती. इंग्लंडमधे तसेच अमेरिकेतही ती होती. आजही प्रत्येक अमेरिकन नागरिकाला, विशिष्ठ वयाच्या गटात, ठराविक काळ, सैन्यात नोकरी करण्याची सक्ती आहे. लढाई संपताच इंग्लंडमधली सक्ती हटविली गेली. सक्तीच्या काळात इग्लंडमधे "सद्सद्विवेकबुद्धीचे निरोधक" (Conscientious objectors) असे काही लोकही होते. त्यांची सक्तीच्या लष्करी नोकरीला सक्त आणि मनापासून हरकत होती. व त्याकरता कोणतीही शिक्षा भोगण्यास ते तयार होते. पण त्यातून एक पळवाट काढून त्यांचा विरोध बोथट केला गेला. अशा लोकांना सशस्त्र सैन्याची सूट दिली जाऊन आवश्यक सेवात (Essential Services) त्यांची नियुक्ती केली गेली. हेही यद्ध प्रयत्नच (war efforts) होते. तरीपण ते अपरोक्ष होते व त्यांत लोकांच्या दैनंदिन जीवनाशी अधिक जवळचा संबंध होता.

हिंदी सेनेचे कौतुक झाले, तसे त्याला दूषणही मिळाले. तिला भाडोत्री (Mercenary) असेही म्हटले गेले. वास्तविक हिंदी सेनेला गौरविले काय किंवा भाडोत्री ही शिवी दिली काय, याची अहिंसावादी कॉंग्रेसी शिष्टांना कांही दखल घेण्याचे मुळीच कारण नव्हते. हिंदी सैन्याचे कौतुक कानावर पडले, तेंव्हा त्यांची काय प्रतिक्रिया झाली हे समजले नाही. परंतु भाडोत्री म्हटले गेले, तेंव्हा त्यांना या शिवीचा उगाचच राग आला व तो व्यक्त झाला. ब्रिटिशांनी आणि काही राजनिष्ठ शिष्टांनी, दोन्ही महायुद्धाचे वेळी अनेक युक्त्या-प्रयुक्त्या, आमिषे, प्रलोभने आणि प्रचार यांच्या बरसातीने लोकांची मने वळवून सैन्य भरती केली होती. मनात कोणतेहि ध्येय नसतांना, संधी मिळते आहे म्हणून, पगार मिळतो आहे म्हणून, तात्पुरता का असेना, बेकारीचा प्रश्न सुटतो आहे म्हणून, सैन्यात काहींनी शिरकाव करुन घेतला होता. मराठ्यांनी रंग्रूट भरती डोक्यावर घ्यावी म्हणून, त्यांच्या भावना उद्दीपित व्हाव्या म्हणून, श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराचा बेळगावच्या मराठा पलटणीच्या केंद्रात अहोरात्र घोषा सुरू ठेवला होता शिवाजी महाराजांच्या नावावर सैन्य भरती होत होती, व त्यामुळे भावनाप्रधान मराठी मन, भारावून गेले; व भरतीला उत्तेजन मिळाले. हे जरी खरे असले; तरी हिंदी सेना, कोणा-करता आणि कशाकरता लढली; हे प्रश्न शिल्लक उरतातच. त्यात काही उच्च तत्वांचा, ध्येयाचा, लवलेश तरी होता का ? ( कांही अपवाद आहेत हे

मान्य ! ) मग या सेनेला ‘भाडोत्री’ म्हटल्याचा विषाद वाटण्याचे काय कारण ? ते सत्यकथनच होते.

दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं ‘लढाईके दौरान मे’ सिंगापूरहून ब्रिटिशांनी पळ काढला. हिंदी सेनेला विश्वासात न घेता-पळ काढला ! हिंदी सैनिक जपानी युद्धबंदी झाले. विश्वासघाताची त्यांना चीड आली. त्यात जपानी क्रौर्याची आणि प्रचाराची भर पडली. ‘आझाद हिंद सेना’ सज्ज झाली. आणि जपानी सेनेबरोबर नेताजीच्या ‘चलो दिल्ली’ या हुकुमाप्रमाणे, दिल्लीच्या रोखाने निघाली. इकडे जवाहरलाल नेहरूंचीहि घोषणा झाली “खबरदार ! तुम्ही दिल्लीवर आलात तर मी तुमच्याशीं लढेन” युद्ध संपले. ‘आझाद हिंद सेना खटले’ लाल किल्ल्यात सुरू झाले. नेहरूंनी आपली तरवार म्यान केली, अभिवक्त्याचा काळा झगा अंगावर चढवला, व कायद्याची पुस्तकें काखोटीला मारून, त्यांच्या बचावाकरता वकील म्हणून ते उभे राहिले. फोटो निघाले. वर्तमान पत्रातून झळकले.

पहिल्या महायुद्धापासून, हिंदी ‘राज-पत्रित’ अधिकाऱ्यांची सुरूवात झाली. तेव्हापासूनच्या राजकीय आंदोलनात हिंदी सैन्याचा विषय अधिकाधिक चर्चिला जावू लागला. सेनेविषयी कुतुहल उत्पन्न झाले, आणि प्रत्यक्ष सैनिकी-जीवनाकडे नसले, तरी लष्करी शिक्षणाकडे लोकांची दृष्टी वळली. व्यायाम शाळा त्याकडे आकर्षित झाल्या. आणि त्यांनी थोडी कवाईत शिकवायला कोठे कोठे आरंभ केला. ‘पुण्याचे **महाराष्ट्रीय मंडळ**’ही महाराष्ट्रातली सर्व प्रमुख अशी एकमेव संस्था आहे. आणि सैनिकीकरणाचे ती संस्था अविरत प्रयत्न करीत आहे. अमरावतीच्या हनुमान व्यायाम शाळेतही कवाईती पथक तयार केले गेले होते. नागपूरात डॉ. हेडगेवारांनी स्थापन केलेला “राष्ट्रीय स्वयंसेवक संघ” आज महान वटवृक्षाप्रमाणे सर्व हिंदुस्तानात पसरलेला असून, त्याची शिस्त परमोच्च कोटीची आहे, कॉंग्रेसचे सेवादल आहे. अशा अनेक संस्था ‘शिस्त’ आणि शारिरिक शिक्षणाचे कार्य करीत आहेत. शाळांतूनही शारिरिक शिक्षणाकरता कवाईत, कसरत शिकविली जात असे. ‘लष्करी शिक्षण’ खाजगी रीतीने कसे देता येईल, यावर विचार सुरू झाला. डॉ. मुंजे यांनी ‘**भोसला मिलिटरी स्कूल**’ या नावाचे एक हायस्कूल नाशिक येथे सुरू केले. त्यांच्या अगोदर पुण्यास **शिवाजी मिलिटरी स्कूल**ही स्थापन झाले होते. त्याच सुमारास जुन्या मध्य प्रदेशात सरकारने ‘रायफल क्लबांना’ परवानगी दिली होती. किंग जार्ज रॉयल मिलीटरी स्कूल्स या नावाने काही फौजी नियंत्रणाखालील शाळाही चालू होत्या. त्यात कनिष्ट दर्जाच्या सैनिक अधिकाऱ्यांच्या आणि सैनिकांच्या पाल्यानाच फक्त प्रवेश दिला जात असे. सैन्यात मुलांनी जावे, निदान पक्षी त्यांना लष्करी शिक्षण मिळावे, असे विचार जिकडे तिकडे बोलले जाऊ लागले. परंतु सेना म्हणजे काय, आणि लष्करी शिक्षण म्हणजे

काय, याची कोणालाहि माहिती नव्हती. सैन्याचा परिचय नव्हता. ते गावापासुन अलग असलेल्या छावण्यात राहात असे. व त्याचा जनतेशी, लोकांशी मुळींच संपर्क नव्हता. सशस्त्र, गणवेशधारी हिंदी सैनिकही फार क्वचितच दिसत. मोठया शहरालगतच्या सडकांवर किंवा चित्रपटगृहात गोरे सैनिक दिसत. त्यांचे आकर्षण वाटत असे. सर्वात जास्त आकर्षणंच नव्हे तर कौतुक आणि हेवाही म्हणावयास हरकत नाही, तो होता ऑफिसर लोकांचा. पहिल्या वर्गाच्या राखीव डब्यातून गणवेष घातलेले किंवा 'मफ-तीत' असलेले, तोडांत पाईप अथवा सिगारेट असतानाच बोबडया शद्वात "नही मांगटा" "जायगा" अशा भ्रष्ट हिंदीत, थोडया मग्रुरीने आणि जास्त ताठयाने, ब्लडीचा खैरात करीत, हमालाच्या तोंडावर पाच रुपयाची नोट फेकणारे, बरोबरच्या सूटकेसेस "चिलमची" हॉकी स्टिक, बंदुकांच्या पेटया, इत्यादी अगणित बोजे डब्यात चढवून, व्हीलरच्या स्टॉलवर इंग्रजी पुस्तके चाळणारे किंवा रेस्तोरांमध्ये 'छोटा हजेरी' वर ताव मारीत बसलेले, काळे गोरे अधिकारी दिसत. आणि सर्व लोक त्यांच्याकडे पाहात उभे राहात. (हल्लीच्या चित्रपट तारे आणि तारका प्रमाणे) हे दृश्य मोठे विलोभनीय वाटे. आणि तरुणात यामुळे सैनिकी जीवनाची–म्हणजे फक्त अधिकारी होण्याची आवड उत्पन्न झाली. नुसत्या विद्यार्थी तरुणातच नव्हे तर त्यांच्या वडीलधाऱ्या माणसांचीही दृष्टी तिकडे वळली. आजही ती तशीच आहे. घरातला एकादा मुलगा आडदांड आणि व्रात्य असला, अभ्यास करीत नसला, परिक्षेत यशस्वी होत नसला, आणि उद्धटपणा, बेगुमानपणा करीत असला, म्हणजे तो 'मिल्ट्रीला' योग्य समजला जाऊ लागला. आणि तोहि ऑफिसर होण्याला. असा सक्षात्कार होऊ लागला आणि आजही हे वदलले नाही. "एक तर" मिल्ट्री ऑफिसर नाही तर डी. ए. जी, पी. टी." लिपिक ही फक्त दोन क्षेत्रे आपल्या तरुणापुढे, आणि त्यांच्या वडील-धाऱ्या माणसापुढे ! बाकीं, "जो होगा वह भगवानके मर्जीसे". एकादा गणवेश घातला थोडे लेफ्ट राईट केले, मानापमानातल्या लक्ष्मीधराप्रमाणे "सूर्य अस्तास जातो आहे, अशा वेळी केलेली, घटका अर्धा घटका, प्रकृतीला मानवणारी" कवाईत केली, हवाई बंदुकी सारख्या छोटया रायफल मधून वर्षातून ५/१० गोळया पांच पंचवीस यार्डावरुन उडवून चांदमारी केली, चार सहा दिवस शहराजवळच, एकाद्या शिबिरात राहून तेथे बालविरांचे खेळ खेळले, फुट सवा फूट माती उकरुन 'खंदक' खणले आणि मोर्चे बांधले, एकाद्या रस्त्यावर थोडी धूळ पसरुन सडक बांधण्याचे श्रमदान केले, आणि हे सर्व करायला ट्रकमधे बसून गेले–आले, म्हणजे लष्करी-शिक्षण पूर्ण झाले! देशाच्या संरक्षणाची राखीव फौज व दुसरी आघाडी तय्यार झाली ! आजही भले भले असे मानतात. अशी आघाडी ? नेहेमीच तयार ठेवण्याचे विद्यापीठे आणि सरकार यांचे प्रयत्न चालू आहेत. त्याच्या भरीला शिस्त

आणि शारिरिक सुदृढता उत्पन्न करण्याकरता भव्य योजना तयार झाल्या. सहस्त्रावधी रुपयांचा चुराडा उडाला. त्या योजनांचा कोठे मागमूसही आता दिसत नाही. एखाद्या शाळेत टांग्याच्या घोडयासारखे दोन चार "निवृत्त" घोडे बाळगले. त्यावर आठवडयातून तास अर्धा तास, एखादा मुलगा बसला की, झाले रिसाल्याच्या 'घुडसवारिचे' शिक्षण. त्याला कशाला पाहिजे पद्धतशीर पाठ अथवा क्रमवार अभ्यासक्रम ? एवंगुणविशिष्ट असलेले शिक्षण हे लष्करी-शिक्षण म्हटले जाते. देश स्वतंत्र होताच, तेंव्हाच्या छात्रसैनिकांच्या शिक्षण–क्रमाचे नाव बदलून, ते एकदम "अधिकारी शिक्षण" झाले व त्याना विद्यापीठाच्या परिक्षेत, एका विषयाची 'सूट' मिळाली; व हे 'अधिकारी–शिक्षण' घेऊन महाविद्यालयाच्या बाहेर पडल्याबरोबर, 'तुम्ही सैन्यात अधिकारी व्हाल' असे त्यांस सागण्यात आले. पुढे ते नाव बदलले गेले. अधिकारी हा शद्व त्या नावातून गळला. देशाच्या सुदैवाने हे अधिकारी फसवण्याचे काम थांबविले गेले. असे लष्करी–शिक्षण घेतलेले अधिकारी चीनच्या युद्धाचे वेळी आपल्या फौजेत वा पदावर नव्हते; हे आपले मोठे भाग्यच. १९६२ च्या चीनच्या युद्धात, आपला पराजय झाल्यावर जनरल हेंडरसन ब्रुक्स यांची 'एक सभासद समिती' त्या अपयशाबद्दल चौकशी करण्याकरता नेमली होती. त्यांच्या रिपोर्ट सरकारनी जरी प्रकाशात येऊ दिला नाही, तरी जी काही माहिती झिरपून बाहेर आली, त्यात आपले कित्येक सेनाधिकारी दुर्बल आणि अयोग्य ठरले; असे स्पष्टपणे लिहून ठेवलेले आहे. ही स्थिती डेहेराडून येथून बाहेर पडणारांची. यावरुन लष्करी अधिकारी काय दर्जाचा असला पाहिजे याची कल्पना येईल.

सारांश हाच, सैन्य आणि लष्करी शिक्षक या विषयीच्या लोकांच्या कल्पना विचित्र आहेत. देशात कोणालाहि लष्करी शिक्षणाची, सैनिकी जीवनाची खरी आवड नाही. त्यांच्याकडे एक मानाचा व्यवसाय ( career ) म्हणून पाहिले जात नाही. प्रत्येकाला फक्त 'राजपत्रित' अधिकारीच व्हायला पाहिजे कारण, अधिकारी सोडून इतर कोणत्याहि सैनिकाला मानाचे स्थान, आपल्या समाजात नाही. जे काही पांढरपेशे सुशिक्षित मराठी तरुण सैन्याकडे वळतात, ते दुसरीकडे कोठे वाव नाही म्हणून तितके बुद्धिवान नसतात म्हणून; आणि सैन्यात बुद्धिमत्तेची गरज नसते ! या विपरीत कल्पनेने वळतात. कोणताही पहिल्या श्रेणीत पास होणारा विद्यार्थी, सैनिकी प्रवेश परिक्षांना बसतनाही. कोण ताही पालकआपल्या पाल्याला उत्तेजन देत नाही इतर व्यवसायात जसे पहिल्या दर्जाचे लोक लागतात, तसे सेनेलाही मिळाले पाहिजेत. इतकेच नव्हे तर प्रत्येक वरिष्ठ आणि श्रेष्ठ दर्जाच्या तरूणाला मर्यादित जागा-मुळे वाव मिळाला नाही, प्रवेश मिळाला नाही तरच मग नाइलाजाने त्याने जीवनाच्या इतर वाटाकडे वळावे, देशाचे रक्षण आणि देशाचे विज्ञान या दोनच

अनुक्रम ... ६८०६ ... दि: ... निबंध —
क्रमांक ... २६६ ... नों. दि: ... ३१·३·८५

गोष्टी, सर्वांत अधीक महत्वाच्या आणि सर्वश्रेष्ठ आहेत. आणि त्याकरता सर्वश्रेष्ठ बुद्धीचे, कर्तव्यनिष्ठ आणि महत्वाकांक्षी देशभक्त तरुण मिळाले पाहिजेत.

देशावर संकट आले म्हणजे क्षणकाल सर्वांच्याच चित्तवृत्ती उत्तेजित होतात. हे १९६२ आणि १९६५ मधे आपण पाहिले. नंतर तो प्रसंग गेला, की सर्व शांत, हेही आपण पाहिले आहे. पाकिस्तानने काश्मीरवर केलेल्या आक्रमणाची तर इकडे कोणाला वार्ता नव्हती. तिकडे काहीतरी चालले आहे. इतकेच फार तर लोकाना वाटत होते. शत्रू श्रीनगरपासून थोड्या अंतरावर आला होता. हे किती लोकाना माहित होते ? हे थांबले पाहिजे. ही सेनेची आवड, स्वसंरक्षणाची इच्छा, पावसाळ्यातल्या मोसमी 'छत्र्या' सारखी भावनेच्या भरातील, क्षणभंगूर उर्मी असता कामा नये. लष्करी शिक्षण ही जादू नाही. **ती वृत्ती आहे.** ती वीरवृत्ती आहे. तो संयम आहे. ते चारित्र्य आहे. तो शरीराचा तसाच मनाचा खंबीरपणा आहे. ते शील संवर्धन आहे. ती शिस्त आहे. ती ध्येयनिष्ठा आणि एका शब्दात तो योग आहे. खरा 'कर्मयोगी' कोणी असेल, तर तो एक सैनिक आहे. हे सर्व अगदी शिशू आणि कुमार वयापासून शिक्षकांनी आणि पालकांनी हातात घेतले पाहिजे. ( Catch them young ) त्यांची काळजीपूर्वक जोपासना केली पाहिजे. या सर्व गोष्टी क्षणिक न होऊ देता, तो स्थायीभाव बनला पाहिजे. हाडामासात रक्तात भिनला पाहिजे. लष्करी शिक्षणास आणि जीवनात, दोन गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत. आणि त्या सर्वांना दिसतात. परंतु त्याचे मर्म लक्षात घेतले जात नाही. त्या दोन गोष्टी म्हणजे एक 'कवाईत' Drill व दुसरी 'शिस्त' Discipline. कवाईत शरीराला 'शिस्त' शिकवते आणि शिस्त मनाला 'कवाईत' शिकविते. शरीराला तसेच मनाला, कवाईत आणि शिस्त या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. कमजोर बेशिस्त मनाला, मजबूत मनगट मिळणार नाही. ते त्याला पेलणार नाही. नुसती मनगटाची मजबूती, शिस्तीवाचून मनाला झेपणार नाही. या दोहोंचा संयोग म्हणजेच कर्मयोग. हा 'कर्मयोग' नुसत्या सैनिकी जीवनापुरताच नव्हे, तर एकंदर मानव जीवनाचाच आधार आणि पाया आहे. असे हे लष्करी शिक्षण रायफली किंवा 'घुडसवारी' वाचूनही देता येते. त्याकरता म्हणजे प्राथमिक तयारी करता महागड्या सैनिकी शाळांची काही आवश्यकता आहे असे नाही. तेथे जे शिकविले जाते, ज्या प्रकारच्या शिस्तीची सवय होते, ते सर्व, प्रत्येक शाळेत सांघिक स्वरुपात आणि प्रत्येक घरात वैयक्तिक स्वरुपात, होऊ शकते. शिक्षक तसाच पाहिजे आणि पालकही बेफिकीर नसला पाहिजे युध्दात सैनिक जसा स्वतः लढतो तसाच तो आपल्या तुकडीत आपल्या विशिष्ट स्थानावर, तुकडीच्या गटाच्या रुपात, आणि गटाच्या नावाने लढतो एकट्या शूराला एकटे पदक मिळते. त्याच्या पलटणीची सांघिक वाहवा होते. एकात त्याच्या व्यक्तीगत

(Individual) शौर्याची कदर होते. दुसऱ्यात त्याच्या सामुहिक (Collective शौर्याचे कौतुक होते. घरी (Individual Training) आणि शाळेत ( Collective Training ) उत्तम रीतीने मिळालेला तरुणच उत्तम सैनिक होईल. हेच आहे लष्करी–शिक्षण. याकरता शिस्तबद्ध छात्रनिवास अतिशय उपयुक्त ठरतील. हे निवास ( Hostels ) शक्य तितक्या कमी खर्चात आणि कोणतेही मोठाल्या इमारतींचे वगैरे अवडंबर न माजविता, काढता येतील. नागपूर सारख्या मोठ्या शहरात, असे निवास–छात्रालये सुरु करणे आणि चालविणे मुळीच कठीण नाही. हे चालविण्याकरता सैन्यातील निवृत्त अधिकाऱ्याचा उत्तम उपयोग होईल. नव्हे त्यांनीच ते चालवावे. शिस्तीची बाजू त्यांनी सांभाळावी व शैक्षणिक बाजू शाळेतील शिक्षकांनी पहावी. व पालकानी त्याना सर्व प्रकारे सहाय्य द्यावे. मोठ्या नगरपालिका व जिल्हा-परिषदांना अशी हॉस्टेलस् काढणे सहज शक्य आहे. लष्करी शिक्षणाचा दृष्टीकोण असा साफ निराळाच पाहिजे. नुसती निशाणबाजी म्हणजे लष्करी शिक्षण नव्हे. आता इतकी निरनिराळ्या प्रकारची आणि कार्यक्षमतेची शस्त्रे निघत आहे कीं एकाच बिंदुवर अचुक नेम मारणे या गोष्टीला पूर्वीसारखे महत्व उरले नाही. आता निशाणबाजीत 'लक्ष्याचे' बिंदू नसून परिघ बनले आहेत. हत्याराच्या कवाईतीला ( Arms Drill ) आता महत्व उरले नाही. इंग्लंड अमेरिका आणि हिंदुस्थान वगैरे देशात रायफल डाव्या खांद्यावर धरतात. युरोपात बरेच देश ती उजव्या खांद्यावर घेतात, म्हणून त्यामुळे त्यांच्या शौर्य, वीर्य धैर्य इत्यादी शिपाईबाण्यात फरक पडत नाही. हातातील शस्त्र महत्वाचे नाही; तर मन आणि शरीर महत्वाचे आहे. आणि ते तयार करणे म्हणजे लष्करी तयारी करणे होय. म्हणून हत्यारावाचून अडून बसण्याचे कारण नाही. हत्यार नसले तरी चालू शकते. सायकल चालवणे, घरातील रेडिओ बरोबर वेव्हलेंग्थवर लावणे, यापेक्षा त्याचा जास्त बाऊ करण्याचे कारण नाही. हत्यार हे इतर यंत्रासारखे एक यंत्र आहे. फक्त ते हिंसा करण्याचे यंत्र आहे व इतर यंत्रासारखे तांत्रिक ज्ञान त्याला लागते. परंतु कोणतेहि यंत्र सुरु आणि बंद करू शकणारा, जसा इंजिनियर होत नाही तसा अचुक गोळीबार करणारा 'युद्ध–विशारद' नसतो.

पहिल्या महायुद्धानंतर 'व्हर्सायच्या तहान्वये' जर्मनीला नावापुरतेच सैन्य ठेवण्याची परवानगी मिळाली होती. परंतु पराजयाचे शल्य सलत राहणारा जर्मनी स्वस्थ बसला नाही. जे लहानसे सैन्य त्याने ठेवले, ते मुळी सर्व शिक्षक आणि तज्ञ म्हणूनच तयार केले. मोठ्या कसोशीने आणि काटेकोरपणाने निवड करुन, सर्वात अधिक बुद्धिवान्, देशाभिमानी, सुशिक्षित आणि शरीर सामर्थ्य असलेलेच तरुण सैन्यात घेतले. व शिक्षकांचेच सैन्य तयार केले. नागरिक व स्थानिक स्वराज्य संस्थांनी, देशातील तरुणांची शिबिरे आयोजित केली. व

त्यातून बिनहत्यारी अशा सर्व लष्करी शिक्षणाची व्यवस्था केली. आणि देशातील यच्चयावत् तरुणांची बिनहत्यारी शिस्तबद्ध प्रशिक्षित सेना तयार केली. आणि तयारीची खात्री झाल्यानर लीग ऑफ नेशन्सला लाथ मारुन उडवून दिले. प्रत्येक सैनिक शिक्षकाने फक्त हत्याराचे पाठ द्यावयाचे होते. ते अल्पकाळात दिले, आणि जर्मनी पुन्हा ताठ उभा राहिला. त्यावेळी जर्मनीजवळ प्रत्येकाला देण्याइतकी हत्यारे नव्हती, व इतरही उणीवा होत्या. परंतु जर्मनीने त्या दूर कशा होतील याची मुळीच फिकीर न करता इतर सर्व तयारी केली; व शस्त्रेहि मिळवली; व तो दुसऱ्या महायुद्धाकरता उभा राहिला.

याचा निष्कर्ष हाच की लष्करी शिक्षणाचा अर्थ सोपा आहे. तो प्रत्येकाच्या आटोक्यातला आहे. ज्याला आंगठाच फक्त उठवता येत असे, ज्याने कधी आगगाडी पाहिली नाही, किंवा रेडिओ ऐकला नाही, अशा खेड्यातल्या अडाणी तरुणाला रंग्रुट म्हणून भरती होऊन ७/८ महिन्याच्या काळात, प्रशिक्षित जवान (Trained Soldier) म्हणून लढाईवर जाऊन शौर्याचे परमोच्च विरुद मिळविता आलेले आहे. त्याचा निरक्षरपणा, अडाणीपणा, असंस्कृत खेड्यातले जीवन आड आले नाही. अशा अडाणी रंग्रुटातूनही संधी मिळताच, हिंदी सैन्यात राजपत्रित अधिकारी (Commissioned Officers) ही झालेले आहेत. आता सामान्य शिक्षणाचा दर्जा व विस्तार वाढला आहे. खेडूत आणि शहरी यांच्यात पहिल्या इतकी खोल आणि रुंद खाई राहिलेली नाही. तेव्हा प्राथमिक तयारीचा काळ आणि कष्ट, अर्थातच कमी व्हायला पाहिजेत. लष्कराचे खरे आकर्षण तरुणात उत्पन्न झाले पाहिजे. ते फक्त अधिकारी होण्यापुरतेच मर्यादित असता कामा नये. त्याला लष्करी जीवनाची खरी आवड किंवा तळमळ म्हणता येणार नाही. अणि ही आवड अथवा आकर्षण फक्त प्रासंगिक असता कामा नये. ती चिरकालिक असली पाहिजे. लढाईत ज्या गोळीने जवान मरतो, त्याच गोळीने सेनापती गतप्राण होतो. तेथे भेदाभेद नाही. प्रत्येक जवान जर सेनापती होतो म्हणाला, तर सेनापतींचेच सैन्य होईल. जवान शिल्लक उरणार नाही. तरीही जवानाला, सैनिकाला सेनापती होता येते. "Every soldier carries the General's baton in his knapsack" प्रत्येक सैनिकाच्या बगल–थैलीत, सेनापतीचा अधिकार–दंड असतो असे नेपोलियनचे वचन प्रसिद्ध आहे. ते यथार्थच आहे.

लष्करी शिक्षणाच्या दोन बाजू आहेत. एक लढाईच्या मैदानावर आहे. आणि दुसरी मुत्सद्यांच्या खलबतखान्यात आहे. त्या दुसऱ्या बाजू करताही युद्धतज्ञ इतर 'तज्ञा' सारखे लागतात. युद्धाचा तात्त्विक आणि शास्त्रीय विचार करणारे तज्ञ आपल्या देशात नाहीत; असे म्हणणे भाग आहे. परदेश–राजकारण, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इत्यादींचे 'शास्त्रीमंडळ' ज्याप्रमाणे मुत्सद्दीमंडळात असावे लागते, त्याच प्रमाणे युद्धशास्त्रज्ञही

मुत्सद्यांच्या ' शास्त्री मंडळात ' असले पाहिजेत. तर परदेश राजकारणाच्या अनुरोधाने, आणि संदर्भात, देशरक्षणाच्या सर्वात महत्वाच्या आणि जिव्हाळयाच्या प्रश्नांचा यथायोग्य विचारविनिमय होऊ शकतो. संरक्षणाचा विचार, वस्तुनिष्ठ झाला पाहिजे. स्वप्ने फसवी असतात. पण 'दिवास्वप्ने' त्याहूनही अनर्थकारी होत असतात. याचा आपण अनुभव घेतलाच आहे. आपल्या विद्यापीठातून राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इत्यादी शास्त्रांच्या शिक्षणाची आणि संशोधनाची व्यवस्था असते. एकटदुकट विद्यापीठात युद्ध–शास्त्रही शिकण्या–शिकवण्याची सोय उपलब्ध झालेली आहे. पण तिचा कोणीही लाभ घेत नाहीत. ते सर्व ओस पडले आहेत. पुणे विद्यापीठात असे ' अध्यासन ' आहे. परंतु तेथे विद्यार्थीच नाहीत. असले तर दोन चारच आहेत असे ऐकतो. हा विषय घेऊन बी. ए होता येते. पण लक्षात कोण घेतो? म्हणे! तरुणांना लष्कराची, लष्करी शिक्षणाची आवड आहे! कोण विश्वास ठेवील ?

अशा अनास्थेत देशाचे संरक्षण कसे होणार ? कोण करणार ? हा मोठा चिंताजनक प्रश्न आहे. आतापर्यंत विद्यार्थ्यांवर झालेला या बाबतीतला सर्व अवाढव्य खर्च आणि बडेजाव, फुकट गेला असेच म्हणावे लागेल. आता त्याचा आढावा घेतला जाऊन, हें का झाले ? यातून काय निष्पन्न झाले ? तरुण खरोखर शिस्तबद्ध, शीलसंपन्न, शरीराने आणि मनाने सुदृढ होऊन, सैनिक होण्याला लायक झाले काय ? देशाने त्यांच्यावर निर्भर राहावे काय ? याचा विचार केला पाहिजे आणि अधिक टिकाऊ. अधिक कार्यक्षम आणि फलदायक कार्यक्रम हातात घेतला पाहिजे. म्हणजे खऱ्या शाश्वत सैनिकी शिक्षणाची दुसरी व्यवस्था हातात घेतली पाहिजे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हयातभर सैनिकीकरणाचा ध्यास घेतला होता. त्याचे मर्म आणि निकड फार थोडयांना होती. त्यांना जातीयवादी म्हटले जात होते. आणि त्यांना फक्त हिंदूचे सैनिकीकरण हवे होते, असा त्यांच्यावर आरोप होता. परंतु त्यांच्या हिंदुत्वाच्या व्याख्येकडे दुर्लक्ष केल्यामुळे, ती न समजून घेतल्यामुळे असे घडले. हिंदुस्थानात राहणारी, या देशाला मातृभूमी, पितृभूमी आणि कर्मभूमी मानणारी प्रत्येक व्यक्ती, हिंदू व्यक्ती आहे. ती जानवे घालो, नमाज पढो, क्रूस खांद्यावर घेवो, अथवा कोणच्याहि मार्गाने ईश्वरासन्निध जाण्याचा प्रयत्न करो, तो गौण भाग होता. त्यांचे हिंदुत्व इतके विशाल आणि सर्वसंग्राहक होते. ते त्यांनी छत्रपती शिवाजीमहाराजांपासून घेतले होते. हिंदवी स्वराज्यात सर्वांना स्थान होते त्याकरता, मुसलमान शिवछत्रपतींच्या आधिपत्याखाली लढले, आग्ऱ्याहून सुटका करुन घेताना आंथरुणावर निजविलेल्या तोतया शिवाजीचे पादसंवाहन करणारा तोच मुसलमान तरुण मदारी मेहेतर, तसाच तेच काम करीत बसला होता. राज्यारोहणानंतरच्या बिदागीत या देशभक्त स्वामिनिष्ट अनुचरानें राजसिंहासनावर महाराज बसलेले

नसताना सरपोस घालून ठेवण्याच्या कामगिरीची 'बिदागी' मागून घेतली होती. महाराजांनी मुसलमानांच्या मशीदींचा अपमान केला नाही. त्यांना नेमणुकाही दिल्या. आणि परकीयांची गुलामी तोडून मोडून 'हिंदवी स्वराज्य' स्थापन केले. त्या स्वराज्यात सर्व सारखे होते. फक्त त्यांनी त्या स्वराज्याशी एकनिष्ठ राहणे आवश्यक होते. याच हिंदुत्वनिष्ठेच्या विशाल व्याख्येचे, दुसरे नाव आहे राष्ट्रीयत्व. आजचे राष्ट्रीयत्व आणि सावरकरांची हिंदत्वनिष्ठा व हिंदत्वाची व्याख्या यात काहींच फरक नाही. त्याना सैनिकीकरण पाहिजे होते. म्हणजे " राष्ट्रीयीकरण " पाहिजे होते. पण राष्ट्रीयीकरण म्हणणे म्हणजे काहीतरी भयंकर उच्चार करणे, असे आजही भल्याभल्यांना वाटते. मुसलमानांना काय वाटेल ? ख्रिस्ती काय म्हणतील ? याची त्यांना शंका येते. पण देशाचे सर्वांगीण संरक्षण, राष्ट्रीयीकरणाशिवाय होणे शक्य नाही; हे त्यांना उमगत नाही. हिंदूकरण आणि राष्ट्रियीकरण एकच आहे. आपण स्वतंत्र आहोत. आपल्या देशात अनेक धर्म आहेत व ते सर्व सारखे आहेत. असे असतांनाहि सर्वच धर्माचे अनुयायी, या देशाचा सारखाच मान सन्मान ठेवीत नाहीत. अभिमान वाळगत नाहीत. इतकेंच नव्हे तर अनेक प्रसंगी अपमानही करतात, आपलेच निशाण फाडतात. संविधानाचा ग्रंथ जाळतात. आणि दुसऱ्या देशाचा जयजयकार करतात. अशा लोकांना राष्ट्रीयदृष्टी आली पाहिजे; असे म्हणताच ते म्हणणारा संकुचित 'जातीयवादी' म्हटला जातो. जगात असा दुसरा देश नसेल ?

राष्ट्रीयत्वाच्या अभावी, देशाचे योग्य संरक्षण होऊ शकणार नाही. देश–रक्षणाकरता तशी संरक्षण मनोवृत्ती ( Defence mindedness ) तयार झाली ती वृत्ती, लढाऊ वृत्तीच्याच ( fighting spirit ) पोटी उत्पन्न होईल. आणि हीही वृत्ती आक्रमक क्रियेतूनच (offensive Action) उद्भवेल. आणि ही क्रिया सैन्य करीत असते. असा हा त्रिकोण आहे. हा त्रिकोण स्वतंत्र देशाचा 'त्रिशूल' आहे. त्याची राष्ट्रीयकरण, हिंदवीकरण आणि सैनिकीकरण ही तीन तीक्ष्ण टोके आहेत. ती नेहेमीच लखलखीत, अणकुचीदार आणि परजलेली असली पाहिजेत

# युद्ध साहित्य--चतुरंग सेना

प्रत्येक कार्याला साहित्य लागते. साहित्य दोन प्रकारचे असते. एक मानवी व दुसरे पार्थीव. या दोन्ही पैकी, मानवी साहित्य अर्थातच श्रेष्ट असते. जड वस्तु व पदार्थांचा, आपल्या कामाकरता मनुष्य उपयोग करीत असतो. देशाच्या संरक्षणाच्या, म्हणजेच युद्धाच्या कार्याला दोन्ही प्रकारचे साहित्य आवश्यक असते. मानवी साहित्य म्हणजे सैन्य आणि पार्थीव साहित्य म्हणजे सैन्याला जरूर असणारी प्रत्येक वस्तु. मनुष्याच्या दैनंदिन जीवनात, त्याच्या सुख-स्वास्थ्याला व योगक्षेमाला, जे जे आवश्यक असते, ते ते सर्व, सैनिकाला त्याच्या अत्यंत खडतर, हालअपेष्टांच्या, युद्धभूमीवरच्या अस्तित्वाला-कार्यक्षम-अस्तित्वाला, कमीत कमी का असेना, परंतु मिळत राहण्याची निश्चिती असेल, तर तो आपले कर्तव्य निश्चित मनाने पार पाडू शकेल. परंतु येवढयाने कार्यभाग होणार नाही. युद्धात प्रतिपक्षीही तसाच सुसज्ज असतो. त्याचे सामर्थ्य नष्ट व्हावे, त्याचा विध्वंस व्हावा आणि तो शरण यावा हाच उभय पक्षाचा हेतु असतो. म्हणून युद्धाला दोन प्रकारचे पार्थीव साहित्य लागते. एक स्वतःला आवश्यक आणि उपकारक, व दुसरे, शत्रूला अपकारक आणि विध्वंसक. हे दुसऱ्या प्रकारचे साहित्य म्हणजे शस्त्रास्त्रे, दारुगोळा इत्यादी संहारक वस्तू.

संकटांचेहि प्रकार दोन असतात. एक 'आस्मानी' आणि दुसरा 'सुलतानी' साधारण नागरिक-जीवनात 'आस्मानी' संकटांचाच मुकाबला करायचा असतो. आस्मानी संकटे परिस्थितीजन्य असतात, आणि ती यदृच्छया येतात. ती कोणी आणू शकत नाही. परंतु 'सुलतानी' संकटे मनुष्य-निर्मित असतात. युद्धात ती दुसऱ्या मानवाकडून-शत्रूकडून-निर्माण केलेली असतात. म्हणून युद्धात सैनिकाला प्राकृतिक म्हणजे 'आस्मानी' तशीच शत्रुनिर्मित म्हणजे 'सुलतानी' अशा दोन्ही प्रकारच्या परिस्थितीत, दुहेरी झुंज द्यावी लागते. म्हणून त्याची सुसज्जताहि तशीच जय्यत ;असावी लागते. साधारण जीवनात 'एकमेकां साह्य करु, अवघे धरु सुपंथ' या भावनेने संकटे वारता येतात, निदान सुसह्य करता येतात. परंतु युद्धात 'एकमेका संहारू, अवघे धरु मृत्यू पंथ' हे ध्येय असते. संहार दोघांचाहि होतो. तो कमी अधीक होण्यावर, सहन करीत राहण्याच्या चिकाटीवर, आणि सामर्थ्यावर, तसेच शेवटी काही 'शिल्लक' उरण्यावर, जय किंवा पराजय अवलंबून असतो. ज्याच्याजवळ शेवटी काही पुरून उरते, ज्याचे काही 'अधिक' ठरते, तो विजयी ठरतो. हा युद्धाचा निष्कर्ष आणि अर्थ असतो जो विजयी होतो त्याची महत्वाकांक्षा वाढते. आणि ज्याचा पराजय होतो तो पुढच्या जयाच्या तयारीला लागतो.

सैन्य हे युद्धाचे सर्व प्रथम आणि सर्वात महत्वाचे साधन म्हणजे 'साहित्य' आहे. पंच-महा-भूतापैकी, पृथ्वी आणि आकाश या दोन तत्वांच्या संपुटात, आप, तेज आणि वायू ही उरलेली तीन तत्वे असतात. मानव पृथ्वीवर राहतो. जलात आणि आकाशात तो संचार करू शकतो. म्हणून युद्ध जमीनीवर पाण्यात आणि आकाशात, तिन्ही ठिकाणी होत असते. अर्थात, या तीन्ही क्षेत्रातल्या प्राकृतिक परिस्थितीमुळे लढण्याची पद्धत वेगळी वेगळी असणार! आणि त्या त्या प्रकारचे साहित्यही लागणार! गरज ही शोधाची जननी आहे. ती भागण्या करता विज्ञानाची कास धरावी लागते. 'विज्ञान–माउली' आपल्या कासेतून सर्व प्रकारच्या क्षुधा–शांतीकरता, दुग्ध–धारांचा अखंड स्त्राव करीत असते. मनुष्याच्या गरजेला अंत नाही. विज्ञानमाउलीच्या स्तन्यालाही अंत नाही. आणि मनालाही खंत नाही. मानव मागतच राहतो. विज्ञान देतच राहते. आज विज्ञानाने जगत संहाराची शक्ती मानवाला प्रदान केली आहे. विज्ञानाने मानवाला प्राप्त करून दिलेले सामर्थ्य, दुधारी असते: निवड मानवाने करावयाची असते. युद्धाचे पहिले आणि महत्वाचे साहित्य सैन्य हे असून दुसरे सर्व पार्थीव साहित्य विज्ञान पुरवीत असते. युद्धाची, जल, स्थल आणि आकाश, अशी तीन क्षेत्रे असली, आणि त्यातील युद्धाची पद्धतही भिन्न भिन्न असली तरी ती एकमेकापासून अलिप्त आणि स्वतंत्र राहू शकणार नाहीत. कारण आकाश-अवकाश–संचार, ही एक सामान्य गोष्ट झालेली आहे. तीन प्रकारच्या सेना आता प्रत्येक देशात आहेत. आणि त्या परस्परांना उपयुक्तही झाल्या आहेत. सारांश हाच की एक मानव दुसऱ्या मानवाशी आता 'कोठेहि' लढू शकतो. अर्थातच या तीन्ही क्षेत्रातील युद्धाकरता वेगवेगळया प्रकारची आणि कार्य-क्षमतेची शस्त्रास्त्रे, विज्ञानाने बनवून दिली आहेत.

पुरातन काळापासून सेना 'चतुरंग' म्हटली गेली आहे. अश्व, गज, रथ आणि पादाती अशी सेनेची चार अंगे, युद्ध मात्र जमीनीवरच करीत असत. म्हणजे पूर्वीची चतुरंग सेना फक्त 'स्थल सेनाच' होती. परंतु आता चतुरंग सेनेची चार अंगे निराळी झाली आहेत. एक स्थलसेना, दुसरे जल सेना, तिसरे वायुसेना, आणि चौथे नागरिक. आता सैनिक आणि नागरिक यांचा फरक गणवेशापुरताच उरलेला आहे. सैनिक हा गणवेश घालणारा नागरिक असतो. आणि नागरिक हा गणवेश न घालणारा सैनिक असतो इतकेच. आता 'जल–सेना' 'स्थल–सेना' 'वायु–सेना' आणि 'जन–सेना' अशी चतुरंग सेना, देश रक्षणाकरता सज्ज असली पाहिजे.

फक्त पहिल्या तीन सेनांची घटनात्मक रचना केलेली असते. ती रचना 'पिरॅमीड' सारखी आहे. सर्वात वरचे टोक म्हणजे एक बिंदु असून, जस जसे खाली उतरावे तसतसा विस्तार वाढत जातो, आणि तळाशी तो सर्वात जास्त

# युद्ध साहित्य--चतुरंग सेना

प्रत्येक कार्याला साहित्य लागते. साहित्य दोन प्रकारचे असते. एक मानवी व दुसरे पार्थीव. या दोन्ही पैकी, मानवी साहित्य अर्थातच श्रेष्ट असते. जड वस्तु व पदार्थांचा, आपल्या कामाकरता मनुष्य उपयोग करीत असतो. देशाच्या संरक्षणाच्या, म्हणजेच युद्धाच्या कार्याला दोन्ही प्रकारचे साहित्य आवश्यक असते. मानवी साहित्य म्हणजे सैन्य आणि पार्थीव साहित्य म्हणजे सैन्याला जरूर असणारी प्रत्येक वस्तु. मनुष्याच्या दैनंदिन जीवनात, त्याच्या सुख-स्वास्थ्याला व योगक्षेमाला, जे जे आवश्यक असते, ते ते सर्व, सैनिकाला त्याच्या अत्यंत खडतर, हालअपेष्टांच्या, युद्धभूमीवरच्या अस्तित्वाला-कार्यक्षम-अस्तित्वाला, कमीत कमी का असेना, परंतु मिळत राहण्याची निश्चिती असेल, तर तो आपले कर्तव्य निश्चित मनाने पार पाडू शकेल. परंतु येवढ्याने कार्यभाग होणार नाही. युद्धात प्रतिपक्षीही तसाच सुसज्ज असतो. त्याचे सामर्थ्य नष्ट व्हावे, त्याचा विध्वंस व्हावा आणि तो शरण यावा हाच उभय पक्षाचा हेतु असतो. म्हणून युद्धाला दोन प्रकारचे पार्थीव साहित्य लागते. एक स्वतःला आवश्यक आणि उपकारक, व दुसरे, शत्रूला अपकारक आणि विध्वंसक. हे दुसऱ्या प्रकारचे साहित्य म्हणजे शस्त्रास्त्रे, दारुगोळा इत्यादी संहारक वस्तू.

संकटांचेहि प्रकार दोन असतात. एक 'आस्मानी' आणि दुसरा 'सुलतानी' साधारण नागरिक-जीवनात 'आस्मानी' संकटांचाच मुकाबला करायचा असतो. आस्मानी संकटे परिस्थितीजन्य असतात, आणि ती यदृच्छया येतात. ती कोणी आणू शकत नाही. परंतु 'सुलतानी' संकटे मनुष्य-निर्मित असतात. युद्धात ती दुसऱ्या मानवाकडून-शत्रूकडून-निर्माण केलेली असतात. म्हणून युद्धात सैनिकाला प्राकृतिक म्हणजे 'आस्मानी' तशीच शत्रुनिर्मित म्हणजे 'सुलतानी' अशा दोन्ही प्रकारच्या परिस्थितीत, दुहेरी झुंज द्यावी लागते. म्हणून त्याची सुसज्जताहि तशीच जय्यत ;असावी लागते. साधारण जीवनात 'एकमेकां साह्य करु, अवघे धरु सुपंथ' या भावनेने संकटे वारता येतात, निदान सुसह्य करता येतात. परंतु युद्धात 'एकमेका संहारू, अवघे धरु मृत्यू पंथ' हे ध्येय असते. संहार दोघांचाहि होतो. तो कमी अधीक होण्यावर, सहन करीत राहण्याच्या चिकाटीवर, आणि सामर्थ्यावर, तसेच शेवटी काही 'शिल्लक' उरण्यावर, जय किंवा पराजय अवलंबून असतो. ज्याच्याजवळ शेवटी काही पुरून उरते, ज्याचे काही 'अधिक' ठरते, तो विजयी ठरतो. हा युद्धाचा निष्कर्ष आणि अर्थ असतो जो विजयी होतो त्याची महत्वाकांक्षा वाढते. आणि ज्याचा पराजय होतो तो पुढच्या जयाच्या तयारीला लागतो.

सैन्य हे युद्धाचे सर्व प्रथम आणि सर्वात महत्वाचे साधन म्हणजे 'साहित्य' आहे. पंच-महा-भूतापैकी, पृथ्वी आणि आकाश या दोन तत्वांच्या संपुटात, आप, तेज आणि वायू ही उरलेली तीन तत्वे असतात. मानव पृथ्वीवर राहतो. जलात आणि आकाशात तो संचार करू शकतो. म्हणून युद्ध जमीनीवर पाण्यात आणि आकाशात, तिन्ही ठिकाणी होत असते. अर्थात, या तीन्ही क्षेत्रातल्या प्राकृतिक परिस्थितीमुळे लढण्याची पद्धत वेगळी वेगळी असणार! आणि त्या त्या प्रकारचे साहित्यही लागणार! गरज ही शोधाची जननी आहे. ती भागण्या करता विज्ञानाची कास धरावी लागते. 'विज्ञान–माउली' आपल्या कासेतून सर्व प्रकारच्या क्षुधा–शांतीकरता, दुग्ध–धारांचा अखंड स्त्राव करीत असते. मनुष्याच्या गरजेला अंत नाही. विज्ञानमाउलीच्या स्तन्यालाही अंत नाही. आणि मनालाही खंत नाही. मानव मागतच राहतो. विज्ञान देतच राहते. आज विज्ञानाने जगत संहाराची शक्ती मानवाला प्रदान केली आहे. विज्ञानाने मानवाला प्राप्त करून दिलेले सामर्थ्य, दुधारी असते: निवड मानवाने करावयाची असते. युद्धाचे पहिले आणि महत्वाचे साहित्य सैन्य हे असून दुसरे सर्व पार्थीव साहित्य विज्ञान पुरवीत असते. युद्धाची, जल, स्थल आणि आकाश, अशी तीन क्षेत्रे असली, आणि त्यातील युद्धाची पद्धतही भिन्न भिन्न असली तरी ती एकमेकापासून अलिप्त आणि स्वतंत्र राहू शकणार नाहीत. कारण आकाश-अवकाश–संचार, ही एक सामान्य गोष्ट झालेली आहे. तीन प्रकारच्या सेना आता प्रत्येक देशात आहेत. आणि त्या परस्परांना उपयुक्तही झाल्या आहेत. सारांश हाच की एक मानव दुसऱ्या मानवाशी आता 'कोठेहि' लढू शकतो. अर्थातच या तीन्ही क्षेत्रातील युद्धाकरता वेगवेगळ्या प्रकारची आणि कार्य-क्षमतेची शस्त्रास्त्रे, विज्ञानाने बनवून दिली आहेत.

पुरातन काळापासून सेना 'चतुरंग' म्हटली गेली आहे. अश्व, गज, रथ आणि पादाती अशी सेनेची चार अंगे, युद्ध मात्र जमीनीवरच करीत असत. म्हणजे पूर्वीची चतुरंग सेना फक्त 'स्थल सेनाच' होती. परंतु आता चतुरंग सेनेची चार अंगे निराळी झाली आहेत. एक स्थलसेना, दुसरे जल सेना, तिसरे वायुसेना, आणि चौथे नागरिक. आता सैनिक आणि नागरिक यांचा फरक गणवेशापुरताच उरलेला आहे. सैनिक हा गणवेश घालणारा नागरिक असतो. आणि नागरिक हा गणवेश न घालणारा सैनिक असतो इतकेच. आता 'जल–सेना' 'स्थल–सेना' 'वायु–सेना' आणि 'जन–सेना' अशी चतुरंग सेना, देश रक्षणाकरता सज्ज असली पाहिजे.

फक्त पहिल्या तीन सेनांची घटनात्मक रचना केलेली असते. ती रचना 'पिरॅमीड' सारखी आहे. सर्वात वरचे टोक म्हणजे एक बिंदु असून, जस जसे खाली उतरावे तसतसा विस्तार वाढत जातो, आणि तळाशी तो सर्वात जास्त

असतो. या पिरॅमीडचा परमोच्च बिंदू किंवा शिखर त्या त्या दलाचा कार्यकारी प्रमुख (Chief of the staff) हा असतो. या तिघांचा समभुज त्रिकोण साधलेला असून या त्रिकोणाचा केंद्रबिंदू आणि सर्वोच्च शास्ता आपल्या घटने प्रमाणे आपला राष्ट्रपती असतो. राष्ट्रपतीच्या सेना-विषयक कार्याच्या सौकर्या-साठी मुत्सद्दी मंडळातील (Cabinet) मंत्र्यापैकी एक संरक्षण मंत्री' म्हणून नियुक्त केलेला असतो. आणि तो संरक्षण-उत्पादन-मंत्र्याच्या साह्याने सर्व संरक्षण दलावर अधिकार राखून, त्यांचे नियंत्रण करीत असतो. आणि आपल्या मुलकी सचीवालयाद्वारे तो आपले कार्य करतो. या व्यवस्थेला 'संरक्षण-मंत्रालय' म्हणतात. या मंत्रालयात निरनिराळी विभागीय मंडळे असतात व एक 'आंतर-सेना समन्वय मंडळ 'ही असते या शिवाय तीन्ही सेना दलांच्या पार्थिव गरजा व सुखसोई, सर्व प्रकारच्या साहित्याचा आणि साधनांचा पुरवठा, त्यांच्या उत्पादनाची व त्या प्राप्त करून घ्यावयाची व्यवस्था, केंद्रीय प्रयोग-शाळा, कारखाने, वगैरे देशात स्थापन केलेले असतात. त्याचप्रमाणे तिन्ही दलांच्या 'मानवी' साहित्याच्या पुरवठ्याचीहि वेगवेगळी आणि केन्द्रीय व्यवस्था असते. त्या करता 'भरतीची' वेगळाली कार्यालये, व अधिकारी नियुक्त केलेले असतात. तेथे उमेदवारांची तपासणी, चांचणी, आणि परीक्षा घेतली जाऊन निवड झालेल्यांना, त्या त्या दलात प्रवेश देऊन त्यांना त्या त्या दलाच्या प्रशिक्षण केंद्रात पाठविले जाते. यशस्वी उमेदवार, त्याच्या योग्यते प्रमाणे व आवडीप्रमाणे त्या त्या दलात पक्का होतो. प्रत्यक्ष युद्ध करणाऱ्या तिन्ही सेना-दलांच्या सूत्र-बद्ध आणि समन्वयकारी रचनेमुळे, तिन्ही सेना परस्परपूरक आणि सहाय्यक होऊन, देश रक्षणांचे कार्य, समर्थ-पणे पार पाडू शकतील यात शंकेला मुळींच जागा नाही. तिन्ही दलांची स्वतंत्र मुख्य-कार्यालये (Head quarters) असून कार्याची वाटणी व विभागणी करून, दुय्यम कार्यालयांची योजना व रचना केलेली आहे. आपल्या देशाचा विस्तार, फार मोठा समुद्र किनारा, आपल्या देशाची भौगोलिक आणि प्राकृतिक परिस्थिती, शेजारी देशांचे हेतु, राजकारणाचे वाहते वारे, आपला त्यांच्याशी संबंध, इत्यादी सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून, आपले सेना बल जरुरी प्रमाणे वाढवून, त्याला पूर्णपणे प्रशिक्षित करुन, जय्यत तयार ठेवले पाहिजे. युद्धाला लागणाऱ्या सर्व प्रकारच्या 'पार्थीव' साहित्याचा सर्व प्रकारच्या हवामानात, आणि कोणत्याही अवघड जागी, जरूर तितका आणि सतत पुरवठा करण्याची खबर-दारी घेतली गेल्यास सैनिकांचे मनोधैर्य कायम राहून, वाढून देशाचे संरक्षण सोपे होईल.

तिन्ही दलातील अंतर्गत रचना, व्यवस्था व घटना निरनिराळ्या प्रकारची असणे अपरिहार्य आहे. सैनिकाच्या (अधिकाऱ्यांच्याहि) श्रेणी, चिन्हे, गणवेश वेगळाले आहेत. परंतु अंतर्गत शासनाचे तत्व आणि सूत्र एकच आहे. प्रत्येक

दलाचे कायदे-कानून, विधी निषेध, त्यांच्या त्यांच्या पुरते वेगळाले आहेत. तसेंच प्रत्येक घराण्यात व कुटुंबात जशी काही वैशिष्टये असतात, तशी वैशिष्टये तिन्ही दलात आहेत. मुख्य गोष्ट, या दलातील प्रत्येक व्यक्तीला, आपआपल्या दलाचा अभिमान वाटत असतो. आपल्या तिन्ही दलांना फार उज्वल इतिहास आहे, आणि परंपराही आहे. त्यातल्या त्यात सर्वात कमी वैशिष्टचपूर्ण आणि त्रोटक इतिहास जलसेनेच्या वाटचाला आला आहे. कारण त्या सेनेला तशी सुयोग्य संधी अजून प्राप्त झालेली नाही. आणि तसा प्रसंग आलाच तर ती सेनाहि आपले शौर्य प्रकट केल्याशिवाय राहणार नाही हे निःसंशय. काही बलाढ्य देशांची आता हिन्दी महासागराकडे दृष्टी वळली आहे. त्यांच्या मनात आता या भागात आपआपले वर्चस्व प्रस्थापित करण्याची महत्वाकांक्षा उत्पन्न झाली आहे. याचा सरळ अर्थ हाच की आता आपल्या देशाला समुद्राच्या बाजूने, अधिक जागरूक राहावे लागणार आहे. व त्याकरता आपली जल सेना अधिक मोठी आणि अधिक सुसज्ज अशी तयार ठेवावी लागेल. आपल्या स्थल-सेना, वायसेनांही तशाच सुसज्ज आणि अद्ययावत् आणि सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे, प्रत्येक बाबतीत स्वयंपूर्ण झाल्या पाहिजेत.

आपल्या तीन्ही सेनात 'स्थल सेना' सर्वात मोठी आणि सर्वात जेष्ठ आहे. जेष्ठतेत 'जल सेनेचा' दुसरा क्रमांक असून तिसरा क्रमांक 'वायुसेनेचा' आहे. प्रत्येक सेनेत निरनिराळे विभाग व पोट विभाग असून, त्यांची रचना त्या त्या घटकांना, शस्त्रास्त्राना व कार्यक्षमतेला अनुसरून केलेली असली, तरी सर्वांचा सांगाडा, साधारण एकाच नमून्याचा आहे. स्थलसेना सर्वात मोठी असल्या कारणाने तिची कार्यालये, केंद्रे वगैरे अधिक आहेत. आणि शहरात आणि शहरालगत छावण्यात आहेत. जलसेनेची कार्यालये समुद्र किनाऱ्यावर असणे साहजीकच आहे. आपल्या येवढ्या विशाल देशात समुद्र पाहिला नसणारांची संख्या फार मोठी आहे. म्हणून जलसेनेचा, लोकांना परिचय जवळ जवळ नाहीच. या सेनेला सैनिक अथवा अधिकारी किनाऱ्यावर येईल किंवा असेल, तेंव्हाच काय तो दिसेल. वायुसेनेची ठाणी आणि कार्यालये व केंद्रे, लोकवस्ती पासून दूर, उड्डाणाला सोईस्कर अशा मैदानावर असतात. विमाने आकाशात उडत असलेली, आता सर्वानाच कोठूनही दिसतात. परंतु त्यांना खाली यावेच लागते. जलसेनेच्या लढाऊ बोटी जहाजे वगैरे नेहमीच समुद्रात दूर असल्यानें दिसत नाहीत. स्थलसेना सर्वात जास्त परिचयाची आहे.

## स्थलसेना–पहिले अंग

स्थलसेनेचे मुख्य दोन विभाग आहेत (असे विभाग जल आणि वायु सेनेतही आहेत. परंतु त्या दोन्ही सेनात कार्यक्षेत्र भिन्नत्वामुळे, आणि त्यांच्या जडण घडणीमुळे, थोडे थोडे फरक आहेत.) एक 'शस्त्र' विभाग म्हणजे 'लढाऊ'

विभाग (Arms) आणि दुसरा 'सेवा' विभाग (Services). स्थलसेनेच्या कार्यकारी प्रमुखाला चीफ ऑफ दी आर्मी स्टाफ (Chief of the Army Staff) हे नाव दिले गेले आहे राष्ट्रपती सर सेनापती असतो. स्थल सेनेच्या मुख्य प्रशासन केंद्राला आर्मी हेड क्वार्टर्स म्हणतात. सेनेच्या दोन्ही विभागांवर, सर्व अधिकाराची आणि नियंत्रणाची जबाबदारी त्याच्यावर, असते. दोन्ही विभागांचे लहान लहान पोट विभाग असतात व त्यांची प्रत्येकाची आपआपली केंद्रेहि असतात. व त्यांची व्यवस्था, नियंत्रण व प्रशासन त्या त्या केंद्राच्याद्वारे केले जाते.

स्थल सेनेचे **लढाऊ** (Arms) **विभागात** (१) पायदळ Infantry (पूर्वीचे पादाती–यात छत्री सैनिक (Para Troops) येतात (२) चिलखती दल Armoured Corps (यात रणगाडे, शस्त्र–सज्ज चिलखती लढाउ वाहने, Armoured fighting Vehicles इत्यादी येतात. (पूर्वीचा अश्व-रिसाला) (३) तोफखाना Artilary (यात सर्व प्रकारच्या तोफा येतात) (४) इंजिनियर्स (वास्तु आणि स्थापत्य) (५) संदेश (Signals) हे पोट विभाग आहेत व ते सर्व आघाड्यांवर स्वतः लढतात. ते पूर्णपणे शस्त्र सज्ज–असून रायफल हे प्रत्येकाचे सामान्य व सर्वसाधारण शस्त्र असते. व तिच्या उपयोगात ते पूर्ण प्रशिक्षित असतात. याशिवाय आपल्या वेगळ्या विभागाचे, सर्व प्रकारचे उच्च प्रतीचे तांत्रिक ज्ञान, त्यांना असावे लागते. म्हणून त्याना लढाऊ (Combatant) असे म्हटले जाते. **सेवा** (Services) **विभागात** (१) पुरवठा विभाग (Army Service Corps) (२) शस्त्रास्त्र, वस्त्र, व सज्जा विभाग (Army Ordinance Corps) (३) वैद्यकीय विभाग (Medical Corps) (४) विद्युत् आणि यांत्रिकी विभाग (Electrical and Mechanical Engineers) (५) सवारी आणि पशुवैद्यक विभाग (Remount and Veterinary corps) (६) दंत विभाग (Dental corps) (७) लष्करी पोलिस विभाग (Military Police) (८) शिक्षण विभाग (Army Education corps) (९) शुश्रुषा विभाग (Nursing corps) (१०) टपाल विभाग (Army postal corps) आणि असेच दोन तीन नित्योपयोगी विभाग आहेत. हे विभाग 'सेवा विभाग' असल्याने ते 'लढाऊ' गणले गेले नाहीत (Non-Combatant) तरीही सेनेचा असा एक सर्व साधारण दंडक आहे कीं, प्रत्येकाने शक्य तितके स्वतःच स्वतःचे संरक्षण केले पाहिजे. म्हणून या विभागातील व्यक्तींना, सर्व सैनिकांचे साधारण आणि प्राथमिक शस्त्र रायफल, याचे प्राथमिक शिक्षण दिले जाते. त्यामुळे प्रसंगोपात या विभागातील व्यक्ती, रायफल चालवू शकतील. इतकेंच नव्हे, तर पलटणीचे लांगरी (स्वयंपाकी) भिस्ती, धोबी, न्हावी यांनाहि कित्येक पलटणीत रायफलचा परिचय करून दिला

जातो. आणि अशा 'सेवेकन्यांनी' निर्वाणीच्या वेळीं, सैनिकाची कामगिरी उत्कृष्टपणे पार पाडून, बचावात मदत दिल्याची उदाहरणे आहेत.

अशा तऱ्हेचे लहान मोठे विभाग, पोट विभाग, जल आणि वायु सेनेतही आहेत. त्या दोन्ही सेना लहान असल्याने तेथे ते लहान आहेत. स्थल सेना फार मोठी असल्याने तिचा व्याप व पसारा अर्थातच मोठा आहे.

## पायदळ (Infantry)

पायदळाला लढाईची 'राणी' The Queen of Battle असे म्हटले जाते. ते यथार्थच आहे. पायदळच शेवटची हातघाईची लढाई लढत असते. पायदळाच्या सैनिकाचे ( आणि साधारणपणे प्रत्येकच सैनिकाचे) हत्यार जी रायफल तिच्या नळीच्या टोकावर बसविलेली संगीनच शेवटी कामास येते. लढाईच्या धुमश्चक्रीत, शत्रूच्या जवळ भिडल्यावर, आणि त्याच्या मोर्चावर हल्ला चढविण्याकरता, रायफलवर संगीन चढवली जाते व विद्युत् वेगाने, शत्रूवर सैनिक तुटून पडतो; तेव्हा अचुक निशाणबाजीपेक्षा (आणि तेव्हा निशाणबाजीला वेळही नसतो) संगीनीचा धडाडीचा बेडर अचूक मारा, अधिक परिणामकारी होत असतो. "शत्रूच्या छाताडात घुसलेले सहा इंच पोलाद लढाईत जय मिळवून देते." आधुनिक यांत्रिक हत्यारांच्या आणि लांब पल्ल्याच्या आयुधांमुळे पायदळाचे आणि त्याच्या संगीनीचे आता महत्व उरले नाही, असे बोलले जाते. परंतु ते बरोबर नाही. शेवटी एखाद्या ठिकाणचा 'ताबा' आणि 'कबजा' पायदळच घेऊ शकते. पायदळ आता यांत्रिक (mechanised) झाले आहे. याचा अर्थ आता पायदळ पायाने पूर्वीइतक्या लांब लांब मजला मारीत नाही. ते शेवटच्या हातघाईच्या, निर्वाणीच्या क्षणाकरता, शक्य तितके 'ताजे तवाने' राहावे म्हणून शत्रूच्या शक्य तितक्या जवळपर्यंत वाहनातून, त्याला तेथे पोहोचविण्यात येते; हा आहे. जेथे दुसरे, तोफखाना, रणगाडे वगैरे जाऊ शकत नाहीत, तेथे पायदळ जाऊ शकते. पायदळाला दिवस व रात्र सारखीच असतात. पायदळाच्या हालचाली निःशब्द होत असल्यामुळे, शत्रूला अनपेक्षितपणे चकित करता येते. पायदळ कोणत्याही हवामानात आणि कोणतेहि स्वाभाविक अथवा कृत्रिम अडथळे, इतरांपेक्षा अधिक सहजतेने पार करू शकते. पायदळातील सैनिक अधिक काटक असावा लागतो. पायदळातील सैनिकाला आपल्या अंगावर सर्वात अधिक ओझे वागवावे लागते. त्याच्या अंगावर सर्व मिळून जवळ जवळ नव्वद–पंचाण्णव पौंड इतके वजन असते. 'गोळीबार आणि पुढे चाल' Fire and movement अशी त्याची युद्धाची पद्धत असते संगीनीसह रायफल, हातबाँब तसेच रायफल बाँब, टॉमीगन हलकी यांत्रिक बंदुक Light Machine Gun, खंदक खणण्याचे अवजार ही त्याची

हत्यारे असतात. १०।१२ ची सेक्शन ही त्याची सर्वात लहान तुकडी असते. त्यावर प्लॅटून, त्यावर कंपनी आणि त्यावर बटालियन, असा स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण विभाग असतो. केवळ पायदळाचा असा ब्रिगेड हा विभाग असतो. या विभागात आवश्यकतेनुसार मदतीकरता, दुसऱ्या विभागाच्या तुकड्याही असतात, ब्रिगेडच्या वरचा डिव्हीजन असतो. या विभागात पायदळ जरी संख्येने अधिक असले तरी दुसऱ्या विभागाच्याहि मोठमोठ्या तुकड्या सामिल केलेल्या असतात. त्याच्या वरील विभागाला आर्मी कोअर किंवा नुसते 'कोअर' म्हणतात व सर्वात वरच्या विभागाला आर्मी म्हणतात. पायदळाचा हल्ल्यात तसेच बचावातही सारखाच उपयोग असतो. आपल्या सैन्यात अनेक पायदळ पलटणींच्या रेजिमेंटस् आहेत. प्रत्येक रेजिमेंटमध्ये बटालियन्स असतात. युद्धाच्या परिस्थितीत ती आडविली जातात, प्रत्येक रेजिमेंटमधील बटालियन्सची संख्या सारखीच नाही. सर्व बटालियन्स मिळून रेजिमेंट हे एक कुटुंब झालेले असते. प्रत्येक रेजिमेंटची तशीच प्रत्येक बटालियनची, आपआपली परंपरा असते; व चालीरीतीहि असतात, व त्या मोठ्या कटाक्षाने पाळल्या जातात. प्रत्येक रेजिमेंटचे एक एक 'केंद्र' असते. हे त्या रेजिमेंटचे 'माहेर' असते. (मराठाज्चे बेळगाव हे आहे. महारांचे सागर हे आहे.) प्रत्येक पायदळ जवानाचे शिक्षण, त्याच्या रेजिमेंटच्या केंद्रात होते. ते पूर्ण झाल्यावर त्याला बटालियनमधे पाठविण्यात येते. प्रत्येक जवान आपआपल्या बटालियनशी पूर्णपणे लवकरच समरस होतो. व तो आपल्या फौजी कुटुंबाचा जिव्हाळ्याचा आणि जिवाभावाचा घटक बनून जातो. व व त्याच्या मनात आपल्या कुटुंबाविषयी आदर आणि अभिमान उत्पन्न होतो. येथे एका गोष्टीचा उल्लेख केल्यावाचून राहावत नाही. ब्रिटिशांच्या वेळच्या, धर्म, पंथ आणि जात अशा पलटणी; आजही आपल्या घटनेनें हे भेदाभेद बेकायदेशीर आणि त्याज्य ठरविलें असूनही, जशाच्या तशाच कायम आहेत. ब्रिटिशांच्या वेळी 'फोडा आणि झोडा' तत्वानुसार आणि 'सर्व 'काळयात' एकराष्ट्रीयत्व उत्पन्न होऊ नये म्हणून, सैन्यात 'जातवार संघटन' Class Composition ठरविले होते. ते अजूनही धर्मातीत स्वराज्यातहीं तसेच चालू राहणे हे **लांछन** आहे. ते तावडतोब धुवून साफ करून टाकले पाहिजे. जलसेना आणि वायूसेना यांच्यात असा प्रकार नाही. ही फार आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. अशी 'जातवारी' स्थलसेनेत विशेषतः पायदळात असूनही आपलीं सेना या विषाला केंव्हाही बळी पडलेली नाही. नुकत्याच पाकिस्तान बरोबर झालेल्या युद्धात ही गोष्ट पुन्हा एकदा सिद्ध झालेली आहे. युद्धाचे वेळी आपली यच्चयावत् सेना फक्त **हिंदीच** सेना असते ! भेदातीत **हिंदी सेना** म्हणूनच लढते !!!

## चिलखती दल Armoured Corps

आता रिसाल्याची जागा या दलाने घेतली आहे. ही पेट्रोलवर चालणारी चिलखते असलेली आणि विशिष्ट प्रकारच्या यांत्रिकी बंदुकी आणि एक प्रकारच्या

तोफा बसविलेली वाहने आहेत. तरीही त्यांच्या रेजिमेंटस्‌ची जुनी रिसाल्याची नावे जसे 'स्किनर्स हॉर्स' 'डेक्कन हॉर्स' 'लाईट कॅव्हलरी' वगैरे तशीच कायम आहे. जुने फौजी लोक यांना 'मुर्दा रिसाला' म्हणतात. पूर्वीच्या रिसाल्यातल्या घोडयांच्या शरीरात 'प्राण' होता आता पेट्रोल असते. रिसाला जरी आता युद्धात उपयोगी नसल्याने सैन्यातून गेला असला तरी किंचित प्रमाणात तो अजूनही शिल्लक आहे. व शिवाय राष्ट्रपतीच्या समारंभाच्या मिरवणूकीत, घोडेस्वारांची शान आगळी उठून दिसते. दलात 'रणगाडे' Tanks आणि चिलखती लढावू वाहने Armoured fighting Vehicles संक्षेपाने AFV असे विभाग आहेत. रणगाडे तीन प्रकारचे असतात. एक हलके, दुसरे मध्यम, आणि तिसरे भारी. त्यांच्यावर बसवलेल्या बंदुका–तोफा वेगळाल्या व्यासाच्या आणि ताकदीच्या असतात. त्यांचा वेग वेगळाला असतो. आणि त्यांची संचार मर्यादाही वेगळाली असते. तसेच त्यांचा प्रसंगानुरूप वेगळा उपयोग केला जातो हलके रणगाडे टेहेळणी आणि गस्तीचे काम उत्तम करू शकतात; तर मध्यम रणगाडे शत्रूवर चाल करून जाणाऱ्या पायदळाला उत्तम मदत देऊ शकतात. आणि भारी रणगाडयांच्या गोलंदाजी पुढे जागा धरून बसलेला मोर्चे (Pill Boxes and Entrenchements) व खंदक आणि आडोसे यांच्यावर मारा करून शत्रूला हुसकावून लावतात किंवा त्याला मैदानात यायला भाग पाडतात, जमिनीवर तसेच पाण्यातही चालणारे रणगाडे (Amphibious Tanks) आहेत. शस्त्र वाहक Weapon Carriers आणि आग फेकणारे (Flame Throwers) अशी AFVS ही शोधून काढली गेली आहेत. व ती आपल्या सैन्यात आहेत. या सर्वांची पायदळाला अतिशय मदत होऊ शकते. आणखी काही प्रकार यात आहेत. चिलखतांचा भेद करणारी (Armour Piercing) आणि त्यांचा विरोध करून त्यांना नादुरुस्त करणारी, तसेच पूर्णनाश करणारी, आयुधेही आहेतच. म्हणून त्यांच्या दुरुस्तीची व सुटे पुर्जे नेहेमी मिळत राहण्याची, व्यवस्था ठेवावी लागते. तसेच पेट्रोल, वंगणाचे तेल इत्यादी राहण्याची, व्यवस्था ठेवावी लागते. तसेच पेट्रोल, वंगणाचे तेल इत्यादी गोष्टीची चणचण किंवा अडचण, निवारण करण्याची पूर्व तयारी, आगाऊ केली असली पाहिजे. तसेच दुरुस्ती–कारखाने आहेत. ही शक्तिमान आणि क्लिष्ट लढाऊ यंत्रे चालविण्यास, अर्थातच श्रेष्ठ प्रतीचे यांत्रिक आणि तांत्रिक ज्ञान असावे लागते. १९६५ च्या आपल्या पाकिस्तान बरोबरच्या युद्धात अमेरिकेने पाकिस्तानला दिलेल्या 'पेटन' या रणगाडयांचा आपल्या फौजेने जो धुव्वा उडवला, त्यात आपल्या सैन्याचा शौर्याचा आणि कौशल्याचा फार मोठा वाटा असला, तरी पाकिस्तानी सैनिकाजवळ, ते रणगाडे चालविण्याला लागणारे तांत्रिक ज्ञान नव्हते. या गोष्टीलाहि कमी महत्व देता येणार नाही. दुसऱ्या महा–युद्धात जर्मनीच्या 'पॅन्झर डिव्हिजन्स 'ना जी एवढी प्रसिद्धी मिळाली ती रणगाडयांच्या धडकांमुळे

या दलातहि पोट विभाग असतात. या दलाची युद्धपद्धतीहि अर्थात निराळी असते. रणगाड्यातील आपसातले दळणवळण, लगावट संपर्क व बिनतारी संदेशवाहन व्यवस्थेने ठेवला जातो. आदेश व लढाईतले मार्गदर्शनही तसेच केले जाते. हा विभाग पायदळास पुष्कळ मदत करू शकतो. वायुसेना यांचे संरक्षण करू शकते. आपल्या देशात आता रणगाड्यांची उत्पत्ती सुरू झाली असून आपल्या 'वैजयन्ता' या जातीचे रणगाडे, आपल्या स्थल सेनेत येत आहेत. आपले पहिले रणगाडातज्ञ जनरल चौधरी हे होत.

## तोफखाना Artilary

स्थल सेनेतला हा एक जोरदार विभाग आहे. पायदळ व रणगाडे यांना तोफखान्याची फार मदत होऊ शकते. युद्धात शत्रूवर गोळ्यांचा वर्षाव करून त्याची पुढे चाल रोखणे, त्याच्या पिछाडीवर मारा करून, त्याच्या केंद्रांचा विध्वंस करणे; रसद, साहित्य, कोठारे, दुरुस्ती कारखाने इत्यादींचा नाश करणे, पूल, रेल्वे लाईन, मोर्चे, माऱ्याच्या पक्क्या जागा उध्वस्त करणे, दळणवळण विस्कळीत करणे, इत्यादी अनेक कामे फार दूरदूर अंतरावर वाहून, तोफखाना करीत असतो. आपले पायदळ आगेकूच करीत असतांना, त्याच्या मागे राहून, किंवा डाव्या उजव्या बगलेवरील सोईस्कर ठिकाणाहून, शत्रूवरील तोफखान्याच्या माऱ्यामुळे, तो आपल्या चालून जात असलेल्या सैन्यावर आपले लक्ष केंद्रित करून मारा करू शकत नाही. त्यामुळे आपल्या चढाईला अडथळा होत नाही. जसजसे आपले पायदळ पुढे पुढे सरकत असते, तशी तशी आपल्या तोफांची गोलंदाजी आपले 'उचलून,' (Lift–ing) अंतर वाढवून, पुढे पुढे सरकवीत नेली जाते. हे होत असतांना वरून तोफांचे गोळे जात असतात, व त्यांच्या 'छत्रा' खालून सैन्य पुढे पुढे चालून जात असते.याला 'सरपटणारी गोलंदाजी' (Creeping Barrage) म्हणतात. जरुरी पुरते जवळ, आपले पायदळ पोहोचले, म्हणजे तोफा बंद केल्या जातात, किंवा त्यांच्या मारगिरीचा पल्ला वाढवून शत्रूच्या पिछाडीवर गोळ्यांचा मारा सुरू होतो. हा एक तोफखान्याच्या गोलंदाजीचा प्रकार आहे. असे आणखीही आहेत.तोफांची 'लक्ष्ये' फार दूर असतात. ती नकाशावरून पाहून आपल्या तोफांच्या ठिकाणांचे, तेथून आंतर मोजून, त्याचे गणित करून, त्रिकोणमिती इत्यादींच्या साह्याने, हिशोब करून, आणि शास्त्रीय व यांत्रिक सिद्धांतानुसार, तोफांचे यांत्रिक भाग चक्रे, उंची, अंतर वगैरे जुळविण्याचे, पुर्जे व्यवस्थित लावून, अचुक निशाणबाजी करण्यात येते. तोफखान्याला विशेष शास्त्रीय आणि गणिती ज्ञान लागते. कित्येक सोईच्या जागी निरीक्षण चौकी (Observation Post) मुक्रर करून तेथून तोफखान्याच्या आपल्या लक्ष्यावर, 'अधिक पुढील' निरीक्षण अधिकाऱ्याच्या (F. O. O. Forward Observation Officer) द्वारा मार्गदर्शन केले जाते. तोफखान्याच्या अंतर्गत संपर्क, आदेश, सूचना वगैरे टेलिफोन द्वारा दिल्या

जातात. त्याच्याकरता टेलिफोनच्या तारा टाकण्यात येतात. आता हे काम बिनतारी संदेश वाहनानेही केले जाते.

आपल्या तोफखान्यात 'फील्ड आर्टिलरी मिडीयम आर्टिलरी' जड मोठ्या उखळी तोफा (Mortors) संमिश्र तोफखाना; विमान विरोधी तोफखाना 'किनारा संरक्षक तोफखाना' 'डोंगरी तोफखाना असे अनेक प्रकार आहेत. त्यांच्या नळ्या निरनिराळ्या लांबीच्या आणि व्यासाच्या असतात. तोफांचे गोळेहि निरनिराळ्या आकाराचे, वजनाचे आणि अंतस्थ रचनेचे असतात. तसेच त्यांच्या माऱ्याचा पल्लाही निरनिराळा असतो. आणि निरनिराळ्या जागावरून, तसेच जागावर (आपल्या तसेच शत्रूच्या) मारगिरी करण्याकरता त्या त्या परिस्थितीत उपयुक्त होईल, अशाच तोफखान्याची योजना करावी लागते. आता वायुसेना तोफखान्याची बरीचशी कामे करू शकते. तरीही तोफांइतके भारी गोळे विमानातून टाकता येत नाहीत. वरून काही मारगिरी सोपी व शक्य असते. विमानाच्या आणि तोफखान्याच्या मारगिरीत फार फरक आहे. तोफा जमीनीवरून एका ठिकाणावर निश्चल राहून, मारगिरी करतात. विमानातून केली जाणारी मारगिरी घाईची आणि उडता उडता केलेली असल्यामुळे तिचे केंद्रीकरण किंवा एकाग्रीकरण (Concentration) होऊ शकत नाही. एका भरारी नंतर दुसरी भरारी अशी थांबून थांबून मारगिरी होते. या उलट 'लक्ष्य' एकदा टिपले गेले, की त्यावर तोफखाना सारखी सरबत्ती करू शकतो. 'ट्रुप' हा तोफखान्याचा सर्वात लहान विभाग आहे. त्यावर बॅटरी व त्यावर रेजिमेंट.

## संदेश-संकेत विभाग Signals

हा विभाग युद्धाच्या तसेच शांततेच्या काळातही महत्वाची कामगिरी करीत असतो. युद्धाच्या काळात अर्थातच त्याची जबाबदारी शतगुणित होते. सर्व प्रकारचे अंतर्गत दळवळण, लगावट, आणि परस्पर संपर्क, सुरळीत आणि सुरक्षित राहण्यावर प्रत्येक विभागाची आणि केंद्राची कार्यक्षमता अवलंबून असते. सर्व प्रकारची व सर्व ठिकाणाहून सारखी माहिती सगळीकडे पाठवित राहणे, संकेत, हुकुम, खबरा पोहचवीत राहणे ही लढाईच्या धुमधडाक्यात जिवावर उदार होउन भयंकर अडचणीच्या आणि माऱ्याच्या जागातून करीत राहणे याला विलक्षण चिकाटी आणि काटकपणा लागतो. हा विभाग व त्याचे कार्य विस्कळीत झाल्यास परस्पर संबंध तुटून एकंदर सैन्यात गोंधळ आणि अव्यवस्था माजेल. कोणास कोणाचा पत्ता लागणार नाही आणि खालपासून वरपर्यंत तसेच उलट दिशेने जरूर तो संपर्क राखला गेला नाही तर होणारे परिणाम फार भयंकर आणि घातक ठरतील. बिनतारी टेलिफोन W/T रेडिओ टेलिफोन R/T आणि ताराचे टेलिफोन L/T असे निरनिराळ्या प्रकाराने संपर्क आणि संदेश मिळतात व पाठविले जातात. यात तारा टाकून अत्यंत बिकट आणि

अवघड जागात, शत्रूच्या गोळीबारातही सर्वांत आघाडीच्या तुकडीपासून वर-वरच्या आणि आजूबाजूच्या केंद्रात संदेश पोहचविण्याची व्यवस्था करणे हे फार गुंतागुंतीचे आणि किचकट काम असते. संदेश वाहकाचे W/T, R/T व L/T हे प्रकार निरनिराळ्या कारणामुळे निरनिराळ्या वेळी उपयोगात आणता येत नाहीत. एखादे वेळी एक काम देतो तर दुसरा निरुपयोगी ठरतो W/T–R/T यांच्या करता वातावरण शांत असेल तितके हवे असते. परंतु ऐन लढाईत ते अशक्य होते. शिवाय शत्रूला आपल्या ध्वनी लहरींच्या वेगाचा पत्ता लागला, तर तो मध्येच आपले सर्व संकेत 'पकडून' आपल्या गुप्ततेचा भेद आणि छेद करू शकतो, किंवा आपल्या ध्वनी लहरीवर भयंकर गोंगाट करुन ऐकणे अशक्य करू शकतो. या शिवाय प्राकृतिक परिस्थिती, दिनमान इत्यादी गोष्टी-वर यांची कार्यक्षमता अवलंबून असते. म्हणून निरनिराळ्या परिस्थितीत निर-निराळी योजना करावी लागते. एकेकाळी शिकवलेली खबूतरे संदेशवाहकाचे काम करीत असत. नवीन W/T, R/T वगैरेच्या शोधामुळे ते बंद झाले होते. परंतु आता त्यांचे पुनरुज्जीवन होत आहे. या दलातील मोटार सायकलस्वार संदेश वाहक सैनिक, हा मोठा कौतुकाचा विषय आहे. संदेश-आदेशाची डाक, कल्पनातीत अशा बिकट जागा पार करून, आणि नाना प्रकारच्या जीव घेणाऱ्या संकटांतून, रात्री बेरात्रीसुद्धा हा DR म्हणजे डिस्पॅच रायडर आपल्या मोटार सायकलवर भरधाव वेगाने जाऊन संदेश पोहोचवीत असतो. वाटेत त्याचे काहीहि होऊ शकते. त्याचे वाहन बिघडू शकते, त्याला अपघात होऊ शकतो. त्याला शत्रूची गोळी लागू शकते किंवा तो शत्रूकडून पकडलाहि जाऊ शकतो. तो एकटा असतो. त्याला कोणीही मदत करू शकत नाही. या विभागाच्या सैनिकांना, आपआपल्या यंत्रसामुग्रीचे आणि उपकरणांचे रक्षणहि करावे लागते. म्हणून हा विभाग लढावू (Arms) विभागात गणला गेला आहे.

## इंजिनीयर्स (Engineers) विभाग

लढावू (Arms) विभागातला हा पाचवा विभाग आहे. पूर्वी याला सॅपर्स अँड मायनर्स' हे नाव होते. याचे मुख्य काम स्थापत्य तंत्रज्ञाचे आहे. पूल तयार करणे, रस्ते तयार करणे, विमानाकरता धाव-पट्ट्या तयार करणे, निरनिराळ्या प्रकारचे मोर्चे आणि संरक्षक आडोसे आणि आश्रयाच्या जागा तयार करणे, पक्के खंदक खोदणे, भुयारी केंद्रे (Dug Out) बांधणे, अडथळे उभे करणे (काटेरी तारांच्या जाळ्यांचे व इतर प्रकारचे) सुरुंग पेरणे (Mine Laying) इत्यादी, आपल्या सैन्याच्या संरक्षक गोष्टी करणे; तसेच पाणी इत्यादी आवश्यक गोष्टी उपलब्ध करणे व शत्रूच्या या गोष्टींचा नाश करणे, अशी दुहेरी कामगिरी या भागाला करावी लागते. त्यातली, शत्रूने पेरलेले सुरुंग काढून टाकून, आपल्या सेनेचा मार्ग बिनधोक व सुरक्षित करणे ही फार

धाडसाची आणि शौर्याची कामगिरी आहे. गेल्या महायुद्धात या विभागातल्या **भगत** या नावाच्या अधिकाऱ्याला 'व्हिक्टोरिया क्रास' हे आजचे 'परमवीर' पदक याच कामगिरीकरता मिळाले होते. शत्रूने पेरलेले सर्व सुरुंग, त्याचा सारखा गोळीबार चालू असता, आवती भोवती गोळ्यांचा पाऊस पडत असतां. व स्वतः जखमी होऊनही, या वीराने काढून टाकले; आणि निकामी केले. आणि आपल्या सेनेचा मार्ग निष्कंटक आणि सुरक्षित करण्यात यश मिळविले, म्हणूनच या परमश्रेष्ठ बिरुदाने त्याचा वीरोचित सन्मान केला गेला. या विभागाचे सैनिक सशस्त्र असून प्रशिक्षित असतात. त्यांचे मुख्य काम जरी आपल्या सेनेच्या सर्व जरुरी, उपयुक्ततेच्या आणि सुरक्षिततेच्या गोष्टी करणे, तसेच शत्रूच्या अशा सर्व गोष्टींचा नाश करणे, हे असले तरी जरुरी प्रमाणे त्यांना प्रत्यक्ष लढावेही लागते.

## सेवा कार्य विभाग (Services)

मराठी ऐतिहासिक वाङमयात 'अठरा कारखाने' असा एक शब्दसमुच्चय जागोजाग आढळतो. ते अठरा कारखाने म्हणजे सेनेची खाती ( Departments ) अथवा पोट-विभाग ( व्यवस्था-सेवा) होत. त्यांची संख्या मोजून अशी त्या वेळी अठरा होती, असे नाही. तरी 'अठरा' हे एक संख्यावाचक नाव प्रचारात आले होते. कारण असो अथवा नसो. दुसरा शब्द कारखाने हा मात्र सार्थ होता. परंतु तेंव्हाचे कारखाने हे आजच्या अर्थाचे यंत्रादिकांनी सुसज्ज आणि वस्तूची निर्मिती करणारी ठिकाणे नसून, ती 'खाती' अथवा विभाग होते. तेच काम आजचा इंग्रजी शब्द Services ज्या विभागांना लावला जातो, ते विभाग करतात. यांचे लढणे हे मुख्य काम नसल्याने याना लढाऊ (Combatant) न म्हणता, सेवाकारी Services असे नाव दिले गेले आहे. पूर्वीचे 'अठरा कारखाने' म्हणजे आजचे 'सेवाकार्य विभाग' (Services) होत. आजही हे विभाग नक्की अठरा नाहीत. (पूर्वीही नव्हते) तरी पुष्कळ आहेत. त्यातील मुख्य मुख्य असे आहेत.

## वस्त्र-शस्त्र-सज्जा विभाग (Ordnance Corps)

या विभागाने, सैन्याला लागणारी सर्व प्रकारची वस्त्रप्रावरणे, तंबू, निवाऱ्याच्या सोयी, शस्त्रास्त्रे, दारूगोळा, सर्व प्रकारची अवजारे, हत्यारे, सज्जा (Equipment ) कातडी व रबरी वस्तू, शस्त्रादिकांचे सुटे भाग, त्यांची तपासणी, दुरुस्ती, अशा अनेक गोष्टी व वस्तू पुरवावयाच्या असतात. या विभागाकडून सेनेला एकंदर ३५००० पस्तीस हजार वस्तूंचा पुरवठा सतत व जरूरीप्रमाणे करवायाचा असतो. याकरता सर्व देशभर अनेक Ordnance Factories उघडलेल्या आहेत. तेथे प्रचंड प्रमाणावर वस्तूंची

निर्मिती आणि साठा करून ठेवला जात असतो. युद्ध काळात या कारखान्यावर अतीशय ताण पडतो. कारण युद्ध सुरु असताना खर्चाला सुमार नसतो. आणि खर्चाचा व उत्पादनाचा मेळ जमविणे कठीण पडते. काही बाबी, मुख्यतः दारु गोळा अतीशय मोठ्या प्रमाणावर अगोदरच तयार करून त्यांचा साठा करून ठेवता येत नाही. कारण ठराविक काळानंतर दारुगोळ्यात वापरलेली रसायने व रासायनिक क्रिया निष्फळ होते. व असा दारु गोळा निरुपयोगी होत असतो. अमक्याच इतक्या कालावधीत 'कार्यक्षम' ठरणाऱ्या रासायनिक प्रक्रियेच्या अनेक वस्तू असतात, व त्या फक्त युद्धात वापरायच्या असतात. आणि त्या वस्तूंच्या कार्यक्षमताकालात, युद्ध होईलच असे कोणीच सांगू शकत नाही. आणि तसे युद्ध न झाले, तर त्या वस्तू निरुपयोगी ठरणार. म्हणून तात्कालिक जरुरीपेक्षा अशा गोष्टीचा अधिक साठा व उत्पादन फुकट जाणारे असल्याने, अचानक युद्ध झाले, तर त्यांचा पुरवठा जरुरीप्रमाणे होत राहणे भयंकर कठीण होते. व त्या लष्करी कारखान्यांची उत्पादनक्षमता तोकडी पडते. यावर एकच उपाय आहे. तो हा की मोठमोठ्या खासगी मालकीच्या कारखान्यांची दुहेरी उपयोगी रचना (Duel purpose) नेहमीकरता सरकारी हुकमाने, किंवा अशा कारखानदारांनी आपखुषीने करावी. म्हणजे संकटकाली ते कारखाने त्या वस्तू बनविणे सुरु करतील व आपल्या सैन्याला त्यांचा तुटवडा पडणार नाही. युरोप मधील देशात ही व्यवस्था आहे. खासगी कारखाने शांततेच्या काळातही अशा युद्धोपयोगी वस्तू बनवितात व सैन्य त्यांचेपासून त्या विकत घेते. आपल्याहि देशात हे झाले पाहिजे. स्वावलबनाला हे आवश्यक आहे. या विभागाचे काम सैन्याला लागणाऱ्या सर्व वस्तू बनविणे, मिळविणे, आणि त्यांचा साठा करणे, इतकेच नसून सैन्याला, त्यांचा अखड पुरवठा करणे, अगदी लढाई चालू असतानाहि, लढणाऱ्या आघाडीवर पोहोचविणे, जागोजागी त्यांचे साठे तयार ठेवणे, शस्त्रे, अवजारे, हत्यारे तपासणे, दुरुस्त करणे इत्यादी गोष्टी या विभागातील सैनिक व अधिकाऱ्यांना कराव्या लागतात. त्यात जोखीम, कष्ट, जबाबदारी व युद्धभूमीवरील सर्व धोके आणि आपत्ती असतातच.

## सेना सेवा विभाग (Army Service Corps)

या विभागाला पूर्वी 'कमीरियेट' म्हणत. नंतर 'सप्लाय अँड् ट्रान्स्पोर्ट' हे नाव त्याला मिळाले नंतर ब्रिटिशांचे वेळी याला (Royal Indian Army Service Corps) 'शाही हिन्दी सेना पुरवठा विभाग' हे नाव मिळाले. या नावाची इंग्रजी आद्याक्षरे आर्. आय्. ए. एस्. सी. अशी आहेत, त्याचा उच्चार मुद्दाम चेष्टेने कित्येक वेळी 'राईस' असा केला जाई; व या विभागाला 'राईस' (म्हणजे भात) कोअर 'भात पुरवणारा विभाग' असे विनोदी नाव मिळाले होते. आणि ते थोडेसे सार्थही होते. कारण रसद-शिधा पुरवठा हे या

विभागाचे मुख्य काम असते. 'राईस'–भात हिंदी फौजेत खातात. गोऱ्या सैन्याच्या शिध्यात तांदुळ नसतो. ते भात खात नाहीत. आताचे या विभागाचे नाव सुटसुटीत "आर्मी सव्हिस कोअर" हे आहे. 'राईस' सारखा उच्चार गेला आणि विनोदही गेला. रसद–शिधा याशिवाय या विभागाचे दुसरे महत्वाचे काम आहे परिवहन व्यवस्था. सैनिक, त्यांचे सर्व सामान आणि जरूरीच्या वस्तूंची वाहतूक शांततेच्या तसेच युद्धाच्या वेळी करणे हे या विभागाचे काम असते. हे काम करण्याची दोन साधने किंवा पोट विभाग असतात. एक मोटार ट्रान्सपोर्ट व दुसरा ॲनिमल ट्रान्सपोर्ट. मोटार ट्रान्सपोर्ट–M. T. विभागात निरनिराळ्या शक्तीच्या आकाराच्या व जडणी घडणीच्या मालवाहू मोटारी, ट्रक्स वगैरे असतात. A. T. या विभागात हे काम पशूकडून म्हणजे खेचराकडून करविले जाते. पूर्वी–मोटारीच्या पूर्वी, म्यूल कोअर्स असत. आताही खेचरेच हे काम करतात. त्याना ॲनिमल ट्रान्सपोर्ट कंपनीज् हे नवीन नाव मिळाले आहे. सैन्याशिवाय इतर कोठेही खेचरांचा उपयोग केला जात नाही. 'जेथे खेचर जाऊ शकत नाही; तेथे कोणीही जाऊ शकत नाही' आणि 'खेचर जाऊ शकत नाही अशी एकही जागा नाही' अशा यथार्थ म्हणी प्रचलीत आहेत. आपल्या खेचरांनी चीनच्या लढाईच्या वेळी फार बिकट आणि मोलाची कामगिरी बजावलेली आहे. 'अडला नारायण गाढवाचे पाय धरी' ही व्यावहारिक म्हण सैन्यात डोंगराळ आणि अप्रवेश्य भागात सेनेला अक्षरशः अनुभवास येते. सेना नारायणास गाढवाचे पाय धरल्या वाचून गत्यंतरच नसते. आणि गर्दभराज, खुषीत असण्यावर फार महत्वाच्या हालचाली अवलंबून असतात. खेचर हा मोठा विलक्षण प्राणी आहे. तो सुतासारखा सरळ वागतो. परंतु एकदा अडला म्हणजे मात्र भयंकर कठीण असते. कापून काढला तरी पुढे सरकत नाही. म्हणून 'खेचरा सारखा हट्टी Obstinate like a mule अशी, हट्टी माणसाला उपमा देत असतात. आपल्या हिंदी खेचरांना सर्व प्रकारचे शिक्षण देण्याचे बरेली येथे केंद्र आहे. खेचरे सांभाळणाऱ्या सैनिकाना (Mule Leaders) त्यांच्या देखभालीचे खाण्या–पिण्याचे उपचार इत्यादिकांचे शिक्षण दिले जाते. घोडा गेला. परंतु खेचर कायम आहे आणि राहणारच. मोटारींची दुरुस्ती, सुट्या भागांचा पुरवठा वगैरे सर्व व्यवस्था या भागाकडे असते. लढाईच्या वेळी युद्ध-भूमीच्या शक्य तितके जवळ व सोईस्कर ठिकाणी या केंद्राला रसद शिधा वगैरेचे सतत वाटप व पुरवठा करावा लागतो. व हे काम रात्रींच करावे लागते. व शत्रूस दिसू नये म्हणून, (आजूबाजूने किंवा विमानातून) मोटारीचे मोठे प्रकाशमान दिवे बंद करून बिकट जागातून वाहने चालविणे सोपे नाही हे सांगायला नको. हेही सैनिकच असतात. त्यांना अपघात हा एक धोका आणि शत्रूचा गोळीबार हा दुसरा धोका, अशा कठीण परिस्थितीत जिवावर उदार होऊ ठराविक कार्यक्रमाप्रमाणे काम करावे लागते. यांनाहि रायफलचे शिक्षण

मिळालेले असते. त्यांच्या रायफली त्यांच्या हाताशीच तयार असतात. रसद वगैरे पुरवठा विमानातून खाली टाकूनही केला जातो. परंतु त्यातही अनेक प्रकारच्या अडचणी असतात. प्रत्येक वेळी प्रत्येक परिस्थितीत ते शक्य नसते. सैन्याची (स्थल-सेनेची) स्वत:ची परिवहन व्यवस्थाच जास्त खात्रीची व सोईची असते. सेनेच्या पोटापाण्याची अन्नाची सोय service corps करते. सैन्याच्या वस्त्र प्रावरणांचीही आणि त्यांच्या-शस्त्रांच्या पोटापाण्याची म्हणजे दारु गोळ्यांची व्यवस्था Ordnance Corps करते.

## वैद्यकीय विभाग (Army Medical Corps)

सैन्याची या विभागाकडून जी सेवा होते तिची सुरुवात अगदी पुढे लढाई चालू असताना प्रत्येक तुकडीचे एक वैद्यकीय मदतीचे ठाणे (Regimental Aid Post RAP) असते, तेथून होते. तेथे जखमी शिपायाचा पहिला इलाज होतो. तात्पुरत्या तत्क्षणीच्या उपायाने जखमी शिपाई परत लढायला पाठविता आला, तर इलाज करून परत लढाईत सामील होतो. नाही तर त्याला मागल्या Advance Dressing Centre Hospital; त्याच्या मागल्या Field; त्याच्या मागल्या Base Hospital अशा क्रमाने, जरूरी प्रमाणे मागे मागे, पाठविले जाते व तेथे त्याच्यावर जरूर तसे इलाज केले जातात. लढाईत जखमी सैनिकांना जे चालू शकत नाहीत अशांना RAP मधे स्ट्रेचरवर आणण्याची व्यवस्था असते. या निरनिराळ्या ठिकाणातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना आणि मदतनिसांना अहोरात्र आणि शत्रूच्या गोळीबाराच्या धोक्यातही काम करावे लागते. ह्या लोकांचे हे काम फार महत्वाचे आणि जोखमीचे असते हे सांगायला पाहिजे असे नाही. यांच्याच बरोबर लष्करी शुश्रुषा-सेवाविभाग (Army Nursing service) ही सर्व पूरक गोष्टी करतो. याशिवाय लष्करी दंत-विभागही (Army Dental Corps) आहे. सुसज्ज व निष्णात शल्य-चिकित्सक, विशेष 'तज्ञ' इत्यादी सर्व व्यवस्था या वैद्यकीय विभागात असते.

याशिवाय लष्करी टपाल विभाग, लष्करी शिक्षण विभाग, लष्करी पशुवैद्यक विभाग इत्यादी अनेक विभाग या सेवा-विभाग services मधे अंतर्भूत आहेत. त्यात आणखी एक Ordnance आणि Service Corps इतका महत्वाचा आणि एक मोठा विभाग आहे. तो आहे EME इंजिनियर्स-यांत्रिकी आणि विद्युत्.

## यांत्रिकी आणि विद्युत विभाग (Electrical and Mechanical Engineers)

हा तंत्रज्ञांचा विभाग आहे. या विभागाच्या नावावरून याच्या सेवेचा पूर्ण बोध होतो. विज्ञानाची जितकी अधिकाधिक प्रगती होईल तितके यांत्रिकीकरण

वाढत जाणार आहे हे उघड आहे. आणि यंत्रादि गोष्टी व उपकरणे अधिकाधिक क्लिष्ट होत जाणार, आणि ती दुरुस्त व चालती, म्हणजे कार्यक्षम राखण्याकरता अधिकाधिक तांत्रिक ज्ञान आणि परिश्रम करावे लागणार; हे उघडच आहे. म्हणून या विभागाचे काम, तसेच महत्व वाढत जाणार हे ओघानेच आले. नाना प्रकारची यांत्रिक हत्यारे अवजारे आणि साधने, शांततेच्या तसेच युद्धाच्या परिस्थितीत 'चालू' ठेवली तर त्यांचा उपयोग. म्हणून या विभागाची दुरुस्ती व पाहाणी केंद्रे व ठाणी, शक्य तितकी पुढे आघाडीच्या जवळच ठेवावी लागतात. म्हणजे या योगाने त्यांची दुरुस्ती, पाहाणी, तपासणी शक्य तितक्या लवकर होऊन ती दुरुस्ती, पाहाणी, तपासणी शक्य तितक्या लवकर होऊन ती दुरुस्त स्थितीत युद्धात कामास पडू शकतील. या विभागाचे आणि वैद्यकीय विभागाचे काम सारखेच असते. वैद्यकीय विभाग सैनिकाची काळजी घेतो तर हा विभाग त्यांच्या शस्त्रास्त्रांची आणि आयुधांची काळजी घेतो. या विभागाचीही मागे जाणारी केंद्रांची व ठाण्याची साखळी असते.

## जलसेना–दुसरे अंग

आपल्या देशाला फार मोठा समुद्र किनारा असून आपला देश, एक खंड–प्राय द्वीपकल्प असून निमूळता होत गेलेला आहे. त्याच्या दोन्ही बाजूला मोठे समुद्र असून वाटेल तितक्या मोठ्या बोटी, जहाजे वगैरे खुशाल संचार करू शकतात. या दोन्ही समुद्रात बेटे वगैरे नाहीत म्हटले तरी चालेल. अंदमान निकोबार अशी लहान बेटे आहेत. परंतु कोणत्याहि प्रकारचा अडथळा अथवा अडचण नाही. तसेच शत्रूच्या आरमाराला धोकाही नाही. दोन्ही समुद्र अतिशय खोल आहेत व जलपृष्ठाखालूनही सुळके वगैरेचा अडथळा नसल्याने पाणबुड्यांचाहि संचार बिनधोक होऊ शकतो. अशा सोईस्कर प्राकृतिक परिस्थितीमुळे पूर्वी धोका नव्हता म्हणून आता नाही असे समजणे बरोबर होणार नाही. म्हणून, आपल्याला शक्तीसंपन्न सुसज्ज आरमाराची जरुरी आहे.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमाराचे महत्व ओळखून मराठी आरमाराची स्थापना केली होती. आंग्रयांचे आरमार प्रसिद्ध होते. मराठी आरमाराने परकीय शत्रूंना चांगली दहशतही बसवली होती. पुढे दुर्दैव आडवे आले. सन १८३० ते १८६३ च्या दरम्यानच्या काळात कंपनीच्या हिंदी आरमाराचे 'इंडियन नेव्ही मरीन' हे नाव होते व नंतर पुढे त्याला 'रॉयल इंडियन नेव्ही' हे नाव मिळाले. तीच इंडियन नेव्ही आता स्वतंत्र **हिंदुस्थानचे आरमार आहे.**

आपल्या जलसेनेच्या कार्यकारी प्रमुखाला **चीफ ऑफ दि नेव्हल स्टाफ** असे नाव दिलेले आहे. चार प्रमुख कार्यकारी अधिकारी आणि आरमारी सचिव यांचे मिळून **नेव्हल हेडक्वार्टर** बनले आहे. व येथून जलसेनेचे प्रशासन आणि संचालन केले जाते. **डेप्युटी चीफ ऑफ दी नेव्हल स्टाफ** या अधिकाऱ्याकडे जल-

सेनेचे, आरमारी डावपेच, संचलन, शस्त्रास्त्रे, सुरक्षितता, गुप्त माहिती, संपर्क अशी खाती आहेत. शिवाय त्याचे मुख्य कार्य आरमाराच्या शाखा, विभाग, उपविभाग, इत्यादींची सुसूत्रता आणि समन्वय हे आहे. या कार्याकरता निरनिराळी कार्यालये व उपविभाग–प्रमुख नियुक्त केलेले आहेत. मुख्य मुख्य उपविभाग–आरमारी मनुष्यबळ, आरमारी शस्त्रास्त्रे व पुरवठा, यांत्रिकी व विद्युत्, रसद, सज्जा, प्रशिक्षण, संशोधन, स्वास्थ्य आणि वैद्यकीय असे आहेत. याशिवाय आता 'आरमारी वायुदल' विभागही उघडण्यात आला आहे. आणि आपल्या आरमारात विमाने उतरू शकतील व तेथून उड्डाण करू शकतील असे मोठे विमान–वाहू जहाज ठेवण्यात आलेले आहे. आपले आरमार इतर देशांच्या तुलनेत फारच लहान आहे. मोठमोठी लढाऊ जहाजे अजून आपण तयार करू शकत नसलो तरी; जहाज बांधणीत आपली प्रगती होत आहे. अर्थातच तिचा वेग वाढला पाहिजे. आपल्या आरमारातील जवळ जवळ सर्वच लढाऊ जहाजे दुसऱ्या देशाकडून 'आड गिऱ्हाईकी' घेतलेली आहेत. त्यांची कार्यक्षमता आता संपण्याच्या जवळपास आल्याने जहाजे विशेषतः मोठी जहाजे बांधणे आपले आपण केले पाहिजे.

आरमारात Battle ships ही सर्वात मोठी व वेगवान लढाऊ जहाजे आहेत. यांना Ship of the Line असे म्हणतात. म्हणजे समुद्रीयुद्धाची अभेद्य 'फळी' बांधण्याची महत्वाची कामगिरी या युद्धनौका करीत असतात. Dread Not (बेडर जहाज) हा युद्धनौकेचा दुसरा प्रकार आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर विमानवाहू नौका, तरते विमानतळ, पाणबुड्या पाणसुरंग खोलवर पेरून ठेवता येणारी भयंकर स्फोटके (Depth charge) वगैरेमुळे ड्रेडनाटचे पहिल्याइतके महत्व उरले नाही. याशिवाय 'क्रूझर्स' (हलकी व भारी) 'पॉकेट बॅटल शिप्स' डिस्ट्रॉयर्स इत्यादी निरनिराळ्या प्रकारची, आकाराची व कार्यक्षमतेची जहाजे आहेत.

आपल्या जल सेनेत 'डिस्ट्रायर्स', हलकी 'क्रूझर्स', 'स्लूपर्स', 'फ्रिगेटस्', कॉर्व्हेटस् या जातीची लढाऊ जहाजे आहेत. काही विमान विरोधी तोफांनी सुसज्ज आहेत. या जहाजावर निरनिराळ्या शक्तीच्या आणि व्यासाच्या तोफा बसविलेल्या आहेत. याशिवाय समुद्रातले पाणसुरुंग साफ करणाऱ्या आणि सुरुंग साफ करणाऱ्या आणि सुरुंग पेरणाऱ्या (mine Layers) अशा नौका आहेत Hospitel Ships रुग्णालय नौकाहि आहेत. युद्ध कालात व्यापारी नौका व जहाजे आरमारात घेतली जाऊ शकतात व ती अतिशय मोलाची व महत्वाची कामगिरी पार पाडू शकतात. जसे उत्पादक खासगी कारखाने दुहेरी उपयोगाचे (Duel Purpose) असणे दूरदर्शीपणाचे आणि उपयुक्त ठरते; तसेच व्यापारी नौका आणि जहाजेहि दुहेरी उपयोग होईल अशा रचनेची तयार केली

जावीत. म्हणजे त्यांच्यावरही तोफा वगैरे बसविता येतील. आणिबाणीच्या वेळी लहान नौका देखील आरमाराला मदत करून संरक्षणात सहभागी होऊ शकेल. गेल्या महायुद्धातले ब्रिटिश महाभारतातले **'डंकर्कपर्व'** हे एक धीरोदात्त आणि शिस्तबद्ध आश्चर्यजनक पर्व सिद्ध झाले आहे. त्या प्रसंगी पाण्यावर तरंगणाऱ्या नौकाच नव्हे; तर 'ओंडक्यांचीही' ब्रिटिश सेनेला अपरिमित मदत झाली.

## वायुसेना-तिसरे अंग

चतुरंग सेनेचे तिसरे आणि सर्वात धाकटे अंग म्हणजे वायुसेना. वयाने हे धाकटे असले तरी कर्तृत्वाने आणि महत्वाने ते दुसऱ्या दोन अंगापेक्षा अनेक वेळी मोठे ठरत असते. कारण ते दोन्ही 'वडील' अंगांना अप्रतीम मदत आणि सहकार्य देऊ शकते. याची संचार-सीमाअमर्याद अनंत आकाश आणि आता अवकाशही आहे. परंतु याच्या संचारालाहि मर्यादा पडतेच. कारण त्याला खाली उतरावे लागतेच. मग ते जमिनीवर असो किंवा तरत्या विमानतळावर आणि समुद्रात असो, दुरुस्तीकरता, विश्रांतीकरता पुन्हा सुसज्ज होण्याकरता अशा अनेक कारणांनी त्याला खालीच उतरावे लागते. अजूनपर्यंत आकाशात विमानतळ उपलब्ध झालेले नाहीत.

आपल्या वायुसेनेच्या कार्यकारी प्रमुखाला **चीफ ऑफ दी एअर स्टाफ** असे म्हणतात. इतर दोन सेनाप्रमाणेच याही सेनेचे प्रशासन, संचालन, व्यवस्था वगैरे सर्व आवश्यक विभाग उपविभाग आहेत व त्यांची निरनिराळी केंद्रे व ठाणी आहेत. आपल्या वायुसेनेत लढाऊ Fighters बाँबफेकी Bombers अशी निरनिराळ्या प्रकारची व निरनिराळी कामे करणारी विमाने आहेत. ही सर्व विमाने निरनिराळ्या प्रकाराने सुसज्ज असतात. त्यात तोफा रॉकेटस् मिसाईल्स, मशीनगन्स वगैरे प्रकार आहेत. आकाशातून आकाशात, आकाशातून जमिनीवर व समुद्रावर त्यांचा मारका होतो. आता ध्वनी व प्रकाश यांच्या वेगांनाही मागे टाकणारी अवकाशात उडणारी स्वयंचलित विमाने व प्रेक्षेपणास्त्रे निघाली आहेत. 'ग्रहगोलही' आता टप्प्यात आलेले आहेत. विमानाइतकी झपाट्याने व आश्चर्यकारक प्रगती दुसरी कशातही झालेली नाही. मनुष्याने जल व स्थल यांच्यावर प्रभुत्व मिळविल्यानंतर, आता आकाश आणि अवकाश यांच्यावरही प्रभुत्व स्थापन केले आहे. आपल्या देशात (अर्थात् परकीय मदतीने) विमानांची निर्मिती सुरु झाली आहे. परंतु आपण शक्य तितके लवकर स्वयंपूर्ण झाले पाहिजे. आता **'आस्मानी'** सर्वार्थाने महाभयप्रद झालेली आहे. 'राडार' हे एक नवे साधन उपलब्ध झाल्याने वैमानिक नियंत्रण आणि संचलन करण्याची व्यवस्था सोपी झाली आहे. तसेच शत्रूच्या वैमानिक हालचालीचीही बित्तंबातमी मिळू शकते.

आकाश-अवकाशातील युद्धाचे तंत्र स्वतंत्र आहे. याचे मुख्य कारण विमान आकाशात एका जागी स्थिर राहू शकत नाही. त्याची मारगिरी उडती धावती

असल्याने अचुक लक्ष्यवेध अतिशय कठीण असतो. जल आणि स्थल या दोन्ही सेनांना वायुसेना फारच महत्वाचे सहकार्य देऊ शकते. वाहतुकी शिवाय विमानातून शत्रूच्या पिछाडी मागेही, कोठेही, छत्र्यांच्या साह्याने सैनिक उतरविता येतात. विमाने टेहेळणीची कामे उत्तम तऱ्हेने करू शकतात. (Air photo) हे स्थल सेनेला एक मोठे वरदान प्राप्त झालेले आहे. आता युद्धात आकाश–श्रेष्ठत्वाला (Air superiority) अतिशय महत्व आले आहे. गेल्या महायुद्धात जर्मनीजवळ हे श्रेष्ठत्व होते. व म्हणून इंग्लंडवर त्याला अविरत हवाई हल्ला, बराच काळपर्यंत सुरू ठेवता आला. परंतु पुढे हे श्रेष्ठत्व कमी झाले. ब्रिटिश लोकांची चिकाटी, असामान्य धैर्य आणि हळूहळू ब्रिटिश वायुसेनेचे वाढते पराक्रम, आणि विमान–विरोधी कार्य यशस्वी होत गेले. या युद्धाला 'बॅटल ऑफ ब्रिटन' म्हटले जाते. त्याचा अर्थ निराळा आहे. लढाई एकाद्या विशिष्ट ठिकाणच्या नावाने ओळखली जाते. परंतु सर्व ब्रिटिश बेटावरच जर्मनीने मारगिरी चालविली असल्याने त्याला अमुक एक लढाई, असे म्हणता येत नव्हते. ती सर्व देशाची एकदम लढाई होती. म्हणून तिला 'ब्रिटनची लढाई' हे सार्थ नाव दिले गेले.

विमाना–विमानांचे जसे आकाशात युद्ध होते, तसेच जमिनीवरुन आणि समुद्रातूनही विमान विरोधी शस्त्रास्त्रांनी वायुदलावर मारा करता येतो परंतु विमाने अतिशय वेगाने उडत असल्या कारणाने अचुक लक्ष्यवेध मोठा कठीण असतो. तरीसुद्धा खालूनही विमानांना धोका असतोच. व अशी अनेक विमाने नेहमी जमिनीवरून केलेल्या मारगिरीने पाडता येतात. पेट घेणे हा विमानाच्या विध्वंसाचा मोठा प्रकार आहे. यांत्रिकी बिघाड होतो व जळण इन्धन संपते ह्याने विमानाचा गतिरोध करतात; व त्यांना जमिनीवर उतरायला, पडायला भाग पाडतात. वायुसेना जसजशी प्रभावी होत गेली, तसतशी जलसेना आणि स्थलसेना विशेषत: स्थलसेना यांना 'नजर बंदी'ची (Comouflage) ची अधिकाधिक जरूरी उत्पन्न झाली. कारण वायु सेनेच्या नजरेतून लहान सहान गोष्टही सुटत नाही. याचे एक फार चांगले उदाहरण गेल्या महायुद्धाचे वेळी आसामात घडले. तेथे घनदाट अरण्यात पिछाडीच्या एका सैनिकाने आपला एक पांढरा कपडा धुवून वाळत घातला होता. तो एका शत्रूच्या विमानाने वरून पाहिला. हिरव्या जंगलात पांढरा रंग कसा? अर्ध्या तासाच्या आत शत्रूच्या विमानांनी त्या तळाचा पूर्ण विध्वंस करुन टाकला. विमानाचे डोळे आणि तर्क फार तीक्ष्ण व अचुक असतात.

## जन-सेना चौथे अंग

या अंगाचे वैशिष्टच हे आहे की पहिल्या तीनही अंगाप्रमाणे ती नेहेमीच खडी नसते. युद्धप्रसंगी आणि संकटकाळी ती बोलाविली जाते. हे बोलावलेले

तिन्ही दलातील सैनिक आपआपल्या पूर्वीच्या जागा घेतात. बाकी उरलेले नागरिक लढाईत गुंतलेल्या आपल्या सेनेचा निरनिराळ्या प्रकारे पाठपुरावा करून, देश सेवेचा आपला वाटा उचलतात. काही सेवा 'आवश्यक सेवा' (Essential Services) ठरविल्या गेलेल्या असतात. दैनंदिन जीवनातही त्यांचे महत्व असते. युद्ध काळात ते अधिकच वाढते. याशिवाय अशा काही विभागांचे 'लष्करी-करण' हीं केले जाते. तेंव्हा ते विभाग लष्करी अंमलाखाली जातात.

काही देशात ठराविक कालमर्यादेची सक्तीची सैनिक सेना असते. अमेरिकेत तशी आहे. याचा फार मोठा फायदा हा आहे की देशाची 'खडी' सेना अति अल्पावधीत हवी तितकी वाढविता येते. कारण प्रत्येक नागरिकाचे कमीत कमी प्राथमिक लष्करी-शिक्षण तरी, पूर्ण झालेले असते. तेथे 'भरती, नेहमीच चालू असते. अशा नागरिक सैनिकांची संख्या लोकसंख्येप्रमाणे घटते, व वाढते. परंतु ज्या देशात अशी सक्ती नसते त्या देशात 'खुशिच्या नागरिक सेने'ची कमाल मर्यादा ठराविक असते. ही मर्यादा देशाच्या आर्थिक-परिस्थितीवर आणि परराष्ट्रीय धोरणावर अवलंबून असते.

सक्तीची सैनिकी सेवा आपल्या देशात कधीही नसल्याचा इंग्लंडचा अभिमान दुसऱ्या महायुद्धाचे वेळी त्याला सोडून द्यावा लागला. परंतु त्यातही सद्सद्विवेक बुद्धीचे विरोधक (Concentious Objetors) अशी एक पळवाट ठेवावी लागली. वास्तविक कोणत्याही स्वतंत्र आणि स्वाभिमानी देशात सैन्य भरती करता आकर्षक प्रचाराची आणि प्रलोभनांची गरज पडू नये आणि विशेषत: संकटकाली तर मुळीच पडू नये. परंतु तसे होत नाही. प्रस्तुत लेखकाने एका इंग्रज सार्जंटला "तू सैन्यात का भरती झालास?" असा प्रश्न विचारला असता त्याने उत्तरादाखल आपली छाती व दंड उघडे करुन दाखविले व मोठ्या डौलाने म्हणाला "भरती व्हा, आणि जग पाहा" (Join the forces and see the world) अशी जाहिरात पाहून मी भरती झालो. मला लहानपणापासून प्रवासाची आवड आहे. परंतु स्वखर्चाने ते शक्य नव्हते मी पाहिलेल्या देशांची नावे व साले गोंदवून घेतली आहेत. ती वाचा. मी आता तुमच्या देशात आसाममधे आलो आहे. व आता लवकरच कलकत्त्याच्या आराम शिबीरात (Rest Camp) जाणार आहे. तेथे (आसाम) हिंदुस्थान व साल गोंदवून घेणार आहे.

जनसेनेचेही चार प्रकार आहेत. तीही चतुरंग आहे. अ. **पहिला प्रकार :** '**राखीव**' (Reservists)-या प्रकारात खड्या सैन्यात ठराविक काल-मर्यादेची सेवा (Colour Service) केलेल्यांचा अंतर्भाव होतो. या विभागात विशिष्ट माजी-सैनिकांना विशिष्ट कालावधीत जरूरीप्रमाणे बोलविण्यात येते. (Mobilisation) शिवाय त्यांनी ठराविक वेळी आपल्या सैनिकी

प्रशिक्षणाच्या उजळणी व सरावाकरता हजर राहावयाचे असते इतर वेळी ते कोणताही व्यवसाय करु शकतात. परंतु त्यांना पोलिसमधे भरती केले जात नाही. कारण संकटकाली ते सैन्यातील नोकरीवर गेल्याने पोलिसांच्या संख्येत खिंडारे पडतील. संकटकाली पोलिसांचे काम अधिक कठीण व जबाबदारीचे होत असते. या शिवाय निवृत्त सैनिकांनाही बोलाविले जाते. व त्यांना त्यांच्या शारिरिक सुदृढतेनुसार सैनिकी कामे दिली जातात. सैन्यात परत बोलावल्यावर त्यांना त्यांच्या दर्जाप्रमाणे पूर्ण पगार वगैरे दिला जातो. अधिकारी वर्गाचाही यात समावेश असतो.

(ब) दुसरा प्रकार : **प्रादेशिक सेना**-या प्रकारात (अ) नागरी आणि (ब) साधारण असे पोट विभाग असतात. प्रमुख शहरात नागरी-प्रादेशिक सेनेची पथके असतात. यातील सैनिकांना आठवड्यातून काही तास सैनिकी शिक्षण घ्यावे लागते. व वर्षातून ठराविक दिवस छावणीत एकत्र राहून सामुहिक-शिक्षण घ्यावे लागते. या विभागात साधारण ग्रामीण नागरिकापेक्षा वरच्या दर्जाच्या नागरिकांचा समावेश असतो. प्रशिक्षण कालात त्यांना रोज भत्ता आणि छावणीतल्या काळाचे वेतन मिळते. साधारण ( ब ) विभागातील सैनिक सर्वच शिक्षण छावणीत राहून घेतात व ठराविक संपूर्ण वेळेचे त्यांचे शिक्षण असते. त्या काळात त्याना 'खड्या' सैनिका सारखेच पूर्ण वेतन, भत्ते वगैरे मिळतात.

या सेना प्रकाराच्या नावावरुनच त्याचे कार्यक्षेत्र उघड होते. या सैनिकांवर देशाच्या सीमाबाहेर जाण्याचे बंधन नसते. देशातल्या देशातच या सेनेने खड्या सैन्याला पूरक आणि त्यांची देशाच्या अंतर्गत असलेली कामगिरी अंगावर घेऊन खड्या सैन्याला मुख्यतः मोकळे करावयाचे असते. या शिवाय जरूरी प्रमाणे सीमांच्या आतील कोणतीही सैनिकी कामगिरी पार पाडावयाची असते. इंग्लंड मधील प्रादेशिक सेनेलाही **ग्रेट ब्रिटनच्या** बाहेर जावयाचे नसे.परंतु दोन्ही महायुद्धांचे विशेष कायदे पार्लमेंटमधे पास करवून घेऊन त्या सेनेला ब्रिटिश सरहद्दीबाहेर पाठवियात आले. आपल्या प्रादेशिक सेनेला असले काही करावे लागणार नाही. कारण आपली 'खडी सेनाच' मुळी **युद्धाकरता** आपल्या सरहद्दीच्या बाहेर केंव्हाही पाऊल टाकणार नाही. तेव्हा प्रादेशिक सेनेचा प्रश्नच उत्पन्न होत नाही.

इंग्रज प्रादेशिक सेना पथकांनी निरनिराळ्या आघाड्यावर मोठी मर्दुमकी गाजविलेली आहे. आणि याचा तेथील जनतेला यथार्थ अभिमान वाटत असतो तिकडे खड्या सैन्यापेक्षा नागरिक सेनेला ( Citizen Army ) जनमानसात अधिक मान आहे. कारण 'पेशा' म्हणून एकादे काम करणाऱ्या पेक्षा 'हौस' म्हणून तेच काम तितकेच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक सरस करणाऱ्या विषयी स्वाभाविकपणे कौतुक व आदर वाटत असतो. आपल्या देशात याच्या अगदी उलट परिस्थिती आहे. पहिल्या महायुद्धाचे वेळी हिंदुस्थानात एक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळ
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नोंद दि: ५१
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८९६८

प्रादेशिक असा इंडियन डिफेन्स फोर्स (I. D. F.) काढला गेला होता. त्यात काही उत्साही तरुण मिळत असलेली लष्करी शिक्षणाची संधी घेण्याच्या अंतस्थ हेतुने भरती झाले होते. या सेनेच्या नावाच्या आद्याक्षरावरुन **'आय डोन्ट फाईट'** असे निंदाव्यंजक नाव बनवून त्यांची टिंगल केली गेली. दुसऱ्या महायुद्धा पूर्वी 'इंडियन टेरिटोरियल फोर्स' (I. T. F) उभा केला गेला होता. त्याची 'हाराटोरीवाला' असे नाव देऊन टिंगल झाली. आज नागरिकांची 'टेरिटोरियल आर्मी' T. A. असे नाव असलेली सेना उभी आहे. तिच्या विषयी कोणालाही आस्था नाही. तिची पथके सैनिक नाहीत, म्हणून ओस पडलेली आहेत. तिच्याकडे कोणी ढुंकनही पहात नाही; आणि तिला क्षुद्र लेखायलाही कचरत नाहीत. आणि अशी काही नागरिक सेना आहे याचा शेकडा ९५ च्या वर लोकांना पत्ताही नाही. आणि म्हणे ! आमच्या तरुणांना लष्करी शिक्षणाची आणि जीवनाची आवड वाटते ! एकदम झूट ! पाकिस्तान आणि चीनची लढाई चालू असतांना फक्त कमिशन्ड अधिकारी होण्याची क्वचित, एकाद्याला इच्छा झाली असेल इतकेच. कोणीही प्रथम श्रेणीतच काय परंतु द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होणारा तरुण खडकवासला किंवा डेहेराडूनच्या सैनिकी विद्यालयात प्रवेश मिळण्याकरता होणाऱ्या परिक्षेला बसत नाही लोकांची कल्पना हीच आहे, कीं सैन्यात कमी बुद्धीच्या नुसत्या दाणगट लोकांचीच गरज आहे बुद्धीवान तरुणांनी त्यापासून दूरच राहावे. ब्रिटिशांचे वेळी पूर्ण काळचा प्रादेशिक सेनेसारखीच इंग्रजांच्या 'लेकावळ्यांची' आक्झीलियरी फोर्स A. F. I. या नावाची एक 'निमगोरी' सेना होती. तिला तिच्या पितृवंशीय गोऱ्या सैनिकांसारख्या सोई व दर्जा दिला गेला होता. परंतु स्वातंत्र्य मिळताच ही निमगोरी सेना बरखास्त केली गेली.

**क तिसरा प्रकार लोक-सहाय्यक-सेना** या प्रकारात सैनिकी कार्यापेक्षा नुसत्या शारीरिक कार्याचाच भाग अधिक असतो. त्यातील सैनिकांना फक्त शारीरिक कष्टाचीच कामे करावयाची असतात. अंशाना पूर्वी कामगार पथके पायोनियर्स म्हणत. त्याना क्वचित रायफल हाताळायला मिळाली तरी तिचे किंवा दुसऱ्या हत्याराचे शिक्षण दिले जात नाही. प्रत्येक पथकामधे अगदीच अल्पप्रमाणात हत्यारे असतात. अशी पथके होती, किंवा आहेत; हे बहुतेक कोणालाच माहीत नाही.

**ड छात्र–सेना** हा चौथा प्रकार मात्र फार गाजावाजा झालेला प्रकार आहे. व त्याची माहिती अगदी लहान गावापर्यंतही सर्वांना आहे. यातही मुले व मुली आणि महाविद्यालयीन व शाळांतील, असे पोट विभाग आहेत. छात्र सेनेत जल, स्थल, आणि वायु या तिन्ही अंगांचे विभाग आहेत. यातही पुनः **मौज** ही आहे की जेथे एकाद्या लहानशा नाल्यातले पावसाळ्यातले पाणीही

दिसत नाही अशा गावच्या शाळांतूनही 'छात्र जलसेनेची पथके' उघडलेली आहेत! कित्येक छात्र वायुसेनेच्या पथकातील छात्र सैनिकांनी अगदी जवळ जाऊन विमानही पाहिलेले नाही!

एके काळी छात्र सैनिकाला वार्षिक परिक्षेत एका विषयाची–इंग्रजीची–सूटही मिळत असे. एकदा छात्रसेना आवश्यक होती. आता ती खुषीची झाली आहे. या सेनेचे सर्वच काही अनिश्चित आणि बदलत राहणारे आहे. अगदी सुरुवातीला या सेनेचे नाव ऑफिसर्स ट्रेनिंग कोअर O. T. C. असे होते. यातील प्रत्येक छात्र सैनिकाला अधिकारी बनविले जाईल असे सांगण्यात आले होते. नंतर हे सर्व बदलले. एकंदरीत छात्र सेनेचा हा प्रयोग व पसारा आता जवळ जवळ २२।२४ वर्षांचा जुना झालेला आहे. या सेनेची उपयुक्तता, तिच्यावर होत असलेला येवढा अवाढव्य खर्च आणि पदरात पडलेले फळ यांचा प्रामाणिक आढावा घेऊन योग्य तो निष्कर्ष काढण्याची दुर्दैवाने कोणालाही निकट वाटत नाही. येथे याची अधिक चिकित्सा अप्रस्तुत होईल.

आपल्या देशात सैनिकी सेवा सक्तीची कधीच होणार नाही. आपल्या 'खड्या' सेनेच्या तिन्ही अंगाची सेना ब्रिटिशांच्या वेळेपासून 'खुषीची सेना' आहे. आणि या सेनेने अविछिन्नपणे अत्यंत मर्दमुकीने आपले कर्तव्य पार पाडून जागतिक कीर्ती व वाहवा मिळविली आहे. आपल्या सेनेला 'जगातील सर्वात मोठी स्वयंसेवकांची सेना' (Largest Volunteer Army in the World) असे परकीय सेनापतींनी गौरविलेले आहे. स्वराज्यातही या आपल्या सेनेने एक दिलाने आपले कर्तव्य केलेले आहे. आणि तसे ती नेहमीच करील हे उघड आहे. अशा आपल्या 'खड्या' सेनेची व्हावी तशी कदर अजूनही होत नाही. तिची सर्व बाजूंनी आणि सर्वांकडून एक प्रकारे उपेक्षाच होत आहे, अशा स्थितीत आपल्या जन सेनेचा कोण केवा?

आपल्या देशाची लोकसंख्या कुटुंब नियोजनाच्या उपायांना दाद न देता वाढतच आहे. तेव्हा देश रक्षणाकरता मनुष्य बळाची उणीव आपल्याला केंव्हाही पडणार नाही. आणि आपला दरिद्री देश फार मोठी सेना 'खडी' ठेवू शकणार नाही. अशा परिस्थितीत जनतेने देशरक्षणाचा भार आपल्या शिरावर घेतला पाहिजे. म्हणजेच आपली **जन** सेना शक्य तितकी मोठी व तरबेज अशी तयार झाली पाहिजे. मनुष्य बळाच्या आवश्यकतेविषयी विज्ञानाच्या प्रगतीमुळे शंका उत्पन्न होत असतात. आता नव्या शास्त्रीय युगात कशा करताही पूर्वी इतके मनुष्य बळ लागणार नाही. कारण अनेक स्वयंचलित यंत्रांमुळे एक मनुष्य अनेकांचे काम करु शकतो. हजारो मैल दूर अंतरावरून एकादे 'बटन दाबून महाभयंकर संहारकारी शस्त्रास्त्रांचा वर्षाव करु शकतो. आता 'बटन दाबू' (Push Button war) युद्धे होतील असे म्हणण्यापर्यंत मजल,

गेली आहे. परंतु सर्वच कामे यंत्राकडून किंवा यांत्रिक मानवाकडून (Robot) होऊ शकत नाही. ' रोबोट 'ला स्वयंचलित करण्याला मनुष्यच लागतो. नव्या शास्त्रीय संशोधनांनी नवीन नवीन स्वयंचलित उपकरणे निर्माण केली आहेत हे हे खरे असले; तरी ती अधिक गुंतागुंतीची आणि त्यांच्या वापराला व उपयोगाला अधिकाधिक तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता असणारी आहेत. म्हणून त्या करता निराळचा प्रकारचे व अधिक कार्यक्षम आणि प्रशिक्षित मनुष्यबळ लागते.

दुसऱ्या महायुद्धापर्यंत एक सैनिक युद्धात लढत ठेवण्याला त्याच्या पाठीमागे १५ ते २० दुसऱ्या माणसांची निरनिराळ्या कामाकरता साखळी आवश्यक असे. आता ते प्रमाण ३० पर्यंत वाढले आहे. युद्ध साहित्याचे प्रकार व वस्तूतही भयंकर वाढ झालेली आहे. आता युद्धात ३५ ते ४० हजार प्रकारच्या वस्तू लागतात. यावरून हे दिसून येईल की विस्तृत उत्पादनाच्या (Mass Production) आणि स्वयंचलिताच्या (Automatisation) नव्या युगातही सरतेशेवटी मनुष्याचे तितकेच हात परंतु निराळ्या प्रकाराने लागतात.

सैनिकी शिक्षणाचा कवाईत आणि शिस्त हा पाया व आधार असतो. कवाईत शरीराची शिस्त असते आणि शिस्त ही मनाची कवाईत असते. (Drill is the discipline of body and discipline is the drill of mind) आपल्या देशात ही दोन्ही, अंगी बाणविण्याची खटपट करणाऱ्या अनेक खासगी संस्था आहेत. त्या सर्वात ' राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ' R. S. S. ही राष्ट्रव्यापी सर्वात मोठी संस्था आहे. ' कांग्रेस सेवादल ' ही एक संस्था आहे. अशा छोटचा छोटचा अनेक संस्था सर्व देशभर विखुरलेल्या आहेत. या प्रत्येक संस्थेत वेगळी वेगळी कवाईत आणि शिस्त शिकविली जात असते. अशा सर्व संस्थांनी फक्त एकाच प्रकारची सैन्यातली बिन-हत्यारी-कवाईत केली आणि सरकारनेहि त्यांना करू दिली तर कोणताहि खर्च न होता सैनिकांचे प्राथमिक निःशस्त्र शिक्षण मिळविलेले तरुण फार मोठचा संख्येने संकटकाळाकरता सैन्यात दाखल होण्यास तयार मिळतील. हे करीत असतांना कोणत्याहि संस्थेला आपले विशिष्ठ ध्येय अथवा मतप्रणाली सोडून देण्याचे कारण नाही. देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखणे आणि संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिक आपले पवित्र आणि आद्य कर्तव्य समजतो हे येथे गृहित धरले आहे.

सैन्यातल्या रंग्रुटाला प्रशिक्षित सैनिक (Trained soldier) बनायला साधारणपणे शांततेच्या काळात ८ ते ९ महिने लागतात. त्यानंतर त्याचे लष्करी शिक्षणाचे धडे अधिकाधिक प्रगत होत जातात. अशा खासगी संस्थात कवाईती शिवाय नकाशे व हवाई फोटो वाचणे (Map and air photo reading) संदेश Signaling; दिशा आणि लक्ष्य ओळखणे (Finding dirction

and (Recognition of Target) जमिनीचा उपयोग (Use of ground) बंदी (Camouflage); शस्त्रांची नुसती माहिती; विमानांची ओळख, प्राथमिक डावपेच (Elementary technics) अंतर अंदाजणे नजर (Judging Distance) अशा सारखे विन-हत्यारी शिक्षण दिले, तर वेळेची किती तरी मोठी बचत होऊन संकटकाली सरकारी तिजोरीवर काहीहि भार न पडता नागरिकांची फार मोठी सेना 'खडी' करता येईल. हे सर्व करण्याकरता शस्त्रांवाचून मुळीच अडत नाही. शस्त्र ही क्षुल्लक बाब आहे." मनुष्यच मनुष्याचे शस्त्र आहे. (Man is his best weapon) हे नेपोलियनचे वचन पूर्णार्थाने सत्य आहे. आपल्या देशाला मजबूत मनाची आणि मजबूत मनगटाची जनसेवा हवी आहे.

---

# सहवीर्य करवाव है।

" Unity of the country is the prerequisite of national security "

— पणीक्कर

सहकार आपल्याला नवा नाही. आपल्या अतिप्राचीन वेदप्रणीत आर्य धर्माच्या प्रारंभापासून सहस्त्रावधी वर्षे "आम्ही सहकार्याने विरोचित कर्मे करावी" अशी आमची कामना आणि प्रार्थना आहे. "एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ" या आपल्या संत वाणीनेहि ती जागृत ठेवलेली आहे. मनुष्य प्राणी जगात येतांना जरी एकटाच आला तरी त्याचे येथले जीवित कार्य संपल्या-वर तो एकटा परत जात नाही. त्याला 'पोहचवावे' लागते. मनुष्य जमीनीवर, पटकुरावर किंवा कोठेही येऊन पडला असला, तरी जातो चारचौघांच्या खांद्या-वरून. हिमालयाच्या गिरीकंदरात ध्यानमग्न आणि समाधी लागलेले तपस्वी वगळून एकटा मनुष्य कोठेही आढळत नाही. ऐक्यभाव ही सहकार्याची प्राणनाडी आहे. ऐक्याने सहकार्याची प्रेरणा मिळते आणि पोसली जाते. आणि सहकाराने ऐक्य उत्पन्न होते. ऐक्य आणि सहकार परस्पर-संभूत आहेत. त्याचा अर्थ आणि कार्य एकच आहे. परंतु त्यागाच्या मजबूत पायाचा त्यांना आधार असला तरच ऐक्य टिकू शकेल. त्यागाकरिता मोठे मन, आणि हार्दिक औदार्य लागते. आत्मकेंद्रित मतलबी संधिसाधुपणा, किंवा प्रासंगिक वा आकस्मिक सहकार तात्पुरता व्यवहार होतो. त्यात भावनेला स्थान नसते, त्यागाची कळकळ नसते, आणि शौर्याचा विश्वास नसतो. गरजेपोटची शय्या-मैत्री पवित्र असू शकत नाही. ती वारांगणेचा विलास ठरते. नृपनीति (राजकारण) वारांगनेसारखी चंचल असते. तेथे आजचा मित्र उद्या शत्रू होतो आणि मित्र बनतो. म्हणून सर्व वातावरण अनिश्चित व संशयग्रस्त असते. तेथे कोणी कोणाचा मित्र नसतो आणि शत्रूही नसतो. अशा परिस्थितीतून देशाला निभावून नेण्याकरिता फार श्रेष्ठ आणि जागरूक मुत्सद्देगिरी लागते

ज्या देशाच्या राज्यकर्त्यांना व्यावहारिक आणि डोळस दृष्टी असते त्या देशाचा उत्कर्ष होत राहतो. आणि अशा राज्यकर्त्यांना सर्व प्रजेचे सहकार्य प्राप्त झाल्याने राज्ययंत्र व प्रशासन सुरळीत चालते. देश सुसंघटित व एकजिनसी बनतो आणि त्याचे सामर्थ्य चढते, वाढते असते. दुर्दैवाने हे भाग्य आपल्यास सुरूवातीपासूनच लाभले नाही. आपले राज्यकर्ते अव्यवहारी आंधळ्या स्वप्न-रंजनात गुंग राहिले. त्यांना देशाच्या अगत्यापेक्षा विश्वाची अधिक फिकिर होती. "काजीजी दुबले क्यों ?" शहरका अंदेशा ! जगाचे भले कसे होईल ? व

जग काय म्हणेल ? याचीच ते चिंता वाहत राहिल्याने देश छिन्नविछन्न व दुबळा झाला. शत्रूची हिम्मत वाढली व प्रजेची हिम्मत खचली. विभूतिमत्वाचा छाप मारलेल्या व्यक्तिला, त्याच्या वर्तनाचा जाब मागणे, हे आमच्या रक्तातच नाही. आम्ही त्या व्यक्तिचा सारखा ' उदो उदो 'च करू, त्याला उचलून धरू; आणि सहकार्य देऊ. परंतु वास्तविक याला सहकार्य न म्हणता निर्बुद्ध, आंधळी व अतिरेकी विभूती-पूजाच म्हटले पाहिजे. हा हिन्दी लोकांचा, विशेषतः हिंदुंचा गुण (?) विशेष आहे. दैनंदिन व्यवहारात असो, अथवा राजकारणात असो एक ध्येय, एक तत्व, एक निष्ठा असली पाहिजे. तेच खरे सहकार्य नाही तर तो सहप्रवास होईल. सहप्रवासी आपआपल्या मुक्कामावर उतरून जातात. त्यांची सोबत तितकीच असते.

देशाच्या उत्कर्षाला ऐक्यभाव म्हणजे **राष्ट्रीयत्व** अवश्य असते. सवता सुभा, संकुचित दृष्टी, फुटीर वृत्ती, संधीसाधुपणा, नाशाला कारणीभूत होतात. या क्षुद्र भावनांच्या पोटीच फितुरी निर्माण होते. फितुरीची घुस घरात घुसली, की त्या घराची धडगत राहत नाही. हिंदुस्थानावरील आक्रमणे यशस्वी होण्याला इतर कारणाबरोबरच क्षुद्र स्वार्थ, आणि फितुरी यांचे खतपाणी मिळत गेले. आजही ती चालू आहे. ती निपटून काढणे सहकार्याने शक्य आहे. देशाच्या उत्कर्षाला तसेच संरक्षणालाही सहकार्य आवश्यक असते. संरक्षण म्हणजे युद्धातला बचाव, इतकाच अर्थ नाही. आता कोणताही प्रश्न किंवा बाजू ' जलाभेद्य ' राहिलेली नाही. व्यक्तिच्या, समूहाच्या तसेच देशाच्या सर्वप्रकारच्या व्यवहारांची गुंतागुंत वाढली असल्याने, कोणत्याही एकाच बाजूचा, केवळ एकटाच, इतरापासून अलिप्त असा विचार करता येणार नाही. आणि म्हणून सहकार्याची निकड अधिकाअधिक वाढत चालली आहे. असे जरी असले, तरी युद्धात शत्रूला सामना देऊन, त्याला पराजित करून, झालेले संरक्षण सर्वश्रेष्ठ असते. कारण देश सुरक्षित आणि स्वतंत्र असला, तरच दुसरे प्रश्न उद्‌भवतात. पारतंत्र्यात गुलामगिरीच्या शृंखला तोडून मुक्त होण्याचे **एकमेव ध्येय** आणि कार्य असते. हे ध्येय आणि कार्य सहकार्याशिवाय सिद्धीस जाऊ शकणार नाही.

आपले स्वातंत्र्य कोणी मिळविले ? कशामुळे मिळाले ? किती वर्षात मिळाले ? त्याकरता किती पिढ्या खर्ची पडल्या ? अशा गोष्टींचा काथ्याकूट व चर्वित–चर्वण अनावश्यक आहे. आपले हे स्वातंत्र्य कसे टिकून राहील, आपले गेलेले लुबाडलेले आणि आपण जाऊ दिलेले सर्व, परत मिळून, आपला देश सुखी, संपन्न, वैभवशाली आणि सामर्थ्यवान् कसा होईल एवढी एकच चिंता आपल्याला लागली आहे. ती दूर करण्याचा सर्वोत्तम–नव्हे–एकच उपाय आहे. आणि तो म्हणजे–ऐक्य भावाने, राष्ट्रीय बाण्याने सर्वांचे सर्वांगीण सहकार्य. प्रत्येक देशाचे निरनिराळ्या अंगाचे स्थैर्य आणि सामर्थ्य त्याच्या **सामरिक सामर्थ्यावरच** अवलंबून

असते. सर्व अंगांच्या सामर्थ्याचा समतोल राखून, लष्करीदृष्टया मजबुती बाळगणारा देश आपले स्वातंत्र्य रक्षू शकेल. देशाच्या **सामरिक सामर्थ्याला** एक आगळे महत्व व स्थान असते. देशाची सर्व धोरणे आणि सर्व राजकारण सुरळीत पार पाडण्याचा युद्ध हा एक फलदायी आणि आवश्यक पर्याय असतो. आणि सामरिक सामर्थ्याशिवाय हे शक्य होत नाही.

पारतंत्र्याच्या काळात परकीय राज्यकर्त्यांनी आपल्याला अनेक प्रकारांनी राबवून घेतले होते. आपल्यापैकी काहींनी भोळेपणाने अज्ञानाने किंवा त्यांच्या तथाकथित सुराज्याने दिपून जाऊन सरकारला अनेक प्रकारे सहकार्य दिले. आणि असे सहकार्य मिळाले नसते तरीही सरकार अडचणीत येणे शक्य नव्हते. हिंदुस्थानी प्रजा इतकी नेभळट, दुबळी आणि कर्तव्यशून्य झाली होती की जनतेच्या सहकार्याशिवायही दंडुकेशाही आणि इतर युक्त्याप्रयुक्त्या योजून त्यांनी आपला राज्यकारभार सुरळीत व मनाप्रमाणे हाकला. 'कंपनी'च्या वखारीवरच्या हिंदी-चौकीदारापासुन बनलेली काळी हिंदी फौज कंपनीला अतिशय उपयोगी पडली. 'कंपनीची' इमाने इतबारे चाकरी करीत असताना ही फौज आपल्या देशबांधवांशी, आपण नुसती भाताची पेज पिऊन आणि भात गोऱ्यांना देऊन लढली, आणि ब्रिटिश साम्राज्याच्या स्थापनेत तिने सिंहाचा वाटा उचलला. इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानातील स्वराज्याच्या आणि स्वातंत्र्याच्या प्रयत्नांना चिरडून टाकण्याकरताहि उपयोगी पडली. इतके इमानदारीने आणि स्वामिनिष्ठेने कोणीही केव्हाही सहकार्य दिले नसेल !

परंतु या सहकार्याचे चीज केव्हाही झाले नाही. इमानदारी आणि स्वामिनिष्ठा यांची कदर झाली नाही. हिंदी फौजेविषयी नेहेमीच दुजाभाव आणि संशयी वृत्ती राखली गेली. तिला निकृष्ट मानले गेले आणि ठेवलेहि गेले. सत्तावनच्या अनुभवापासून ही वृत्ती विशेषच बळावली व हिंदी फौजेत मोठा विलक्षण बंधुभाव उत्पन्न झाला होता. धर्म, पंथ, जात इत्यादी भेद लुप्त झाले होते. अशा या भेदरहित ध्येयनिष्ठ सेनेला जनतेनेहि एक दिलाने सहकार्य दिले होते. ते युद्ध अपेशी ठरले व हिंदुस्थानवरची इंग्रजी सत्ता वज्रलेप झाली. सेनेत आपसात आणि सेनेत व जनतेत ऐक्य–भाव निर्माण होऊ नये, हिंदी सैनिकात राष्ट्रप्रेम उत्पन्न होऊ नये आणि त्यांनी अलिप्त राहावे या करता त्यांनी अनेक कडक उपाय योजले. त्यातले मुख्य दोन होते. पहिला उपाय पलटणीचे जात (धर्म) वार प्रमाण (Class Composition) आणि दुसरा सैनिक व जनता यांचा संपर्क होऊ नये म्हणून केलेले नियम. पहिल्या उपायाने पलटणी एकाच जातीच्या (नाव एकच जाति वा पंथ विषयक असले तरी) होऊ दिल्या नाहीत. उदाहरणार्थ **मराठा पलटणी**. त्यांच्यात मुसलमानांचे विशिष्ट प्रमाण पेरून ठेवलेले होते. मराठ्यातही **पुनः दखनी मराठे**

**कोकणी वा मराठे** असाहि कृत्रिम भेदभाव उत्पन्न करून ठेवला होता (दुसऱ्या महायुद्धापर्यंत वैदर्भीय मराठे भरती केले जात नव्हते) पलटणीची बहुसंख्या **दखनी मराठ्यांची** असली तर **सुभेदार मेजर कोकणी मराठा** नेमल्या जात असे. ब्रिगेड पातळीवरही हाच प्रकार असे. **इंडियन ब्रिगेड** असे नाव असले तरी त्यात गोऱ्या तुकडीचा अंतर्भाव असे. याला गुरखा पलटणीचा अपवाद होता. आजही आहे. त्यात कोणतीही दुसरी जात जमात नाही. परंतु त्यातले सर्व अधिकारी गोरे असत. गुरखे, हिंदी अधिकाऱ्याच्या हाताखाली काम करण्यास राजी नाहीत, असे ब्रिटिश सरकारने आपणच ठरवून टाकले होते. आता गुरखा पलटणीत काळे हिंदी अधिकारी आहेत तरी गुरख्यांची मुळीच तक्रार नाही. सर्व सैनिकीतळ नागरीक वस्तूच्या बाहेर असत आणि दूरही असत. शिवाय सैनिकांवर '**मर्यादेबाहेर** (Out of Bounds)' सारखे अनेक निर्बंध असत. कोणतीही लष्करी छावणी काळ्या हिंदी फौजेनेच वसविलेली नसे. तेथेहि गोऱ्या तुकड्यांची वसाहत मुद्दाम ठेवलेली असे. सैनिक रजेवर असले, राखीव दलात 'वर्ग' झाले असले किंवा निवृत्त झाले असले तरीही पाटील, पोलीस, वगैरे अधिकाऱ्यांच्या निग्राणित असत. हेतु हाच की त्यांच्यात आणि नागरिकात ऐक्य, देशप्रेम, सहकार्य वगैरे गोष्टीचे विष फैलावू नये. परंतु म्हातारीने कोंबडा झाकला तरी सूर्य उगवणारच ! सैनिकात देश प्रेमाचा उदय होण्याचे कोणी बंद करू शकला नाही. आतल्याआत, त्याची मुळे खोल खोल जाऊ लागली होती. परंतु हिंदी सैन्याची शिस्त अजोड असल्याने या अंतस्थ भावनांची परिस्फुटता फक्त एकाच प्रसंगी झाली. गढवाल पलटणीच्या एका तुकडीला तथाकथित शांतता प्रस्थापित करण्याकरता एका जमावावर गोळी चालविण्याचा दिलेला हुकुम, त्यांनी अमान्य केला. त्याला कारण **ते देशबांधव होते; त्यांच्यावर गोळी चालवणार नाही; असे नसून ते निःशस्त्र होते; आणि वीर सैनिकाने निःशस्त्र माणसावर हत्यार चालवणे हा अधर्म आहे** हे उघडपणे आपल्या जबान्यातून त्या सैनिकांनी दिले. अर्थात त्यांना शिक्षा दिल्या गेल्या. अजूनही क्वचित कोठे कोठे 'गढवाल दिन' साजरा करतात दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी हिंदी फौज पूर्वीसारखी राहिली नसून देशभक्ती आणि राष्ट्रीय भावनांनी पुरेपूर भडकली आहे; आणि ही सेना पूर्वी सारखीच सर्वतोपरी ताब्यात ठेवणे शक्य नाही; असे सरकारला मनोमन पटले होते. युद्धात जय मिळाला असला तरी हिंदी फौजेवर वचक बसविण्याकरता आणि हिंदुस्थान ताब्यात ठेवण्याकरता, **ग्रेट ब्रिटन** जवळ पुरेशी गोरी फौज शिल्लक नव्हती; म्हणून स्वातंत्र्य देऊन टाकून गाशा गुंडाळण्याची, गोऱ्या सरकारवर पाळी आली ही वस्तुस्थिती आहे.

ब्रिटिश साम्राज्यावर पहिले मोठे संकट पहिल्या महायुद्धाचे वेळी आले. त्यावेळीं बऱ्याच हिंदी लोकांनी सरकारला सहकार्य दिले. रंगूट भरतीला मदत

केली. युद्धनिधीत पैसा ओतला आणखीही अनेक प्रकारे मदत केली. परंतु तो सहकार्याचा भाग नसून राजनिष्ठेचाच बराचसा भाग होता. संस्थानिक असहाय होते; बांधलेले होते. दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं, दुसरे मोठे संकट आले. त्याही वेळीं हे सर्व प्रकार झाले. परंतु राजनिष्ठेचा पूर ओसरलेला होता. ' सरकारची अडचण तीच आपली संधी ' असे मानणारा बराच मोठा वर्ग निर्माण झालेला होता. आणि स्वराज्याच्या प्रयत्नांना पूर्ण भर आलेला होता. परंतु गांधीजींना आपल्या मित्राच्या अडचणीचा गैरफायदा घेणे प्रथम पसंत नसले; तरी त्यांनीही शेवटी " करा अथवा मरा " असा संदेश जनतेला दिला. दोन्ही महायुद्धांचे वेळी सरकारला मदत व सहकार्य देणाऱ्यांना पदव्या दान केल्या गेल्या आणि अन्य प्रकारचे फायदे दिले गेले. पहिल्या महायुद्धाचे वेळी जनता सैनिकापासून फार दूर होती. ती दुसऱ्या महायुद्धाचे वेळी बरीच जवळ आली. सैनिकाकरता सरकारी प्रेरणेने आणि काही स्वयंस्फूर्त अशी, सुखसोयीची केंद्रे उघडली गेली. या केंद्रांतून आणि रेल्वे स्टेशनावर प्रवासी सैनिकांना चहा, फराळ, सिगरेटी वगैरे देण्याकरता बऱ्याच ' थोरामोठ्यांच्या ' समाजसेवा करणाऱ्या हिंदी मडमा आपल्या सर्व साजश्रृंगारासह हजर असत. १८५७ पासून १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरु होण्याच्या दरम्यानच्या काळात, जनता आणि हिंदी सैनिक यांची झालेली फारकत पुढे दुसऱ्या युद्धात बरीच कमी झाली असली; तरी स्वातंत्र्य मिळून आज तेवीस वर्षानंतरही नागरिक आणि सैनिक यांचा एकजीव झालेला दिसत नाही. सैनिकी जीवनाची पूरी ओळख, सामान्य नागरिकालाच नव्हे, तर सुशिक्षित, सुस्थित आणि बहुश्रुत, अशा वरच्या थरालाहि झालेली नाही. अजूनही बऱ्याच असत्य आणि विपरीत कल्पना कायम आहेत. ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. ब्रिटिशांच्या काळातली सैनिकाविषयीची तुच्छता समूळ नष्ट झालेली नाही. अजूनही लष्करी जवानाला ' निर्बुद्ध, हडेलहप्पी, शिपुर्डा ' अशी विशेषणे दिली जातात.

नायब-सुभेदार, रिसालदार, सुभेदार मेजर, अशा सैनिकी अधिकाऱ्यांना समाजात मानाने वागवले जात नाही. अशा परिस्थितीत जनतेच्या आणि सैन्याच्या सहकार्याची निकड अधिकच वाढते. असे जरी असले; तरी सैन्यातल्या चाकरीला एक कौतुकाची आकर्षणाची झालर होती, आणि आहे. हे मान्य केले पाहिजे आणि दूरून डोंगर साजरे दिसतात तशा युद्धाच्या कथाहि रम्य वाटतात.

आपल्या देशात खरा ऐक्यभाव, एक-जिनसीपणा आणि एकराष्ट्रीयत्व केंव्हाच नव्हते; आणि अजूनही नाही. येथे भीम-पराक्रमी शूरांची वाण नव्हती व नाही. त्यांच्या बलिदानाला तुलना नाही. परंतु त्यापासून जाती पंथ धर्म-निरपेक्ष अशा परंपरा निर्माण झाल्या नाहीत. ज्या निर्माण झाल्या त्या संकुचित, फुटीर आणि परस्परविरोधी अशा बनल्या. आपल्या वीरांच्या गाथा " हिंदी

वीरांच्या गाथा बनल्या नाहीत. त्या रजपूतांच्या, मराठयांच्या, शीखांच्या अशा अलग अलग बनल्या. कारण ते परस्परविरूद्ध लढले. आजही एक-राष्ट्रीयत्व कोठेच आढळत नाही. आपल्या **निधर्मी सरकारात** जातीयता कायमच आहे. अल्पसंख्यांकांना संरक्षण देण्याच्या सोज्वळ नावाखाली धर्मभावना आणि जातीयवृत्ती, सारख्या फोफावू दिल्या जात आहेत. सैन्यात ( पोलीसमधेहि ) मुसलमान विशिष्ठ आणि अधिक प्रमाण मागत आहेत. परंतु एक गोष्ट येथे प्रामुख्याने नमूद करून ठेवली पाहिजे. इतरत्र कितीही जातीयता असली तरी आजच्या घटकेला हिंदी सेनेत तिला स्थान नाही. हिंदी सैनिकाला, सैन्यात धर्म नाही; आणि जातही नाही. तो फक्त शुद्ध **हिंदी सैनिक** आहे. ही मोठ्या कौतुकाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. तरीही आपले सैन्य अजूनही **राष्ट्रीय-सैन्य** झाले नाही हेहि तितकेच खरे आहे. आपल्या सैन्यातील घटकांची नावे आणि बिरूदे अजूनही जाती, धर्म वा पंथ वाचक अशी कायम आहेत. ' महार रेजिमेंट, ' ' राजपुताना रायफल्स्, ' ' मराठा लाईट इन्फंट्री, ' ' सीख रेजिमेंट ' अशा पलटणी तशाच चालू आहेत. ' महार रेजिमेंट मधे शीख कसा असणार ? आणि शीखात राजपूत कसा सापडणार ?' आपल्या घटनेने असे भेदाभेद वर्जच नव्हे तर दंडनीय ठरविले आहेत. परंतु सरकारच आपल्या कायद्यांची पायमल्ली करीत आहे. अशा आपल्या जातीपंथनिष्ट, अराष्ट्रीय सैन्याचे सर्वोच्च सेनापतीपद आपले **राष्ट्रपती** भूषवित आहेत. असे जरी असले, तरी नावे कोणतीही असोत; आपले सर्व सेना विभाग एक दिलाचे आणि एकजिनसीपणाने कर्तव्य पालनास तत्पर राहत आलेले आहेत व राहतील. मग देशात एक-राष्ट्रीयत्व उत्पन्न होवो वा न होवो. ' यात तिळमात्र संशय नाही.

सैन्याच्या घटकातील ऐक्यभाव, परस्पर सहकार्य, येवढेच देशाच्या संरक्षणाला पुरे पडणार नाही. सैन्याला सर्वांकडून, सर्व प्रकारचे आणि सर्व दिशांनी सहकार्य मिळाले; तर त्याचे कार्य सुलभ होईल व त्याने मनोधैर्य शत-गुणित होईल. युद्धात संरक्षणाचा भाग सर्वात कठीण असतो. हल्ला करणे जरी सर्वोत्तम संरक्षण असले तरी हल्ल्यात क्षणिक ' जोष ' आणि ' बेहोशी ' मुख्य असते आणि ती पुरेशी होऊ शकते. बचावात अधिक स्थैर्य, चिकाटी, व चित्ताची शांतता लागते. हल्ला विफल झाल्याने होणाऱ्या परिणामापेक्षा ' संरक्षणाची फळी ' फुटण्याचे फार भयंकर दुष्परिणाम होतात. संरक्षणातच सहकार्याची खरी परीक्षा होते. विशेषतः युद्ध आपल्याच भूमीवर लढले जात असेल, तर सैन्याला जनतेचे विशेषच सहकार्य मिळणे अत्यावश्यक असते. दुसऱ्या महायुद्धात जर्मनी रशियात, फार आत जाऊन रशियन राजधानीला वेढा घालून बसला होता. या बिकट प्रसंगी रशियन सेनेच्या शौर्यापेक्षा रशियन जनतेच्या सहकार्यामुळे जर्मन सेनेला रशियातून माघार घ्यावी लागली. जर्मन फौज आपल्या देशापासून व

आपल्या पुरवठा केन्द्रांपासून फार दूर पुढे गेली असल्या कारणाने जर्मन रसद-पुरवठा विस्कळीत होऊन गेला. व जर्मन सेनेवर उपासमारीची पाळी आली. जर्मन सेनापतींची अशी अटकळ होती, की रशियातील अन्नधान्याची रसद मारून, जर्मनसेनेला आपला चरितार्थ चालविता येईल ( live on the land ). परंतु रशियन जनतेने आपल्या 'दग्ध भूमीच्या' ( Scorched Earth ) दिव्य स्वार्थ-त्यागाने, आपली स्वत:ची उपासमार पत्करून, आपली उभी पिके जाळून टाकून, जर्मनांना रसद मिळू दिली नाही. आपले मोठमोठे तलाव व बांध-बंधारे फोडून टाकून शत्रूचे सर्व दळणवळण आणि वाहतूक विस्कळीत करून टाकली; व शिवाय नाना प्रकारच्या गनीमी युद्धाच्या युक्त्या प्रयुक्त्यांनी; युद्धात गुंतून पडलेल्या आपल्या सैन्याला सहकार्य देऊन शत्रूला देशाच्या बाहेर पिटाळून लावले. सेना आणि जनता यांच्या सहकार्याचे हे अजोड उदाहरण आहे.

आपल्यालाहि आपल्या शत्रूशी युद्ध करावे लागणार आहे. व ते युद्ध आपल्याच भूमीवर लढले जाणार आहे. कारण आपण आपल्या 'सरहद्दीची 'लक्ष्मण-रेषा' ओलांडून शत्रूवर कधीहि हल्ला करणार नाही. जनतेच्या संपूर्ण, सतत सहकार्याशिवाय संरक्षण शक्य होणार नाही. फक्त प्रत्यक्ष युद्ध चालू असताना, सैनिकाकरता स्वेटर विणणे, मिठाईची पार्सले पाठविणे, आणि 'राखी' बांधणे इत्यादी गोष्टींनी सैनिकांना 'बरें वाटले' तरी या प्रकारांना सहकार्य म्हणता येणार नाही. ही फार तर क्षणिक-सहानुभूती म्हणता येईल. याने युद्धात जय मिळणार नाही. 'आपल्याला आपल्या गणवेश न घातलेल्या यच्चयावत बंधुबांधवांची सर्व प्रकारची मदत आहे; व आपण रणमैदान लढवीत असतांना आपले बंधुबांधव निरनिराळ्या प्रकारांनी इतर दुसऱ्या अशा वेगळ्या आघाड्या लढवीत आहेत, याची सैन्याला खात्री पटली; म्हणजे त्याच्या मनोधैर्याला उधाण येते; व त्याला यशाची चिंता वाटत नाही. अत्यंत निकराने 'शेवटला जवान शेवटली गोळी' (Last man-last round) इथपर्यंत तो लढू शकतो. जयाची खात्री वाटून त्याची लढावू वृत्ती (fighting spirit) शिगेला पोहोचते. गेल्या महायुद्धात इटालियन सैनिकात अशी निकराची लढावू वृत्ती नसल्या कारणाने हजारोंच्या संख्येने ते 'युद्ध कैदी' झाले. त्यांना शस्त्र 'खाली' ठेवावयास फार वेळ लागला नाही. 'युद्धात मनुष्यच सर्व काही असतो.' (In war man is every thing) आणि 'मनुष्यच सर्वोत्तम शस्त्र असतो' (man is his best weapon) ही नेपोलियनची सुभाषिते लढावू वृत्तीचा आधार आहेत. याचा अर्थ हाच, की खंबीर मनाच्या सैनिकाला साधनांची पर्वा करण्याचे कारण नाही. त्याच्यातील दुर्दम्य लढाऊ वृत्तीच त्याला यशस्वी करते. साधने निमित्त मात्र असतात. लढाऊ वृत्ती म्हणजे 'क्षात्रधर्म.' देशाच्या रक्षणाकरता प्रत्येक नागरिकाचा

हाच सर्व श्रेष्ठधर्म असतो त्याच क्षात्रधर्मातिले, त्याकरता झालेले निधन, हे खऱ्या देशभक्त नागरिकाचे श्रेयस् असते.

क्षात्रवृत्तीच्या जोपासनेला 'रंगेलपणाचे' खतपाणी सतत मिळत राहिले पाहिजे; आणि तेहि अगदी उपजल्यापासून. जनतेची सेनेला सहकार्य देण्याची तत्पतरता मोसमी असता कामा नये. मोसमी पुष्प वाटिका चित्तवेधक वाटली तरी ती क्षणभंगूर असते. ती आनंद देईल परंतु 'आसरा' देऊ शकणार नाही. सुंदर कोमल दृश्ये, गुलगुल गोष्टी, नाजुक प्रेमचेष्टिते, **रंगेलपणा** उत्पन्न करतील; परंतु **रगेलपणा** निर्माण करू शकणार नाहीत. क्षात्रवृत्तीचा स्थायी भाव **रगेलपणा** हा आहे. रगेलपणा म्हणजे कुरापतखोरी आणि भांडकुदळपणा नव्हे.

शूर सैनिकाला भीती वाटत नाही; असे नाही. भीती वाटणे हा प्राणीमात्राचा स्वभावधर्म आहे. भीतीचा कोणताहि परिणाम मनावर आणि शरीरावरही न होऊ देता, प्रसंगाला धैर्याने तोंड देणे, यातच मनाचा समतोल आणि धैर्याची कसोटी असते. भीतीचे अनेक प्रकार असले तरी **अज्ञाताची भीती** (fear of the unknown) सर्वात जास्त भिवविते. जेंव्हा शस्त्राचा पल्ला काही फुटाचाच होता, तेंव्हा प्रत्यक्ष निकट दिसणाऱ्या शत्रूवर आपल्या हातातल्या शस्त्राने आघात करता येत असे. भीतीचे उगमस्थान समोर स्वच्छ उभे दिसत असे. पुढे हे अंतर वाढत गेले. धनुष्यबाण, बंदूक, तोफ या क्रमाने वाढत जाऊन आता ते सहस्त्रावधी मैलांचे झाले आहे. आणि पूर्ण अदृश्य झाले आहे. आता जल, स्थल अस्मान असे कोठूनहि आणि कोठेही अचानकपणे कोसळू शकणाऱ्या संकटाने अज्ञाताची भीती पराकोटीला पोहचली असून त्यामुळे सर्वसंहार, प्रलय होण्याची शक्यता आहे; याचे ज्ञान झाले आहे. यामुळे सर्व वातावरणच भय आणि चिंताग्रस्त झालेले आहे. या अवस्थेत 'लढाऊ' वृत्तीचा प्रश्न अधिकच गंभिर झालेला आहे. कारण लढाऊ वृत्तीमुळे, उत्पन्न होणाऱ्या धैर्याची कसोटी लागणारी ही अवस्था आहे. आणि अशा प्रसंगी मनोधैर्याला धक्का लागण्याची शक्यता आहे. मनोधैर्याला आणि लढाऊ वृत्तीला सुरुंग लावण्याकरता **प्रचार** हे आणखीही एक नवे तंत्र निघाले आहे. दुसऱ्या महायुद्धात इंग्रजी भाषेतून ब्रिटिश सैनिकांना जपान आकाशवाणीवरुन सांगत असे "ब्रिटिश सैनिकांनो तुम्ही इकडे आमच्याविरुद्ध लढून प्राण गमवीत आहात; आणि तिकडे तुमच्या देशात अमेरिकन सैनिक तुमच्या आया बहिणी आणि स्त्रिया भ्रष्टवीत आहेत. परत जा. आपले प्राण आणि त्यांची अब्रू वाचवा" गोबेलचा प्रचार आणि त्याचे तंत्र थोडे वेगळ्या प्रकारचे होते व प्रभावही होते.

सुखासुखी कोणीहि प्राण गमावण्यास तयार होत नसतो. गौरव, कीर्ती, प्रेम श्रद्धा, ध्येय, निष्ठा इत्यादी प्रमाणेच शुद्र स्वार्थ, लूट, द्वेष इत्यादी करता,

अनेकांनी प्राण दिले घेतले आहेत. यात साहस असले, तरी अशा साहसाला नेहमीच शौर्य म्हणता येणार नाही. रोजच पशुहत्या करणारा कसाई किंवा भावनावेगात अविचाराने मनुष्यवध करणारा खूनी, शूर असतो असे नाही. तो भेकाडातला भेकड असू शकेल. त्याला फार तर क्रूर म्हणता येईल. **खरा शूर क्रूर नसतो. क्रौर्य म्हणजे लढाऊ वृत्ती नाही.** शौर्य, धैर्य सोशिकपणा देशप्रेम, निष्ठा, इत्यादी गुणावर लढाऊ वृत्ती पोसली जाते. पूर्वी विभूतीपूजा, व्यक्तीनिष्ठा आत्यंतिक स्वार्थत्याग इत्यादी गोष्टी प्राणत्याग करण्याची सैनिकांना स्फूर्ती देत असत. 'स्वामिकार्यात' देह पडणे हे भूषण होते. आता काळ बदलला आहे. आताच्या लढाया व्यक्तीनिरक्षेप ( Impersonal ) असतात. कोणीही कोणा व्यक्तीकरता लढत नाही. काश्मीरच्या लढाईत आपले सैनिक नेहरू करता लढले नाहीत; पाकिस्थानच्या दुसऱ्या लढाईत लालबहादुर शास्त्री यांच्या-करता लढले नाहीत. आता व्यक्तीची जागा श्रेष्ठ अशा निष्ठांनी, भावनांनी आणि मूल्यांनी घेतली आहे. आम्हाला आमच्या देशाकरता, आमच्या अस्मिते-करता आणि स्वाभिमानाकरता आता लढावयाचे आहे. देश ही एकच प्रेरक शक्ती आहे. त्याच्या करता आमच्या प्रत्येकात लढाऊवृत्ती बाणली पाहिजे आणि परस्पर सहकार्य आमचा स्वाभीमाव बनला पाहिजे.

आपल्या वेदप्रणीत प्रार्थनेत सहकार्याने वीरोचीत कर्मे **आम्ही सर्वानी** करावीत ! अशी हार्दिक इच्छा व्यक्त केली गेली आहे. त्यात **सहवीर्य** असा शब्द प्रयोग आहे. नुसते मोघम सहकार्य करावे असे नाही ही महत्वाची गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवली पाहिजे. आम्हा सर्वांना सहकाराने वीरोचित कार्य करावयाची आहेत प्रत्येक हिंदी माणूस त्याचा धर्म वा पंथ कोणाचाही असो ! आपल्या मातृभूमीच्या सैन्यातला एक सैनिक असून राष्ट्रीयत्वाच्या पायावर उभा आहे. आपण वीरोचित सहकार्याने हे सिद्ध केले पाहिजे.

-----

# युद्धाची मूलतत्वे -- रणचंडीच्या अष्टभुजा

"Though principles of war do not change the tactics as is well known, vary in every war, in accordance with the characteristics and armament of the enemy and the type of ground over which we have to fight."

—*Packenham Walsh*

आजच्या सुशिक्षित आणि सुसंस्कृत समाजाच्या ज्ञानाचा परिघ विस्तृत झाला असून, बहुश्रुतपणाच्या दिशा फाकल्या आहेत. आणि ही क्रिया अशीच चालू राहणार आहे. प्रत्येक क्षणी काहींतरी नवीन घडते आहे. भूत आणि भविष्य यांचा संधिकाल, जो वर्तमान, तो क्षणजिवी आणि पुसट होत चालला आहे. वर्तमान, पाहता पाहता भूतात जमा होतो; आणि भविष्य लगट करतो. हे वेगाचे युग आहे. शास्त्र असो वा कला असो, त्यांच्या अभ्यासाच्या जुन्या चाकोऱ्या मागे पडून पूर्वी न दिसलेले आणि न आलेले प्रत्यय, व साक्षात्कार, आता वेगाने होऊ लागले आहेत. युग कोणतेहि असो, मूलभूत तत्व आणि सिद्धांत विशिष्ठ मर्यादेपर्यंत तरी, अबाधित राहात असतात. युद्धाच्या तत्वांनाहि तोच नियम लागू आहे.

'जीवो जीवस्य जीवनम्' या न्यायाने सजीव सृष्टीच्या मूलारंभापासून सुरु झालेले युद्ध चालूच राहणार आहे. प्रकार, साधने, काल व दोन युद्धांमधले अंतर, यातच काय कमी अधिक फरक होईल तेवढाच. इंग्लंडचा एक राजा (अथवा राणी) कालवश झाल्यानंतर, दुसऱ्या राजाचे "राजा मृत्यू पावला : राजा चिरायू होवो" (The King is Dead : Long Live the King) असे स्वागत केले जाते. कारण राजा कधीच मरत नाही; (The King never dies) असे इंग्रज मानतो. इतकी मनांत आणि रक्तात भिनून गेलेली राजेशाही, इतरत्र कोठेहि आढळत नाही. आपल्या राजाने ढळढळीत खून केले असते, तरी "राजा प्रमाद करीत नाही." (The king does no wrong) अशीही ब्रिटीशांची श्रद्धा आहे. त्याचप्रमाणे, युद्धात उतरलेला प्रत्येक देश, आणि त्याचे 'दोस्त' आपलाच तेवढा सत्पक्ष आहे. सत्य, न्याय, मुक्ती (Liberation) आणि मानवता-रक्षण या करताच आपण यद्ध पुकारले आहे असा कंठशोष करीत असतो. आणि शेवटी, पराभूत देशातील विशिष्ट व्यक्तिंना गुन्हेगार ठरवून, 'न्युरेनबर्ग ट्रायल्स' मधल्या सारख्या, अमानुष शिक्षा ठोठावित असतो. आणि सरते शेवटी जित, जेते, आणि उरलेले "युद्ध संपले, युद्ध चिरायु होवो" अशा घोषणा करीत, पुढच्या युद्धाच्या

व्यवस्थेला लागतात व पुनः युद्ध बंद करण्याकरिता युद्ध, (War to end war) सुरू करतात. जंगलात भडकलेली एक आग विझविण्याकरता जंगल खाते दुसरी आग लावीत असने तसाच हा प्रकार आहे.

हिंदुस्थानच्या दृष्टीने, युद्धाचा विचार केला, तर असे दिसून येईल की आपले एकही युद्ध एकजुटीने, आणि एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेने लढलें गेले नाही. तत्वचिंतन आणि तत्त्वज्ञान, भक्ती, आणि मुक्तीं आधिभौतीक आणि आधिदैविक, आध्यात्मिक आणि पारलौकिक गोष्टीवरच सर्व प्रज्ञावंत आणि साधु संत यांचे लक्ष केंद्रित झालेले असते. (याला श्री समर्थ रामदास हा एकच अपवाद आहे.) युद्ध, संहार, हिंसा, हे सर्व पाप; असा दृढ समज होता. आता स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, आणि **पाकिस्तान** आणि **चीन** यांनी धडे शिकविल्यावर, युद्ध हे राष्ट्रीय कर्तव्य आहे; असे पटू लागलें आहे. श्रीकृष्णानी हजारो वर्षापूर्वींच, अर्जुनाला हे पटवून दिलेले आहे. कोणालाही ‘रणावीण’ स्वातंत्र्य मिळाले नाही. (आपल्याला ते मिळाले आहे.) आणि असा अद्‌भुत चमत्कार झालाच, तरी ते ‘रणावीण’ टिकू शकणार नाही. म्हणून स्वातंत्र्य रक्षणाकरता, युद्ध हेच प्रत्येकाचे ‘प्रेयस’ आणि ‘श्रेयस’ झाले पाहिजे.

कोणत्याही विषयाची ओळख करून घेतांना, तो विषय कलेच्या कक्षेत येतो कि शास्त्राच्या शाखेत बसतो; असा प्रश्न उभा राहतो. लार्ड वेव्हेलच्या मते “युद्ध हे शास्त्र नाही, किंवा कलाही नाही; तर पुष्कळ लोकानी, एकमेकाला दगड मारण्याच्या खेळाशी त्याची तुलना करता येते.” (“War is neither science nor an art, but it can be compared with a game where lot of people take part and throw stones at each other.”) विदर्भांत पांढुर्णा या गावी, एका विशिष्ट दिवशी, नदीच्या दोन्ही तीरावर जमून परस्परांवर ‘गोटमार’ करीत असतात. ‘वेव्हेलला’ हिंदुस्थानचा चांगला परिचय होता. पांढुर्ण्याच्या ‘गोटमारी’ वरून युद्धाची ही व्याख्या त्याला सुचली असेल काय? युद्ध शास्त्र आहे की कला आहे; हा प्रश्न वादग्रस्त आहे. ज्ञान हा शास्त्राचा हेतु आहे; आणि आनंद हा कलेचा हेतु असतो. असे स्थुल मानाने म्हटले जाते. शास्त्राचे अध्ययन, ज्ञानाची वृद्धी करील. कला भावनांचे उदात्तीकरण करील. ज्ञानोपासनेत भावनांना स्थान नसते; आणि कलेची आराधना ज्ञानी बनण्याकरता केली जात नाही. **पॅकेन हॅम-वाल्श** या लष्करी लेखकाच्या म्हणण्याप्रमाणे, ज्ञान मिळविण्याकरता युद्ध केले जात नसून, एकादे ईप्सित प्राप्त करण्याकरता युद्ध केले जाते. (“War is not waged to obtain knowledge, but to gain an end”) शास्त्र आणि कला, यांच्या साध्यात आणि

साधनात फरक असला तरी, त्यांच्या अभ्यासाच्या पद्धतीत साम्य असते. युद्धाला शास्त्र म्हटले किंवा कला मानले, तरी त्याच्या अभ्यासकाला १) युद्धाची मूलतत्वे २) युद्धाची साधने आणि ३) या दोहोच्या आधाराने करावयाची कृती आणि कृतीची पद्धती, या तीन गोष्टी समजून घ्याव्या लागतील.

गत इतिहासाच्या परिशीलनाने, अनुभवजन्य ज्ञानाच्या भांडवलावर, मानसशास्त्र आणि तर्कशास्त्र यांच्या आधारावर, युद्धाची मूलतत्वे अधिष्ठित आहेत. ती व्यावहारिक आणि सोपी असून, त्यांचा परस्परांशी संबंध आहे. निरनिराळ्या देशात त्यांची निरनिराळी संख्या मानली गेली आहे. व निरनिराळ्या नावांनी ती ओळखली जातात. तरी त्यामुळे, मूलभूत सिद्धांतांना कोणतीही बाधा येत नाही. युद्धाच्या 'आंग्ल-दर्शना' प्रमाणे ( British school of war) ही तत्वे आठ आहेत. आपली हिंदी फौज, ब्रिटिश परंपरेतच अजूनही असल्यामुळे, आपल्या सैन्यातही, आठ हीच संख्या मान्य आहे. आपली हिंदूची युध्द-देवता अष्टभुजा देवी असून तिच्या हातात अष्टायुधे आहेत. आपल्या रणचंडीच्या अष्टभुजा आणि अष्टायुधे या कल्पनेत, ही आठ युद्ध-तत्वे चपखल बसतात. हा एक विलक्षण योगायोग आहे.

**उद्दिष्ट कायम ठेवणे** ( Maintainance of object ) – हे सर्वात महत्वाचे आणि पहिले तत्व आहे. याचा सरळ अर्थ, अंतिम साध्य आणि साधनें, स्पष्ट आणि पक्के समजून घेणे. अंतिम उद्दिष्टांच्या वाटचालीत, अनेक छोटे मोठे उद्देश, साध्य करावे लागतात. एकाच उड्डाणात एकदम, व नेहेमीच अंतिम उद्दीष्टावर झेप घेता येत नाही. इंग्रजीत फौजी परिभाषेत अंतिम उद्दिष्टाला Object म्हणतात; आणि मधल्यांना Objectives म्हणतात. मधल्या मजला, क्रमाक्रमाने आणि सुत्रबध्द योजनांनी, पार कराव्या लागतात. त्यांचा क्रम ठरवून सुसूत्रता राखणे हे दूरदृष्टीने आणि कौशल्याने करावे लागते. हे मधले छोटे मोठे उद्देश, त्यांच्या त्यांच्या मर्यादेत, 'उद्दिष्टे' असली तरी 'अंतिम उद्दिष्टांची' ती केवळ साधने असतात. म्हणून अंतिम उद्दिष्ट मनावर कोरून ठेवले, तरच ते साध्य करण्याच्या मार्गावर, बिनचूक राहता येईल. नाहीपेक्षा मार्गातले तात्पुरते अनुषंगिक आणि गौण उद्देश यांच्यात मन गोंधळून गेल्यामुळे, योग्य मार्गापासूनची च्युति होऊन, अंतिम उद्दिष्टांचे विस्मरण होते. युद्धक्षेत्रावरच नव्हे, तर राजकीय, सामाजिक कोणत्याही कार्यक्षेत्रावर अंतिम उद्दिष्टांच्या विस्मरणाने साधनानांच साध्य समजले जाते. याची अनेक उदाहरणे देता येतील. गांधीचे अंतिम उद्दिष्ट स्वराज्य होते. खादी खासच नव्हते. स्वराज्याच्या मार्गावरील रचनात्मक कार्यक्रमात, ते एक साधन होते. स्वावलंबन आणि स्वदेशी यांचे ते फक्त प्रतीकात्मक चिन्ह होते. स्वराज्य मिळाले, आणि खादीही मागे राहिली. कचरा तसाच राहिला, आणि

झाडूची पूजाही संपत नाही.-- सामाजिक ऊच्चनीचता नाहीशी करण्याचे, सहभोजन एक साधन आहे. पंगती उठल्या आणि विषमताही कायमच राहिली. देवाच्या दरबारात कोणालाही मज्जाव असू नये, म्हणून 'मंदीर-प्रवेश' सत्याग्रह आला. परंतु आतल्या देवासकट मंदिर दूर झाले. नुसता आग्रहच जिभेवर कायम बसला.

मनुष्याच्या अंगी वसत असलेल्या, सर्व शक्तींचा, व गुणांचा पूर्ण विकास होण्याकरता, त्याच्या जीवनाला ध्येय असले पाहिजे. विस्तीर्ण सागराच्या चंचल पृष्ठभागावर, वायुलहरी बरोबर, किंवा लाटांच्या हेलकाव्यामुळे, आंदोलित होऊन, कुठे तरी भरकटत जाणाऱ्या जीर्ण वृक्षपर्णाप्रमाणे नुसते वर वर तरंगत राहणारे जीवन अर्थहीन असते. म्हणून प्रत्येकाचा जीवित हेतु ठरविला गेला पाहिजे. आणि तो सफल करण्याच्या मार्गावर, अविचलित मनाने कायम राहिले पाहिजे. युद्ध, विशिष्ट हेतु साध्य करण्याकरता लढले जाते. तोच साध्य करणे, हे युद्धाचे अंतिम उद्दिष्ट असते. त्यात साध्य आणि साधनांची गल्लत होऊ देता उपयोगी नाही. नेपोलियन म्हणत असे. "युरोपात पुष्कळ चांगले सेनापती आहेत. परंतु त्यांना एकाच वेळी अनेक गोष्टी दिसतात. मला शत्रूची मुख्य फौजच फक्त दिसते. आणि तिचा नाश करण्याकरता मी तुटून पडतो." (There are many good Generals in Europe, but they see too many thin-s at once. I see the enemy's main forces and I go to destroy them.) आपल्या धनुर्विद्येची परीक्षा देण्यास सिद्ध झालेल्या अर्जुनाला तो पक्षी दिसत नव्हता; त्याचा डोळा दिसत नव्हता; फक्त डोळ्यातली बाहुलीच दिसत होती. प्रत्येक सेनापतीनेच नव्हे तर प्रत्येक सैनिकाने आपल्या अंतिम उद्दिष्टांच्या ध्येयावर कायम राहिले पाहिजे; व त्या करता सर्व शक्ती एकवटल्या पाहिजेत. मार्गातल्या दुय्यम आणि आनुशंगिक उद्देशात गुरफटून जाऊन मुख्य उद्दिष्टांचा विसर पडू देता कामा नये.

येथे असा प्रश्न येईल की युद्धाचे अंतिम उद्दिष्ट काय? व ते कोण ठरविणार? सेनापतीचा त्यात भाग किती? ऐके काळी धर्मप्रसाराकरता युद्धे झाली. ख्रिस्त्यांची 'क्रूसेडस्' इतिहास प्रसिद्ध आहेत. तलवारीनेही धर्मप्रसार करण्याची इस्लामी 'धर्माज्ञा' आहे. परंतु आता तो काळ बदलला. खुल्या युद्धाला धर्मप्रसार हे उद्दिष्ट राहिलेले नाही. तसेच राज्यविस्तार, (भौमिक) हेही उद्दिष्ट राहिले नाही. आता युद्धाच्या उद्दिष्टांत, राजकीय गर्भित असतात. पूर्वीच्या संदर्भातला विस्तार, आता लुप्त झाला असून तो 'महत्वाच्या क्षेत्राचा' (Sphere of Influence) आहे. त्यात आर्थिक, वैचारिक आणि व्यावहारिक 'वजनाचा' ((Influence) विस्तार अंतर्भूत असतो. हे देशाचे अंतिम उद्दिष्ट ठरविण्याची जबाबदारी, देशाच्या मुत्सद्दी

मंडळाची असते. अंतर्गत आणि परराष्ट्रीय धोरणाच्या समन्वयावर, देशाचे लष्करी धोरण ठरविले गेले पाहिजे. ते सत्ताधिष्ठित मुत्सद्दी ठरवीत असतात. त्यात सेनापतीला स्थान नसते. आपण स्वतंत्र होताच, पाकिस्तानने काश्मीरवर आक्रमण केले. शत्रूशीं सामना देण्याचा सेनापतीला आदेश मिळाला. नंतर पं. नेहरूंनी 'युनोत' जाऊन आपला आदेश रोखून (Stay) धरला. चीनने आक्रमण केले. पं. नेहरूंनी त्याना हुसकावून लावण्यास सेनापतीला सांगून ते परदेशात निघून गेले. परंतु चीनच थांबला. पुढे ६५ मधे पाकिस्थानने पुनः युद्ध मांडले. हुकुमाप्रमाणे सेनेने काम सुरु केले. पण शास्त्रींनी ताश्कंदला जाऊन युद्ध थांबविले. या सर्व घटनांत सेनापती कुठेच नव्हते.

मुत्सद्द्यांचे उद्दिष्ट काहीही असले; किंवा ते डळमळीत असले; तरी प्रत्येक युद्धात सैन्याचे एकच अंतिम उद्दिष्ट असते. शत्रूच्या सामर्थ्याचा पूर्ण नाश करुन, त्याची प्रतिकार शक्ती आणि इच्छा नाहीशी करणे, व त्याला शरण आणणे. या व्यतिरिक्त, सेना आणि सेनापती, यांचे दूसरे कार्य नाही. शत्रू शरण आल्यावर, त्याला अटी घालणे, त्या कबूल करायला लावणे, आपल्या इच्छा त्याच्यावर लादणे व आपल्या राष्ट्राच्या हिताच्या व जिव्हाळयाच्या कलमांचा, आपल्या इच्छेप्रमाणे निकाल लावणे, व आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांची वृध्दी व रक्षण, हे राज्यकर्त्या मुत्सद्यांचे काम आहे. मुत्सद्दी युध्द ठरवितो; आणि सेनापती ते लढतो. मुत्सद्याच्या उद्दिष्ट पूर्तीचे, सेनापती हे साधन आहे-- निर्वाणीचे साधन आहे. यजमानाने मनात संकल्प धरावयाचा, पुरोहिताने मंत्र म्हणावयाचे. यजमानाच्या संकल्पाची शहानिशा पुरोहित करीत नाही. शुध्द, बिनचुक, प्रसंगानुरुप आणि शास्त्रोक्त पध्दतीने मंत्र म्हणणे हे पुरोहिताचे काम आहे. यजमान आणि पुरोहित यांची परस्पर समजूत आणि सहकार्य प्रत्येक संकल्पसिध्दीला अत्यावश्यक असते. परंतु मुत्सद्याच्या युध्द संकल्पात, पुरोहित सेनापतीला ते नेहेमीच मिळत नाही. हेही अनेक युध्दांच्या इतिहासावरुन दिसून येते. ते काहीही असले, तरी सेनेला आपल्या, नियोजित आणि अंगीकृत कार्यात ढिलाई किंवा बेशिस्तपणा करता येत नाही.

सेनापती मुत्सद्यांच्या-राष्ट्राच्या अंतिम उद्दिष्टाच्या सिद्धी करता आपल्या सेनेच्या निरनिराळया विभागांना, अंतिम उद्दिष्ट पूर्तीला अनुसरून असणाऱ्या दुय्यम उद्देशांची, वाटणी करून देतो-टप्पे व मजला नेमून देतो. क्रमशः या तात्पुरत्या उद्देशांची वाटणी-विभागणी एकएकटया सर्वात लहान तुकडी पर्यंतच नव्हे, तर प्रत्येक सैनिकापर्यंत व्यक्तिशः जाऊन पोहोचते. त्या त्या टप्प्यात आणि मजलेत ते ते दुय्यम आणि तात्पुरते उद्देश त्या त्या स्तरांवर अंतिम उद्दिष्टे ठरतात. या क्रमात मुख्य सेनापतीच्या अंतिम उद्दिष्टाचे स्वरूप. तपशिलाने, दुय्यम-सेनापतीच्या, आणि त्या खालच्या अधिकाऱ्यांच्या उद्दिष्टां]

पेक्षा निराळे भासू लागते. आणि येथेच गोंधळ, गफलत होण्याचा धोका असतो. मुख्य अंतिम उद्दिष्टाला पूरक होणारी, आणि असणारी, दुय्यम आणि तात्पुरती उद्दिष्टे, अंतिम उद्दिष्टाची साधने असून ती साध्य करण्याची जबाबदारी अंगावर असलेल्या, प्रत्येक लहान मोठ्या अधिकाऱ्याला, आपआपल्या पुरते कार्य स्वातंत्र्य असते. हे स्वातंत्र्य अगदी खाल पर्यंतही असते. त्यात प्रत्येकाला आपल्या बुद्धीचा आणि कौशल्याचा उपयोग करायला वाव असतो.

**२ आक्रमण क्रिया** ( offensive action ) हे युद्धाचे दुसरे मूलतत्व आहे. अंतिम उद्दिष्टाच्या सिद्धीच्या प्रयत्नांची सुरुवात करणे, म्हणजे प्रगतीपथावर पदार्पण करणे. ही प्रवृत्तीपर प्रगतीची क्रिया, म्हणजेच युद्धातली आक्रमक क्रिया, किंवा चढाईची क्रिया होय. आरंभा पासूनच आत्मविश्वास, ईर्षा आणि धडाडी, जागृत ठेवण्याचे मुख्य साधन, म्हणजे विजिगीषु वृत्ती. आक्रमक क्रिया, हे तिचे उगम-स्थान आहे. यामुळे चित्त उल्हसित होऊन, धैर्य आणि शौर्य वृद्धींगत होते; आणि 'प्रथमोपक्रमाचे' कृती-स्वातंत्र्य ( Initiative ) मिळविता येते. याचा शत्रूवर फार दूरगामी परिणाम होत असतो. युद्धात आक्रमक क्रियेने, अर्धे यश मिळविता येते. एखादा पहिलवान नेहेमी बचावाच्याच प्रयत्नात राहील, तर त्या झुंजीला 'निकाली कुस्ती' किंवा 'चितपटाची' कुस्ती म्हणता येणार नाही. व जय मिळालाच तर तो संशयास्पद राहील. अकरणात्मक झुंज सहसा अनुकूल निकाल देत नाही. अशा कुस्तीत प्रतिपक्षी नुसताच दमून गेला, तरी त्याने अंतिम कार्यभाग साधत नसतो. कोणच्याहि सामन्याला, नुसते 'हार न खाण्याकरता' कोणीही उभा राहत नाही. काहीहि न करणे, म्हणजे निश्चितपणे काही तरी चुकीचे करणे होय. ( "Doing nothing is positively doing something wrong" ) म्हणून चढाई अनिवार्य आहे. एकादे वेळी जबरदस्ताशी प्रसंग पडला, तर स्वतःच्या दमछाकीकरता, किंवा दुसऱ्या एकाद्या 'डावा' करता, प्रसंगोपात बचावाचे धोरण धरावे लागले, तरी ते किंचित् कालच असले पाहिजे. युद्धात, मोर्च्यामागे दडावे लागेल, खंदकांचा आश्रय घ्यावा लागेल, लपून छपून हत्यार चालवावे लागेल, किंवा एखादी जागा, सोडून द्यावी लागेल. परंतु योग्य संधी येताच, उलट खाऊन निकराची चढाई केल्याशिवाय यश मिळणार नाही. म्हणून प्रत्येकाला आक्रमक वृत्तीचे महत्व कळले पाहिजे. 'स्थिरावलेल्या' बचावाच्या धोरणाचा सैनिकांच्या मनावर अनिष्ट परिणाम होत असतो. त्यांची हिंमत खचते. मन द्विधा होते. आणि अंतिम उद्दिष्ट नजरेसमोर राहात नाही. उलट चढाईमुळे चित्त स्थिर होते. आत्मविश्वास वाढतो. आणि मनोधैर्य कायम राहते. युद्धात यशाचे मुख्य श्रेय, इतर युद्ध सामग्रीपेक्षा, सैनिकाच्या मानसिक सामर्थ्यावरच विशेषतः अवलंबून असते. ज्याचा घाव अगोदर पडतो तो जिंकतो ( one

who strikes first wins ) पहिला घाव, आक्रमक क्रियेशिवाय घालता येणार नाही. मानसिक प्रेरणेशिवाय हेतु पूर्वक क्रिया होऊ शकत नाही. ( No Neurosis without Psyehosis ) हा मानस शास्त्राचा नियम आहे. केवळ संवयीमुळे होणाऱ्या यांत्रिक क्रिया, हेतूपूर्वक क्रिया नसतात. ( Ideo-motor actions are mechanical and not deliberate ) हे मानसशास्त्राचे नियम आहेत. म्हणून लढाऊ वृत्ती ( fighting spirit ) असल्याशिवाय, आक्रमक क्रिया ( offensive action ) होणार नाही आक्रमक क्रियेनेच युद्धात जय मिळतो. ( Victory can only be won as a result of offensive action. )

**३ अनपेक्षितता–** ( surprise ) हे युद्धाचे तिसरे मूलतत्व आहे. अनपेक्षित आणि अकल्पित हालचालीनी, शत्रूला बेसावध स्थितीत गाठता येते. अकल्पित आणि अनपेक्षित प्रसंगी, मन अनिश्चित होते व गोंधळून जाते. शक्ती असूनही त्याच्यात एक प्रकारचा दुबळेपणा उत्पन्न होतो. कारण, आपल्या शक्तीच्या उपयोगाची त्याची योजना तयार नसते. अशा परिस्थितीत त्याचे जास्तीत जास्त नुकसान करणे सोपे जाते. अचानक आणि अकल्पित प्रसंगांनी त्याचा आत्म-विश्वास खच्ची होऊन, त्याच्यात दहशत उत्पन्न होते. त्याच्या शक्तीची पांगापांग होते. शत्रूच्या अशा अवस्थेत त्याच्यावर प्रथम प्रहार ( first strike ) सद्यः फलदायी होतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्ध कौशल्याचा, हा गाभा होता. त्यांच्या चढाया अनपेक्षित, आणि अकल्पित असल्याने, शत्रूला ते नेहमीच चकित करीत असत. शत्रूला तोंड देण्याची तयारी करण्याकरता, काही तरी अवधी लागतोच. म्हणून शत्रूने आपल्यास बेसावध गाठल्यास, त्याला तोंड देण्यास तयार होई पर्यंत, आपलेहि नुकसान होणे शक्य आहे. शिवाय घाईच्या तयारीत मुख्य उद्दिष्ट दृष्टी आड होणे संभवते. म्हणून आपणच सर्व प्रकारची ' दक्षता ' ठेवली पाहिजे. " अनपेक्षितता हा प्रत्येक लढाईचा आत्मा आणि विजयाची गुरुकिल्ली आहे. " ( " surprise is the soul of every battle, secret of success and key to victory ) असे इंग्रजी लष्करी लेखक फुल्लर म्हणतो. " शत्रूला घोटाळ्यात पाडा, चुकवा आणि चकित करा " ( " mistify, mislead and surprise the enemy in every way. " असे अमेरिकन यादवी युद्धातला प्रसिद्ध सेनापती जॅकसन ( ' stone wall ' Jackson ) म्हणतो. आधुनिक युद्धे फार क्लिष्ट झाली आहेत; म्हणून त्यांच्या तयारीलाहि फार कालावधी लागतो. भावी घटनांची शक्याशक्यता अंदाजून, अगाऊ तयारी करून ठेवावी लागते. व ही सर्व तयारी अत्यंत गुप्त राखावी लागते. हे कठीण झाले आहे. म्हणून त्याची जरूरीही वाढली आहे. " शत्रूला तीनच पर्याय आहेत,

असे एखाद्या सेनापतीला पूर्ण विचारांती दिसत असले, तर मग सर्वस्वी अकल्पित अशी चवथी योजना करतो; व शत्रूला चकित करून सोडतो; असे मला दिसून आले आहे." हे प्रसिद्ध जर्मन सेनापती फॉन मोल्टके याचे अनुभवाचे बोल आहेत. शत्रूला बेसावध गाठून चकित करणे हे युद्धाचे तिसरे मूलतत्व आहे.

**४ सुरक्षितता** ( Security ) हे चौथे तत्व आहे. शत्रूला चकित करण्याकरताच नव्हे, तर सर्व वेळी, आणि सर्व प्रकाराने, आपली प्रत्येक हालचाल शत्रूपासून गुप्त राखली पाहिजे. आपल्या डावपेचांची, व्यूह रचनेची, युद्ध साहित्याची, किंवा उद्दिष्ट व उद्देश यांची यत्किंचितही माहिती शत्रूला न मिळू देण्याची पराकाष्टा केली पाहिजे. आपले सैन्य, युद्ध साहित्य, रसद, पुरवठा, परिवहन, संपर्क, संदेश, कारखाने, मुख्य केंद्रे ( Head Quarters ) इत्यादी प्रत्येकाचे, सदैव रक्षण करण्याची जबाबदारी, प्रत्येक लहान थोर अधिकाऱ्यावर त्या त्या प्रमाणात असते. सर्व प्रकारे रक्षण होणे ( protection ) हे सुरक्षिततेच्या योजनेवर अवलंबून असते. "Protection and security go together; they are one." शत्रूला कनिष्ट लेखणे, घातक ठरते, आणि असमंजसपणाचे असते. शत्रूचेहि उद्दिष्ट असते. त्यालाहि युद्धतत्वे अवगत असतात. तोहि आपले बुद्धीसर्वस्व आणि कौशल्य पणाला लावीत असतो. तोहि आपले स्वतःचे, संरक्षण करीत असतो. आणि आपल्या विषयाची शक्य तितकी माहिती मिळविण्याचे त्याचेहि प्रयत्न चालू असतात. आपल्या सुरक्षिततेचा ( security ) 'भेद' करण्यास तोहि टपून असतो. सुरक्षितता जितकी जास्त, तितके कृति स्वातंत्र्यही जास्त; जितके कृती-स्वातंत्र्य जास्त, तितकी प्रथम-प्रहाराची शक्यता जास्त; आणि त्याच प्रमाणात यशाची निश्चितीही अधिक. अनपेक्षितता ( surprise ) आणि सुरक्षितता ( security ) ही दोन तत्वे परस्परपूरक आणि परस्परावलंबी असल्याने, त्यांची युती व समन्वय, युद्धाच्या अंतिम निर्णयावर हितकारक-परिणामी ठरतो. सुरक्षिततेत नुसताच बचावाचा भाग नसतो. त्यात गुप्तता अंतर्भूत असते, आणि त्यामुळे अनपेक्षितता साधता येते.

**५ शक्तीचे केंद्रीकरण**– ( Concentration of force ) , पाचवे तत्व आहे. या तत्वाचा पाश्चिमात्य आद्य पुरस्कर्ता नेपोलियन मानला गेला आहे. आपल्या इतिहासात छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी आपल्या युद्धपद्धतीत या तत्वाचा अवलंब केलेला आहे. रजपुतांनीही आपल्या सर्व शक्ती एकवटून केंद्रित करून मोगलांशी लढाया दिल्या. पण त्या 'मैदानी युद्धात नव्हे; आपआपल्या बंदिस्त आणि सुरक्षित किल्यांच्या आतून! किल्याच्या तटाआडून तेथे सर्व शक्ती सहजच आणि आपोआपच एकत्रित होते. त्या करता वेगळे काहीं करावे लागत नाही. गेल्या महायुद्धात, जर्मनीने 'मजबूत केंद्र

who strikes first wins ) पहिला घाव, आक्रमक क्रियेशिवाय घालता येणार नाही. मानसिक प्रेरणेशिवाय हेतु पूर्वक क्रिया होऊ शकत नाही. ( No Neurosis without Psyehosis ) हा मानस शास्त्राचा नियम आहे. केवळ संवयीमुळे होणाऱ्या यांत्रिक क्रिया, हेतूपूर्वक क्रिया नसतात. ( Ideo-motor actions are mechanical and not deliberate ) हे मानसशास्त्राचे नियम आहेत. म्हणून लढाऊ वृत्ती ( fighting spirit ) असल्याशिवाय, आक्रमक क्रिया ( offensive action ) होणार नाही आक्रमक क्रियेनेच युद्धात जय मिळतो. ( Victory can only be won as a result of offensive action. )

**३ अनपेक्षितता–** ( surprise ) हे युद्धाचे तिसरे मूलतत्व आहे. अनपेक्षित आणि अकल्पित हालचालीनी, शत्रूला बेसावध स्थितीत गाठता येते. अकल्पित आणि अनपेक्षित प्रसंगी, मन अनिश्चित होते व गोंधळून जाते. शक्ती असूनही त्याच्यात एक प्रकारचा दुबळेपणा उत्पन्न होतो. कारण, आपल्या शक्तीच्या उपयोगाची त्याची योजना तयार नसते. अशा परिस्थितीत त्याचे जास्तीत जास्त नुकसान करणे सोपे जाते. अचानक आणि अकल्पित प्रसंगांनी त्याचा आत्म-विश्वास खच्ची होऊन, त्याच्यात दहशत उत्पन्न होते. त्याच्या शक्तीची पांगापांग होते. शत्रूच्या अशा अवस्थेत त्याच्यावर प्रथम प्रहार ( first strike ) सद्य: फलदायी होतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्ध कौशल्याचा, हा गाभा होता. त्यांच्या चढाया अनपेक्षित, आणि अकल्पित असल्याने, शत्रूला ते नेहमीच चकित करीत असत. शत्रूला तोंड देण्याची तयारी करण्याकरता, काही तरी अवधी लागतोच. म्हणून शत्रूने आपल्यास बेसावध गाठल्यास, त्याला तोंड देण्यास तयार होई पर्यंत, आपलेहि नुकसान होणे शक्य आहे. शिवाय घाईच्या तयारीत मुख्य उद्दिष्ट दृष्टी आड होणे संभवते. म्हणून आपणच सर्व प्रकारची 'दक्षता' ठेवली पाहिजे. "अनपेक्षितता हा प्रत्येक लढाईचा आत्मा आणि विजयाची गुरुकिल्ली आहे." ( "surprise is the soul of every battle, secret of success and key to victory ) असे इंग्रजी लष्करी लेखक फुल्लर म्हणतो. "शत्रूला घोटाळ्यात पाडा, चुकवा आणि चकित करा" ( "mistify, mislead and surprise the enemy in every way." असे अमेरिकन यादवी युद्धातला प्रसिद्ध सेनापती जॅकसन ( 'stone wall' Jackson ) म्हणतो. आधुनिक युद्धे फार क्लिष्ट झाली आहेत; म्हणून त्यांच्या तयारीलाहि फार कालावधी लागतो. भावी घटनांची शक्याशक्यता अंदाजून, अगाऊ तयारी करून ठेवावी लागते. व ही सर्व तयारी अत्यंत गुप्त राखावी लागते. हे कठीण झाले आहे. म्हणून त्याची जरूरीही वाढली आहे. "शत्रूला तीनच पर्याय आहेत,

असे एखाद्या सेनापतीला पूर्ण विचारांती दिसत असले, तर मग सर्वस्वी अकल्पित अशी चवथी योजना करतो; व शत्रूला चकित करून सोडतो; असे मला दिसून आले आहे." हे प्रसिद्ध जर्मन सेनापती **फॉन मोल्टके** याचे अनुभवाचे बोल आहेत. शत्रूला बेसावध गाठून चकित करणे हे युद्धाचे तिसरे मूलतत्व आहे.

**४ सुरक्षितता** ( Security ) हे चौथे तत्व आहे. शत्रूला चकित करण्याकरताच नव्हे, तर सर्व वेळी, आणि सर्व प्रकाराने, आपली प्रत्येक हालचाल शत्रूपासून गुप्त राखली पाहिजे. आपल्या डावपेचांची, व्यूह रचनेची, युद्ध साहित्याची, किंवा उद्दिष्ट व उद्देश यांची यत्किंचितही माहिती शत्रूला न मिळू देण्याची पराकाष्टा केली पाहिजे. आपले सैन्य, युद्ध साहित्य, रसद, पुरवठा, परिवहन, संपर्क, संदेश, कारखाने, मुख्य केंद्रे ( Head Quarters ) इत्यादी प्रत्येकाचे, सदैव रक्षण करण्याची जबाबदारी, प्रत्येक लहान थोर अधिकाऱ्यावर त्या त्या प्रमाणात असते. सर्व प्रकारे रक्षण होणे ( protection ) हे सुरक्षिततेच्या योजनेवर अवलंबून असते. " Protection and security go together; they are one. " शत्रूला कनिष्ट लेखणे, घातक ठरते, आणि असमंजसपणाचे असते. शत्रूचेहि उद्दिष्ट असते. त्यालाहि युद्धतत्वे अवगत असतात. तोहि आपले बुद्धीसर्वस्व आणि कौशल्य पणाला लावीत असतो. तोहि आपले स्वतःचे, संरक्षण करीत असतो. आणि आपल्या विषयाची शक्य तितकी माहिती मिळविण्याचे त्याचेहि प्रयत्न चालू असतात. आपल्या सुरक्षिततेचा ( security ) 'भेद' करण्यास तोहि टपून असतो. सुरक्षितता जितकी जास्त, तितके कृति स्वातंत्र्यही जास्त; जितके कृती-स्वातंत्र्य जास्त, तितकी **प्रथम-प्रहाराची** शक्यता जास्त; आणि त्याच प्रमाणात यशाची निश्चितीही अधिक. अनपेक्षितता ( surprise ) आणि सुरक्षितता ( security ) ही दोन तत्वे परस्परपूरक आणि परस्परावलंबी असल्याने, त्यांची युती व समन्वय, युद्धाच्या अंतिम निर्णयावर हितकारक-परिणामी ठरतो. सुरक्षिततेत नुसताच बचावाचा भाग नसतो. त्यात गुप्तता अंतर्भूत असते, आणि त्यामुळे अनपेक्षितता साधता येते.

**५ शक्तीचे केंद्रीकरण**– ( Concentration of force ), पाचवे तत्व आहे. या तत्वाचा पाश्चिमात्य आद्य पुरस्कर्ता नेपोलियन मानला गेला आहे. आपल्या इतिहासात छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी आपल्या युद्धपद्धतीत या तत्वाचा अवलंब केलेला आहे. रजपुतांनीही आपल्या सर्व शक्ती एकवटून केंद्रित करून मोगलांशी लढाया दिल्या. पण त्या 'मैदानी युद्धात नव्हे; आपआपल्या बंदिस्त आणि सुरक्षित किल्यांच्या आतून! किल्याच्या तटाआडून तेथे सर्व शक्ती सहजच आणि आपोआपच एकत्रित होते. त्या करता वेगळे काहीं करावे लागत नाही. गेल्या महायुद्धात, जर्मनीने 'मजबूत केंद्र

Firm Base 'शत्रूला घेराव' Encircling movement आणि चोरटे प्रवेश Infilteration या तीन सूत्रांच्या जोरावर अत्यंत अल्पावकाशात सबंध युरोप जवळ जवळ पादाक्रांत केला होता. या तीन सूत्रांचे मर्म 'शक्तीचे केंद्रीकरण' हे तत्व आहे. त्याच्या पूर्वी किती तरी वर्षे अगोदर, छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी याच सुत्रानुसार मैदाने मारली आहेत. प्रतापगडच्या युद्धातले अपूर्व यश, यांच्या मुळेच त्यांना मिळाले. अशी आणखीहि उदाहरणे देता येतील. मनुष्याच्या शक्तीचे केंद्र त्याच्या मनगटात असते. त्याची उभारलेली मूठ, त्याच्या शक्तीचे प्रतीक असते. आपल्या इच्छेप्रमाणे मिटल्या मुठीचा ठोसा मारता येतो, तसेच मूठ खोलून पंजाने चपकारही मारता येते. जशी पांचही बोटे एकत्र करून मूठ बांधता येते, तसेच कोणतेहि बोट एकएकटे उघडता येते. जसा प्रहार करता येतो, तसेच शत्रूचे मनगट किंवा मानगुटी पकडता येते. सर्व शक्ती एकवटून सेनेच्या प्रत्येक विभागाचा आणि प्रत्येक शस्त्राचा प्रत्येक वेळी एकाच शत्रूवर एकजिनसी मारा करणे हा शक्तीचे केंद्रीकरण या तत्वाचा अर्थ नाही. तर प्रसंगानुरूप विशिष्ट लक्ष्यावर सेना विभागाच्या कार्यक्षमतेनुरूप समतोल सामर्थाने झुंज देणे, व 'न्यून्य ते केंव्हाहि पुरते' करण्याची शिलकी सिद्धता राखणे हा आहे. यात 'पुरते' करणे आणि ते करता येण्यासाठी शक्य तितकी शक्ती शिल्लक ठेवणे या दोन बाजु मुख्य आहेत आणि हे करीत असतांना, कोणताहि भाग असुरक्षित आणि कमजोर न राहू देण्याची दक्षता घेणे ही तिसरी बाजू आहे. या तिन्ही बाजूंनी सेनेची रचना व योजना म्हणजेच शक्तीचे केंद्रीकरण होय. प्रत्येक लढाईत निर्वाणीचा प्रसंग येतोच. त्या वेळी सर्व शक्ती एकवटून घाव घातला गेला पाहिजे; व म्हणून शक्तीचे केंद्रीकरण आवश्यक असते. संपूर्ण शक्ती केंद्रीभूत न होता घातलेला घाव लटका पडण्याचा संभव असतो. केंद्रीत अल्पसामर्थ्य, विस्कळीत आणि सातपट मोठ्या शक्तीला लोळवू शकते. केंद्रीकरण म्हणजे, सर्व सैन्य एकत्र गोळा करून ठेवणे नव्हे. तर शक्ती समतोल राखून जरूर त्या कामगिऱ्या जरूर तेंव्हा पार पाडण्याकरता सेनेची मांडणी जुळणी आणि योजना करता येणे.

**६ शक्तीचा मितव्यय** (Economy of force.) हे सहावे तत्व, शक्तीच्या केंद्रीकरणाच्या पांचव्या तत्वाशी संलग्न आहे. व त्या तत्वाची ही दुसरी बाजू आहे. इंग्रजी लष्करी लेखक लिडल हार्ट म्हणतो. "शक्तीचा मितव्यय हा यशस्वी युद्धाचा सर्व प्रथम आणि सर्वोत्तम नियम आहे. शत्रूविरुद्ध आपली सर्व शक्ती पणाला लावीत असतांना, युद्धाचा सर्व प्रकारचा ताण सहन करण्याची क्षमता, केवळ अपार साधन संपत्तीवर नसून ती शक्तीचा मितव्ययी वापर आणि वाटप यावर अवलंबून असते." मितव्यय म्हणजे कंजुषी नव्हे. कंजुषी अनेक वेळा गळचाशी येते. शहाणपणाने आणि चातुर्याने केलेला खर्च, म्हणजे मितव्यय. सारासार विचारांनीं आपल्या शक्तीचा अपव्यय टाळून

निर्वाणीच्या प्रसंगाकरता शक्तीचा संचय करुन ठेवणे, अतीशय महत्वाचे असते. स्वत:च्या सुरक्षिततेकरता, तसेच शत्रूची शक्ती फुकट वाया जावी, अशा हालचाली, चतुर सेनानायक करीत असतो. परंतु याच्याकरताहि, करावयाचा आपला खर्च, तसाच जरुरीचा, उपयोगी असला पाहिजे. अंतिम उद्दिष्टावरचे लक्ष्य विचलीत न होऊ देता, दुय्यम उद्देश आणि कामगिऱ्यांच्याकरता, हात राखूनच खर्च केला पाहिजे. नाहीपेक्षा, सर्व शक्ती एकवटता न आल्याने, किंवा बरीच शक्ती व्यर्थ खर्च होऊन गेल्याने, जरुर तेंव्हा, कमजोरी उत्पन्न होईल. उदाहरणार्थ बिनीची तुकडी (Advance Guard) जरुरीपेक्षा, आणि योग्य प्रमाणापेक्षा मोठी, मुक्रर केली गेली, तर मुख्य फौज (Main Body) रोडावेल. म्हणून, व्ययाचे तारतम्य राखले पाहिजे. हे दैनंदिन व्यवहारातले साधे तत्व आहे. ते युद्धातही तितकेच महत्वाचे आहे.

७ **गतिमानता** (Mobility) हे त्यापुढचे सातवे युद्धतत्व आहे. सैन्याची इष्ट स्थळी व वेळी शीघ्रातिशीघ्र वेगाने हालचाल करता आली, तर कृती–स्वातंत्र्य (Initiative) मिळणे सुलभ होते. 'पहिला घाव, जय पाव' या सूत्राप्रमाणे, पहिला घाव घालण्याला '**तेथे**' पहिल्याने पोहोचले पाहिजे. ("To get there first with the utmost") "तेथे जास्तीत जास्त शक्तीसहित पहिल्या प्रथम पोहोचणे" हा चालू '**वेगयुगाचा**' स्थायी भाव आहे. युध्दभूमीवरची सेनेची रचना, वेगाच्या हालचाली करता येण्यासारखी असली पाहिजे तरच '**तेथे**' अगोदर पोहोचता येईल, शत्रूला बेसावध गाठता येईल, चकित करता येईल; आणि त्याच्यावर पहिला प्रहार आपलाच होईल. आकारमान × वेग = आघाताचा जोर. हे गणिताचे प्रमेय युध्दातही खरे आहे. लहान आणि सुटसुटीत फौजेच्या वेगवान धडकींचा, त्याच्यापेक्षा पुष्कळ मोठ्या शत्रूवरही, जबरदस्त, मार बसू शकतो. याच्या योगाने शत्रूची 'फळी फुटते' ("modern war is a war of transportation") "आधुनिक युध्द हे परिवहनाचे युध्द आहे." जर्मन 'ब्लिट्झक्रिग' प्रसिध्द आहे. सैन्याच्या कित्येक त्रुटीची पूर्ती, वेगामुळे होते. शिवाजी महाराजांच्या मुठभर मावळ्यांनी, मोगलांच्या मुसलमानांच्या मोठमोठ्या सेना–संभारांना त्रस्त करुन सोडले होते; ते त्यांच्या वेगाच्या हालचालीमुळे. मराठा स्वार भाला उलटा रोवून, त्यावर मुंडासे ठेवून, खोगीरावर बसल्या बसल्या झोपत असे. म्हणून संकेत मिळताच, चटकन घोड्याला टाच देऊन, तो दवडू शकत असे. दिल्लीचे तख्त फोडण्याच्या अचाट साहसाची गुरु किल्ली, राघोबाच्या 'भरारीत' होती. राघोभरारी म्हणजे मूर्तीमंत वेग. 'भरारी' म्हणजे गतिमानता. (Mobility)

८. **सहकार्य** (Co–operation) हे युद्धाचे आठवे व शेवटले मूल–तत्व आहे. हे फारच महत्वाचे आहे. हाताशी असलेल्या युद्ध साहित्याचा, आणि

सैन्याच्या निरनिराळ्या अंगांचा त्यांच्या गुणाधर्माप्रमाणे आणि कार्यक्षमतेप्रमाणे, शक्य तितका उपयोग करून, त्यांच्याकडून परस्परांना शक्य तितके साहाय्यक, आणि पूरक कार्य करून घेण्याचे चातुर्य सेनापतीत असले पाहिजे. सामर्थ्याचा पूर्ण विकास परस्पर सहकार्याने सहज होऊ शकतो. जल, स्थल आणि वायुसेना या तीहीचे कार्यक्षेत्र, कार्यपद्धती, आणि कार्यक्षमता, भिन्न भिन्न प्रकारची आहे. तसेच त्यांची वैगुण्ये आणि न्यूनताहि भिन्न भिन्न आहेत. परंतु त्यांची योजना परस्पर साह्यकारी आणि पूरक होऊ शकते. या तिन्ही सेना, हातात हात घालून काम करू शकतात. तसेच त्यांचे पोट विभागही, परस्परांना, आणि दुसऱ्या प्रकारच्या सेनेच्या पोट विभागांना, अनेक प्रकारांनी मदत देऊ शकतात. याचा तपशील त्या त्या प्रसंगावर अवलंबून राहील. प्रत्येक प्रकारची सेना प्रत्येक लढाईत उपयोगी पडेल, किंवा वापरली जाईल असे नाही. उदाहरणार्थ नाविक तोफांच्या माऱ्याच्या पलीकडे घडणाऱ्या युद्ध प्रसंगात केवळ जमिनीवरच्या, किनाऱ्यापासून नाविक दलाच्या सहकार्याचा प्रश्न उद्भवतच नाही. सर्वंच प्रसंगी, सर्वच आयुधे कार्यक्षम किंवा उपलब्ध नसतात. हजर साधनांचा जास्तीत जास्ती उपयोग करून घेणे आणि त्रुटी परस्पर सहकार्याने भरून काढणे, यातच सेनापतीच्या चातुर्याची परीक्षा होत असते. सेनापतीला आहे त्याच्यात निभाऊन घेण्याचे (Improvisaton) तारतम्य, आणि कौशल्य असावे लागते. "एकमेकां साह्य करू" हे एक संत वचन आहे. ह्याचा संदर्भ निराळा असला, तरी तत्व एकच आहे. सर्व प्रकारच्या सेनेला, आणि विभागांना परस्परांच्या शक्तीचे, कार्यक्षमतेचे, कार्यपद्धतीचे तसेच वैगुण्याचेहि ज्ञान असले पाहिजे. त्यावर सहकार्याचे यश अवलंबून राहील. कोणाला कोणाची मदत केव्हाही लागणारच नाही असे सहसा घडत नाही. कमजोरी, त्रुटी, यांची भरपाई सहकार्याने होऊ शकते. त्यावर सहकार्य हाच एक उत्तम उपाय आहे.

युद्धाची ही मूलतत्वे म्हणजे, दोन आणि दोन चार असा गणिताचा हिशोब नाही. या तत्वांची पायमल्ली होऊनही लढाया यशस्वी झाल्या असतील. परंतु, त्यामुळे यांचे मोल कमी होत नाही. असे एखादे यश अपघातच आहे. अपघाताने तत्त्वाला बाधा येऊ शकत नाही. अशी बाधा झाली तर ते मूलतत्त्व राहणार नाही. कोणतीही तत्त्वे फक्त मार्गदर्शन करतात. त्याचे पालन यशाचा मार्ग सोपा व शक्य करते. उपलब्ध शक्तीच्या जोरावर, प्राप्त परिस्थितीत, विचारपूर्वक, शांत चित्ताने, आणि या तत्वानुसार लढणारा सेनापती आणि सैनिक आपले अंतिम उद्दिष्ट साध्य करू शकेल. ही रणचंडीच्या अष्टभुजात धारण केलेली युद्धात उपयोगी पडणारी तिची आठ शस्त्रे आहेत.

युद्ध म्हटले, म्हणजे सैनिक आलेच. म्हणून सैनिकांविषयीच्या मूलतत्त्वांचा येथे निर्देश आवश्यक वाटतो. सैनिकांची सेना होते. सेना म्हणजे सैनिक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ५८४०६ वि: निबंध
क्रमांक २९६१/७५ नों: दि: ३१/१/७२

युद्ध करतो. म्हणून युद्धाबरोबर सैनिकाचाहि विचार करणे क्रमप्राप्त आहे. सैनिकांसंबंधी विचार करीत असताना पहिला विचार येतो तो त्याच्या मनुष्य य. नात्याच्या संबंधाचा आहे. याला लष्करी परिभाषेत इंग्रजीत man management असे म्हणतात. म्हणजे सैनिकाचे अधिकाऱ्याशी कसे संबंध असले पाहिजेत ? अधिकाऱ्यांनी आपल्या हाताखालच्या लोकांशी कशी वर्तणूक ठेवली पाहिजे ? त्यांच्याकडे कसे लक्ष दिले पाहिजे ? त्यांची कशी काळजी घेतली पाहिजे ? आणि जपणूक केली पाहिजे ? इत्यादी बाबींचा, यात अंतर्भाव होतो. हा प्रत्येक छोटया मोठया सेना नायकाचा प्रांत आहे. परस्पर बंधुभाव, आदर, व निष्ठा यांचे मूलस्थान वरिष्ठ आणि कनिष्ठ यांच्या प्रेमाच्या आणि परस्पर सहानुभूतीच्या वागणुकीत असते. स्थानपरत्वे, प्रत्येकाला निरनिराळया गोष्टी उपलब्ध असतात. जसजसे वर जावे, तसतशा सोयी वाढत जातात; कारण जबाबदारीही वाढत जाते. परंतु त्यांचा उपभोग घेत असतांना, वरिष्ठांनी केवळ आत्मकेंद्रित स्वार्थबुद्धी ठेवली तर तो कनिष्ठात आपल्याविषयी विश्वास प्रेम, आदर, आणि निष्ठा, उत्पन्न करू शकणार नाही. उभयतात दुरावा, मनोमालिन्य, (कमीत कमी–' त्रयस्थता ') उत्पन्न होईल. अशा मनस्थितीत, कोरडया कर्तव्याकरता लढणाऱ्यांचा दर्जा, निकृष्ठ राहण्याची शक्यता असते. त्यात सर्वस्व मनापासून ओतले जाणे, दुष्कर होऊ शकते. स्वतःला तहान लागली असतांनाहि आपल्या तोंडाजवळ नेलेले दुर्मिळ पाणी, जखमी होऊन पडलेल्या, कंठी प्राण आलेल्या, सैनिकाच्या तोंडात " तुझी गरज माझ्यापेक्षा जास्त आहे. " असे म्हणून घालणारा सेनापती सैनिकांना प्रत्यक्ष देव न वाटला तरच नवल ! असे निःस्वार्थी, सहानुभूतीपूर्ण, आपुलकीचे, पण त्याचबरोबर न्यायी, आणि शिस्तीला बाधा न आणणारे, अधिकाऱ्याचे सैनिकाशी वर्तन, हाच उत्तम man mangement चा पाया आहे. अडचणीत मदत, आणि कर्तृत्वाची कदर सैनिकांत दुर्दम्य मनोधैर्य उत्पन्न करू शकते.

सैनिकाविषयीचा (यात सर्व दर्जाचे अधिकारीही येतात) दुसरा महत्वाचा विचार त्याचे मनोधैर्य (Morale) हा आहे. युद्धात मनोधैर्याइतके कशालाहि महत्व नाही. मनोधैर्य उत्पन्न करण्याचे, वाढविण्याचे आणि ते टिकविण्याचे, तीन मार्ग आहेत. आपण एका ' उदात्त ' ध्येयाकरता लढतो आहोत, आपला खरा सत्पक्ष आहे; याची जाणीव व अभिमान हा आधिदैविक मार्ग आहे. जरूर ती शस्त्रास्त्रे आणि दुसरे युद्ध साहित्य, आणि रसद वगैरेचा योग्य पुरवठा, परिस्थित्यनुरूप अन्न वस्त्रादिक प्राथमिक गरजांची पूर्ती, स्वास्थ्य आणि वैद्यकीय मदत, ' देखभाल ' होण्याची खात्री, हा ' आधिभौतिक ' मार्ग आहे. अंगिकृत कार्य, सर्वस्वाच्या बलिदानाने, आणि कर्तव्यबुद्धीने करीत राहण्याचा निर्धार, परस्पर बंधुभाव, वरिष्ठांवर विश्वास आणि निष्ठा, आणि निश्चित मन, हा " मानसिक " मार्ग आहे. या तीन मार्गांनी सैन्याचे मनोधैर्य ऊच्च कोटीचे,

आणि अविचल राखले जाते. सैन्यातल्या प्रत्येक लहान मोठ्या अधिकाऱ्याने, आणि "मागे राहिलेल्या" देशातील यच्चयावत् नागरिकाने सैन्याचे मनोधैर्य आणि आत्मविश्वास, अढळ राहण्यास मदत केली पाहिजे, याच पायावर, सैन्याची विजीगिषु-वृत्ती उभी असते. दुसऱ्या महायुद्धातला प्रसिद्ध ब्रिटिश सेनापती स्लीम मनोधैर्याचे विश्लेषण करताना म्हणतो-"सैन्य कितीही उच्च दर्जाचे, प्रशिक्षित असले, तरी लढाईत असा एक क्षण येतो कि जेव्हा अधिकाऱ्यांचा सैनिकावर काबू राहणे शक्य होत नाही. त्यावेळी, त्याच्यात एकलेपणाची भावना उत्पन्न होते. तरीहि तो तसाच लढत असतो. त्यावेळी त्याचे मनोधैर्यच त्याची प्रेरक शक्ती असते. तेच त्याचा सर्वस्वी आधार असते." हिटलर म्हणतो "शस्त्र लढत नाही; ते चालविणारा सैनिक लढतो; सैनिकही लढत नाही, लढत असते त्याचे मन." सैनिकात मनोधैर्य उत्पन्न करणे ते वाढविणे आणि कायम राखणे हे सेनापतीचे खास कर्तव्य आहे. आणि हे त्याने स्वतःच्या उदाहरणाने केले पाहिजे. "रणांगणावर मरून पडलेल्या सेनापती इतके दुसऱ्या कशानेही, सेनेचे मनोधैर्य, अधिक उंचावू शकत नाही." "Nothing raises morale better than a Dead General" John Masters.

———

# मोहिमेची आखणी

स्वेच्छेने राजकीय धोरण म्हणून असो, किंवा अनिच्छेने आपद्धर्म म्हणून असो! शासनाने युध्द करावयाचे म्हणजे शत्रूवर चालून जावयाचे ठरविले; म्हणजे सेनापती रंगमंचावर प्रवेश करतो. युध्द कसे सुरू करावयाचे, कोठे सुरू करावयाचे, हे मुत्सद्यांनी सेनापतीच्या सल्ला मसलतीने ठरविले पाहिजे. कारण युध्द करावयाचे जरी मुत्सद्दी मंडळाने ठरविले; तरी प्रत्यक्ष कृती, सैन्य करते. म्हणून सेनापती मसलत महत्वाची असते. सेनापतीला सर्व राजकीय पार्श्वभूमी समजावून दिली गेली पाहिजे, त्याला सर्व उद्दीष्टे व हेतु उलगडून सांगितले गेले पाहिजेत. उद्दिष्ठ पूर्तीच्या न्यूनतम, तशीच अंतिम मर्यादांची पूर्ण जाणीव दिली पाहिजे. आणि शासकीय दप्तरी असलेली प्रत्येक बाबतीतली खडान्खडा माहिती दिली पाहिजे. देशाच्या आर्थिक परिस्थितीची, साधन सामग्रीच्या पुरवठ्याची, उत्पादन क्षमतेची, तसेच बाहेरील मदत इत्यादी प्रत्येक बाबतीतले देशाचे प्रामाणिक चित्र त्याच्यापुढे मांडले पाहिजे. वास्तविक हे शासनाच्या दैनंदिन व्यवस्थेतलेच एक प्रधान अंग समजले गेलेले असेल; तर सेनापतीला युध्द ठरल्यावर पहिल्यापासून सर्व सांगण्यासमजण्याची आवश्यकता उत्पन्न होणार नाही. कॅबिनेटमधील सभासदांइतके, सेनादलाच्या प्रमुखांना नेहमीच विश्वासात घेतलेले राहून, त्यांचा देशाच्या अंतर्बाह्य परिस्थितीशी, काहीहि हातचे न ठेवता परिचय अखंड ठेवला गेल्यास, संरक्षणाची कार्यक्षम योजना आखणे सेनापतीला सुलभ होऊ शकेल.

आघाड्या उघडणे व ठरविणे, (Threatre of war) शत्रूच्या सामर्थ्यानुरूप व हेतूंना अनुलक्षून, डावपेच योजणे, त्याकरता जरूर तितके त्या जातीचे आणि प्रकारचे सैन्य निवडून, त्याची योजना करणे, वगैरे प्रत्यक्ष युध्दातले कार्य, हा सेनापतीचा एकट्याचा प्रांत असला पाहिजे. व शासनाने सर्व प्रकारची मदत, सवलत व सोई सेनापतीला सहज आणि ताबडतोब उत्पन्न करून दिल्या पाहिजेत. अर्थखाते, हिशेबखाते इत्यादिची लालफीत गुंडाळून ठेवली पाहिजे. परंतु आणीबाणीची परिस्थिती असूनही, नियम आणि विधिनिषेधांच्या कोंडाळ्यातून अर्थमंत्र्यांचे सचिवालय, हिशोब खाते, तपासणी खाते इत्याही 'खाती' बाहेर पडायला तयार नसतात. याची सेनापतीला भयंकर डोके दुखी असते. शांततेच्या काळातले मुलकी नियम, थोडे शिथिल किंवा सैल करायला त्या खात्यातले 'वेडे' नियंत्रक तयार होत नाहीत. ही एक सेनापतीच्या युध्दसंचलनात मोठी अडचण असते. दुसरी मोठी अडचण म्हणजे सेनापतीला हवी असलेली आणि जरूर तितकी फौज, संरक्षण मंत्रालयाकडून

दिली जात नाही. आणि एखादे वेळीं दिली गेली, तरी ती काढून घेण्यात येते. व तिला दुहेरी कामगिरी दिली जाते. याचा परिणाम दुहेरी होतो. एक. मोहीम, योजना केल्याप्रमाणे पार पाडता येत नाही; आणि दोन निरनिराळ्या पोट आणि उपविभागांचे संतुलन आणि समन्वय बिघडून जातो. याचे कारण मुत्सद्दी संरक्षणमंत्री, किंवा प्रत्यक्ष महामंत्री, त्या सेनापतीच्या दृष्टीकोनातून त्या मोहिमेकडे पाहात नाहीत. अशा परीस्थितीत सेनापतीचे काम अधिकच बिकट होत असते.

विशिष्ट युध्दक्षेत्र निवडले गेले व आघाडी मुक्रर झाली म्हणजे त्या आघाडीवरील सेनापतीची निवड व नेमणूक होते. त्या त्या विभागातील भौगोलिक आणि प्राकृतिक परिस्थितीवर युध्दाची पध्दत आणि डावपेच योजले जातात. आणि कोणत्या प्रकारची शस्त्रे अधिक फलदायी होतील याचा विचार होतो व त्या त्या प्रकारच्या विशेषज्ञ आणि तज्ञ सेनापतींची नियुक्ती तेथे होते. आणि त्या त्या मोहिमेवर किंवा आघाडीकरता त्याच तत्वावर आधारलेल्या धोरणाने, निरनिराळ्या शस्त्रास्त्रांनी सुसज्जित, अशा सेनेची पथकें, तुकड्या, उपविभाग यांची नियुक्ती केली जाते. ही नियोजित सेना "संतुलितसेना" असली पाहिजे. 'संतुलित सेना म्हणजे काय हे पुढील अवतरणावरुन स्पष्ट होईल.'
Balanced force means a force having correct proportion of the various Arms and Services required for a particular task. The Balance of force also depands upon proper disposition of the differant units so that the aim may be achieved with minimum loss to self and maximum loss to enemy. The strength and the dispositions of the enemy have to be considered."
आपल्या सेनेला पार पाडावयाच्या कामगिरीचा सर्वांगीण विचार करुन, निरनिराळ्या प्रकारच्या, निरनिराळ्या कार्यक्षमतेच्या, जरूर तितक्या लहान, अथवा मोठ्या तुकड्या, शत्रूचा जास्तीत जास्त नाश होऊ शकेल, आणि आपले कमीत कमी नुकसान होईल अशा धोरणाने, नियुक्त केल्या पाहिजेत. त्याच बरोबरच शत्रू सेनेची रचना आणि सामर्थ्य, याही गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. आणि हे सर्व युध्द क्षेत्राच्या भौगोलिक आणि प्राकृतिक परिस्थितीला योग्य अशा रीतीने करावयाचे असते. या योजनेत आपल्या दळणवळणाची सुरक्षितता आणि साधने, परिवहन आणि पुरवठा व्यवस्था याही महत्वाच्या गोष्टी नजरेसमोर असल्या पाहिजेत.

प्रत्येक मोहिमेकरता अथवा आघाडी करता नियुक्त केलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या विभाग, उपविभाग, तुकड्या, पथके इत्यादींची क्रमवार नियुक्ती णेकर याला लष्करी परिभाषेत Order of Battle म्हणतात. या Order

of Battle ची म्हणजे नियोजित सेना विभागांची, शक्य तितकी ताजी आणि तपशीलवार माहिती मिळविण्याची, उभय पक्षांकडून अतोनात खटपट होत असते. परस्परांच्या सामर्थ्याचा, शस्त्रादिकांच्या प्रकारांचा, आणि त्यावरून युध्द पध्दतीचा आणि डावपेचांचा अंदाज बांधता येतो. आणि त्या अनुसार उभय पक्ष आपआपली योजना आखू शकतात. अर्थातच ही सर्व Order of Battle ची माहिती शक्य तितकी ताजी आणि विश्वसनीय असली पाहिजे. कित्येक वेळी आपआपली खोटी व फसवी Order of Battle शत्रूला मिळ देण्यात येत असते. शत्रूची फसवणूक करणे हाच अर्थात याचा हेतु असतो. आपले मनोधैर्य कितीही ऊच्च कोटीचे असले, आपली सेना कितीही सुसज्ज असली आपल्याला जयाची कितीही खात्री वाटत असली, तरी शत्रूला तुच्छ मूर्ख, अथवा निःकृष्ट समजणेही भयंकर चूक ठरेल. **आत्मविश्वास म्हणजे गर्व नव्हे. उत्साह म्हणजे मग्रुरी नव्हे, आणि जयाचा भरवसा म्हणजे शत्रूचा पराभव नव्हे.**

शांततेच्या काळातही प्रत्येक देश दुसऱ्या देशांच्या युद्ध साहित्याची, आंतरराष्ट्रीय हित संबंधांची, भौगोलिक आणि प्राकृतिक परिस्थितीची, नैसर्गिक साधन संपत्तीची, सर्व प्रकारच्या उत्पादनाची, व्यापार विषयक, आर्थिक स्थैर्य, तसेच देशांच्या अंतर्गत असणाऱ्या विचार आणि 'विकार' प्रवाहांची सांस्कृतिक जीवनाची, इत्यादी सर्व प्रकारच्या अंगोपांगांची अद्यावत् माहीती मिळविण्याची आणि ती सतत मिळत राहण्याची, खटपट करीत असतो. हे कार्य आपआपल्या वकीलाती, प्रतिनिधी, आमंत्रणाने अथवा अंगतुकपणाने मिळवीत असतात. नट, नर्तक, व्यापारी, विद्यार्थी, प्रचारक आणि हौशी प्रवासी, असे सर्व प्रकारचे लोक, आपआपल्या देशाकरता हे काम करीत असतात. या आणि अन्य मार्गांनी, उघड आणि गुप्त रीतीने, प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुरोधाने देशाची परराष्ट्रनीती ठरविली जाते. युद्ध कालात, अर्थातच शत्रू विषयीच्या अशा अनेक प्रकारच्या माहितीला अनन्य साधारण महत्व प्राप्त होत असते. कारण सेनापतीला आपल्या मोहीमांची योजना व आखणी करण्याकरता हिचा फार उपयोग होत असतो..

युद्धाचा निर्णय घेऊन सेनापतीची नियुक्ती, युद्धक्षेत्र व आघाडीची निश्चिती, उद्दिष्ट, सैन्याची नेमणूक (Order of Battle) सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रादी युद्ध साहित्याचा पुरवठा, परिवहन व्यवस्था, आणि सेवा Services विभागांच्या आपआपल्या जबाबदारीची वाटणी इत्यादी सर्व प्राथमिक परंतु महत्वाच्या बाबतीतले यथायोग्य आदेश व सूचना, सेनापतीला मिळाल्या; म्हणजे त्याच्या कामाची सुरुवात होते. त्याला मिळालेल्या आदेशांची आणि कामगिरीची वाटणी आणि वाटप यांची साखळी जुळत जुळत, ती सर्वात

खालच्या आणि सर्वांत लहान अशा १०।१२ सैनिकांच्या नायकापर्यंत तयार होत जाते; व त्या त्या विभागाला आपआपल्या योजना कराव्या लागतात. या करता, लहान मोठा प्रत्येक नायक आपआपल्या अधिकारानुसार आणि वाटून दिलेल्या कार्यानुसार, आपआपली योजना (plan of action) तयार करतो. प्रत्येक लहान मोठ्या सेना नायकाला आपली योजना तयार करण्याकरता, एक महत्वाची गोष्ट करावी लागते. त्याला आपआपल्या कार्यं क्षेत्राचे म्हणजे युद्ध क्षेत्राचे अत्यंत काळजीपूर्वक निरीक्षण करावे लागते. या क्रियेला इंग्रजीत रेकॉनायसन्स Reconnaissance म्हणतात. ही पाहणी अथवा निरीक्षण, तुकडी जितकी लहान तितके प्रत्यक्ष नजरेने पाहून करता येते, व तिच्या नियुक्त क्षेत्रानुसार ती पाहणी प्रत्यक्ष नजरेने किंवा उपलब्ध सांधनांच्या मदतीने (जसे नकाशे, विमानातून घेतलेले फोटो, मिळालेली प्रतिवृत्ते (Reports) टेहेळणी करता नियुक्त केलेल्या खास व्यक्ती किंवा लहान मोठ्या तुकड्यानी मिळविलेली माहिती इत्यादी) करावी लागते. या करता लहानात लहानापासून मोठ्यातल्या मोठ्या अधिकाऱ्याला 'नकाशा' वाचता आला पाहिजे (Map Reading) तसेच विमानातून काढलेले फोटोहि वाचता आले पाहिजेत. (Air Photo Reading) कारण प्रत्येक वेळी प्रत्येक लहान अथवा मोठ्या नायकाला युद्ध क्षेत्र प्रत्यक्ष डोळ्याने पाहता येत नाही. जसजसे वर जावे तसतसे ही पाहणी अथवा निरीक्षण, प्रत्यक्ष होणे कमी कमी शक्य होत जाते; आणि ईतर साधनाचाच याकरिता आश्रय घ्यावा लागतो. या शिवाय सेनेचा निरनिराळा नायक आपआपल्या दृष्टीकोणातूनही पाहणी अथवा निरीक्षण करीत असतो. उदाहरणार्थ पायदळ तुकडीच्या नायकाचे निरीक्षण पायदळाच्या कार्य पद्धती प्रमाणे व कार्यक्षमतेनुसार, पायदळाच्या दृष्टीनसार होईल; तर तोफखान्याचे तोफखान्याच्या दृष्टीनुसार होईल. वर वरच्या सेनानायकाला आपल्या हाताखालच्या निरनिराळ्या प्रकारच्या विभागांच्या दृष्टीकोनातून केलेल्या पाहणीचा-निरीक्षणाचा समन्वय करावा लागेल. वरवरच्या श्रेणीत Order of Battle प्रमाणे नियुक्त केलेल्या विभागांच्या विशिष्ट दृष्टीकोणातून केलेल्या निरीक्षणाचा समन्वय करावा लागेल. या पाहणीत-निरीक्षणात अनेक गोष्टी येतात त्यापैकी मुख्य म्हणजे १) आपल्या कार्यक्षेत्राच्या सीमा २) तेथली जमिनीची अथवा /आणि नैसर्गिक परिस्थिती (जसे मैदान, जंगल, डोंगरी भाग, टेकड्या, दऱ्या वगैरे) ३) शत्रूच्या बाबतीतली अशीच परिस्थिती म्हणजे युदक्षेत्री तपशीलवार पाहणी. ४) शत्रूची कमजोर ठिकाणे ५) प्रवेश आणि मारा करण्यास सोईची जागा, ६ ) त्याच्या मोर्चेबंदीच्या आणि बचावाच्या संभाव्य जागा ७ ) त्याला मिळू शकणारे आडोसे आणि आश्रयाच्या जागा ८ ) तशाच आपल्या सोईच्या जागा ९ ) आपल्याला पुढे चालू करून जाण्यास

सोईच्या वाटा आणि दिशा १० ) आपल्यास हरकत करू शकणारे अडथळे ११ ) आपला तोफखाना उत्तम प्रकारे मारगिरी करू शकेल अशा जागा १२ ) आपली फौज एकत्र होण्यास आडोशाची सोईस्कर ठिकाणे १३ ) दळण-वळणाचे शक्य मार्ग १४) बाजूंची अशीच परिस्थिती. १५ ) आपले मुख्य ठाणे ( Head quarters ) ठेवण्यास सोईस्कर ठिकाणे-- १६ ) आपल्या व शत्रूच्या हल्ल्यास आणि फेर हल्ल्यास सोईच्या जागा १७) आपल्यास शत्रूवर मारा करण्यास सोईच्या जागा १८ ) आपल्या पुढील आणि बाजूच्या, लगतच्या प्रदेशातील उंचवटे, नाले, नद्या यांची माहिती, नद्यात पाणी वाहात असेल तर त्याची खोली, आणि उताराच्या जागा इत्यादी शेकडो गोष्टी विषयी पहाणी शक्य तितकी **नजरेने**, आणि शक्य नसेल तेव्हा, दुसऱ्या साधनांनी करुन, सभोवतालच्या प्रदेशाचे आघाडी आणि युद्ध क्षेत्राचे तपशीलवार, स्पष्ट चित्र आपल्या मनात तयार करुन ठेवावे लागते. जेथे शक्य असेल तेथे, आपण कच्चे खर्डे नकाशे ( Sketches) काढले पाहिजेत व ही पाहणी शक्य तितकी सर्वांगीण केली पाहिजे. एकादी चूक सुद्धा अनपेक्षित दुष्परिणाम करु शकते व आपल्या योजना विस्कळीत व विफल करु शकते. म्हणून ( 'Time spent in Recconissance is never wasted') 'पहाणीत खर्च झालेला काळ कधीही व्यर्थ जात नाही.' हे सूत्र, प्रत्येक लहान मोठ्या सेना नायकाला लक्षात ठेवले पाहिजे. व आपली पाहाणी-निरीक्षण बारीक आणि तपशीलवार केले पाहिजे. याच्यावरच पुढील सर्व क्रिया आणि योजना आधारलेल्या असतात. म्हणून सर्व माहिती बिनचुक, विश्वसनीय **आणि ताजी** असली पाहिजे. व निरीक्षण काळजीपूर्वक आणि कसोशीने झाले पाहिजे. येथे स्थल सेनेच्या दृष्टी-कोनातून परिक्षण-निरीक्षण याचा विचार केला आहे. याच तत्वानुसार जलसेना आणि वायुसेनेच्या नायकांचे आणि सेनापतीचे कार्य होईल. कार्यक्षेत्र भिन्नत्वा-मुळे, तपशीलात अर्थातच फरक राहील. परंतु तिन्ही दलाकरता पद्धत आणि तत्वे तीच आहेत. प्रत्येक दलाला आपआपल्या कार्यक्षमतेनुसार प्रत्येक युद्धात प्रत्येक प्रसंगी आपआपले विशिष्ट निरीक्षण परीक्षण करावेच लागते.

यानंतरची पुढची क्रिया म्हणजे उद्दिष्टाला धरून सर्व (शत्रूच्या आणि आपल्या) बाबींचा आणि परिस्थितीचा साधक बाधक विचार. याला इंग्रजीत फौजी परिभाषेत Appreciation म्हणतात. याला मराठीत 'गुणदोष विवेचन' असे नाव देता येईल. ही मानसिक क्रिया तर्कशुद्ध आणि क्रमवार होण्यावर लढाईची योजना म्हणजे डावपेच आणि व्यूहरचना निर्दोष होणे अवलंबून आहे. ही विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची मुद्देसूद आणि सर्व स्पर्शी पद्धत असल्याकारणाने, शेवटी काढलेले निष्कर्ष, घेतलेले निर्णय, आणि केलेली योजना यशस्वी होण्याची अधिक शक्यता आहे. या पद्धतीने कोणत्याहि प्रश्नाचे काढलेले उत्तर, हे अंतिम शेवटचे एकमेव उत्तर असते; असा दावा

अथवा हमी कोणीही आणि केंव्हाही देऊ शकणार नाही. हे गणिताचे उत्तर नाही. दोन अधिक दोन मिळून कोठेहि केंव्हाही चारच होतात. कमी अधिक होऊ शकत नाहीत. परंतु कितीही खोल आणि सर्वांगीण बाजूंनी विचार करून काढलेले उत्तर, फक्त 'एक उत्तर' असेल ते फक्त 'एकच' उत्तर असणार नाही. (It will be an answer and will not be the answer) याचे कारण म्हणजे मनुष्याचे मन बुद्धी आणि विचार शक्ती म्हणजे यंत्र नव्हे. म्हणून प्रत्येकाचे कोणत्याही प्रश्नाचे एकच आणि तेच उत्तर निघेलच असे म्हणता येणार नाही. येथे हेही लक्षात ठेवले पाहिजे की हे गुणदोष विवेचन फक्त युद्ध प्रसंगीच करावयाचे नाही. ते अगदी रोजच्या सवयीच्या, साध्या, आणि क्षुलल्क प्रसंगीही करावे लागते; किंवा सवयीने अथवा अन्य काही कारणाने आपोआपच होते. युद्ध प्रसंगी पद्धतशीर रीतीने करावे लागते. याचे कारण, एक तर तो अतीशय महत्वाचा, जबाबदारीचा आणि गंभीर प्रसंग असतो. व्यवहारात निर्णय प्रमादाने तो घेणाऱ्याचे नुकसान होईल; यापेक्षा आणखी विशेष असे परिणाम होणार नाहीत. परंतु युद्ध हा जीवन मरणाचा प्रसंग असतो. तेथे चुकीच्या निर्णयाचे भयंकर असे परिणाम अतिशय विस्तृत परिघापर्यंत पोहोचतात. एकाद्या लढाईतली एकादी लहानशी चूक, त्या युद्धाच्या अपयशाला कारणीभूत होऊन, सबंध देशाला संकटात पाडू शकेल असे जरी आहे; तरी एकाद्या प्रसंगी सर्व नियम पद्धत आणि क्रम लाथाडून घेतलेला निर्णय यशस्वी होतो. परंतु हा प्रकार अपवाद असतो. आणि अपवाद जर अनेकदा झाले तर तो नियम 'नियम' राहू शकत नाही. चुकीचा, नियमाचा व पद्धतीचा विचार न करता मिळालेले यश, म्हणजे केवळ योगायोग किंवा अपघात असतो. अपघात वाईटच. परंतु अपघाताने एखादी चांगली गोष्टही घडून येते. नाही असे नाही.

**प्रसंगाचे गुणदोष परीक्षण** (Appreciation) करून निष्कर्ष काढून त्या प्रसंगाला योग्य आणि तर्कशुद्ध रितीने तोंड देण्यासाठी घ्यावयाच्या काळजीचे आणि जरूरीचे महत्व किती असते याचे विवेचन जितके करावे तितके थोडेच. हे परीक्षण बिनचुक, तर्कशुद्ध, सुसंगत, संयुक्तिक आणि सर्वस्पर्शी होण्यावर, त्या त्या प्रसंगाकरता तयार करावयाच्या योजनेचा निर्दोषपणा अवलंबून राहील; हे उघड आहे. म्हणून युद्ध शास्त्रात एक क्रमवार प्रश्नावली अथवा विचार करण्याची आवश्यकता असणाऱ्या निरनिराळ्या अंगांची एक साखळी, अथवा वाटल्यास त्यास सांगाडा म्हणावे तयार केलेला आहे. त्यातील क्रमानुसार विचार केल्यास, कोणतीही गोष्ट नजरेआड होण्याची अथवा एखादी बाजू दुर्लक्षित होण्याची शक्यता राहणार नाही. असा विचार क्रमवार करीत असतांना; सर्व प्रथम लक्षात घ्यावयाची बाब म्हणजे आपले 'उद्दिष्ट', काय आहे हे स्पष्ट व निश्चितपणे मनात पक्के ठसले पाहिजे. आपले उद्दिष्ट त्या त्या प्रसंगानुरूप असेल, व वेळोवेळी

बदलेल. तसेच अंतिम उद्दिष्ट आणि ते पूर्ण करण्याकरता साधनीभूत ठरणारे टप्पे आणि दुय्यम उद्देशही, प्रसंग आणि परिस्थितीनुसार बदलतील. यात गफलत होण्याचा संभव असतो.

१. उद्दिष्ट एका प्रसंगी एकच ठेवले गेले पाहिजे. असे प्रसंगही येतील किंवा एकापेक्षा अधिक उद्दिष्टे एकसमयावच्छेदेकरून एकाच वेळी साध्य करणे आवश्यक ठरेल. अर्थातच अशा प्रसंगी ती उद्दिष्टे साध्य करण्याकरता त्यांची विभागणी व साध्य करण्याची जबाबदारी व्यक्तीशः तितक्या व्यक्तींवर सोपविली जाईल व त्या त्या व्यक्तीच्या अधिपत्याखाली वेगळाल्या पथकांची नियुक्ती केली जाईल. म्हणजे त्या त्या व्यक्तींचे आणि पथकांचे वेगळे वेगळे, परंतु एका वेळीं एकच उद्दिष्ट कायम असेल. याचाच अर्थ एका वेळी एकच उद्दिष्ट कायम करणे व त्यावर सर्व विचार, शक्ती, आणि योजना एकत्रित करणे हा आहे. उद्दिष्ट स्पष्ट आणि असंदिग्ध असले पाहिजे. त्यात कोणताही 'पण' आणि 'परंतु' अथवा 'पर्याय' असता कामा नये. उद्दिष्टांची निश्चिती त्याच्या आनुषंगिक गोष्टींचा पूर्ण विचार करून केली पाहिजे. म्हणजे त्या बाबतीत कसल्या शंका कुशंका राहणार नाहीत.

२ उद्दिष्ट सुस्पष्ट निश्चित झाल्यावर ते साध्य करण्याचा विचार सुरु होतो. हा विचार करीत असतांना, तो सर्वांगीण असला पाहिजे. त्यातील एकही शक्य आणि संभाव्य, तशीच योजनेवर परिणाम करु शकणारी बाब वगळली जाता कामा नये. याला इंग्रजीत consideration of the 'factors' affecting attainment of the object असे म्हणतात. हे फॅक्टर्स अनेक असू शकतात. वर वर त्यांचा संबंध समजू शकला नाही, तरी ते उद्दिष्टांच्या सिद्धीवर, परोक्ष वा अपरोक्ष रीतीने, परिणाम करु शकतात. म्हणून त्यांचा वेगवेगळा, तसाच परस्परांच्या संबंधात पूर्ण विचार करून, प्रत्येकाचा वेगळा वेगळा निष्कर्ष काढला गेला पाहिजे. याला इंग्रजीत Deductions असे म्हणतात. या factors म्हणजे परिणामकारी बाबी, प्रसंगा प्रमाणे भिन्न भिन्न असतात; म्हणून त्या त्या परिस्थितीला धरून आणि मुख्यतः उद्दिष्ट सिद्धीच्या संदर्भात त्यांचा साधक बाधक विचार करून शक्य ते आणि संभाव्य ते निष्कर्ष, काढावे लागतात. मुख्यः ( factors ) बाबी या व अशा असतात. अ. **शत्रूची व आपली शक्ती** यांची तुलना व मुल्य-मापन. यांत शत्रूची संख्या, त्यातील निरनिराळ्या शास्त्रास्त्रधारी व प्रकारच्या तुकड्या व त्यांची कार्यक्षमता व त्यांच्या तुलनेत आपल्या त्याच बाबतीत आणि त्याच प्रकाराने तुलना व या तुलनेचा निकर्ष. उदाहरणार्थ शत्रूची संख्या आपल्यापेक्षा कमी असेल. परंतु त्याला वायुसेनेची मदत आणि सहकार्य मिळणे संभवनीय असेल, व आपल्याला तसे साह्य उपलब्ध होणार नसेल, तर स्वाभाविक निष्कर्ष

( Deduction ) हा निघेल, कि शत्रू मारगिरीच्या आणि मदतीच्या शक्यतेमुळे आपल्यापेक्षा सामर्थ्यवान् आहे. आपल्या जवळ रणगाडे असून विमान विध्वंसक तोफखाना असेल तर आपली शक्ती शत्रूपेक्षा अधीक आहे; हा निष्कर्ष निघेल.

**आ. शत्रूची सध्याची व्यूहरचना.** ( Dispositions ) म्हणजे युद्ध क्षेत्रावरील जमीनीवरची मांडणी व रचना, आणि आपली मांडणी यांची तुलना. उदाहरणार्थ शत्रूची फौज दूरदूर अंतरावर विभागून पसरून ठेवली गेली काय ? त्याची ही रचना 'हमल्याच्या' हेतूने केली गेली आहे; अथवा बचावाचे युद्ध करण्याची ती व्यूह रचना आहे ? त्याच्या रचनेवरुन त्याच्या हेतूचा अंदाज, आपल्याही सेनेची सध्याची मांडणी व रचना, या दोहीची तुलना आणि निष्कर्ष; तो म्हणजे शत्रूवर हल्ला करणे; अथवा तात्पुरते बचावाचे धोरण ठरवून शत्रूचा हेतू, आणखी उघड झाल्यावर आपली प्रति-योजना करण्यासाठी, आपली व्यूहरचना त्याला अनुरुप करणे. (इ) **आपली व शत्रूची गतिमानता.** म्हणजे शत्रू किती वेगाच्या हालचाली करू शकेल व आपणही आपल्या हालचाली किती वेगाने करू शकू? याचा विचार करीत असताना शत्रूची व आपली परिवहन साधने, शत्रूच्या निकटच्या व पिछाडीच्या दळणवळणाची साधने, जसे सडका लोह-मार्ग इत्यादी. त्या आपल्यास किती व कशा उपलब्ध आहेत, समुद्र किनारा युद्ध क्षेत्रानजीक असल्यास नाविक साधने, इत्यादींचा सूक्ष्म व सर्वस्पर्शी विचार व तुलना करुन काढलेला निष्कर्ष ( ई ) **युद्ध क्षेत्राची प्राकृतिक परिस्थिती**, म्हणजे युद्ध क्षेत्र मोकळे मैदान, तुरळक जंगल, घनदाट अरण्य, डोंगरी विभाग, दलदल, मरुभूमी, उंच सखल कसे आहे ? त्यात आपल्याला व शत्रूला उपयोगी, तशाच अडचणीच्या कोणत्या व किती जागा आहेत, त्यांचा उपयोग आणि/किंवा अडथळा, कोणाला किती प्रकारचा आणि कसा होईल ? त्या भागात असणाऱ्या कोरड्या किंवा वाहत्या नद्या, पाणी वाहण्याची दिशा, पक्के आणि कच्चे मार्ग, इत्यादींची छाननी करून कोणत्या प्रकारची युद्ध पद्धती उभय पक्षांना अनुसरावी लागेल याचा निष्कर्ष (ड) **वेळ म्हणणे उद्दिष्ट निश्चिती पासून** किंवा आदेश मिळाल्या पासून) ते उद्दिष्ट साध्य करण्यास किती वेळ दिला गेला आहे; आणि किती वेळ लागेल, याचा अंदाज. दुय्यम सेनापतीला आणि असेच खाली खाली जात जात शेवटल्या लहानात लहान तुकडीला आपआपले वेगळे वेगळे उद्दिष्ट साध्य करण्यास लागणाऱ्या वेळेचे अंदाज बांधल्यावर, एकंदर मोहीमेचे वेळापत्रक तयार करावयाचे असते. एकादेवेळी एखाद्या पथकाला, एखादे उद्दिष्ट अमुक वेळेच्या आत साध्य करण्याचा आदेश दिला जातो; किंवा एकापेक्षा अधीक उद्दिष्टे एकसमयावच्छेदेकरून एकाच वेळीं हस्तगत करावयाची असतात. व त्यात यश मिळण्यावर दुसऱ्या एकाद्या उच्च उद्दिष्टाची पूर्ती अवलंबून असते, म्हणून वेळेला फार महत्व असते. असे हे 'काळ काम आणि वेगाचे,' गणीत, काळजी पूर्वक सोडवून

निष्कर्ष काढावा लागतो. ( ऊ ) अंतर. आपल्यात व शत्रूत अंतर किती आहे म्हणजे किती अंतरावरून आपल्याला शत्रूवर मारा करता येईल, आपल्या हत्यारांचा पल्ला किती आहे ? शत्रूच्या शक्य तितके किती जवळ जाता येईल ? व शत्रूलाही हे करण्यास किती अंतर तोडावे लागेल ? यांचा विचार व निष्कर्ष. उभय पक्ष एकमेकाकडे चालून जातील किंवा सोईस्कर जागा पाहून तात्पुरत्या बचावाचा पवित्रा घेतील यापैकी, युद्धक्षेत्राच्या परिस्थितीवरून व दुसऱ्या गोष्टीवरून अंदाज बांधून, निष्कर्ष काढावा लागेल. चाल करून पुढे जात असतांना, अनपेक्षित घटनामुळे किंवा अनपेक्षित प्रादेशिक परिस्थितीमुळे चालून जाण्याची 'गती' मंदावू शकेल, किंवा मुद्दाम मंद करावी लागेल. म्हणून वरील 'काळ काम आणि वेगाच्या गणितात' अंतराला महत्त्वाचे स्थान असते. ( ए ) **मोसम आणि हवामान** यांचा विचार, काळकामाचे उदाहरण सोडविताना अतीशय महत्वाचा असतो. कारण त्यावर उभयतांची गती आणि वेग अवलंबून असतो आणि त्याचा युद्ध क्षेत्राच्या प्राकृतिक परिस्थितिशी घनिष्ट संबंध असतो. पावसाळ्यांत, कोरड्या हवेपेक्षा वेग कमी राहील. व युद्धक्षेत्रात चिखल, दलदल इत्यादी झाल्यामुळे, रणगाडे किंवा तोफखाना यांच्या संचाराला अडथळे येतील. हवामान अनिश्चित असल्यास योजलेला कार्यक्रम वेळा-पत्रकानुसार होऊ शकणार नाही. आणि अशा कोणत्याही हवामानाचे सैनिकांच्या शरीरस्वास्थावर निरनिराळे परिणाम होऊ शकतील. म्हणून या सर्व गोष्टींचा सांगोपांग व खोल विचार करून निष्कर्ष काढावा लागेल ( ऐ ) **उभय पक्षांचे मनोधैर्य** ( Morale ) मनुष्याचे मनोधैर्य सदा सर्वकाळ एकसारखे कधी राहू शकत नाहीं. हा दैनंदिन आणि सार्वजनिक अनुभव आहे. शरीर जर्जर झालेले असले, तरी कित्येक वेळी मनोधैर्य उच्च पातळीवर असते. कित्येक महाबली वीर, दुर्मुखलेले दिसतात व त्यांची शारिरीक शक्ती क्षिण झाल्यासारखी दिसते. शरिराची शक्ती आणि मनाचा जोम नेहमी समतोल प्रमाणात राहू शकत नाही. इतकेच नव्हे, तर ही परस्परावर विपरीत परिणाम करतात. उद्दिष्ट नवे कोरे असेल, सैनिक प्रथमच रणांगणावर उतरला असेल, तर त्याचे मनोधैर्य. उच्च असले, तरी ते अनुभवाने तसे झालेले नसते. युद्ध बराच काळ चालू असेल, आणि एखाद्या प्रसंगी यश मिळाले असेल, अथवा अपयश मिळाले असेल, रसद पुरवठा आणि शस्त्रसज्जा योग्य आणि निर्दोष असेल, किंवा त्रुटीत वा खंडित असेल, तर त्यांचा मनोधैर्यावर परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. म्हणून या बाबतीतले निष्कर्ष फार काळजीपूर्वक विचार करून काढले गेले पाहिजेत.

वर वर्णन केलेल्या या बाबी येथेच संपत नाहीत. हे नुसते ढोबळ आणि त्रोटक असे दिग्दर्शक आहे. अनेक बाबी आहेत. त्यांची सर्व संग्राहक जंत्री

देता येणार नाही. प्रत्येक प्रसंग आणि प्रत्येक परिस्थिती वेगवेगळी असते. एक प्रसंग दुसऱ्या प्रसंगासारखा तंतोतंत केंव्हाही असत नाही, आणि युद्धात तर नाहीच नाही. आणि येथेच सेनानायकाच्या स्थिर, कुशाग्र बुद्धीची, तसेच 'स्थितप्रज्ञतेची' परीक्षा असते. अशा सर्व निष्कर्षांचे रसायन सेनानायकाला सिद्ध करावयाचे असते. असे सर्व निष्कर्ष तोलून जोखून, कार्याची दिशा आणि उद्दिष्ट साध्य करण्याचा मार्ग, त्याला ठरवावयाचा असतो. परंतु आपली अखेरची योजना पक्की करण्यापूर्वी, त्याला आणिक एका फार महत्वाच्या बाबीचा विचार करावा लागतो. आणि तो म्हणजे शत्रूची योजना काय असू शकेल ? त्याचे उद्दिष्ट कोणते असेल आणि ते सिद्धीस नेण्यास त्याला किती पर्यायी मार्ग उपलब्ध होऊ शकतील ? व त्यांना अनुलक्षून आपल्या उद्दिष्टपूर्ती साठी किती पर्यायी मार्ग काढता येतील याचा शांतपणे केलेला विचार.

**३ मार्ग** Courses : मार्गाविषयी विचार करतांना, प्रथम शत्रूला किती पर्यायी मार्ग त्याचे उद्दिष्ट (जे आपल्या नेमके विरुध्दच असणार) साध्य करण्याकरिता काढता किंवा योजता येईल; याचा प्रथम विचार करणे श्रेयस्कर असते. व्यवहारातसुद्धा 'दुसऱ्याच्या डोळ्यांनी' आपल्याकडे पाहणे योग्य आणि हिताचे असते. आपण आपल्या मते उत्तम वेषभूषा केली, तरी आपले सर्व लक्ष ती दुसऱ्यांना कशी दिसेल? ह्याकडे असते. आपण जेंव्हा आरशात पाहतो तेंव्हा आपण दुसऱ्याच्या डोळ्यांनी आपल्याकडे पाहण्याचा प्रयत्न करतो. आपण दुसऱ्याला कसे दिसू याचा आरशात पाहणे हा आपला पहिला प्रयोग असतो. आरशात पाहून, त्या दुसऱ्या 'मी'ला जे नीट दिसणार नाही, मग ती कपड्याची एखादी सुरुकुती असो ! किंवा डोक्यावरचा एखाद्या केस असो ! तो ठाकठीक करण्याचा आपण प्रयत्न करतो, आणि मग एकांताच्या बाहेर पडून इतरांच्या प्रतिक्रियेविषयी उत्सुक होतो. ती अनुकूल झाली, तर आनंदित होतो. एखादी स्त्री साक्षात् हिडिंबा असली, तरी तिला चुकून का होईना ? किंवा छद्मीपणाने का असेना ! सुंदर म्हटले, 'बरे' दिसणाऱ्या तिच्यावर (वृथारोप) केला; तर तिच्या अंगावर मूठभर मास चढते. परंतु युध्दात प्रतिपक्षाच्या योजनेच्या पर्यायी मार्गांचा जो विचार करावयाचा असतो, तो त्याच्या तोडीस तोड आणि त्यावर मात करणारी आपली योजना असावी, म्हणून करावयाचा असतो. हे शांतपणे आणि गंभीरपणे केले पाहिजे.

प्रत्येक प्रश्नाला नेहमी एकच उत्तर असेल असे नाही. फक्त गणितात ते असते. म्हणून ह्या ठिकाणी त्यातले शक्य तितके बरोबर उत्तर, आणि तेही प्रतिपक्षाने काढलेल्या उत्तराच्या संदर्भात, तुलनात्मक दृष्टीने जितके जे बरोबर असेल तितके ते घेतले पाहिजे. या विषयी एका फार व्यवहारी आणि कुशल सेनापतीने

म्हटले आहे. "माझा असा अनुभव आहे की सर्व साधक बाधक विचार करून मी निष्कर्ष काढले, की शत्रूला फक्त तीन मार्ग मोकळे आहेत. म्हणून त्या तीन मार्गांचा विचार करून मी आपली योजना करतो. मला उपलब्ध असलेला, शक्य तितका निर्दोष मार्ग मी ठरवतो. परंतु माझा असा अनुभव आहे की शत्रू चौथाच मार्ग काढतो आणि त्याला तोंड देणे मला फार कठीण होऊन बसते."

**४ पक्की योजना** Plan of Action : उद्दिष्ट सिध्दीची पक्की योजना करणे, ही या विचार मंथनाची शेवटची मजल आहे. (१) योजना शक्य तितकी साधी असली पाहिजे. ती सर्वांस नीटपणे समजू शकली पाहिजे. ती गुंतागुंतीची आणि क्लिष्ट असल्यास, सर्वांची बुद्धीमत्ता एकच दर्जाची नसल्यामुळे सर्वांस सारखीच समजू शकणार नाही आणि ती योजना कार्यान्वित असताना कोठे बिघाड झाला, अडचण आली तर, गुंतागुंत सोडवणे कठीण जाईल (२) योजना **समतोल** असली पाहिजे म्हणजे ती पार पाडण्याची कामगिरी व व जबाबरी सम प्रमाणात विभागली गेली पाहिजे. म्हणजे सर्वांस आपआपल्या शक्तीप्रमाणे आणि शस्त्रादिकांच्या कार्यक्षमतेप्रमाणे परस्पर पूरक आणि साहाय्यक कार्य करता येईल. 'समतोल' म्हणजे **समतोल जबाबदारीची**. (३) योजनेतील त्या त्या विभागाला आणि त्याच्या नायकाला कृतीस्वातंत्र्य आणि प्रथमोपक्रमाला (initiative) वाव असला पाहिजे. (५) आणि योजना लवचिक असली पाहिजे. म्हणजे अनपेक्षित प्रसंगी, तिच्यात जरूर ती मुरड घालून तिच्या कार्यक्षमतेवर आणि सिध्दीस जाण्याच्या शक्यतेवर अनिष्ट परिणाम होणार नाहीत. याच्या पुढचा टप्पा ही योजना कार्यान्वित करण्याचे हुकुम हा आहे.

---

# युध्दाचे आदेश

प्रत्येक दर्जाच्या सेनानायकाला आपआपल्या उद्दिष्टांच्या सिद्धी करता विचार पूर्वक तयार केलेली योजना ( Plan of Action ) कार्यान्वित करण्याकरता, म्हणजे अमलात आणण्याकरता आपआपल्या सेना विभाग, पथके, आणि तुकड्या यांच्या नायकाला त्या विषयी आदेश द्यावे लागतात. हे आदेशही फार विचार पूर्वक तयार करावे लागतात. येथे स्थलसेने करता दिल्या जाणाऱ्या आदेशांचा विचार नमुन्या दाखल केलेला आहे. व त्यांचा तपशील व क्रम सांगितला आहे. जलसेना आणि वायूसेना यांनाहि त्यांचे त्यांचे सेनापती आप-आपल्या उद्दिष्टांच्या सिद्धीसाठी तयार केलेल्या योजनांनुसार आपआपल्या विभाग उपविभागांच्या नायकांना आदेश देत असतात. त्या दोन सेनांची युद्ध क्षेत्रे भिन्न भिन्न असल्यामुळे युद्ध पद्धती व कार्य क्षमता भिन्न भिन्न असते. व उद्दिष्टांचे स्वरूप ही भिन्न भिन्न असते. आणि म्हणून अर्थातच आदेशांचा तपशील व क्रम वेगवेगळा असणे अपरिहार्य असते. येथे तिन्ही सेना प्रकारांच्या युद्धाचा विचार आणि विवेचन केलेले नाही. त्या करता प्रत्येकी एक एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. येथे इतकेच लक्षात ठेवले पाहिजे की, तपशील आणि क्रम भिन्न भिन्न असला तरी मुलभूत तत्वे अंतर्यामी तिन्हां सेनाकरता तीच असतात. युद्धाच्या आदेशांना इंग्रजीत Operation order म्हणतात. ऑपरेशन हा शब्द मराठीतल्या 'मोहीम' या अर्थाने वापरला जातो. मोहिमांना सांकेतिक नावे दिलेली असतात. व जे जे आदेश दिले जातात त्यांना या मोहीमेचे आदेश असे म्हटले जाते. उदाहरणार्थ, गेल्या महायुद्धात हिंदुस्थानवर स्वारी करण्याची जी मोहीम जपानने आखली होती त्या मोहिमेला operation sea 'मोहीम सी' हे नाव दिले होते. अर्थातच त्या मोहिमेच्या आदेशांना orders for operation sea' असे नाव जपानी सेनापतीने दिले होते. गुप्तता राखण्याच्या दृष्टीने अशी सांकेतिक नावे दिली जात असतात. हे आदेश लेखी असतात; तसेच ते तोंडीहि दिले जातात. सर्वात खालच्या सेक्शन या लहान तुकडी पासून बटालियन व तत्सम रेजिमेंट यांना दिलेले आदेश बहुतकरून लेखी नसतात. दुय्यम व संबंधित खालच्या अधिकाऱ्यांना हे आदेश तोंडी दिले जातात. कारण तितका वेळ नसतो व त्याच्या जवळ तशी लेखी आदेश व त्यांच्या प्रती देण्याची सामग्री नसते. साधारणपणे ब्रिगेडपासून वरचे आदेश लेखी असतात व त्यांच्या प्रति संबंधित दुय्यम नायकांना दिल्या जातात. आणि त्यांना एकत्रित करणे शक्य असल्यास एकत्रित करून समजाऊन दिले जातात. परंतु हे तोंडी आदेश शक्य तितके लवकर व बिनचुक असे लिहून काढावे लागतात. त्यांची नोंद पुढे उपयोगी

ठरते. आदेश तयार करण्याची काही तत्वे आहेत. त्या प्रमाणे आदेश काढले गेले पाहिजेत. १ आदेशांची रचना व पध्दती आत्मविश्वास उत्पन्न करु शकणारी असली पाहिजे. २ आदेश स्पष्ट आणि पुढे कोणत्याहि शंका उत्पन्न होणार नाहीत असे असले पाहिजेत. कारण शंकाचे निरसन करण्यास अथवा करुन घेण्यास वेळ नसतो. ३ आदेश देणाऱ्याने ज्यांना ते दिले असतील त्यांना ते समजले; असे गृहित धरून चालावे लागेल. म्हणून याबद्दल खात्री करुन घेतली पाहिजे. ते अस्पष्ट आणि दुसरा कोणताही अर्थ त्यातून निघू शकेल असे संदिग्ध असता कामा नयेत. कारण युध्दाच्या धुमश्चक्रीत संशय निरसन आणि शंका समाधान अशक्य असते. ज्यांना आदेश पोहचले असतील व ज्यांना ते मिळावयास हवे होते त्यांच्या कडून ते आदेश पोहचल्याची पावती मिळविली पाहिजे. तोंडी आदेश एखाद्या युध्द क्षेत्रावरील सोईच्या आडोशाच्या आणि जेथून प्रत्यक्ष युध्द क्षेत्र जितके जास्त दिसू शकेल तितक्या जवळच्या जागी सर्व संबंधितांना एकत्रित करुन तोंडी दिले जातात. सर्व आदेश संपले म्हणजे आदेश देणारा सेना नायक प्रश्न विचारुन आदेश समजल्याची खात्री करुन घेऊ शकतो.

आदेश देण्याचा एक सुत्रबद्ध क्रम असतो. त्याच एका क्रमवार पद्धतीने आदेश देण्याने कोणतीही गोष्ट नजरेआड होऊ शकत नाही; आणि गैर समजाला, अथवा शंकेला जागा राहात नाही. व निःसंधिग्धता प्राप्त होते. तो क्रम असा——

**१ खबर-अथवा माहिती** प्रथम शत्रू विषयी सर्व माहिती द्यावयाची असते. त्यात त्याची शक्ती-म्हणजे संख्या, शस्त्र प्रकार-जसे पायदळ, तोफखाना इत्यादी, त्याचे निरनिराळे पोट विभाग असण्याच्या जागा, या जागा प्रत्यक्ष हाताने दाखविता येत नसतात. त्या नकाशावरच दाखविता येतात. म्हणून प्रत्येक अधिकाऱ्याजवळ संबंधित विभागाचे नकाशे असलेच पाहिजेत. आणि असे नकाशे अधिकाऱ्यांनी आपल्या जवळ सतत बाळगले पाहिजेत. सेनेतले सर्व नकाशे एकाच 'प्रमाणाचे' असले पाहिजेत. तसे नसेल तर, घोटाळा आणि गैरसमज उत्पन्न होतील. साधारणपणे सैन्यातील नकाशे एक इंच = एक मैल या प्रमाणातले असतात-प्रत्येक नकाशावर, त्या त्या नकाशाचा अनुक्रमांक (Sheet Num -ber) प्रदेशाचे नाव आणि प्रमाण दिलेले असते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे सैन्यात नकाशाचे महत्व फार असल्याने, आणि त्यांच्याच आधारावर मोहिमेची योजना केली गेली असल्याकारणाने, अगदीं सर्वात खालच्या, आणि सर्वात लहान तुकडीच्या अधिकाऱ्यापर्यंत प्रत्येकाला 'नकाशा वाचण्याचे' (Map Reading) आणि आता 'हवाई छाया चित्र' वाचण्याचे (Air Photo Reading) शिक्षण दिलेले असते. म्हणून जरूर त्या नकाशातील सर्व मुख्य जागा ज्यांचा आपल्या आदेशात नामनिर्देश केला गेला असेल, त्यांची ओळख आणि संदर्भ

# युध्दाचे आदेश

प्रत्येक दर्जाच्या सेनानायकाला आपआपल्या उद्दिष्टांच्या सिद्धी करता विचार पूर्वक तयार केलेली योजना ( Plan of Action ) कार्यान्वित करण्याकरता, म्हणजे अमलात आणण्याकरता आपआपल्या सेना विभाग, पथके, आणि तुकड्या यांच्या नायकाला त्या विषयी आदेश द्यावे लागतात. हे आदेशही फार विचार पूर्वक तयार करावे लागतात. येथे स्थलसेने करता दिल्या जाणाऱ्या आदेशांचा विचार नमुन्या दाखल केलेला आहे. व त्यांचा तपशील व क्रम सांगितला आहे. जलसेना आणि वायूसेना यांनाहि त्यांचे त्यांचे सेनापती आपआपल्या उद्दिष्टांच्या सिद्धीसाठी तयार केलेल्या योजनांनुसार आपआपल्या विभाग उपविभागांच्या नायकांना आदेश देत असतात. त्या दोन सेनांची युद्ध क्षेत्रे भिन्न भिन्न असल्यांमुळे युद्ध पद्धती व कार्य क्षमता भिन्न भिन्न असते. व उद्दिष्टांचे स्वरूप ही भिन्न भिन्न असते. आणि म्हणून अर्थातच आदेशांचा तपशील व क्रम वेगवेगळा असणे अपरिहार्य असते. येथे तिन्ही सेना प्रकारांच्या युद्धाचा विचार आणि विवेचन केलेले नाही. त्या करता प्रत्येकी एक एक स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. येथे इतकेच लक्षात ठेवले पाहिजे की, तपशील आणि क्रम भिन्न भिन्न असला तरी मुलभूत तत्वे अंतर्यामी तिन्हीं सेनाकरता तीच असतात. युद्धाच्या आदेशांना इंग्रजीत Operation order म्हणतात. ऑपरेशन हा शब्द मराठीतल्या 'मोहीम' या अर्थाने वापरला जातो. मोहिमांना सांकेतिक नावे दिलेली असतात. व जे जे आदेश दिले जातात त्यांना या मोहीमेचे आदेश असे म्हटले जाते. उदाहरणार्थ, गेल्या महायुद्धात हिंदुस्थानवर स्वारी करण्याची जी मोहीम जपानने आखली होती त्या मोहिमेला operation sea 'मोहीम सी' हे नाव दिले होते. अर्थातच त्या मोहिमेच्या आदेशांना orders for operation sea' असे नाव जपानी सेनापतीने दिले होते. गुप्तता राखण्याच्या दृष्टीने अशी सांकेतिक नावे दिली जात असतात. हे आदेश लेखी असतात; तसेच ते तोंडीहि दिले जातात. सर्वात खालच्या सेक्शन या लहान तुकडी पासून बटालियन व तत्सम रेजिमेंट यांना दिलेले आदेश बहुतकरून लेखी नसतात. दुय्यम व संबंधित खालच्या अधिकाऱ्यांना हे आदेश तोंडी दिले जातात. कारण तितका वेळ नसतो व त्याच्या जवळ तशी लेखी आदेश व त्यांच्या प्रती देण्याची सामग्री नसते. साधारणपणे ब्रिगेडपासून वरचे आदेश लेखी असतात व त्यांच्या प्रति संबंधित दुय्यम नायकांना दिल्या जातात. आणि त्यांना एकत्रित करणे शक्य असल्यास एकत्रित करून समजाऊन दिले जातात. परंतु हे तोंडी आदेश शक्य तितके लवकर व बिनचुक असे लिहून काढावे लागतात. त्यांची नोंद पुढे उपयोगी

ठरते. आदेश तयार करण्याची काही तत्वे आहेत. त्या प्रमाणे आदेश काढले गेले पाहिजेत. १ आदेशांची रचना व पध्दती आत्मविश्वास उत्पन्न करु शकणारी असली पाहिजे. २ आदेश स्पष्ट आणि पुढे कोणत्याहि शंका उत्पन्न होणार नाहीत असे असले पाहिजेत. कारण शंकाचे निरसन करण्यास अथवा करुन घेण्यास वेळ नसतो. ३ आदेश देणाऱ्याने ज्यांना ते दिले असतील त्यांना ते समजले; असे गृहित धरून चालावे लागेल. म्हणून याबद्दल खात्री करुन घेतली पाहिजे. ते अस्पष्ट आणि दुसरा कोणताही अर्थ त्यातून निघू शकेल असे संदिग्ध असता कामा नयेत. कारण युध्दाच्या धुमश्चक्रीत संशय निरसन आणि शंका समाधान अशक्य असते. ज्यांना आदेश पोहचले असतील व ज्यांना ते मिळावयास हवे होते त्यांच्या कडून ते आदेश पोहचल्याची पावती मिळविली पाहिजे. तोंडी आदेश एखाद्या युध्द क्षेत्रावरील सोईच्या आडोशाच्या आणि जेथून प्रत्यक्ष युध्द क्षेत्र जितके जास्त दिसू शकेल तितक्या जवळच्या जागी सर्व संबंधितांना एकत्रित करुन तोंडी दिले जातात. सर्व आदेश संपले म्हणजे आदेश देणारा सेना नायक प्रश्न विचारुन आदेश समजल्याची खात्री करुन घेऊ शकतो.

आदेश देण्याचा एक सुत्रबद्ध क्रम असतो. त्याच एका क्रमवार पद्धतीने आदेश देण्याने कोणतीही गोष्ट नजरेआड होऊ शकत नाही; आणि गैर समजाला, अथवा शंकेला जागा राहात नाही. व निःसंधिग्धता प्राप्त होते. तो क्रम असा—

**१ खबर-अथवा माहिती** प्रथम शत्रू विषयी सर्व माहिती द्यावयाची असते. त्यात त्याची शक्ती-म्हणजे संख्या, शस्त्र प्रकार-जसे पायदळ, तोफखाना इत्यादी, त्याचे निरनिराळे पोट विभाग असण्याच्या जागा, या जागा प्रत्यक्ष हाताने दाखविता येत नसतात. त्या नकाशावरच दाखविता येतात. म्हणून प्रत्येक अधिकाऱ्याजवळ संबंधित विभागाचे नकाशे असलेच पाहिजेत. आणि असे नकाशे अधिकाऱ्यांनी आपल्या जवळ सतत बाळगले पाहिजेत. सेनेतले सर्व नकाशे एकाच 'प्रमाणाचे' असले पाहिजेत. तसे नसेल तर, घोटाळा आणि गैरसमज उत्पन्न होतील. साधारणपणे सैन्यातील नकाशे एक इंच = एक मैल या प्रमाणातले असतात–प्रत्येक नकाशावर, त्या त्या नकाशाचा अनुक्रमांक (Sheet Num -ber) प्रदेशाचे नाव आणि प्रमाण दिलेले असते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे सैन्यात नकाशाचे महत्व फार असल्याने, आणि त्यांच्याच आधारावर मोहिमेची योजना केली गेली असल्याकारणाने, अगदीं सर्वात खालच्या, आणि सर्वात लहान तुकडीच्या अधिकाऱ्यापर्यंत प्रत्येकाला 'नकाशा वाचण्याचे' (Map Reading) आणि आता 'हवाई छाया चित्र' वाचण्याचे (Air Photo Reading) शिक्षण दिलेले असते. म्हणून जरूर त्या नकाशातील सर्व मुख्य जागा ज्यांचा आपल्या आदेशात नामनिर्देश केला गेला असेल, त्यांची ओळख आणि संदर्भ

आदेशाच्या प्रारंभीच सांगितला गेला पाहिजे. याला नकाशातले संदर्भ (Map Reference) म्हणतात. तोंडी आदेशात त्यानां संदर्भ बिंदू (फौजी हिंदीत 'महशूर निशान') म्हणतात व ते बिंदु समोरील क्षेत्रात बोटाने नकाशाच्या मदतीने दाखविले जातात. हे संदर्भ निवडतांनाहि अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. त्या सर्व येथे सांगता येणार नाहीत व तशी आवश्यकता विषय समजण्याकरता नाही. म्हणून अधीक तपशीलात शिरत नाही. हे संदर्भ सांगण्याचे काम सर्वप्रथम झाले पाहिजे; म्हणजे त्यावरून शत्रूची ठिकाणे तशीच आपलीहि सेना असलेली ठिकाणे समजू शकतील. शत्रूची शक्य तितकी **माहिती** दिल्यानंतर, आपल्या सेनेची **माहिती** दिली पाहिजे. या माहितीत आपल्या सेनेला, दुसऱ्या कोणत्या आणि कशा सेना–विभागाचे सहकार्य मिळत आहे, याचीही स्पष्ट परिस्थिती सांगितली गेली पाहिजे. Order of Battle मधे, प्रत्येक सेना विभागाची नोंद असतेच. परंतु त्याची प्रत नेहमीच प्रत्येक अधिकाऱ्याला दिली जात नसते. येवढ्या करता आपल्या विभागाला कोणाची मदत मिळणार आहे, ते आदेशात सांगावे लागते. ही मदत किंवा सहकार्य दोन प्रकारचे असते. एकात मदत देणारा विभाग, 'आधिपत्याखाली' (under command) असतो, व दुसऱ्यात तो फक्त 'संलग्न' (Attached) असतो. आधिपत्य याचा अर्थ उघड आहे. यात दुसऱ्या सहकारी विभागाला, कार्यस्वातंत्र्य नसते. त्याने काय काम करावयाचे, कसे करायचे, वगैरे सर्व तपशील त्याला मिळालेल्या आदेशाप्रमाणेच पार पाडला पाहिजे. दुसऱ्या प्रकारात 'काय करावयाचे आहे' म्हणजे सहकार्य कसे हवे ? येवढेच सांगितले जाते. यात त्या मदतगार विभागाच्या नायकाला 'कृति–स्वातंत्र्य' असते. ही सर्व खबर विश्वसनीय, आणि शक्य तितकी ताजी असली पाहिजे. त्यानंतरचा सर्वात महत्वाचा आणि सर्व आदेशाचा गाभा असलेला भाग म्हणजे आपला **इरादा** (Intention) हा होय.

२ **इरादा** (Intention) स्पष्ट शब्दात सांगितला पाहिजे. पाल्हाळाने न सांगता, मोजक्या, अर्थपूर्ण शब्दात सांगितला पाहिजे. '**इरादा**' नीटपणे समजण्यावरच सर्व कार्यवाही अवलंबून असते. प्रत्येक दुय्यम सेनापतीने आपल्या सेनेचा '**इराद**' सांगताना, आपल्यापेक्षा एक पायरी वर असलेल्या सेनापतीचा **इरादाहि** थोडक्यात सांगितला पाहिजे. असे केल्याने एकंदर मोठी योजना काय आहे. याची कल्पना येते व ती मोठी योजना काय आहे याची कल्पना येते व ती मोठी योजना यशस्वी होण्याकरता, आपल्याला काय वाटा उचलावयाचा आहे, हे समजते. व आपली जबाबदारी पार पाडण्याला फार मदत होते. म्हणून आपला **इरादा** सांगताना 'एक पायरी वरचा **इरादाहि**' सांगणे हितावह असते.

प्रत्येक कार्य एका दमात नेहेमीच पार पाडता येत नाही. म्हणून त्याच्यात मजला, टप्पे, मोजावे लागतात. याचा अर्थ हा, कि जेव्हा टप्या–टप्याने अखेरचा

इरादा आणि उद्दिष्ट पार पाडावयाचे असते, तेव्हा मधली दुय्यम उद्दिष्टे हस्तगत करावी लागतात, व अशा वेळी त्या त्या मधल्या टप्प्यांना विशेष महत्व प्राप्त होऊन, सर्व चित्त त्यावर एकाग्र करावे लागते. कित्येकदा असाहि प्रसंग येतो, कि मधल्या टप्यात विघ्न आले किंवा अपेक्षा, सिद्धीस जाव्या तशा गेल्या नाहीत, तर आदेशात बदलही करावा लागेल. ही संभाव्यता लक्षात बाळगून, आदेश दिले गेले पाहिजेत. म्हणून जसजसे मधले टप्पे पार पडत जातील तसतसे आदेश दिले जातील, अशीही सूचना सर्वास असणे योग्य होईल.

३ **तरीका** (Method) : उद्दिष्टसिद्धि कोणत्या पद्धतीने करावयाची आहे, हे या सदरात येते. यात 'उद्दिष्ट सिद्धी' करता हल्ला करावयाची योजना आहे काय अथवा बचावाचा पवित्रा घेण्याचे ठरविले गेले असून संधीची वाट पहावयाची आहे काय ? इत्यादी बाबतीत उद्दिष्टांची उकल व फोड करावयाची असते, व त्या त्या योजनेकरता व कार्याकरता, सेनेच्या कोणत्या, आणि किती विभागांची नियुक्ती करावयाची आहे, हे (Order of Battle) उपलब्ध व हाताशी असलेल्या सेनेवरून ठरविलेले असून, तसे तसे त्या विभागाला, या सदरात आदेश दिलेले असतात.उदाहरणार्थं जर शत्रूवर चाल करुन जाऊन हल्ला करावयाचा असेल तर पुढे चालून जाणाऱ्या पायदळाला, तोफखान्याने कशी मदत करावयाची आहे; तोफांचा मारा कुठे कुठे, कोणकोणत्या लक्ष्यावर करावयाचा आहे; त्याची सुरुवात केंव्हा करावयाची, व आपले पायदळ कोठपर्यंत पोहोचल्यावर, किंवा किती वेळाने बंद करावयाची, किंवा पर्यायी लक्ष्यावर करावयाचा रणगाडा पथकाने चालून जाणाऱ्या पायदळाला, 'बगला'-कडून, अथवा समोर राहून, कशा प्रकारे आणि कोठपर्यंत संरक्षण द्यावयाचे; यांत्रिक बंदुकी (Machine guns) पथकाने शत्रूचे 'मस्तक दाबून' ठेवून, त्याला आपल्या चालून जाणाऱ्या पायदळावर, गोळी चालविणे अशक्य व्हावे म्हणून, काय करावयाचे, अशा तऱ्हेचे परस्पर साहाय्यक आणि पूरक आदेश प्रत्येक विभागाला देणे आवश्यक असते. आपली चढाई टप्याटप्याने करावयाची असेल तर, प्रत्येक मजल गाठल्यावर, काय करावयाचे, कोणती खबरदारी घ्यावयाची, हे आदेश यात अंतर्भूत असतात. उद्दिष्ट साध्य झाल्यावर शत्रूचा पाठलाग कोठपर्यंत करावयाचा, हा पाठलाग चालू असतांना मुख्य फौजेने कोठे थांबावयाचे, व शत्रूच्या संभाव्य फेर हल्ल्याच्या वेळी आपल्या संरक्षणाची काय योजना करावयाची; गस्त सुरु करण्याची योजना, त्यांचे सांकेतिक दळण वळण, आपल्या तात्पुरत्या जागेला मजबूत करणे, आपला खर्च झालेला रसद पुरवठा, दारु-गोळा, शस्त्रास्त्रादिकांची पूर्ती आणि भरपाई, आपल्या जखमी सैनिकांची व्यवस्था, आणि आपल्या सैन्याची पुनर्रचना, शत्रूच्या पकडलेल्या सैनिकांची विल्हेवाट, इत्यादी अनेक बाबतीतली व्यवस्था, व त्यांच्या संबंधीचे आदेश, या सदरात येतात. त्या सर्व बाबींचे विवेचन येथे करता येत नाही. वर मुख्य

गोष्टीचा निर्देश केलेला आहे. आता शेवटी आणखी काही मुख्य आणि महत्वाच्या बाबी विचारात घेतल्या पाहिजेत. त्यात तीन मुख्य आहेत. **पहिली–** युद्धाला सुरुवात करण्याकरता निवडलेल्या सेनेची 'फळी' बांधून, त्यांना एका विशिष्ट पद्धतीने व आपआपल्या वेगानुसार, विशिष्ठ क्षणी कार्याची सुरुवात करणे सोपे जावे म्हणून, एकत्र करण्याची जागा (Assembly Area) निवडणे. **दोन**–या परिसरात, फौज गोळा झाल्यावर, फळी तयार करणे व युद्धाच्या सुरुवातीकरता, त्या त्या विभागाला, सुरुवातीच्या रेषेवर (Starting Line) आणणे. याला क्रिकेटच्या मैदानावरील, खेळ सुरु होण्यापूर्वी केल्या जाणाऱ्या क्षेत्र रचनेची (fielding plan) उपमा देता येईल. हे क्षेत्र रक्षणाचे आणि त्याकरता रचनेचे काम चमूचा कर्णधार, दोन दृष्टीने करीत असतो. तेच युद्धातही करावयाचे असते. त्या नंतर **तिसरी** आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे युद्धाचा 'मुहूर्त' ठरविणे आणि त्या मुहुर्ता प्रमाणे, **पळा–निपळा पर्यंत वक्तशीरपणा** ठेवण्याची आटोकाट दक्षता बाळगण; ही होय. कोणत्याही एका विभागाने, अथवा उपविभागाने, आपली सुरुवात एक 'निपळ' अगोदर केली, किंवा एका निपळाची त्याच्या कडून दिरंगाई झाली, तर सर्व योजना कोसळून पडू शकते. लष्करी परिभाषेत या मुहूर्ताला 'D'Day व 'z'ero hour म्हणतात 'द' दिवस आणि 'शून्य' क्षण ही मराठी संज्ञा याला देता येईल. त्या मुहूर्ताच्या क्षणाला 'शून्य' क्षण म्हणण्यात विशेष अर्थ आहे. सैनिकाचा आयुष्याच्या तो सुरवातीचा 'क्षण' समजला पाहिजे. तेथूनच त्याच्या 'युद्ध जीवना' ला सुरुवात होत असते. या दिवसाच्या अगोदर किंवा नंतर तसेच 'मुहूर्तक्षणा'च्या अगोदर आणि नंतर, यांचा काळ दर्शविण्याची विशिष्ट लष्करी तांत्रिक प्रथा आहे. ती अशी : 'द' दिवसाच्या आधी काही करावयाचे असल्यास 'द'–तितके दिवसाचा संख्यादर्शक आकडा; नंतर असल्यास 'द' + अधिक तितक्या दिवसाचा आकडा. त्याच प्रमाणे शून्य इंग्रजी 'झेड' Z या सांकेतीक मुळाक्षराने मुहुर्ताचा क्षण दाखविला जात असतो. उदाहरणार्थ द + २ म्हणजे नियोजित दिवसा नंतर दोन दिवसानी. द- ३ म्हणजे तीन दिवस अगोदर. युद्धात किंवा कोणत्याही कार्यात मुहूर्ताचे अनन्य-साधारण महत्व असते. घाई किंवा उशीर उपयोगी नसतो. याचे मोठे ठळक उदाहरण १८५७ च्या संघर्षाचे वेळीं घडले. **मंगल पांडेने** घाईने मुहुर्ताच्या अगोदर पहिली गोळी झाडली. दुसरे उदाहरण, नाशिकला नाटक गृहात जॅक्सन वर मुहूर्तावर गोळी न झाडली गेल्याने सर्व योजना ढासळली असे म्हणतात. यावरून मुहूर्ताचे महत्व कळून यावे !

**४ व्यवस्था** – (Administration) अंतर्गत व्यवस्थेविषयीचे आदेशाचा नंतर क्रम येतो. यापैकी काही बाबींचा, वरील तिसऱ्या 'तरीकापद्धत' (method) या सदरात उल्लेख केला असला, तरी त्यांच्या बाबतीतले

अधिक खुलासेवार, आणि स्पष्ट आदेश या चौथ्या सदरात येतात. त्यात हत्यारे, दारुगोळा, रसद पुरवठा, परिवहन व्यवस्था, स्वास्थ व्यवस्था, अवजारे, जसे मोर्चेबंदीची खणण्याची उपकरणे, काटेरी तार, इत्यादी विषयी सविस्तर आदेश असून, मुख्य म्हणजे या सर्व गोष्टीचे वितरण, आणि वाटप करण्याची केंद्रे ( Delivery and Distribution points ) वैद्यकीय विभागातले पहिले केंद्र (Regimental Aid Post) त्याच्या मागचे ' रुग्ण-वर्गीकरण आणि पाठवणी केन्द्र ' ( Casualty Clearing Station ) अशा सारख्या ' कल्याणकारी ' आणि अंतर्गत सुव्यवस्थेच्या बाबी विषयीचे, आदेश दिले जात असतात.

**५ अंतर्गत संपर्क व्यवस्था** (Internal Communication) या विषयीचे आदेश .असतात. त्यात सेनेच्या मुख्य केंद्राची जागा, फौज चाल करून जात असल्यास, केंद्राची प्रत्येक टप्यावरची, किंवा मजले वरची जागा, याशिवाय आपल्या मुख्य केंद्राव्यतिरिक्त, वरच्या श्रेणीच्या एका केंद्राची जागा, याचे आदेश असले पाहिजेत. वरच्या एका केंद्राच्या जागेची माहीती असण्याचे महत्व उघड आहे. लढाईच्या धुमश्चक्रीत, परस्पर संबंध तुटणे, आणि परस्परांचा पत्ता न लागणे संभवते. म्हणून दोन केंद्रांची माहिती असली, तर दोन पैकी एकाशी तरी संबंध व संपर्क प्रस्थापित करता येईल. ' एकसे दो भले ' हा न्याय सर्व ठिकाणी सोईचा असतो. केंद्राशिवाय आणखी एक ' हजेरी लावण्याचे ' म्हणजे संपर्क ठेवण्याचे केंद्र, प्रसंगोपात योजून ठेवावे लागते. त्याला Reporting Centre असे म्हणतात. याचा असा अर्थ नव्हे की सेनापती नेहेमी स्वतः जातीने ह्या ठिकाणी व केंद्रात प्रतिवृते ऐकण्याकरता किंवा पुढील आदेश देण्याकरता हजर असतो. सेनापती लढाईचा रागरंग पाहात असतो व सबंध आघाडीवर जरूर त्या कोणत्याहि ठिकाणी आणि तुकडी बरोबर, जरूर तितका राहतो व लढाईची प्रगती जागरूकपणे पाहतो, सर्व प्रकारचा सल्ला देतो. परंतु त्या विभागीय अधिकाऱ्याच्या कार्यस्वातंत्र्याचा अधिक्षेप करीत नाही. या सदरात संदेश वाहनाची साधने, जसे टेलिफोन, बिनतारी संदेश, वाहन व्यवस्था, खलीते, आदेश, इत्यादी पोहोचविणाऱ्या मोटार सायकल स्वारांची योजना, इत्यादी संदेश वाहन आणि संपर्क व्यवस्थेविषयी सर्व आदेश दिलेले असतात. लढाईत ' लगावट ' संपर्क कायम राहणे फार महत्वाचे असते.

**६ पावती** व आदेश वितरण हा सर्वात शेवटचा भाग असतो. लेखी आदेशाच्या किती प्रती काढल्या गेल्या, व त्यांचा नक्की बटवडा आणि हिशोब काय, हे कटाक्षाने पाहावे लागते. कारण शत्रूच्या हातात एकादी प्रत जाणे, किंवा यातला काही अल्प स्वल्प भाग, त्याला कळणे म्हणजे किती भयंकर प्रसंग उत्पन्न होईल, याची नुसती कल्पनाहि करता येणार नाही. हातात घेतलेली मोहीम नुसती अयशस्वीच होणार नसून,

सगळ्या देशाच्या संपूर्ण युद्ध विषयक योजना व तजविजी धुळिला मिळतील. Operation order आणि Order of Battle चा सुगावा लावण्याचे शत्रुचे अहोरात्र आणि आटोकाट प्रयत्न असतात. आणि शत्रू संबंधी आपणही हेच करीत असतो. शेवटी हे आदेश मिळाल्याची पावती प्राप्त करुन घेतली पाहिजे. मुहूर्त टळू नये म्हणून सर्व संबंधितांच्या घड्याळींनी तंतोतंत एकच वेळ दाखविली पाहिजे. येवढ्या करता सर्वांची घड्याळे मिळविणे आणि बरोबर लावणे हा महत्वाचा भाग मुद्दाम होऊन शेवटी उल्लेखिला आहे याला इंग्रज़ीत synchronising watches असे म्हणतात. व हे महत्वाचे असल्या कारणाने यद्धाच्या आदेशात सांगितले जाते.

युद्धाच्या आदेशाशिवाय, आदेशवजा व तितक्शा महत्वाच्या सूचनाहि वेळोवेळी दिल्या जातात. अशा 'सूचना' दोन प्रकारच्या असतात. एक प्रकार सर्व साधारण मार्गदर्शक असतात. त्याना Directive Instructions असे म्हणतात. दुसऱ्या अंतर्गत व्यवस्था, आणि प्रशासन व्यवस्थेविषयी असतात. त्यांना Administrative Instructtions असे म्हणतात. पुढे एका ब्रिगेडच्या प्रत्यक्षात दिल्या गेलेल्या आदेशापैकी मुख्य मुख्य गोष्टींचा उल्लेख असलेले एक मराठी भाषांतर दिले आहे. त्या ब्रिगेडचा क्रमांक व आदेशाचा दिनांक, हेतूपूर्वक दिलेला नाही. तसेच स्थलनामे व व्यक्तीनामे दिलेली नाहीत. हे लेखी आदेश आहेत. यात प्रत्यक्ष लढाईची योजना नाही फक्त एक सेना-विभाग विमानातून एका ठिकाणाहून दुसऱ्या एका ठिकाणी जाण्याचा कार्यक्रम पार पाडावयाचा आहे. युद्धात किती तपशीलाचे आणि किती गोष्टींचे अवधान ठेवावे लागते, याची यावरून कल्पना येईल. ते लेखी आदेश असे होते.

**अत्यंत गोपनीय**
प्रत क्रमांक............
दिनांक.................

XXX हिंदुस्थान स्थल-सेना XXब्रिगेडचे कृतीआदेश (operation orders)
क्रमांक................

संदर्भ—नकाशा अ. क्र. —पान क्र. —प्रमाण १ इंच बरोबर ४ इंच.

१ **खबर-सूचना** हे आदेश ब्रिगेडच्या सध्याच्या जागेपासून धावपट्टीच्या स्थळा-पर्यंतच्या स्थलांतरापुरतेच आहेत. पुढील आदेश शत्रूची अधीक खबर आणि त्याच्या हेतूची अधिक माहिती प्राप्त झाल्यावर देण्यात येतील.

अ शत्रू—त्याचे वैमानिक आणि दुसरे शस्त्रास्त्राचे सामर्थ त्याची ठाणी व केंद्रे त्याचा संभाव्य हेतू वगैरे

ब स्वत:-आपले वरील सर्व प्रकारचे सामर्थ मदतगार दलांचे सामर्थ्य व मदतीचा प्रकार यात वायुसेनेच्या मदतिचा अंतर्भाव आहे. हे स्थलांतर वायुमार्गे

व्हावयाचे असल्याने हवामान व सूर्य चंद्राच्या उदयास्थाची कोष्टके, धुके, अंधार इत्यादी कोष्टके, मोसम.

२ इरादा–विमानातून स्थलांतर– 'अ' जागेपासून 'ब' जागेवर.

३ तरीका–पद्धत–रुपरेषा–'द' दिवस मुहूर्त 'शून्य क्षण' आणि कार्यपूर्तीची कालमर्यादा, पोटविभागांच्या विमानोड्डाणाचा कार्यक्रम बरोबर बाळगावयाची शस्त्रास्त्रे व सज्जा आणि सर्वांचे वजन, धावपट्टीपर्यंत पोहचण्याचा विभागश: कार्यक्रम; विमानात शिरण्याचा अनुक्रम आणि संख्यावितरण 'कामकरी तुकड्या' कामाचा कार्यक्रम, विमानातून इच्छित स्थळी पोहचल्यावर उतरण्याचा व विभागीय पुनर्रचनेचा कार्यक्रम अचानक हवाई हल्याच्या प्रतिकाराची व बचावाची तजवीज, सुरक्षितता–कागदपत्रे, दप्तर व व्यक्ती; नकाशे, ओळख पटण्याची साधने व वस्तू, इतर लोकाशी संपर्क संशनित व्यक्तीची विल्हेवाट शस्त्रादिकांची आणि युद्ध साहित्याची सुरक्षितता, हवाई अपघात इत्यादी.

४ व्यवस्था–वर वर्णन केलेल्या आणि निर्देशित केलेल्या मुद्यावर आधारित तपशीलवार आदेश व सूचना.

५ संपर्क–लगावट ब्रिगेडचे मुख्य केंद्र (Head Quarters) आघाडीवरील (Advance) आणि पिच्छाडीवरील (Rear) संपर्क केंद्र (Reporting Centre) संदेश व्यवस्था, सांकेतिक खुणा सांकेतिक स्तब्धता (signal silence) सांकेतिक संदेशांची उकल व साध्या / खुल्या संदेशांचे सांकेतिकी–करण व्यवस्था, घड्याळांची मिळवणी–भारतीय वेळेप्रमाणे अथवा रेडियो प्रमाणे इत्यादी,

६ पावतीं–आदेशांची पावती व पावत्यांची नक्की वेळ व हस्ताक्षर.

७ आदेश वितरणाची व्यवस्था–आदेश कोणी पोहचविले, जसे टपाल, कूरियर, Courier, Dispatch Rider वगैरे.

८ आदेशावरचे हस्ताक्षर व त्याची वेळ जसे–ब्रिगेड मेजर वेळ दिनांक.......
वेळ १८.४० सामान्य (General) विभाग

९ प्रतींची विल्हेवाट–प्रत क्रमांक १—————— क्रमांक २ ——————————
क्रमांक ३ वरिष्ट केंद्र. क्रमांक ४ युद्धाची दैनंदिनी क्रमांक ५ स्थळप्रत क्रमांक ६ शिल्लक. एकूण प्रती ६

वरील सांगाड्यावरून, आणि त्या अगोदर केलेल्या विवेचनावरून, युद्धाच्या आदेशांची किंचित् कल्पना येईल. हा लेखी आदेशाचा नमुना झाला. खाली तोंडी (Verbal) आदेशाचा नमूना दिला आहे. तोंडी आदेश समक्ष दिले जात असतात. व तेव्हा संबंधित अधिकारी हजर असतात. कित्येक प्रसंगी पलटणीचा मेडिकल ऑफिसर जरी 'लढाऊ' नसला तरी हजर असणे उपयुक्त ठरते. तोंडी

आदेश साधारणपणे बटालियनपासून खाली दिले जातात. बटालियनच्या अधिपतीचे आदेशही, तितका अवधी असल्यास लेखी दिले जाऊ शकतात. बटालियनच्या आदेशाकरता हजर असाव्या लागणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कार्याप्रमाणे त्यांचे गट (group) बनविले जातात. (ही ब्रिटिश पद्धत आहे. आपली सेना ब्रिटिश परंपरेतीलच आहे. आपल्याहि सेनेत तीच पद्धत आहे) ते असे–'ओ गट' (O group) दुय्यम अधिकाऱ्यांचा, ज्यांना कामे वाटून दिली जातात त्यांचा गट. 'एफ् गट' (F group) प्रत्यक्ष लढणाऱ्या सैनिकांचा गट. 'ए' (A group) अंतर्गत व्यवस्था व बंदोबस्ताची जबाबदारी असणारांचा गट, यात 'टी' ग्रुप म्हणजे परिवहन Transport गट संम्मिलित असतो. आणि शेवटला 'आर' ग्रुप (R group) म्हणजे युद्धक्षेत्राचे निरीक्षण करणारे (यात स्वतः बटालियनचा)कमांडर व शत्रूची टेहेळणी करणारे, माहिती मिळवणारे असतात.

वरिष्ठाचे युद्धाचे आदेश मिळताच 'आर' ग्रुपच्या कामाला एकदम प्रारंभ होतो. व या 'गटाचे' काम चालू असतांना इतर गटांना तयारीचे तात्पुरते आदेश मिळतात व ते सर्व 'गट' शक्य तितक्या जलदीने, परिपूर्ण तयारी करून, पक्क्या हुकमाची वाट पहात असतात. बटालियन कमांडर, किती वेळाने 'ओ' गटाने त्याला कोठे भेटावयाचे ते ठरवून, त्याला तसा हुकुम देतो. आपण युद्धक्षेत्राची पहाणी, परीक्षण करून, मागे दिलेल्या अनुक्रमानुसार आणि पद्धतीने, प्रसंगाचे परीक्षण (Appreciation) करतो, व आपली युद्धाची योजना (Plan of Action) पक्की करून, वरील क्रमानुसार व पद्धतीने, आपले (तोंडी) आदेश (Verbal orders) तयार करतो व नियोजित वेळी व जागी, हे आदेश ऐकण्यास व समजून घेण्यास तयार होऊन बसलेल्या 'ओ' गटाला तोंडी दिले जातात.

असे तोंडी आदेश देतांना, त्याचा आविर्भाव आवाज आणि पद्धत, आत्म–विश्वासाची खात्री पटेल, व परिणामकारक असेल, याची त्याने खबरदारी घेतली पाहिजे. त्याचा उत्साह आणि हिम्मत दिसून आली पाहिजे. त्याच्या बोलण्यात व सांगण्यात यत्किंचितही संदिग्धपणा किंवा गैरसमजाला जागा असता कामा नये. अशा रीतीने समोरासमोर दिलेले आदेश परिणामकारक ठरतात. आदेश संपल्यावर, ते सर्वांना समजले असल्याची 'पावती' घेण्याचीही पद्धत आहे. कोणालाहि कोणताहि प्रश्न विचारून आदेश समजला आहे किंवा नाही याची परीक्षा पाहता येते. काही शंका, गैरसमज कोठे दिसून आल्यास, दुरुस्तीला, पुनः समजाऊन द्यायला, शंका निरसन करायला, युद्ध सुरु झाल्यावर संधी मिळणार नाही. तो दुय्यम अधिकारी आपली शंका फेडून घ्यायला, कदाचित जिवंत राहणार नाही; किंवा शंकेचे समाधान करून, संशयनिवृत्ती करायला आदेश देणारा बटालियन कमांडरच इहलोकात शिल्लक उरला नसेल.

———

# डावपेच आणि व्यूह

युद्धाच्या परिभाषेतल्या Tactics आणि Strategy या दोन इंग्रजी शब्दांना मराठीतल्या **डावपेच** या लहान शब्दाने व्यक्तविले जाते. मोहिमेतल्या चकमकी, लहान लहान लढाया यातील युक्त्या-प्रयुक्त्या, म्हणजे Tactics ( डावपेच ) आणि युद्धाच्या अंतिम उद्दिष्टाकरता मोठ्याप्रमाणावर योजलेल्या युक्त्या-प्रयुक्त्या आणि व्यापक हालचालींना Strategy (डावपेचच) म्हटले जाते. याशिवाय 'ब्रिजच्या' खेळातल्या स्लॅमवरील ग्रँडस्लॅम (Grand Slam) प्रमाणे ग्रँडस्ट्रॅटेजी असते. तिलाच देशाची 'युद्धनिती' War strategy असेही म्हटले जाते. 'युध्दनिती' संबंध देशाच्या व्यापक हिताच्या, संरक्षणाच्या, शेजाऱ्यांच्या आणि संभाव्य शत्रूंच्या सामर्थ्यांच्या, स्वतःच्या सामर्थ्याच्या तसेच शत्रूच्या गुप्त अथवा उघड उद्दिष्ठांच्या अनुरोधाने, 'मुत्सद्दी मंडळाने' ठरविलेली राज्यनिती व **परराष्ट्रीय** धोरणही असते.

व्युह पौराणिक काळात योजले जात असत. ते 'आटयापाटयाच्या कोंडी' सारखे असावेत. तो निव्वळ धर्मयुद्धाचा काळ होता. त्यावेळी सेनापती आपल्या सैन्याची अनेक प्रकारची रचना करून, प्रतिपक्षाच्या विरांना, सही सलामत बाहेर पडण्याचे म्हणजेच 'कोंडी फोडण्याचे' आव्हान देत असावेत ! आणि एक कोंडी फुटताच, दुसऱ्या पाटीवर कोंडी धरून, प्रतिपक्षाला तिच्यात पकडण्याचा प्रयत्न करीत असावेत ! कौरव-पांडवयुध्दातले अभिमन्यूचे 'चक्रव्यूह प्रकरण' सर्वांस माहितच आहे.

पूर्वी काय असेल ते असो, पण आता सैन्याच्या निरनिराळया विभागांच्या आपल्या उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने, केलेल्या हालचाली, आणि शत्रूला अडचणीत आणि कोंडीत पकडण्याची सैन्याची रचना याला 'व्यूह' म्हणता येईल. शत्रूला बेसावध आणि अडचणीच्या जागात डांबून ठेवणे, त्याच्या हालचाली निर्वेध होणार नाहीत, अशी आपल्या सैन्याची युध्दक्षेत्रावर मांडणी करणे आणि **आपण निवडलेल्या जागी**, त्याला लढाई करावयास भाग पाडणे, अशा आपल्या सैन्याच्या रचनेला 'व्यूह' हे नाव देता येईल.

हालचालींना-युध्ददृष्टया करावयाच्या हालचालींना-इंग्रजीत Manouvers म्हणतात. मराठीत यालाही अर्थ-गर्भ प्रतिशब्द नाही. आधुनिक युध्दतंत्रानुसार अर्थगर्भ नवे शब्द आपल्या भाषेत बनवावे लागतील. पूर्वीचे युग गेले. आपली सेना ब्रिटिश परंपरेतली असल्याने, आपल्याला काही काळापर्यंत तेच शब्द वापरावे लागतील. आता युध्दें फक्त दोन देशात नसतात. त्यांचा परिघ आणि विस्तार फार मोठा होऊ शकतो. प्रत्येक पक्षाला आपआपले

'साहाय्यक' असतात. त्यांना 'दोस्त' म्हटले जावो, किंवा 'अक्ष' म्हटले जावो, त्या कारणाने 'आघाडया' एकापेक्षा अधिक असतात. नवीन उघडल्या जातात; आणि प्रत्येक आघाडीची भौगोलिक, प्राकृतिक, अथवा नैसर्गिक परिस्थिती वेगळी असते. म्हणून त्या त्या प्रमाणे युद्धपध्दती वेगवेगळया होतात, व वेगवेगळया सेना-प्रकारांचा उपयोग करावा लागतो. आता अणुपरमाणूंच्या आकाश अवकाशाच्या, विमानादि साधनामुळे, 'सर्वंकष' युध्दात आघाडी अशी कोठेच नसते. देशाच्या कोपरान् कोपरा शत्रूचे 'लक्ष्य' बनू शकतो.

असे जरी असले, तरी हालचाली, डावपेच वगैरे गोष्टी लढाऊ सैन्याला कराव्याच लागतात. आता युध्दाची पध्दत मात्र पार बदलून गेली आहे. जवळ जवळ एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत, सेना एकत्र लढत असे. सेनापतीच्या स्वतःच्या एकटयाच्या हातात, युध्दाच्या संचालनाची सर्व सूत्रे केंद्रीभूत झालेली असत. परंतु आता नव्या 'वेग युगात' आणि लांब पल्ल्याच्या शस्त्रादिकांच्या प्रादुर्भावामुळे, अधिकाराचे आणि संचालनाचे, संपूर्ण विकेंद्रीकरण झालेले आहे. सर सेनापती आपले आदेश दुय्यम सेनापतींना देतो. ते आपआपल्या उद्दिष्टापुरते आपआपले आदेश, त्याही खालच्या अधिकाऱ्याला देतात, व साखळी वाढत वाढत, सर्वात लहान तुकडीच्या नायकापर्यंत जाते. आणि शेवटी तो नायक आपल्या अधिकारातल्या १०/१२ सैनिकांना देतो. आणि त्यातील प्रत्येक सैनिकाने, आपआपले काम पार पाडावयाचे असते. व हे व्यक्तीगत कर्तव्य आणि जबाबदारी पार पाडण्याकरता, त्याला आपली **व्यक्तीगत बुद्धी-मत्ता आणि चातुर्य** कामात आणावे लागते. या वरून हे स्पष्ट होईल, की वरपासून खालच्या एक एकटया जवानापर्यंत, कार्य-स्वातंत्र्य, बुध्दीला चालना आणि चातुर्याला वाव असतो. विचार करावा लागतो, आणि आपआल्या कक्षेत असलेले स्वातंत्र्य, आदेशाचे पालन करीत असतांनाच उपयोगात आणावयाचे असते. हे फोड करून सांगण्याचा उद्देश हाच आहे, की सेना आणि सेनिकाविषयी, गैरसमज शिल्लक राहू नये. सैन्यात नुसती आंधळी 'हडेलहप्पी' नाही. हे लक्षात घेतले पाहिजे. इतर युगावरोबरच चालू युग विकेंद्रीकरणाचे आणि स्वातंत्र्याचेहि युग आहे.

जुन्या युद्ध पद्धती विषयी लिडल हार्ट हा लष्करी लेखक म्हणतो "manouver in war prior to Nineteenth Century was the weapon of the Supreme Commander only. The army moved, as a complete body, unified at all times." परंतु आता वर सांगितलेल्या विकेन्द्रीकरणामुळे, प्रत्येक छोटया मोठया नायकाला, आपआपली वेगवेगळी जबाबदारी उचलावी लागते. सर्व लहान मोठे विभाग दूरदूर अंतरावर पसरलेले असतात. त्यांच्यावर प्रत्यक्ष अधिकार चालवणे, आदेश देणे, सूचना देणे आणि संचालन करणे शक्य नसते.

म्हणून आता प्रत्येक नायकाला आपली सूक्ष्म बुद्धी **प्रथमोपक्रम** क्षमता आणि निबंतृत्व (Insight, Initiative, Control) या तीन गुणांच्या आधाराने आपआपल्या उद्दिष्ट–सिद्धी करता, डावपेच व हालचाली करण्याचे स्वातंत्र्य असते. हे पुन: सांगण्याचा हेतू हा आहे, की सेनेत चिंतनशील, बुद्धिमान, तल्लख सैनिक आणि अधिकारी असले पाहिजेत. आणि या गुणांच्या उत्कर्षाला आणि उपयोगाला सैन्यात पूर्ण वाव असतो व संधीही असते.

प्रत्येक मोहिमेत आणि लढाईत भौगोलिक आणि प्राकृतिक रचनेला, म्हणजे त्या त्या भूमीखंडाच्या (Terrain) नैसर्गिक परिस्थितीला महत्व असते. म्हणजे वेगळाल्या सैन्यरचना, हालचाली आणि डावपेच सेनापतीला योजावे लागतात. व युद्धाची पद्धतही वेगळी वेगळी होते. म्हणून परिस्थितीनुरुप 'मैदानी युद्ध', 'वाळवंटी युद्ध ', 'जंगल युद्ध ', 'डोंगरी युद्ध ' अशी त्या त्या पद्धतीला नावे दिली जातात.

युद्धाचे डावपेच ठरविण्याची, आणखीहि एक दृष्टी असते. अंतिम उद्दिष्टाच्या ध्येयानुसार, युद्ध आक्रमक असून, शत्रूचा काही प्रदेश जिंकून, आपल्या ताब्यात घ्यावयाचा आहे काय ? अथवा फक्त आपला प्रदेश शत्रूने बळकावू नये म्हणून, नुसता बचाव करावयाचा आहे काय ? अथवा शत्रूने आपला घेतलेला प्रदेश, आपल्याला हिसकाऊन घ्यावयाचा आहे काय ? तिसरा प्रकार जर आपले अंतिम उद्दिष्ट असेल तर आपली युद्ध पद्धती मिश्र होईल. म्हणजे आपल्या प्रदेशात ठाण मांडून बसलेल्यांना त्या प्रदेशातून हुसकाऊन लावण्याकरता, 'आक्रमक युद्ध ' करावे लागेल. आपल्याला आपल्याच प्रदेशात **'प्रदेशावर ' नव्हे.** शत्रूवर हल्ले चढवावे लागतील; म्हणजे **आपल्याच प्रदेशावर 'आक्रमण ' करावे लागेल.** शत्रूला पिटाळून लावण्यात यश मिळाल्यावर आपली युद्ध पद्धती बचावाची होईल, **ती शत्रूच्या फेर हल्ल्याला तोंड देण्याकरता** म्हणून. हिंदुस्थानला हेच करावयाचे आहे. आपली युद्धपद्धत '**मिश्र** ' असेल. याचा अर्थ हाच, की आपल्या सेनेला सर्व प्रकारच्या युद्ध पद्धतीने, लढण्यास सिद्ध असले पाहिजे. पूर्वेकडे आसामकडील भाग आणि ईशान्येकडील भाग घनदाट अरण्याचा आहे. म्हणून जंगल युद्ध; पश्चिमेकडे आणि दक्षिणेकडे समुद्र असल्यामुळे (आणि पूर्वेकडेही) सागरी युद्ध; उत्तरेकडे बर्फमय पर्वत असल्यामुळे, डोंगरी आणि हिमयुद्ध, वायव्य सरहद्दीवर डोंगरी युद्ध, राजस्थानकडील सीमेवर मैदानी युद्ध, अशा सर्व भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थितीला योग्य अशा सर्व प्रकारच्या युद्ध पद्धतीत, हिंदी सेना तरबेज असली पाहिजे. तसेच आकाशालासीमा नसतात म्हणून आपल्याला आपले आकाश श्रेष्टत्व (Air Superiority) कायम राखली पाहिजे. नमून्यादाखल 'स्थल युध्दाच्या' डावपेचांचा फक्त येथे परामर्ष घेतला आहे. जल व आकाश यातील युध्दांचे तंत्र स्वतंत्र आहे.

सर्वच युध्दतंत्रांची ओळख वा परिचय एका लहान प्रकरणात होणे शक्य नाही. त्यावर मोठ मोठे ग्रंथ आहेत. (अनेक युरोपीय भाषात) ते अभ्यासिले जाऊ शकतात. येथे फक्त जिज्ञासा उत्पन्न करण्याचा अल्प प्रयत्न केला आहे.

युद्धाच्या व्याप्तीप्रमाणे त्यात एका पेक्षा जास्त आघाडचा असतात, नवीन उघडाव्या लागतात व त्या आघाडचावर लढून विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्याकरता अनेक लढाया कराव्या लागतात. तसेच लढाईत अनेक छोटचा लढाया म्हणजे चकमकी होतात. एखादी चकमक विरुद्ध गेली, एखाद्या लढाईत यश मिळाले नाही, किंवा एखादी मोहीम फसली तर एकंदर युद्धात 'पराभव' झाला असे म्हणता येणार नाही. युद्धात घडून आलेल्या सर्व घटना आणि प्रसंग यांची वजाबाकी वगैरे गणित करुन अंतिम उद्दिष्टावर त्याचा होणारा परिणाम हाच यशापयाचे गमक होय. उद्दिष्ट शेवटी साध्य झाले तर मधल्या यशापयशाचा विचार अथवा खंत करण्याचे कारण नाही.

युद्धात चार मुख्य क्रिया असतात. त्या प्रत्येकीत अनेक उपक्रिया कराव्या लागतात व सेनेचे विविध प्रकार जसे पायदळ, रणगाडे, तोफखाना, मशीनगन्स् त्या त्या परिस्थितीत त्यांच्या त्यांच्या कार्यक्षमतेनुसार कामात आणावे लागतात, हे त्या त्या सेनानायकांच्या चातुर्यावर आणि योजकतेवर अवलंबून असते. सेनानायकाला जरुरी प्रमाणे आणि जरुर तितके, त्या त्या प्रकारच्या सेना विभागाचे पाठबळ नेहेमीच मिळते असे नाही. 'भागवून घेण्याचेच' प्रसंग अधिक वेळा येतात. कारण त्या प्रकारचे सेना विभाग कमी असतील, किंवा त्यांची दुसऱ्या कामाकरता योजना केलेली किंवा करावयाची असेल किंवा वरिष्ट सेनापतीशी त्या विभागाच्या सेनेच्या जरुरीबद्दल मतभेद होईल म्हणून प्रत्येक सेना नायकाला 'भागवून' घेण्याचेच प्रसंग अधीक येतात. व आपल्या "योजकते"वरच आपली लढाईची योजना व आदेश तयार करावें लागतात. शत्रूशी 'हात मिळवणी' किंवा 'सलामी' करता आगेकूच (Advance to contact); चढाई किंवा हल्ला, बचाव, आणि माघार या त्या चार मुख्य क्रिया आहेत.

युद्धाचा निर्णय घेऊन, आघाडी निवडून, सेनेची व सेनापतीची नियुक्ती झालेली आहे; नियुक्त सेनापतीला युद्धाची पार्श्वभूमी समजाऊन दिलेली आहे; 'उद्दिष्ट' निःसंदिग्ध आणि स्पष्टपणे सांगितले आहे, त्याला शत्रूविषयी 'दप्तरी' असलेली संपूर्ण माहिती दिलेली आहे; आणि त्याला शत्रूविषयीची माहिती सारखी मिळत आणि मिळवीत राहण्याची व्यवस्था केलेली आहे; सेनापतीने प्रसंगाचे संपूर्ण निरीक्षण आणि परीक्षण केले आहै; आपली योजना तयार केली आहै, व्यूह रचना आणि हालचाली आखल्या आहेत आणि संबंधित दुय्यम सेनानायकांना आपले आदेश दिलेले आहेत येथपर्यंतच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ८६८०६ 2969 निवड 29.3.42 929



बाबतीतली प्रत्येक गोष्ट यथासांग पूर्ण झाल्यावर पहिले पाऊल जे उचलावयाचे ते शत्रूशी 'हात मिळवणी' 'सलामी' 'संपर्क' ( Contact ) प्रस्थापित करण्याकरता असते. युद्धाचे सूत्रमय असे चार 'एफ' कार आहेत. ते इंग्रजीत मूळाक्षरांच्या 'एफ' या अक्षराने सुरु होतात. ते संस्कृतातील सूत्राप्रमाणे समजावे. या चार 'एफ' कारात आद्य 'एफकार' Fin the Enemy शत्रूला शोधून काढणे म्हणजे त्याच्याशी हात मिळवणी करणे, सलामी घेणे, संपर्क साधणे हा आहे. दुसरा 'एफकार' Fix the Enemy शत्रूशी संपर्क झाल्यावर त्याला नजरेत ठेवणे, निसटून न जाऊ देणे–डांबून ठेवणे, म्हणजे त्याचा सतत मागावर राहणे; तिसरा 'एफकार' Fight with the Enemy शत्रुशी, योग्य संधी साधून लढणे म्हणजे त्याच्यावर हल्ला करणे, चौथा आणि शेवटला 'एफकार' Finish the Enemy शत्रूचा पूर्ण विध्वंस करणे त्याला 'संपविणे'. या चार 'एफकारात' ज्या ज्या छोटया मोठया अनेक गोष्टी, हालचाली, डावपेच होतील, करावे लागतील, त्या सर्वांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, म्हणजे युद्ध. या गणिताचे उत्तर म्हणजे एकाचा जय, अर्थात दुसऱ्याचा पराजय. अगदी सोपे गणित !

१ ) सलामी–या प्रथम क्रियेकरता (अ) सेनापतीने आपल्या सर्व सैन्याला केंद्रित करण्याकरता सोईची जागा निवडावयाची असते. सेनापतीच्या हाताखाली दिलेले निरनिराळे विभाग, प्रकार आणि पथके आपआपल्या देशभर विखुरलेल्या छावण्यात असतात. व काहींच्याकडे विशेष कामेही दिलेली असतात. नियुक्त सेनापतीला (Order of Battle) दिलेल्या यादीपेक्षा त्यांची काहीही माहिती नसते व त्या त्या सेनानायकांचा परिचयही नसतो. म्हणून त्या सर्वांना एका केंद्रावर गोळा करणे जरूर असते, काही पथकांना आहे त्या ठिकाणाहूनच नियुक्त कामगिरी बजावणे सोपे पडेल, काहींची हलवा–हलवी कालहरण करणारी असेल, आणि काही एकत्रित एका केंद्रावर आणणे आवश्यक नसेल, अशांना अर्थातच एका केंद्रावर आणण्याचे कारण नसेल ! या बाबत सेनापतीने निर्णय घ्यावयाचा असतो. परंतु आपली नियुक्ती होऊन आपल्याला दिलेल्या सेनेची यादी ( Order of Battle) हातात पडताच सेनापतीने त्या त्या विभागाच्या सेनानायकाला शक्य तितक्या लवकर त्यांनी तयार व्हावे म्हणून तात्पुरते पूर्व सूचनावजा आदेश द्यावयाचे असतात. त्यात पूर्ण तयारीने अमूक वेळात अमूक जागी पोहोचण्यास तयार राहिले पाहिजे असा मुख्य हुकुम असतो. (ब) सेनापतीने दुसरी जागा निवडावयाची असते, ती आपल्या सैन्याची अनुक्रमाप्रमाणे आणि युद्धात करावयाच्या कामगिऱ्या प्रमाणे, म्हणजे दुय्यम उद्दिष्टांच्या अनुरोधाने, आपल्या सैन्यास कूच करण्यास सोईस्कर अशा परिसराची निवड करणे. हा परिसर शत्रूच्या शक्य तितका जवळ असावा. या परिसरात हालचाली व परिवहन चपळाईनें करता यावी. म्हणून लोहमार्ग

सडका, वाटा, खुले मैदान त्याच प्रमाणे काही आडोसाही असला पाहिजे. आडोसा पाहण्याचा हेतु आपल्या हालचाली शत्रूच्या लक्षात शक्य तितक्या कमी याव्यात, शत्रूला बेसावध अवस्थेत चकित करता यावे हा असतो. ( क ) आपल्या सैन्याला ‘ फळी ’ बांधून शक्य तितके सरळ रेषेने शत्रूवर चाल करून जाता यावे, असा परिसर निवडणे व त्या रेषेवर आपआपल्या जागी पोहोचण्याची प्रत्येक विभागाला सूचना देऊन ठेवणे (ड) आपल्या सैन्याच्या ‘अक्ष रेषेची’ योजना व दिशा ( शत्रूच्या रोखाने ) निश्चित करणे. । अक्षरेषेचा अतीशय उपयोग असतो. यामुळे सेनेच्या प्रगतीची दिशा कायम राहते. सेनेचे मुख्य केन्द्र या रेषेवर पुढे पुढे सरकत असते. म्हणून दोन्ही बगला वरील दूर दूर पसरून पुढे चाल करून जाणाऱ्या विभागाला केन्द्राशी संपर्क ठेवणे, वेळोवेळी केंन्द्राकडे प्रतिवृत्ते व खबरा पाठवणे व एकंदर सर्व विभागाला अंतस्थ संपर्क ठेवता येतो ( ई ) विभागशः दुय्यम उद्दिष्टे मुक्रर करणे आदि मधले टप्पे व मजला ठरवणे ( फ ) शत्रूच्या सेनेविषयी मिळालेल्या माहितीनुसार आपली सेना संतुलित करणे–म्हणजे विशिष्ट उद्दिष्टाकरता शत्रूच्या अनुरोधाने आणि आपल्या विभागांच्या कार्यक्षमतेप्रमाणे व युद्ध क्षेत्राच्या नैसर्गिक परिस्थितीप्रमाणे नियुक्त करणे. ( ग ) आपल्या फौजेच्या संरक्षणाची योजना करणे; म्हणजे आघाडीची बिनीची तुकडी दोन्ही ‘ बगला ’ वरील तुकड्या आणि पिछाडी संभाळणारी तुकडी यांच्या नेमणुका करून सर्व दिशांकडून शत्रूने आपल्यावर हल्ला करू नये म्हणून व्यवस्था करणे. या संरक्षक तुकड्यांचे, मुख्य फौजेपासून मधले अंतर इतके ठेवले पाहिजे की मुख्य फौजेचा गतीरोध होऊ नये; आणि यदाकदाचित या संरक्षक तुकड्यापैकी कोणाशी शत्रूशी हात मिळवणी दूर अंतरावर पुढे किंवा बगलेवर झाली, तर मुख्य फौजेला लढाईचा पवित्रा घेण्यास सवड मिळावी. आणि अशी हात मिळवणी होताच शत्रूला डांबवून ठेवून त्याच्यावर शक्य तितक्या लवकर निकराचा हल्ला चढविणे फायद्याचे असते. कारण अशा वेळीं शत्रूही चाचपडतच असतो. या ‘ सलामीच्या ’ हालचालीची अत्यंत काळचा किट्ट अंधारात सापडणाऱ्या व्यक्तीच्या क्रियांची तुलना करता येईल. ती व्यक्ती अंधारात चाचपडत असताना सावध असते. त्याकरतां आपला एक हात पुढे करून समोरील जागेचा अंदाज घेत असते. आणि तेंव्हाच त्याचा दुसरा हातही काहीं अनपेक्षित झाल्यास त्याच्या करता तयारीत असतो म्हणजे चाचपडणारा पुढचा हात आणि तयारीचा दुसरा हात ( तोही चाचपडण्याच्या क्रियेबरोबर ) प्रतिकाराला तयार असतो. अशी दुहेरी क्रिया म्हणजे सैन्याचे शत्रूशी सलामी करता आगेकूच असते.

हे चालू असताच चतुर सेनापती, युद्धाच्या नवीन समजल्या जाणाऱ्या, गेल्या महायुद्धात जर्मनीने उपयोगात आणलेला पद्धतीनुसार आपला व्यूह

( आधुनिक अर्थाने ) रचीत असतो, ती तत्वे तीन आहेत १. **पक्का मजबूततळ.** याचा उल्लेख वर ( व ) या जागी केलेला आहे. सेनापतीने निवडलेला परिसर हा त्या लढाई पुरता पक्का तळ होत असतो. याला इंग्रजीत Firm Base म्हणतात. या तळाहून सेनेच्या विभागांची जरूर तशी हालचाल करता आली पाहिजे. आक्टोपस या जल-प्राण्याच्या शरीराला हत्तीच्या सोंडे सारख्या अनेक सोंडा असतात. त्या भक्ष्य शोधीत असतात व सारख्या वळवळत असतात. परतु त्यांचे शरीर एके ठिकाणी स्थिर नसते. ह्याच प्रमाणे सेनेच्या संरक्षणात्मक विभागांचे म्हणजे सोंडांचे काम असते. व सेनेचे मुख्य केंद्र तिचा मजबूत पक्का तळ असतो. आणि तळ फार झाले तर एकेका लढाई पुरताच एका परिसरात स्थिर राहतो इतकेच. तोही युद्धाची जसजशी प्रगती होत जाते तस तसा हलवावा लागतो. दुसरे तत्व २. **चंचुप्रवेश** म्हणजे शत्रूला अनेक ठिकाणी चावे घेऊन त्याच्या संरक्षित परिसरात निरनिराळ्या बाजूंनी अगदी सावधगिरीने अल्प-स्वल्प प्रवेश करणे. याला इंग्रजीत Infiltration म्हणतात तिसरे तत्व ३. **सर्व बाजूनी घेरणे** हे आहे. हा 'घेरा' घालण्याचा अर्थ सर्व बाजूने हल्ला करणे हा नव्हे. हे शक्य होणार नाही. या प्रकारच्या हालचालींनी त्याला आपल्या संरक्षणाची अधीक काळजी घेणे भाग पडेल. त्याला आपल्या तुकड्या व विभाग अधिक दूर पसरून ठेवता येणार नाहीत. त्या आत जवळ खेचाव्या लागतील. म्हणजे युद्धाचा परिसर आकुंचन पावेल आणि युद्ध क्षेत्र जितके आकुंचित आणि शत्रू जितका जास्त एकत्रित तितका त्याच्यावर निकराचा हल्ला करणे सोपे. कारण जितका विस्तार कमी तितके हल्ल्याच्या दृष्टीने केंद्रीकरण सोपे; असा नियम आहे. याला इंग्रजीत Encircling Movement म्हणतात. पहिले महायुद्ध हे युरोपात 'स्थिर युद्ध' ( Static warfare ) होते. दुसऱ्या महायुद्धात गतीमानता आली. कारण यांत्रिकीकरणामुळे ( mechanisation ) वेग वाढला. व त्याला अनुसरून वर सांगितलेली तीन तत्वे जर्मनीने यशस्वी रीतीने वापरली.

---

परंतु ही तत्वे छत्रपती श्री शिवाजी महाराजानांहि माहीत होती. आणि त्यांचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. शिवाजी महाराजांनी ही तत्वे प्रतापगडच्या युद्धात यशस्वी केली. प्रतापगड ही महाराजाची firm base होती. अफझलखानाशी ठरलेल्या भेटीच्या ठिकाणासभोवार त्यांनी आपल्या छोट्या निवडक सैन्याची योजना करुन ठेवून Encircling movement ची तयारी ठेवली होती. भेटीत अफझलखान मारला गेल्यावर मोगल फौजेवर चहुबाजूने हल्ला करुन शत्रू सेनेला घेरून टाकले. आणि भेटीकरता महाराज रवाना झाले तेंव्हा मोगल सेनेत अनेक ठिकाणी शेलके शिलेदार 'पेरून' ठेवले होते. म्हणजे शत्रू सेनेत Infiltration केले होते. शिवाजी महाराजांची

युद्ध पध्दती केव्हांहि स्थिर ( static ) ठाण मांडून लढण्याची नव्हती. त्याचे मुख्य सूत्र ' वेग ' हे होते. म्हणून त्यांची युध्दपध्दति गतिमान mobile होती. पानिपतापर्यंत मराठ्याची ही पध्दति कायम होती. तोपर्यंत मराठ्यांना यश मिळत गेले. परंतु पुढे ही खास मराठी पध्दत मागे पडली व मराठी सेना अपयशी होऊ लागली.

'बालादपि सुभाषितम् ग्राह्यम्' असे एक वचन आहे. त्यात आणखी एकाची भर घालण्यास हरकत नसावी. शत्रूचेहि ' सुभाषित ' ग्राह्य मानले जावे. शत्रला आपल्या पेक्षा निकृष्ट लेखणे ही युध्द दृष्ट्या मोठी चूक असते. आपले शत्रू दोन आहेत. एक पाकिस्तान व दुसरा चीन. पाकिस्तान हा तर केवळ मुसलमान धर्मांधिष्टित असलेला देश आहे. इस्लाम आणि हिंदुस्थान यांचे परंपरागत शत्रूत्व आहे. चींनचे व आपले आपण स्वतंत्र होईपर्यंत मुळीच वैमनस्य नव्हते. आणि स्वतंत्र झाल्यावर मात्र चीनशी आपल्या पूर्वीच्या चांगल्या संबंधावर भ्रातृ प्रेमाचा नेहरुंनी कळस चढविला. अल्पावकाशात या भ्रात्याचे खायचे दात आपणास दिसले व तो आपला उघड शत्रू झाला. या नव्या शत्रूच्या एका मुत्सद्याने युध्दाविषयी सूत्र-सिध्दांत मांडले आहेत. तो आपला शत्रू असला तरी आपण त्याचे हे सिध्दांत-सुभाषिते ग्राह्य मानावी अशी आहेत. चिनी सन् त्झू म्हणतो "दहास एक असे आपल्या सैन्याचे शत्रूच्या सैन्याशी प्रमाण असेल, तेंव्हा शत्रूला वेढा घाला. पाचास एक प्रमाण असेल तेंव्हा हल्ला करावा. एकास दोन असेल, तेंव्हा शत्रूचे दोन भाग करावे, (म्हणजे दोन आघाड्या उघडाव्या) एकास एक असेल तेंव्हा लढाई द्यावी. आपल्या पेक्षा थोडासा अधीक असेल तेंव्हा त्याला टाळावे, (हुलकावण्या द्याव्या) आणि आपल्या पेक्षा प्रत्येक बाबतीत फार मोठा असेल तेंव्हा पळून जावे. हा युध्दाचा नियम आहे." या चिनी युध्दाच्या नियमांचा शब्दशः अर्थ घ्यावयाचा नसून त्यातले मर्मच फक्त विचारात घ्यावे; व डावपेच आखताना आणि व्यूहाची रचना करताना ते मर्म नजरेसमोर ठेवावे.

-----

# बिनी, आघाडी, पिछाडी, गस्त

आपल्या सेनेचा सुरक्षितपणा हे प्रत्येक सेनापतीचे आद्यकर्तव्य असते. कोणीहि सेनापती जेंव्हा शत्रूच्या 'मागा' वर जात असतो, त्याच्याशी हात मिळवणी व संपर्क साधण्यासाठी कूच करीत असतो, तेंव्हा त्याला **बिनीच्या, बगलेच्या** आणि **पिछाडीच्या** रक्षणाकरता आपल्या सेनेच्या छोटया तुकडयांची योजना करावी लागते. या तुकडयाची नियुक्ती, सर्व बाजूंनी **संरक्षण-करण्याचे काम** याकरता (All round Defence) असते व त्याना संरक्षणाचा पडदा (Protective Screen) असे म्हटले जाते. युध्दाच्या मूलतत्वातील 'सुरक्षितपणा' (Security) आणि 'अनपेक्षितता' (Surprise) ही दोन तत्वे संलग्न आहेत. आपल्या हालचाली, व्यूह रचना, आणि इरादा, यांचा शत्रूला मागमूसही लागू न देता आपल्या फौजेंचे, त्याच्यापासून सर्व बाजूनी रक्षण करणे; आपण बेसावध न सापडणे, आणि योग्य संधी मिळताच शत्रूवर प्रहार करणे; या गोष्टी 'चालून' जाणाऱ्या सेनेने करावयाच्या असतात. शत्रूची कोणतीही हालचाल, आपल्या नजरेतून सुटू देणे, म्हणजे आपल्या संरक्षणात ढिलाई होऊ देणे होय. मुख्य फौज पुढे जात असता 'बिनीची' आणि 'बगलेवरील' संरक्षणाची व्यवस्था करतांना 'शक्तीचा मतव्यय' या तत्वाला महत्व असते. शक्य तितक्या लहानात लहान आणि विशेषतः वेगाने हालचाली करणाऱ्या तुकडयांची, या कामगिरीवर योजना केली जाते. त्यांनी करावयाची कामे म्हणजे, १ शत्रूवर नजर ठेवून, त्याच्या हालचालींच्या खबरा मिळविणे; व त्या आपल्या मुख्य केंद्राकडे पोहचविणे. २ आपली माहिती शत्रूला न मिळू देणे. ३ आगेकूच करीत असतांना युद्धदृष्टया आपल्या पुढील प्रदेशाची पाहणी करून त्याचा नैसर्गिक आणि भौगोलिक तपशील मुख्य केंद्राकडे कळवीत राहणे. ४ शत्रूच्या किरकोळ उपद्रवांचा समाचार घेणे. ५ शत्रूने अधिक जोरदार हरकती केल्यास लढाई देणे आणि आपल्या मुख्य फौजेला तयारीला वेळ मिळवून देणे. ६ आपल्याला सोईच्या परंतु शत्रूला अडचणीच्या अशा परिसरांत, शत्रूला आपल्याशी लढाई देणे भाग पाडणे शक्य व्हावे म्हणून; माऱ्याच्या जागा धरणे, आणि ७ शत्रूला निसटून न जाऊ देणे ही होत. या संरक्षक तुकडयांचे हल्ला करून लढाई देणे, हे काम मुख्य नसते. मुख्य फौजेला ती कामगिरी करावयाची असते. या संरक्षक तुकड्या शक्य तितक्या लहान मुकर केल्या जातात. त्या फार मोठ्या परिसरात विखुरलेल्या असतात. त्यांचा मुख्य केंद्राशी संपर्क असतो. आणि असलाच पाहिजे. परंतु त्यांचा आपसात संपर्क प्रत्येक वेळी नसतो म्हणून हल्ला करणे ही त्यांची कामगिरी नव्हे.

पिछाडीचे संरक्षण करण्याचे दोन प्रसंग उद्भवतात. एक प्रसंग पुढे जात असताना; व दोन आपण काही कारणाने किंवा हेतूने एक जागा सोडून देऊन दुसरी मागील जागा धरीत असताना. माघार घेऊन जागा सोडून देणे म्हणजे पराभवाची कबूली नव्हे. ' माघार घेणे ' ही एक व्यूह रचना असू शकते. हे काम एका दृष्टीने पुढे जाण्यापेक्षा अधिक कौशल्याचे आहे. एखादे वेळी अधिक सोईची आणि बचावाला उपयुक्त अशी दुसरी ' जागा धरणे ' योग्य असते. शत्रूला हुलकावणी देण्याकरता माघार घ्यावी लागते. त्याचा प्रहार चुकविण्याकरता पवित्रा बदलावा लागतो. एखादे वेळी शत्रूच्या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे विस्कळीत झालेल्या आपल्या फौजेची जमावाजमव आणि पुनर्घटना करण्याकरता माघार घ्यावी लागते. आणि असे केल्याने आपल्याला शत्रूवर ' फेर हल्ला ' करण्याची तयारी करता येते. सारांश बिघडलेली घडी पुन्हा बसविणे, आणि पिछाडीचे संरक्षण करणे याकरता माघार घेतली जाते.

माघार घेणे म्हणजे मागे न पाहता, उलट एक एक पाऊल मागे सरकवित जाणे. एक पाय मागे घेऊन तो व्यवस्थित रीतीने मागे टेकला गेला, आणि तो शरीराचा तोल संभाळू शकेल अशी खात्री झाली म्हणजे दुसरा पाय उचलून पहिल्या पायाच्या मागे टेकवणे म्हणजे युद्धातली माघार घेणे होय. आपण हे करीत असतांना, शत्रूने आपल्यावर अधिक निकराने चाल करुन येऊ नये म्हणून पिछाडीच्या संरक्षक तुकडीला शत्रूला गुंतवून ठेवण्याचे काम करावयाचे असते. आणि प्रसंगविशेषी मधले पूल इत्यादिही निरूपयोगी करावे लागतील. सारांश हाच की पुढे जाऊन शत्रूशी संपर्क साधण्या-करता संपर्क साधला, ' हात मिळवणी ' झाली आणि त्याच्यावर चढाई करण्याची मुख्य सेनापतीने योजना आखली, म्हणजे चढाई होऊन शत्रूशी प्रत्यक्ष युद्ध जुंपून, हात घाईची ' हाणा–मारी ' सुरु होईपर्यंत मुख्य फौजेला, सर्व बाजूनी संरक्षणाची आवश्यकता असते. त्या करता १ ) बिनीच्या फौजेच्या लहान तुकडीची योजना होते २ ) बिनीच्या फौजेच्या मागे थोडया अंतरावर आघाडी संरक्षणाची मुख्य योजना करावी लागते. दोन्ही ' बगलावर 'ही, कूच करीत असलेल्या फौजेला उपद्रव न व्हावा म्हणून संरक्षण तुकडयांची योजना करावी लागते. या तुकडयांना ' अॅडव्हान्स गार्ड ' ' मेन गार्ड ' व ' फ्लँक गार्ड ' अशी इंग्रजी नावे आहेत. या शिवाय सैन्य पुढे जात असताना ' पिछाडी संभाळण्याची तजवीज ' हा पिछाडीच्या संरक्षणाचा एक प्रसंग असतो. ज्या वेळी सैन्याला माघार घ्यावयाची असते म्हणजे एक जागा सोडून दुसरी मागची जागा घ्यावयाची असते त्याही वेळी मुख्य फौजेच्या संरक्षणा:करता, पिछाडीच्या संरक्षणाकरता योजलेल्या तुकडीला ' रियर गार्ड ' असे इंग्रजीत म्हणतात. आणि एक एक पाऊल मागे सरकत जाण्याला इंग्रजीत ' Rear Guard

Action ' म्हणतात. सेना पुढे अथवा मागे कोणीकडेही सरकत असो तिच्या संरक्षणाकरता, लहान लहान तुकड्या योजाव्या लागतात. या तुकड्या किती मोठ्या वा लहान असाव्यात, त्यांच्यात आणि मुख्य फौजेत किती अंतर असावे वगैरे तपशीलाच्या बाबी त्या त्या प्रसंगावर अवलंबून असतील. ज्या भागातून सैन्याची हालचाल होत असेल त्या भागातील प्राकृतीक परिस्थितीवर हे अवलंबून राहील. मुख्य फौजेला आपल्या हालचालीत कोणत्याही बाजूने अडथळा होऊ नये, कोठेही तिच्यावर शत्रूचा अचानक हल्ला होऊ नये आणि मुख्य फौजेचे सर्व बाजूनी संरक्षण व्हावे, म्हणून सर्व संरक्षण तुकड्यांना वेगाची हालचाल करावी लागेल. म्हणून त्यांची हत्यारे वगैरे हलकी असली पाहिजेत. त्यांना शीघ्र गतीने हालचाल करता आली पाहिजे. व असे करू शकतील अशांची योजना या करता केली जाते. ' लढाऊ लष्करी वाहने ' हलके रणगाडे या करता फार उपयोगी असतात. पूर्वी या कामावर ' रिसाल्याची ' घोळदळाची योजना केली जात असे. आता रिसाल्याची जागा ' चिलखती लढाऊ वाहनांनी ' (AFV) घेतली आहे.

**गस्त :** ज्या प्रसंगी बचावाच्या धोरणाने सैन्य जागा धरून बसे त्याला प्रसंगीसुद्धा मुख्य सैन्याच्या संरक्षणाची व्यवस्था करावी लागते. या व्यवस्थेला ' गस्त ' इंग्रजीत (Patrol) असे म्हणतात.

गस्तीचे प्रकार तीन आहेत व त्यांना तीन नावे दिली गेली आहेत. ती अशी १ **खडी गस्त** (Standing patrol) २ **टेहेळणी गस्त** (Recces patrol) आणि ३ **लढाऊ गस्त** Fighting patrol. ' खडी गस्त ' या प्रकारात एखाद्या विशिष्ट ठिकाणचे, विशिष्ट काळपर्यंत रक्षण करणे हे काम असते– उदाहरणार्थ मुख्य फौजेच्या मार्गात एखादा पूल आहे आणि त्या पुलावरून पुढे जावयाचे आहे. तर शत्रूने त्या पुलाच्या जवळ पास जागा धरून आपल्या सैन्यावर मारा करू नये म्हणून किंवा तो पूल उडवून देऊ नये म्हणून त्या पुलाच्या रक्षणाकरता अर्थात आपली फौज तो ' पार ' करीपर्यंत आणि त्या पुलाच्या परिसरात, शत्रूने ' मोर्चा ' धरू नये म्हणून त्या पुलावर एका तुकडीची नियुक्ती करणे दुसरे उदाहरण आपल्या सैन्याच्या मार्गात आणि लागून उंचवटे टेकड्या वगैरे असून त्या ताब्यात घेऊन तेथून चालत्या फौजेवर शत्रूला मारगिरी करता येऊ नये म्हणून आपणच त्या ताब्यात घेऊन (तातपुरत्या) तेतून शत्रूवर नजर ठेवणे व शत्रूला तशी ठिकाणे, ताब्यात घेणे आवश्यक करणे; अशा सारख्या बचावाच्या (तातपुरत्या) व्यवस्थेला ' खडी गस्त ' Standing Patrol म्हणतात. ' **टेहळणी गस्त** ' Recce Patrol या प्रकारात शत्रूची ' खबर प्राप्त करून घेऊन, ती सारखी अथवा ठराविक वेळी, ' मागे ' पोहचविणे. परंतु हे करीत असतांना आपली कोणतीही खबर किंवा ' सुगावा ' शत्रूला लाग

न देणे हे काम करावयाचे असते हे काम करीत असतांना हत्यार चालवावयाचे नसते. कारण लढाई देणे हा या प्रकारच्या गस्तीचा उद्देश नसतो. अशा गस्तीत गोळी चालविणे, शक्य तितके टाळावयाचे असते. व सर्व हालचाली शक्य तितक्या 'गुपचुप' लपून छपून व निशब्दपणें करावयाच्या असतात. ३ 'लढाऊ गस्त' Fighting Patrol ही नावाप्रमाणेच लढण्याकरता करावयाची असते. शत्रूने एकदा मोर्चा अगोदरच धरला असेल, व त्यापासून आपल्या फौजेला धोका असेल, तर ती जागा त्याच्यापासून लढून छिनून घेणे; शत्रूच्या गस्ती तुकड्यावर अचानक छापे घालून त्याला 'सतावून सोडणे' विशिष्ट अडचणीची अथवा महत्वाची जागा काही वेळपर्यंत लढवणे; शत्रूने आपल्या मार्गात 'सुरुंग' वगैरे पेरून ठेवले आहेत काय? काही 'अडथळे' अथवा 'सापळे' रचले आहेत काय? यांचा तलास करणे आणि आपली फौज अशा जागी आल्यावर तिच्यावर मारा करण्यास अगोदरपासून योजून बसलेल्या शत्रूच्या लहान लहान तुकड्यावर हल्ला करून त्यांच्याशी लढून, हुसकून देणे अशा तऱ्हेच्या 'धावत्या, पळत्या' चकमकीकरता 'लढाऊ गस्त' योजली जाते. कित्येक वेळी शत्रूचे सैनिक पकडून आणण्याकरताही मुद्दाम 'लढाऊ गस्त' पाठविली जाते. असे कैदी पकडून आणता आले तर त्याच्याकडून शत्रूची पुष्कळच माहिती मिळू शकेल.

गस्तीकरता लहान तुकड्यांची नियुक्ती केली जाते. त्या तुकड्या वेगवेगळ्या मार्गांनी आपल्या सर्वात पुढील मोर्चेबंदीतून शत्रूच्या व आपल्या अज्ञात आणि कोणाच्याच अधिकारात नसणाऱ्या क्षेत्रात (No mans land) संचार करण्याकरता पाठविल्या जातात. त्यांचे जाण्यायेण्याचे मार्ग, कार्यक्रम, संख्या वगैरे प्रत्येक बाबीची सविस्तर माहिती आपल्या सर्वात पुढे असलेल्या संरक्षक मोर्चेबंदीतल्या तुकड्यांना (Foremost defended localities) दिली गेली पाहिजे. त्या गस्ती तुकड्या मोर्चेबंदीतल्या लोकांना व परस्परांना ओळखता याव्या म्हणून 'परवलीचे शब्द' व 'सांकेतिक खुणा' नेमून दिल्या जात असतात. या परवलीच्या आणि सांकेतिक खुणाची काल-मर्यादा आणि परस्परांची ओळख पटवून देण्याची पद्धत ही आगाऊ ठरविली गेली पाहिजे. तसेच हे परवलीचे शब्द वगैरे सारखे बदलीत राहिले पाहिजे. या गस्ती तुकड्यांचे जाण्यायेण्याचे मार्गही निश्चित करून ठेवले पाहिजे. या तुकड्या आघाडीवरील अज्ञात प्रदेशात परस्परांना अचानकपणे भेटण्याची शक्यता असते; किंवा तशा त्या भेटाव्या अशीही व्यवस्था मुद्दाम केलेली असते. अशावेळी परस्परांनी एकमेकाला जे काही पाहिले असेल, कळले असेल ते सर्व सांगणे आवश्यक असते. यामुळे पुढील अज्ञात प्रदेशाची व शत्रूची अनेक प्रकारची माहिती मिळू शकते ताडून पाहून पक्की करता येते.

'गस्त' रात्री तशी दिवसा अशी दोन्ही वेळी घातली जाते. रात्रीच्या गस्ती करता विशेष खबरदारी ध्यावी लागते. गस्त घालणाऱ्या सैनिकांनी धूम्रपान करता कामा नये आगपेटीची काडी पेटविता कामा नये. हे अंधारात लांबून दिसू शकते. कोणी कोणत्याही प्रकारचा ध्वनी अथवा आवाज होऊ देता कामा नये. रात्रीच्या वेळी पायाखाली अंधारात तुडवलेल्या पाल्या पाचोळयाचा, किंवा काडया-काटक्याचा आवाज दूरवर ऐकू जात असतो. म्हणून नेहमीच्या बुटा ऐवजी, रबरी बूट वापरले जातात. शिंक, खोकला सुद्धा, दूरवर आवाज पोहोचवितो. गस्तीच्या सैनिकाजवळ कोणतीही चिट्टी चपाटी, त्याचीं खासगी पत्रे, कुणाचेही फोटो चित्रे, ओळख पटेल अशी एकही वस्तू असता कामा नये. त्या सर्व काढून, गोळा करुन, जाण्यापूर्वी ठेऊन दिल्या पाहिजेत. कारण शत्रू 'गस्त' पकडण्याचा संभव असतो. गस्तीचे सैनिक निवडक असले पाहिजेत. त्यांचे कान व दृष्टी अतिशय तिखट असली पाहिजे. ते अतिशय चपळ असले पाहिजेत. आणि 'मनाचे मजबूत' असले पाहिजेत. पकडले गेल्यास त्यानी वाटेल तो छळ झाला तरी आपल्या सेनेविषयी यत्‌किंचितही माहिती शत्रूला देता कामा नये. तसेच त्यांनी शत्रूच्या आमिषांनाही बळी पडता कामा नये. गस्तीचे मुख्य काम शत्रूची माहिती मिळवणे व आपल्या हालचालीची व सैन्याची कोणत्याही प्रकारची माहिती, शत्रूला न मिळू देणे; हे असल्यामुळे आपल्यावर शत्रूची गोळी चालली तरीही प्रतिकार तर नव्हेच, परंतु स्वरक्षणा-करताही आपली गोळी चालविणे अक्षम्य ठरते. कारण आपल्या गोळीबाराने आपली जागा शत्रूला घेरता येईल; व त्याला आपल्या विषयी माहिती मिळ-विण्याचा 'धागा' सापडेल. गस्तीत सुताने-स्वर्गाला जाण्याची धूर्तता व चापल्य लागते. म्हणून गस्तीत अत्यंत 'संयमी' सैनिकांची व नायकांची नेमणूक केली गेली पाहिजे. दिवसा विमाने वरून पाहू शकतात. रात्री अंधारात गती मंदावते. दोन्ही वेळची गस्त निराळया प्रकारांनी कठीण असते. गस्तीच्या पथकाला आपल्या सैन्याच्या रात्रींच्या 'पक्क्या केलेलेल्या गोळीच्या मारगिरीच्या दिशा' आणि 'लक्ष्ये' यांची माहिती असली पाहिजे. कारण काही अनपेक्षित घडून आल्यास, व कोठून धोक्याची सूचना मिळाल्यास आपल्या मोर्चातून रात्रीचा Fixed line of sights वर आपोआप एकदम गोळीबार सुरु होतो. तो नेम धरुन केलेला नसतो. या गोळीबाराच्या 'दिशा' आणि 'लक्षे' माहीत नसल्यास गस्तीची तुकडी आपल्याच गोळीबारात सापडून गारद होईल; म्हणून गस्तीला आपल्या हालचाली व मोर्चेवाल्यांनी आपल्या योजना, परस्पराना समजावून दिलेल्या असल्या पाहिजेत. गस्तीच्या तुकडीलाही पुढे चाचपडत जावे लागते. तिलाही आपल्या संरक्षणाची किमान पक्षी 'सूचना' मिळण्याचीं आवश्यकता असते, म्हणून आपल्या पुढे काही अंतरावर दोन सैनिक टेहेळणी करता नेमावे लागतात. ते नेहेमी दोन असले पाहिजेत, शक्यतोपर्यंत

एकट्याला पुढे पाठवू नये. कारण दोनपैकी एक पकडला गेल्यास, अडचणीत सापडल्यास, दुसरा माघारी येऊन, पुढील घटनेची मागल्या. नायकाला सूचना व माहिती देऊ शकतो. यांना Scout म्हणतात. दिशा कायम ठेवण्यातही Scout उपयोगी असतो. रात्री तारे वगैरे ओळखणारे सैनिक गस्तीकरता उपयुक्त असतात.

या सर्व वर्णनाचा व विवेचनाचा निष्कर्ष एकच आहे की, युद्धात सैन्य पुढे जात असो, एक ठिकाण सोडून दुसऱ्या जागी जात असो, माघार घेत असो, किंवा मोर्चे-बदो करून बचावाच्या पवित्र्यात, जागा धरून बसलेले असो, सर्वकाळ सर्व बाजूने त्याच्या संरक्षणाची काळजी व दक्षता, घ्यावी लागते. आणि आता वायू-सेनेमुळे आणि लांब पल्ल्याच्या तोफा, स्वयंचलित रायफली, वगैरे शस्त्रास्त्रांमुळे, ही काळजी वाढली आहे. याला एकच प्रसंग अपवाद असतो, आणि तो म्हणजे हातघाईची लढाई. त्या वेळीच काय ते सर्व बाजूचे संरक्षण आणि बचाव All round Protection and All round Defence शक्य होत नाही. आणि न केला तर चालू शकते. कारण त्या वेळीं शत्रूचा 'पूर्ण नाश' या या एकाच 'लक्ष्या'वर सर्व लक्ष व सर्व शक्ति एकाग्र केलेली असते.

युद्धाच्या वेळीच गस्तीची जरूरी असते असे नाही. देशाच्या सीमेलगतचे शेजारी देश, 'उपद्रवकारी' असले, त्यांच्याकडून 'सीमा-भंग' होत असले, आणि होण्याची शक्यता असली, तर शांततेच्या काळातही 'गस्त' आवश्यक असते. **पाकिस्तान** आणि चीन या दोन शत्रु देशांच्या आणि आपल्या देशांच्या सीमा परस्परांना भिडलेल्याच असून शत्रू त्या मानावयास तयार नाही. याकरता, आपल्याला सीमांवर अहोरात्र 'गस्त' ठेवावी लागत आहे. व तिन्ही प्रकारची— म्हणजे १ 'खडी' standing २ '**टेहळणीची**' Recee आणि ३ 'लढाऊ' fighting अशी ठेवणे, आपल्याला जरूरीचे आणि कायमचे होऊन बसलेले आहे.

———————

# हल्ला, बचाव, मोर्चेबंदी व माघार

"Attack is fire that advances, Defence is fire that stands" —*French Regulations*

"हल्ला (Attack). शत्रूशी सलामी झाली, संपर्क प्रस्थापित झाला म्हणजे, पुढचे त्याच्याशी लढण्याचे कर्तव्य समोर उभे राहने. त्याकरता त्याच्यावर हल्ला करण्याची योजना आखावयाची असते. हल्ला करण्याचा हेतू शत्रुला बेजार करणे, त्याचे शक्य तितके नुकसान करणे, त्याने 'धरलेली' जागा आपण त्याच्यापासून हिसकावून घेऊन त्याला तेथून पळ काढावयास लावणे हा होय.

हल्ल्याचे मुख्य सूत्र 'आक्रमक क्रिया' (offensive Action) हे आहे. सेनापतीपासून तो शेवटल्या जवानापर्यंत ही 'तुटून पडण्याची' प्रखर वृत्ती जितक्या धडाडीची आणि सारखी कायम राहील तितकी 'धडक' जोराची होईल. अतिशय सूसाट वेग, चपळाई आणि निर्धार, ही हल्ल्याची **त्रिसूत्री** आहे. म्हणून हल्ल्याची योजना आखताना ज्या महत्वाच्या गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत त्या अशा (१) शत्रूविषयी–त्याच्या ताकदीविषयी आणि त्याच्याकडे असलेल्या सैन्याच्या प्रकाराविषयी आणि संख्येविषयी माहिती (२) आपल्या सैन्याचे मजबूत आणि पक्के केंद्र (३) शत्रूच्या सैन्याच्या मुकाबल्याच्या दृष्टीने आपले संतुलित सैन्य (Balanced force) (४) आपल्याला वायुसेनेकडून मदत (५) आपल्या दुसऱ्या विभागांशी सहकार्य (६) शत्रूच्या कमजोर आणि नाजुक ठिकाणांची माहिती. (७) आपले शक्तीचे एकाग्रीकरण (८) आपल्या हल्ल्याची 'अक्षरेषा' (९) आपल्या सैन्याच्या प्रत्येक लहान मोठ्या अधिकाऱ्याला आपल्या योजनेची, आदेशाची आणि आपआपल्या कामगिरीची सुस्पष्ट उमज, उकल, आणि जाणीव; आणि शेवटी व सर्वात महत्वाची आणि शेवटपर्यंत कायम टिकणारी (१०) निर्धाराची आणि चढाईची वृत्ती या आहेत, आणि अशा रीतीने निकाराचा हल्ला झाल्यानंतर आपल्या सैन्याविषयीची महत्वाची गोष्ट म्हणजे 'पुनर्व्यवस्था' ही होय. आणि शत्रूच्या संबंधातील गोष्ट म्हणजे त्याच्यापासून हिसकाऊन घेतलेल्या ठिकाणाची त्याच्या 'फेर हल्ल्याच्या' तयारी करता आणि आपल्या पुढील प्रगतीकरता जिंकलेल्या जागेची 'मजबूती.' या दोन्ही गोष्टी आपल्या सैन्याच्या मनोधैर्याला आणि आपल्या सैन्याच्या अंतिम उद्दिष्टाला पोषक ठरतात.

हल्ल्याचे मुख्य प्रकार असे आहेत– **चाचणी करता** म्हणजे शत्रूची ताकत अजमावण्याकरता. अशा प्रकारचा हल्ला अतिशय चपळाईने करावयाचा असतो.

या हल्ल्या करता वेग आणि धडक देऊन पसार होणे हे महत्वाचे असते. यात गुंतून पडावयाचे नसते. हा हुलकावणी म्हणूनही करता येतो. हाच तो मराठ्यांच्या ' गनीमी ' युद्धाचा मुख्य प्रकार होता. २ सर्व शक्तीनिशी केलेला **निकराचा हल्ला.** या प्रकारात आपल्या सैन्याच्या निरनिराळ्या प्रकारांचे आणि विभागांचे उत्तम सहकार्य असले पाहिजे. ३ **रात्रीचा** अंधारातला हल्ला. ( या प्रकाराचा अधीक विस्तार पुढे येईल ) ४ **मावळतीचा हल्ला**–असा हल्ला करताना कमी कमी होत जाणाऱ्या उजेडाचा पूर्ण फायदा पदरात पाडून घेणे हे ध्येय असते. कारण ह्याचे रुपांतर रात्रीच्या हालचालीत होत असते. रात्रीच्या अंधारातल्या हालचालींचे विशेष तंत्र असते. हा निसटत्या चाचणीच्या हल्ल्याचा प्रकार आहे. अशा हल्ल्यात शत्रु अत्यंत सावधगिरीने वागतो. कारण त्याच्या समोर रात्रीचा अंधार असतो. ५ **उजाडता हल्ला**–हाहि निसटत्या चाचणीच्या हल्ल्याचाच प्रकार आहे. मावळतीच्या हल्ल्याच्या अगदी उलट परिस्थिती यां वेळी असते. झुंजुमुंजु दिसू लागताच किंवा थोडे अगोदरही अंधाराचा किती फायदा किती वेळ मिळू शकेल, याचा अंदाज घेऊन हा हल्ला योजावा लागतो. या प्रकारात आपल्याला अतीशय सावधगिरी बाळगावी लागेल. सूर्याचा उदय होऊन स्वच्छ दिसू लागण्याच्या आंत छापा मारून निसटून नाहीसे होणे हे हल्ल्याचे सूत्र असते.

हल्ल्याचे टप्पे तीन असतात पहिला टप्पा तयारी. दुसरा तुटुन पडल्यावरची हात घाईची लढाई आणि तिसरा हल्ला यशस्वी झाल्यावर आपल्या फौजेची पुनर्व्यवस्था व रचना. पुनर्व्यवस्था म्हणजे जखमी अथवा मृत सैनिकांची व्यवस्था. तुकड्यातील कमी झालेल्या मनुष्यबळाची तूट भरून काढणे. थकलेल्यांना आरामाची व्यवस्था करणे, खर्च झालेल्या दारुगोळ्याची भरपाई करणे, शस्त्रास्त्रांची भरपाई व दुरुस्ती आणि अशा तऱ्हेच्या इतर सर्व त्रुटी पूर्ण करून व शिवाय अनुभवाने कळून आलेली कमजोरी व उणीवा भरून काढून पूर्वी पेक्षाहि जय्यत तयार होणे. ही पुनर्वव्यवस्था वा पुनर्रचना करीत असतांनाच आणखी दोन गोष्टी करावयाच्या असतात आणि त्या उत्तम प्रकारे पार पडण्या-वर पुनर्व्यवस्था निर्भर राहू शकते. यापैकी पहिली गोष्ट म्हणजे मिळालेल्या यशाचा पूरेपूर फायदा घेण्याकरता शत्रूचा पाठलाग करणे ही होय. हा पाठलाग मोठ्या चातुर्याने केला पाहिजे. कारण पाठलाग करायला सर्वच फौज उपयोगात आणावयाची नसते. लढाईचे उद्दिष्ट साधारणपणे एकादे मोक्याचे ठिकाण काबीज करणे, शत्रूला तेथून पिटाळून लावणे हा असतो. म्हणून काबीज केलेल्या ठिकाणाचे संरक्षण करणे हे मुख्य कर्तव्य ठरते. येवढ्या करता म्हणजे त्या जागेवर शत्रूने फेर हल्ला करून ते ठिकाण परत घेऊ नये म्हणून त्याच्या संरक्षणाकरता फौजेची गरज असते. व त्या करता शत्रूच्या पाठलागावर सर्व

फौज पाठवणे चूक असते. परंतु पाठलाग करावाच लागतो. आणि शत्रूला घेतलेल्या ठिकाणापासून शक्य तितके दूर ठेवण्याने त्याला आपल्यावर एकदम फेर-हल्ला चढवता येणार नाही. याशिवाय पाठलागामुळे त्याची रचना आणि व्यवस्था अधिकच विस्कळित होऊन शत्रूचा त्याच्या फौजेवरचा ताबा आणि नियंत्रण सुटून त्याच्या कडून फेर हल्ल्याची शक्यता कमी होईल. व आपल्याला आपल्या फौजेच्या पुनर्व्यवस्थेला व पुनर्रचनेला अवसर व अवकाश मिळेल. परंतु पाठलाग कोठपर्यंत करावयाचा, याची कमाल मर्यादा आगाऊच ठरवून ठेवणे योग्य होईल. नाहीपेक्षा भान न राहून पाठलाग करणारी तुकडी फार पुढे गेली तर तिचा मुख्य फौजेशी संपर्क नाहीसा होईल. तिला कोणीहि मदत करू शकणार नाही. कदाचित ती पाठलाग करणारी तुकडी एकटी पडल्याने तिच्यावर शत्रू परत हल्ला चढवून तिला नेस्तनाबूत करू शकेल. म्हणून **शत्रूच्या पाठलागात संयम राखला गेला पाहिजे**. तो जर राहिला नाही तर ती पाठलाग करणारी तुकडी एक तर स्वतःच नामशेष होईल किंवा पाठलागाच्या धुंदीत दिशाभूल होऊन कोठे तरी भलत्याच क्षेत्रात जाईल. शत्रूचा हाच प्रयत्न असू शकेल. आणि मुख्यतः मुख्य फौज उघडी पडेल. कारण पाठलाग करणारी तुकडी मुख्य फौजेला समोरील बाजूवर एक प्रकारचा संरक्षक पडदा ( A defencive screen ) आपोआपच बनते व संरक्षणाचे काम करते. व अशा संरक्षित अवस्थेत पुनर्व्यवस्थेचे काम बिनधोक होऊ शकते. म्हणून सेनापतीने पाठलागाला मर्यादा घालून दिली पाहिजे. आणि पाठलाग करणाऱ्यांनी संयम ठेऊन तिचे उल्लंघन करता कामा नये.

सेनापतिने आपले प्रत्येक उद्दिष्ट साध्य होताच **विजयाचा संदेश** सर्व संबंधितांनाबंगले वरील पिछाडीवरील तसेच आपल्यापेक्षा वरिष्ठाकडे तावडतोब पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे. हा यशाचा संदेश पाठविण्याचे सर्वांत सोपे आणि बिनचुक तसेच सर्वात त्वरेचे साधन म्हणजे पूर्व नियोजित रंगित काडतुसे उडविणे (Very lights) हा आहे. हा संदेश सर्व सैन्यात एकदम चेतना आणि उत्साह निर्माण करून मुख्य सेनापतिला पुढील डावपेच आणि हालचाली निःशंक मनाने आखण्यास अतिशय उपयुक्त ठरतो.

हल्ल्याचा प्रकार कोणताही असो प्रत्येक हल्ल्यात तुटून पडावयाच्या अगोदर आणि शत्रूवर तुटून पडून हातघाईची लढाई चालू असताना; आणि नंतर ज्या गोष्टी ज्या क्रमाने व तपशीलाने करावयाच्या असतात त्या सारख्याच असतात. त्या क्रमवार अशा १ युद्ध क्षेत्राची–शत्रू असलेल्या क्षेत्रीय पाहणी आणि अभ्यास. २. शत्रू विषयीची सर्व प्रकारची माहिती व खबर ( हे काम गस्ती तुकड्याकडून करविले जाते. ३. आपल्या फौजेला एकत्र होण्यास सोईची जागा निवडणे ४. आपल्या फौजेच्या कामगिरीनुरूप योजलेल्या विभागांना आणि

लहान लहान तुकड्यांना आपआपल्या उद्दिष्टांच्या पूर्तीकरता आगेकूच करण्यास सोईच्या जागांची निवड आणि सुरवातीच्या मुहुर्ताआधी त्यांची तेथे तयारीने राहण्याकरता रवानगी ५ आपल्या तुकड्यांना परस्पर साहाय्य मिळण्याची योजना. (जसे चालून जाणाऱ्यांना मशीनगन किंवा आणि तोफखान्याची मदत वगैरे) ६ आपल्या स्वतःच्या केंद्राची (Head Quarters) ठिकाणे व पुढे सरकण्याची दिशा. ७ अंतर्गत लगावट व दळण वळण व्यवस्था (जसे बिनतारी संदेश, टेलिफोन, सांकेतिक खुणा वगैरे). तुटून पडून लढाईची धुमश्चक्री चालू होताच ज्या गोष्टी सेनापतीनें कौशल्याने आपल्या फौजेचे नियंत्रण व मार्गदर्शन करीत असतांना योजावयाच्या असतात. त्यापैकी मुख्य गोष्टी म्हणजे १ लढाईला तोंड लागताच शत्रूच्या फळीच्या आत शक्य तितक्या अधिक ठिकाणी आणि त्याच्या हेरुन ठेवलेल्या नाजूक आणि कमजोर जागांत आपले सैनिक घुसवणे २ हे जितके अनपेक्षितपणे करता येईल तितके करुन शत्रूला चकित करणे ३ शत्रूच्या फळीत घुसणे आणि त्याला हातघाईच्या, एकमेकास भिडलेल्या लढाईस भाग पाडणे (असे झाले म्हणजे अंतरावरचा गोळीबार बहुतेक थांबतो व हातबाँब आणि संगीनीचा मारा होतो ४ शत्रूची फळी फोडून पार करुन पुढे जाणे (असे झाल्याने शत्रू विस्कळीत होतो व त्याचे मनोधैर्य ढासळते) ५ ठाणे जिंकताच ताब्यात घेऊन त्याची मजबुती करणे, पाठलाग करणे आणि आपली पुर्नर्व्यवस्था व पुनर्रचना करुन आपल्या संरक्षणाची तजविज करणे आणि वरिष्ट सेनापतिच्या योजनेप्रमाणे व आदेशाप्रमाणे पुढील मजलेकरता अथवा कामगिरीकरता तयार राहणे.

हल्ला म्हणजे शत्रूवर चालुन जाऊन त्याच्यावर तुटून पडणे असे जरी मुख्यतः त्याचे स्वरुप असले तरी त्यात पुढील बचावाचीहि व्यवस्था अंतर्भूत असते. **हल्ला हा शेवटी बचावात रूपांतरीत होतो.** कारण कोणीही केव्हाही सारखे पुढे पुढेच जाऊ शकत नाही. कोठे तरी त्याला थांबावेच लागते आणि थांबताच बचावाची तजवीज आवश्यक होते. पुढे जात असतांना आपल्या संरक्षणाची जशी काळजी घ्यावी लागते तशीच थांबल्यावरही संरक्षणाची योजना करावी लागते. याचा अर्थ हा की **मारता मारता पुढे जात असता आणि मारल्यानंतरही बचावाची योजना युद्धाच्या प्रत्येक प्रसंगी केली पाहिजे.**

**बचाव** (Defence)

'Defentce is attack halted' बचाव म्हणजे थांबलेला हल्ला असे बचावाचे एका शब्दात वर्णन करता येते. पहिल्या महायुद्धात फ्रान्समधे **जर्मन** आणि दोस्त फौजा समोरासमोर खंदकात बसून एकमेकावर क्वचित गोळी बार करण्याची 'बैठी लढाई' खेळत असताना लार्ड हेग यांनी आपल्या एका खलीत्यात असे म्हटले होते " A purely defencive attitude can

never bring about a successful decision either in a battle or a campaign." केवळ नुसताच बचाव कोणत्याही लढाईत अथवा मोहीमेत यशस्वी निर्णय घडवून आणू शकत नाही. हे जरी खरे असले तरी प्रत्येक सेनापतीला वेळोवेळी बचावाचे धोरण स्विकारावे लागतेच परंतु बचाव हा फक्त 'तात्पुरता असतो. बचावाचे धोरण स्विकारण्याचे अनेक प्रसंग येतात. व अनेक कारणेही असतात १ विस्तृत आघाडीवर एखाद्या विवक्षित ठिकाणावर हल्ला चढविण्याकरता दुसऱ्या एखाद्या जागी बचावाची व्यवस्था करावी लागते. २ हूल दाखविण्याकरता एखाद्या ठिकाणी आपण बचावाचे धोरण स्विकारुन आपण आता आपला आक्रमक पवित्रा थांबवला आहे असे शत्रूस भासवून अनपेक्षित ठिकाणावर हल्ला करता यावा म्हणून ३ आपले सामर्थ्य शिलकेत ठेऊन शत्रूला दमवण्याकरता ४ दमलेल्या शत्रूच्या निस्तेज पडलेल्या हल्ल्यातून बचावून परत ताज्या दमाने चढाई करण्याकरता ५ लढून घेतलेले ठिकाण मजबूत करण्याकरता वगैरे. प्रत्येक हल्यानंतर विश्रांती व पुनर्व्यवस्था आणि पुनर्रचनेकरता बचावाची व्यवस्था करावी लागते. बचावाच्या व्यवस्थेतली मुख्य बाब आणि काळजी ही, की बचावाचा समतोल कोठेही बिघडू देता कामा नये. म्हणजे तो सारखा असावा आणि त्यात नाजुक ठिकाणे आणि कमजोरी कोठेहि राहू देता कामा नये.

साधारणपणे बचावाचे मुख्य प्रसंग दोन असतात. एक. झपाट्याच्या लढाईतला मधल्या टप्प्यावरचा घाईचा बचाव व दुसरा 'स्थिर–युद्धाचा', धोरण म्हणून, अथवा नाइलाजाने विचारपूर्वक केलेला बचाव. पहिल्या महायुद्धातल्या मेसापोटेमिया आणि मध्य पूर्वेतले बचावही पहिल्या प्रकाराचो उदाहरणे आहेत आणि फ्रान्स मधील खंदकांची बैठी लढाई हे दुसऱ्या प्रकाराचे उदाहरण आहे. शिवाजी महाराजांनी जशी धावती गनिमी मारगिरी केली तशीच धावती पळती बचावाची व्यवस्थाहि केली. त्यानी एका ठिकाणी किल्ले वगळून, कोठेहि पक्का बचाव करण्याचा प्रयत्न केला नाही. निसटून जाणे, हे त्यांचे धोरण असल्याने मराठी फौज फार क्वचित कोंडीत सापडली व तिला प्रदीर्घ बचाव करावा लागला नाही. मराठ्यांनी घेरा पडलेले किल्ले लढवले पण अनेक प्रसंगी ते सोडून देण्याचीहि मुत्सद्देगिरी दाखवली.

निर्धार, शक्तीचा मितव्यय, प्रतिकाराची पराकाष्ठा, आणि संरक्षणाची 'सघनता' ही बचावाची चतुःसूत्री आहे. यापैकी निर्धार आणि प्रतिकाराची पराकाष्ठा ही सूत्रे एकमेकात मिसळून त्यांचे एकच सूत्र बनू शकेल. हल्ल्यात ज्याप्रमाणे सर्व शक्ती एकवटून धडाडीनें तुटून पडावयाचे असते, त्याचप्रमाणे बचावालाहि शत्रूशी निकराची झुंज देण्याचा मनाचा निर्धार लागतो. आणि तो **शक्तीचा कणकण** खर्चून पार पाडायचा असतो. बचावात " Last man

and last Round" "शेवटला मनुष्य आणि शेवटली गोळी" असे निकराने आणि चिवटपणाने लढावयाचे असते. 'सघनता' ज्याला इंग्रजीत Defence in Depth असे म्हणतात, ती एक व्यूह रचना आहे. बचावाच्या फौजेच्या आघाडीच्या मागे शिलकी फौजेची अशी रचना करावयाची, की पुढील तुकड्यामधील खिंडी भरुन काढून, आत घुसू पाहणाऱ्या, किंवा घुसणाऱ्या शत्रूला प्रतिहल्ला करुन मागे हटविता यावे, किंवा त्याच्या काही तुकड्या, बऱ्याच आत शिरल्यास त्यांची कोंडी करुन त्यांचा त्यांच्या दुसऱ्या तुकड्याशी संपर्क तोडून टाकून, त्यांचा नाश करता यावा.

बचावाच्या धोरणाचा सेनापतीने पक्का विचार केल्यावर, बचावाच्या क्षेत्राची निवड हा महत्वाचा प्रश्न सेनापतीनें दूरदर्शीपणाने आणि कौशल्याने सोडवावयाचा असतो. या क्षेत्राच्या निवडीकरता ज्या मुख्य गोष्टींचा विचार करावा लागतो त्या अशा-(१) क्षेत्र सर्व बाजूनी संरक्षण करता येईल असे असले पाहिजे. (२) अडचणीच्या आणि नाजुक जागा शक्य तितक्या कमी असल्या पाहिजेत. (३) क्षेत्र फार मोठी फौज लागेल येवढे विस्तीर्ण असता कामा नये. तसेच आपल्या हालचालींना अडचण होईल आणि शत्रूला आयतेच आपल्याला लहान जागेत कोंडता येईल इतके लहान नसले पाहिजे (४) संरक्षणाची सघनता साधता येईल असे, म्हणजे, आपल्या लहान मोर्च्यांच्या जाळ्यात, शत्रूला आत आपल्या घेऱ्यात कोंडता येईल अशी 'खोल' रचना करता येण्याच्या सोईचे असले पाहिजे. (५) आपल्याला संधी मिळताच निसटून जाता येईल असे. (६) आपला बाहेरशी, आपल्या फौजेशी, आणि वरिष्ट केंद्राशी संपर्क तुटणार नाही असे. (७) बचावाच्या दृष्टीनें भोवतालून आणि वरुनहि आडोसा आणि नजरबंदी होऊ शकेल असे. (८) कृत्रिम अडथळे, खंदक आणि मोर्चे, बांधता येतील असे. (९) आपल्या मोर्चातून एकमेकांच्या समोरील भागांवर लहान मोठ्या मशीनगन्स्चा मारा करता येऊन, कोणतीही 'बिना-माऱ्याची जागा सुटू नये असे, व आपल्या माऱ्यात अडथळा येऊ नये असे. (१०) शत्रूला एकवटून हल्ला चढविता येणार नाही, व त्याला आपल्यावर विभागून व विभागशः चढाई करावी लागेल, म्हणजे त्याचे लहान लहान तुकडे पडून हल्ल्याचा विस्तार वाढला, तरी जोर कमी होईल, असे. (११) आपल्याला आपल्या मुख्य बचावाच्या क्षेत्रापलीकडे एक लहान मोर्चाची सर्वात पुढची तुरळक संरक्षक पडद्यासारखी फळी उभारता येईल असे. (१२) शत्रू चाल करुन येण्याच्या संभाव्य मार्गांवर अडथळे उभे करता येतील, सुरुंग जमीनीत पेरुन ठेवता येतील, (Laying mine fields) असे. अशा अनेक दृष्टीने बचावाचे क्षेत्र निवडावे लागेल.

प्रत्येकालाच युद्धात जय प्राप्त करून घेण्याची ईर्षा असते. नुसत्या बचावाने जय केंव्हाही मिळत नाही. परंतु युद्धाच्या डावपेचात बचाव करणे हेही महत्वाचे

आहेच. आणि प्रसंगोपात बचावाचे धोरण स्विकारावेच लागते. तेव्हा बचावाचा डाव टाकतांना फेरहल्ला, पुनश्च लढाई, डोळ्यासमोर राखूनच एकादी जागा धरून बसावयाची असते. ही जागा धरीत असतांना ती संधी येताच सोडून द्यावयाची आहे हे धोरण मुख्य असते. एवढ्याकरता बचावाच्या सघनते बरोबरच आपल्या वेगवान विभागाला (रणगाडे, लढाऊ वाहने वगैरेच्या संचाराला आणि बाहेर पडून बाहेरून शत्रूवर माराकरता येण्याला अडचण न होऊ देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. आणि सघनतेच्या व्यूहात चढाई करणाऱ्या शत्रूला आत आत खेचून त्याला गाऱ्यावर ( Killing Ground ) आणून त्याच्यावर 'फेर हल्ला' बचावाच्या व्यूहाचे चपळाई करून आक्रमणात रूपांतर करावयाचे असते. या धोरणाने बचावाची व्यूहरचना व मांडणी करणे हे बचावाचे तंत्र आहे. हल्ल्यापेक्षा बचावाला जास्त दूरदर्शीपणा, योजकता आणि कौशल्य लागते. म्हणून बचाव हल्ल्यापेक्षा कठीण असतो.

मोर्चेबंदी हा बचावाचाच एक भाग असतो. मोर्चेबंदीचे प्रकार दोन असतात. एक तात्पुरती व दुसरी पक्की. पक्की मोर्चेबंदी बचावाची परिस्थिती दीर्घकाल टिकणारी झाली, तर पक्क्या बचावात रुपांतरीत होते. परंतु मुख्य फौजे पासून बरेच पुढे असलेले तिचे स्थान कायम राहते. मोर्चेबंदीचे हेतू तीन असतात. ( १ ) आपल्या सैन्याच्या शक्य तितक्या मोठ्यात मोठ्या भागाला शक्य तितकी विश्रांती मिळवून देणे ( २ ) आपल्या फौजेची शत्रूला काहीही खबर मिळू नये म्हणून त्याला मुख्य फोजेपासून शक्य तितके दूर ठेवणे आणि हे करीत असतानाच शत्रूची सर्व प्रकारची शक्य तितकी माहिती मिळविणे ( ३ ) शत्रूच्या निकराच्या हल्ल्यास तोंड देण्यास किंवा प्रसंगी बचावाचे धोरण सोडून शत्रूवर चालून जाण्याची संपूर्ण तयारी होण्यास संधी व अवधी मिळवणे याचा अर्थ शत्रूला शक्य तितके दूर आणि प्रसंगानुरूप आपल्या लांब पल्ल्याच्या शस्त्रांच्या माऱ्यातही येऊ देणे. ( ४ ) शत्रूच्या लांब पल्ल्याच्या तोफखान्याच्या माराबाहेर आपली सेना राहील इतक्या दूर त्याला थोपवून धरणे व गुंतऊन ठेवणे. या हेतूच्या पूर्तीकरता मोर्चेबंदीत योजलेल्या आणि नियुक्त केलेल्या सेनेला दोन कामे करावयाची असतात. पहिले काम प्रतिकार करणे, आणि दुसरे 'खबर' मिळविणे.

प्रतिकार किती आणि कसा करावयाचा हे मुख्य फौजेच्या बचावाच्या धोरणावर अवलंबून असते. बचावाचे धोरण जर दीर्घ कालीन होण्याची शक्यता असेल तर बचावासारखाच निकराचा Last round last man असा कडवा प्रतिकार करणे हे मोर्चेबंदीच्या पक्षकांचे कर्तव्य असते. बचाव तात्पुरता आणि मर्यादित असेल तर मोर्चेबंदीच्या पथकालाहि आपला प्रतिकार मुख्य फौजेच्या धोरणानुसार आणि जरूरी प्रमाणे आवश्यक तितकाच आपल्या बचावाचे महत्व न विसरता शिथिल करावा लागेल.

मोर्चेबंदी जर तात्पुरती असेल तर ती 'गस्ती' ( Patroling ) सारखी होईल व त्यात शत्रूची माहिती मिळविणे हा भाग प्रमुख राहील. या मोर्चेबंदीच्या कार्यास नियुक्त केलेल्या फौजेचे मुख्य सूत्र 'आपण पहावे परंतु दिसू नये' ( To see but not be seen ) हे असले पाहिजे. म्हणून दिवसा उजेडापेक्षां रात्री अंधारात हालचाली करणे अधीक चांगले. सकाळचा व संध्याकाळचा संधी-प्रकाशही या कामाला उत्तम ठरतो. तात्पुरते खंदक खणणे मशीनगन्सच्या माऱ्याची ठिकाणे निवडणे, शत्रूपासून ती लपवणे, ठळक ठळक लक्ष्ये दिवसाच टिपून ठेवून त्यांच्या अनुसंधानाने माऱ्याच्या जागांचे अंतर व मोजमापाचा हिशोब करून रात्री अंधारात ( नेम न धरता–कारण शक्य नसते म्हणून ) पक्क्या गोळीबारांच्या 'रेषा' आणि 'डाव्या उजव्या माराची, 'मर्यादा' ठरविणे ( fixed line of sights and traverses ) अशा गोष्टी संधि-प्रकाशात करता येतात व केल्या पाहिजेत. यात सुरक्षितता security या युद्ध तत्वाला प्राधान्य असते. मोर्चेबंदी ही नुसती पुढे धरलेली संरक्षक ढाल असते. तो एक संरक्षक पडदा असतो. शत्रूला ती निष्फळ करणे मोठेसे कठीण जाणार नाही. त्याला आपल्या रणगाड्यांनी मोर्चेबंदी रगडून टाकता येईल किंवा तोफखान्याने उध्वस्त करता येईल. म्हणून मुख्य फौजेच्या सेनापतीने आपली फौज निमिषार्धात युद्धास उभी राहू शकेल अशा व्यूह रचनेत मांडली पाहिजे व तिच्या आरामाची व्यवस्था व्यूहातल्या नियुक्त स्थळावर केली पाहिजे.

मोर्चेबंदीत व पक्क्या बचावाच्या योजनेत तत्वत: तसा फरक नसतो. मोर्चेबंदी सुरुवातीस जरी तात्पुरती असली तरी ती तशी राहणे न राहणे, शत्रूच्या हालचालीवर अवलंबून राहील. शत्रूने बचाव धरून बसलेल्या फौजेवर निकराचा हल्ला केल्याशिवाय युद्धाचा निर्णय लागणार नाही. परंतु उभय-पक्षी एकमेकांची भिती, हालचालींची अनिश्चितता आणि सामर्थ्य तुल्यबल असल्यास किंवा प्रादेशिक नैसर्गिक परिस्थिती उभयतांनाहि सोईची नसल्यास आपआपली मोर्चेबंदी करून समोरासमोर महिनेच्या महिने, आपले मोर्चे व खंदक धरून बसल्याचे उत्तम उदाहरण पहिल्या महायुद्धात युरोपमध्ये विशेषत: फ्रान्समधे पाहावयास सापडते. या उलट मध्य एशियातील युद्धात अशा बैठ्या मोर्चेबंद्या कोणी केलेल्या नाहीत. अशा परिस्थितीत फार तर परस्परावर रात्री बेरात्री एकादा भुरटा हल्ला करून, परत आपल्या खंदकात अथवा आडोशात उभय पक्षाचे सैनिक लपत असत. परंतु आता नव्या वेग युगात आणि वायूसेनेच्या आकाशातील धोक्यामुळे दीर्घकालीन मोर्चेबंदी, व बचावाची व्यूहरचना शक्य नाही.

ज्या प्रमाणे नुसती जमीन धरून बसण्याने यश मिळत नाही; त्याच प्रमाणे नुसते हल्लाच करीत राहण्यानेही 'बिळात' लपून बसून चोरटा व भुरटा उपद्रव देणाऱ्याचाही पूर्ण नाश होऊ शकणार नाही. असा सारखा हल्लाच करीत राहणे, भिंतीवर डोके आपटीत राहण्यासारखे ठरेल. व शेवटी हल्ला थांबवून

मोर्चात बसलेला शत्रू बाहेर येण्याची कंटाळवाणी आणि उत्साहावर विरजण घालणारी, वैफल्याची मनोवृत्ती, चढाई करणाऱ्या सैनिकात उत्पन्न होऊ शकेल. शेवटचा निर्णय समोरासमोर उघडयावरील झुंजीनेच होईल. म्हणून बचाव व मोर्चेबंदी हे डावपेच कंटाळवाणे, लढाईतले लक्ष उडून जायला लावणारे, आणि शेवटी एका विशिष्ट रीतीने ढिले व ढिसाळ होतात. आणि तशी निकराची वेळ आली म्हणजे दडलेला पक्ष 'सोक्षमोक्ष' लाऊन घेण्याकरता बाहेर येतो. व खुली लढाई देण्यास तयार होतो. **माघार** Withdrawal-- **माघार म्हणजे पराभव नव्हे.** हा एक डाव असतो. चढाईला आणि हल्ल्याला लागणारे मनोधैर्य एका जातीचे असते. माघार घेण्याला लागणाऱ्या मनोधैर्याची जात निराळी असते. परंतु दोन्ही क्रियांना मनोधैर्य सारखेच लागते. चढाईत स्थिर बुद्धी किंवा गांभीर्याचे प्रमाण कमी असते. तेथे उतावीळ उत्पन्न होते. कारण सैनिक पुढे पुढे सरकत असतो. पुढच्या गतीने उत्साह वाढतो. परंतु माघार घेतांना अधिक स्थिर बुद्धी, अधिक गांभीर्य, आणि अधिक शांतपणा लागतो. पुढे जाणे सोपे असते. मागे जाणे कठीण असते. आणि मागे सरकण्याच्या क्रियेचे मनोधैर्यावर विपरीत, वैफल्या सारखे परिणाम होऊ शकतात. म्हणून मागे जाणाऱ्या सैनिकांतले मनोधैर्य टिकवून धरणे, त्यांच्यात वैफल्याची भावना उत्पन्न न होऊ देणे हे महाबिकट काम, सेनापतीला, प्रत्येक नायकाला करावे लागते. गांभीर्य आणि चित्तशांती टिकून राहण्यावर, माघार यशस्वी होणे अवलंबून असते.

माघार घेताना यत्किंचितही गोंधळ, धाई किंवा कच्चे पाऊल पडता कामा नये. पुढे पाहत असताना एक पाऊल मागे घेऊन पक्के केल्या नंतरच दुसरे पाऊल उचलून पहिल्याच्या मागे घेतले गेले पाहिजे. व हे काम कठीण असते.

माघार घेण्याचे अनेक प्रसंग उद्भवतात-- १) जेंव्हा आपली एकादी तुकडी फार पुढे गेली असेल तेंव्हा तिला मागे खेचावे लागते. २) बगला वरील तुकडया सम-रेषेच्या फार पुढे, किंवा वाकडया तिकडया दिशांनी पुढे जात असतील, तेंव्हा परत रेषेवर आणण्याकरता मागे खेचाव्या लागतात. ३) जेंव्हा आघाडीचा अतीशय विस्तार झाला असेल व झालेल्या विस्ताराला पुरेल इतकी आपली फौज नसेल, तर 'आघाडीचा संकोच' करण्याकरता आणि ती लहान व सरळ रेषेत आणण्याकरता माघार घ्यावी लागेल. ४) आपले संख्याबळ कमी असेल, आणि तितके सुसज्ज नसेल, तर माघार घेणे हितावह ठरते. ५) शत्रूची ताकत अधिक असेल आणि त्याला मिळणाऱ्या यशाचे वाढते प्रमाण असेल तेंव्हा. ६) शत्रूकडे 'हवाई-वर्चस्व' असेल तर. ७) आणि आपल्याला चकमकीतून निसटून जाऊन आपली पुर्नरचना आणि पुनर्व्यवस्था करून परत प्रतीकार करण्याकरता, तयार होऊन परत फिरण्याकरता, चपळाईने तयार होणे शक्य असेल तर तात्पुरती माघार घेणे योग्य होईल. ८) माघार घेण्याची

हुलकावणी दाखवून, शत्रूला बुचकळचात पाडता येत असेल, अशा कित्येक कारणांनी व प्रसंगी माघार घेतली जाते. परंतु **हा पराभव नव्हे** असे पुनः पुनः लक्षात ठेवले पाहिजे.

या शिवाय लढाईत बराच वेळ गुंतून पडलेल्या विभागाला विश्रांती देण्याकरता, त्या विभागाला राखीव फौजेच्या योजनेने आणि मदतीने लढाईतून सोडवून माघारी आणावे लागते मागील क्षेत्र अधिक सोईचे असेल, तर माघार घेणे योग्य होईल. ही नवी मागील जागा बचावाच्या दृष्टीने पाहावी लागेल. त्यात मोर्चांना सोईची ठिकाणे, अंतर्गत सोपा संपर्क, आडोसा, बचावाची 'सघनता' उत्तम माऱ्याच्या जागा, शत्रूला फार दूर अंतरावर थोपवून धरण्याकरता आपल्या तोफखान्याला लांबच्या माऱ्याला आवश्यक ती 'लक्ष्ये' सर्व क्षेत्रावर अनेक ठिकाणातून केलेल्या मारामुळे कोठही कोणचीही जागा उघडी राहून माऱ्यातून सुटु शकणार नाही, अशा तऱ्हेची 'मारगिरीची योजना' करण्यास सोईस्कर असे क्षेत्र मागे असेल तर तिकडे माघार घेऊन ते क्षेत्र 'लढवणे' योग्य होईल. माघार म्हणजे जागा वदलणे.

माघार घेताना एक कार्यक्रम आखला पाहिजे १) मागील जागेची व क्षेत्राची पाहणी. २) जास्तीचे आणि अडगळीचे साहित्य प्रथम मागे नेणे ३) प्रत्यक्ष लढण्यात गुंतलेल्या सैन्याला वगळून बाकी क्रमवार व शिस्तीने, निवडलेल्या जागी हलवणे. ४) मागची जागा पक्की झाल्यावर लढणाऱ्या तुकड्यांना मोकळे करून मागे घेणे. ५) हळूहळू आघाडी 'पातळ' करीत जाणे आणि ६) शेवटी निवडलेली मागील जागा, बचावाच्या दृष्टीने तयार करून, तेथे पूर्व नियोजित ठिकाणी निरनिराळे विभाग व तुकड्या पोहोचून त्या सर्वांनी 'मोहोरा फिरवून' शत्रूशी झुंज घायला तयार होणे. अशा अनेक क्रिया माघार घेण्यात कराव्या लागतात.

माघार दिवसा घेतली तर १) कार्यक्रमावर चांगले नियंत्रण राहू शकते. आणि परस्पर संपर्क राखणे सोपे असते. २) मधले टप्पे व मजला शिस्तीत पार करता येतात. ३) मनोधैर्यावर विपरीत परिणाम होत नाही. ४) परंतु विमानातून शत्रूच्या माऱ्याचा धोका असतो. ५) आणि शत्रूला मारगिरी करायला 'लक्ष्ये' उजेडात दिसू शकतात रात्रीच्या अंधारातल्या माघारीत, १) आकाशातून भय नसते. २) अंधारामुळे शत्रूला आपण दिसत नाही; व त्याला अंदाजानेच गोळी चालवावी लागेल सुरक्षितता वाढेल. परंतु त्या उलट १) नियंत्रण व संपर्क कठीण होईल. २) माघारी–दिशा चुकण्याची शक्यता असेल, मागील ठिकाणी बिनचुक पोहोचणे कठीण होईल आणि अंधारात वावरण्याची 'अज्ञाताचे भय' अधिक होत असते; म्हणून मनोधैर्याला धक्का लागण्यात अधिक शक्यता असते.

असे अनेक प्रकारचे डावपेच, सैन्याच्या विभागांची आणि तुकड्यांचीं मांडणी इत्यादी गोष्टी युद्धात कराव्या लागतात, युक्त्या योजाव्या लागतात, आणि अनेक हालअपेष्टांना तोंड द्यावे लागते. परंतु युद्धातली प्रत्येक क्रिया, युद्धाच्या मूलतत्वानुसार करणे हे सेनापतीचे काम असते. खरे पाहिले असता, युद्ध शस्त्रांनी लढले जाते खरे! परंतु खरी झुंज असते ती त्याला सेनापतीच्या आणि सेनानायकाच्या बुद्धीमत्तेची! हत्यारे व इतर गोष्टी निमित्तमात्र, आणि केवळ जड साधने असतात.

---

# हेरगिरी

" फित्व्याने बुडती राज्ये । खबर्दारी असेचीना "
—श्री समर्थ

आता 'वेग युग' सुरू झाले आहे. प्रकाश आणि ध्वनी यांना मागे टाकणारी 'मनोजवम्' गती मानवाला विज्ञानाने मिळवून दिली असल्याने दोन घटनातील 'मधला काळ' झपाटयाने कमी कमी होतो आहे. म्हणून आता तयारीला अवकाश व संधी मिळू शकत नाही. प्रत्येकाला प्रत्येक बाबतीत सतत 'हुश्शार व तयार' असावे लागते. त्याचे 'हेरगिरी' हे मुख्य व महत्वाचे साधन होय. हेरगिरी जागरूक, तत्पर व विश्वसनीय असली पाहिजे. ती आता सर्व समावेषक झाली असून तिला आगळा अर्थ आणि वेगळे महत्व प्राप्त झाले आहे.

शास्त्र कोणाचाहि मुलाजा मानीत नाही. व्याकरण शास्त्राने 'श्वा युवा मघवा' या सूत्राने देवेन्द्राला कुत्र्याच्या माळेत ओऊन टाकले आहे. डाकूगिरी, फसवे गिरी, लफंगेगिरी या शब्दावलीत 'हेरगिरी' हा शब्द मराठीने बसवला असल्याने त्याला एक निंद्यभाव व अर्थ चिकटला आहे. हेरगिरीत गुप्ततेला प्राधान्य आणि महत्व असते. साधारणतः मनुष्य सीधा, सरळ, एकमार्गी असतो. त्याच्या जवळ लपवण्यासारखे काही नसते व त्याची त्याला जरूरीही वाटत नाही. म्हणून गुप्ततेला हीन मानले जाते. आपला सर्व कारभार उघडया चावडीवर मांडण्याची जरूरी नसते व ते श्रेयस्करही नसते. याला भोळसटपणा, अकारण नागडेपणा असेच म्हणावे लागेल.

हेरगिरीला इंग्रजीत इन्टेलिजन्स ( Intelligence ) म्हणतात. या शब्दाला या अर्थाचा प्रतिशब्द नाही. इंग्रजीतला संपूर्ण अर्थ मराठीतल्या एका शब्दाने व्यक्तविला जात नाही. फ्रेंच व जर्मन भाषांतही या इंग्रजी शब्दाचा पूर्ण अर्थ व्यक्तविणारा प्रतिशब्द नाही असे म्हणतात. इन्टेलिजन्स म्हणजे बुद्धी, ( हुशारी ) हेरगिरीला तीक्ष्ण बुद्धी लागते. येऱ्या गबाळयाचे हे काम नाही.

मानवाला त्याच्या पंचेंद्रियांमुळे ज्ञान मिळते. मानसशास्त्राने knowing, feeling आणि willing अशा मनाच्या तीन अवस्था ठरविल्या आहेत. पहिलीत त्याला ज्ञान होते. दुसरीत त्याच्या भावना जागृत होतात व तिसरीत त्याची हेतुगर्भ वा जाणीवपूर्ण क्रिया प्रगट होते. हेरगिरीतही तीन अवस्था असतात. पहिलीत निरनिराळ्या मार्गांनी मिळालेली व निरनिराळ्या प्रकारची माहिती संग्रहित करावयाची असते. दुसरीत तीवर विचार केला जातो व

तिसरीत निर्णय घेतले जाऊन योजना आखल्या जातात. हेरांची हजेरी पहिल्या अवस्थेत असते. राज्यकर्ते-मुत्सद्दी आपल्या खलबतखान्यात आणि सेनापती रणक्षेत्रावर पुढच्या दोन्ही अवस्थातून जाऊन देशाची परराष्ट्र आणि रणनीती निश्चित करतात. देशाची परराष्ट्रीय इभ्रत त्याच्या सामरिक सामर्थ्यावर अवलंबून असते.

पुराणकालापासून हेरगिरीचे अस्तित्व व महत्व प्रतीत झालेले आहे. हनुमंताचा 'सीता शोध' म्हणजे हेरगिरीच होती. सीतेचा ठावठिकाणा शोधून काढून तिला दिलासा तर दिलाच शिवाय युद्धदृष्टचा लंकेची, तेथल्या सैन्याची, शस्त्रास्त्रांची इत्यादी सर्व माहिती काढून आणखी लंकेत अनेक घातपाती कृत्येकरून ( sabotage ) सहीसलामात परत जाऊन रामाला आपला विस्तृत हेरगिरीचा अहवाल Intelligence Report मारोतीने सादर केला. हेरगिरीला विशेष बुद्धिमत्ता लागते म्हणून 'बुद्धीमताम् वरिष्ठम्' अशा हनुमन्ताची श्री रामचंद्राने या कामगिरीवर योजना केली होती. कौटिल्याने या खात्याची रचना, विभाग, कार्य, साधनांचे प्रकार, कामाची पद्धत इत्यादींचे तपशीलवर विवेचन केलेले आहे. त्याने 'विषकन्या' हेहि एक विशेष साधन सांगितलेले आहे. आजच्या चालू युगात 'विषकन्या' जरी नसल्या तरी सुंदर, चतुर आणि हरहुन्नरी स्त्रियांचा उपयोग केला जातो. परदेशातील वकीलाती व दूतावासात नियुक्ती करता इतर सर्व आवश्यक गुणाशिवाय त्या व्यक्तीच्या पत्नीचे सौंदर्य, नृत्यनैपुण्य, व्यक्तीमत्व आणि लाघवीपणा अशा सारख्या गोष्टी विशेष लायकी ( special assets ) समजली जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदरी फार चतुर आणि धाडसी हेर होते.

हेरगिरीची व्याप्ती दुसऱ्या महायुद्धापासून विशेषकरून ओळखली गेली. दुसऱ्या महायुद्धात ओढले जाण्याच्या क्षणापर्यंत अमेरिकेच्या आत्म-केन्द्रीत. आणि अलिप्त धोरणाने या महत्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे 'पर्ल हारबर' चा नामुष्कीचा प्रसंग ओढवला असे अमेरिकन ऊच्चपदस्थ मुत्सद्दी आणि सेनापती यांना वाटू लागले. आयसनहावरने ही खंत अनेक वेळा बोलून दाखवली. दोन्ही बाजूला दोन महासागर असतांना भय कशाचे ? अशी अमेरिकेची धारणा होती. हिंदुस्थानलाहि असेच वाटत होते. स्वतंत्र होण्याच्या क्षणापासूनच आपल्या सरकारने अलिप्ततेची-तटस्थतेची जपमाळ घेऊन त्याचा अनाहूत पुकारा सुरू केला. आपल्याच नावाचा महासागर आपल्या देशाचे पद-प्रक्षालन करीत असून त्याच्या पोटात दोन्ही बाजूला दोन सागर शिवाय उत्तरेला अनुल्लंघनीय हिमालय, भरीला शांततेची आर्त हाक, आणि अहिंसेचे ब्रीद, मग भय कोणाचे ? या स्वप्नाळु निर्भयतेच्या फसव्या आवरणात आपण गुरफटून गेलो होतो. हिमालय चीनपासून आपले रक्षण करू शकला नाही. समुद्रसम्राज्ञी ब्रिटानिया

हिंदी महासागरातून आपली पथारी गुंडाळून निघून जात असल्याने त्या महासागरात एक 'पोकळी' निर्माण होत आहे. ती भरून काढण्याचे मनसुबे रशिया व अमेरिका रचीत आहेत. चीनही नजर ठेवून आहेच. शिवाय दोन्ही बाजूला पाकिस्तानही आहेच. अशा परिस्थितीत आपल्या संरक्षणाचा प्रश्न अधिक बिकट होत चालला आहे.

अमेरिकेने ही चूक दुरुस्त करून या विषयातले सर्वोच्च स्थान आता मिळविले आहे. अतिविशाल व्यापक व कार्यक्षम सरकारी यंत्रणेशिवाय अनेक विद्यापीठे, संशोधन संस्था, अभ्यास मंडळे जगातील सर्व देशांची, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, औद्योगिक, वैज्ञानिक, वैचारिक, वांशिक इत्यादी झाडून सर्व प्रकारची माहिती मिळवून ती संगतवार लावून निष्कर्ष काढीत असतात. ही विराट हेरगिरीच म्हटली पाहिजे. हे सर्व काम निरूपद्रवी आणि केवळ ज्ञानार्जनाकरता होतांना दिसले तरी या खटाटोपाचा सरकारला फार उपयोग असतो या व अशा प्रकारच्या उघड माहितीचा आणि अन्य मार्गांनी मिळविलेल्या गुप्त माहीतीचा अन्वय अर्थ लावून सरकार आपले अंतस्थ धोरण, परराष्ट्रीय राजकारण आणि रणनीती निश्चित करीत असते. प्रत्येक लहान मोठा देश कमी अधीक प्रमाणात हेरगिरी करीत असतो.

मुत्सद्दी आणि सेनापती या दोघांनाहि हेरगिरीची गरज असते. सरळ ढोबळ व उघड माहीतीच्या पलीकडील गुप्त व सहज न मिळू शकणाऱ्या आगाऊ माहितीचा त्यांच्या उद्दिष्ट-सिद्धीला भरवशाचा आधार होत असतो. निर्णय घेण्याच्या निकडीच्या प्रसंगी असे ताजे आणि विश्वसनीय 'आगाऊ ज्ञान' त्यांच्या उद्दिष्ट सिद्धीची निश्चिती उत्पन्न करू शकते. उत्तम इंटेलिजन्स च्या जोरावर व आश्रयाने देशाची न्यून्ये व वैगुण्ये सागता येऊन त्यांच्यावर मात करता येते. परंतु अशी 'आगाऊ माहिती' ( उघड असो किंवा गुप्त असो ) फक्त पूर्व-सूचनें दाखल समजावी लागेल. त्यावरून निरपवाद भविष्य वर्तविता येणार नाही. आजची बिनबुडाची, बाजारगप्प उद्याची सत्य घटना ठरू शकेल. हा संभव लक्षात ठेवला पाहिजे. धोका देण्याकरता, लक्ष उडवून लावण्याकरता अनेक प्रसंगी वावड्या उडविल्या जातात. बोलतो एक आणि करतो दुसरेच. भासवतो एक आणि असते भलतेच. तो दुटप्पी तसाच दुहेरीही आहे. तो एक कोडे आहे. असा अमेरिकाचा रशियावर कायम आरोप आहे. आपली स्थिती याच्या अगदी उलट आहे. आमच्या जवळ गुप्त झाकून ठेवण्यासारखे काहीच नाही. आणि असले तरी ते लपवून ठेवण्याची आपल्याला गरज वाटत नाही. कोणीही परकीय कोणत्याहि नात्याने अथवा मिषाने येवो त्याला आमत्रणे देऊन त्याला आपण आपले सर्वांग आणि संपूर्ण दर्शन घडवीत असतो. बस्तर, मंडला इत्यादी भागातील अजूनही जवळ जवळ रानटी अवस्थेत असलेल्या आमच्या उपेक्षित

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४५४०६ वि: मिश्रविषय
क्रमांक २९५९ नोंद दि. ३२-३-५२

देशबांधवाची नृत्ये आदि कार्यक्रम ' सांस्कृतिक ' या नावाखाली पाहण्याच्या मनोरंजना करता मुद्दाम करविले जातात.

विज्ञानाने नवी नवी शस्त्रास्त्रे दिली तशीच हेरगिरीची साधनेहि दिली आहेत. नव्या इल्क्ट्रॉनिक साधनानी अत्यंत कमी वेळात मैलोगणिक दूर अंतरावरून अधिक तपशीलवार अधिक विश्वसनीय व मनुष्यांनी मिळविलेल्या माहीती पेक्षा अधिक बिनचुक माहिती मिळू शकते. मनुष्याच्या कामगिरीत त्याचे ' स्वतःचे ' अधीक उणे असू शकते. तिच्यात वैय्यक्तिक वैशिष्टयाला व विचाराला वाव असतो. म्हणून मानवी हेरगिरीच्या मोजमापात क्वचित् पासंग टाकावा लागेल किंवा विरूद्ध बाजूला झुकते माप द्यावे लागेल. माहिती कोणात्याहि साधनांनी मिळाली तरी तिचा परस्पर पडताळा पाहून तिची चिकित्सा करून अंतिम ठरवावे लागेल. हेरगिरीचा प्रकार कोणताहि असो साधने कोणतीहि असोत तिच्या पासून कोणालाहि स्वतःला वाचविता येत नाही.

हेरगिरीच्या उलट प्रति-हेरगिरी (Counter Espionage) हिलाहि तितकेच महत्व आहे. दुसऱ्याची माहिती मिळवीत असतानाच आपल्यास हानीकारक असे कोणास न कळुं देणे हा संरक्षणाचा पवित्रा असतो. एकादे वेळी दुसऱ्याची कमी अथवा मुळीच काही माहिती न मिळाली तरी चालेल; परंतु आपली यत्किंचित्‌ही माहिती कोणालाहि संशयास्पदच नव्हे तर तथाकथित मित्रांनादेखील न मिळू देणे ही जागरूकता ठरते. आपल्या विषयीच्या माहितीच्या अभावी अथवा चुकीच्या माहितीवरून, शत्रूला आपले डावपेच लढवणे कठीण गेले तरी तेवढ्याने कार्यभाग साधू शकत नाही. फार तर आपला थोडा बहुत बचाव झाला तरी शत्रूची शक्य तितकी माहिती मिळण्याने त्याच्या योजना ठरवता येतील. हेरगिरी व प्रतिहेरगिरी दोन्हीहि एकसाथ केली पाहिजे. मानवी हेराला जसे पकडता येते. फोडता येते; तसेच वैज्ञानिक हेरही फोडता येतात व निष्क्रीय करता येतात. शत्रूची पकडलेली सर्वच माहिती खरी समजणे चूक होईल. कित्येक वेळी अशी माहिती नकाशे, कागदपत्रे, प्रतिवृत्ते, हुकुमांच्या व योजनांच्या प्रती, लष्करी तुकड्यांची चिन्हे, गुप्त व सांकेतिक लीपीतले संदेश मुद्दाम खोटे, दिशाभूल केरणारे, असे साहित्य पकडविले जाते. हेतु स्पष्टच आहे. आपले डावपेच यशस्वी होणे आणि शत्रूचे उधळून लावले जाणे हेच हेरगिरीचे व प्रतिहेरगिरीचे खरे व वास्तविक यश होय.

हेरगिरीत शारिरिक आणि मानसिक सामर्थ्याची परिसीमा असते, तशीच बौद्धिक आणि वैचारिक शक्तीची परमावधी असते. या सर्व शक्ती एकाच माणसात असणे संभवनीय नसते. म्हणून हेरगिरीत दोन भाग पडतात. एकाने कणाकणाने, क्षणाक्षणाला माहिती मिळवीत राहावे लागते. दुसऱ्याने सर्व माहिती संगतवार लावून विषयवार करुन प्रती ठरवून, निवडून, पारखून, निष्कर्ष

काढावयाचाचे असतात. या निष्कर्षांच्या आधारावर व अनुरोधाने मुत्सद्दी व सेनापती परराष्ट्रीय धोरण व रणनीती ठरवीत असतात. सेनापतीला डावलून एकटचा मुत्सद्यांनी ठरविलेल्या योजना देशाला मारक ठरु शकतात. सेनापतीची दांडगाईची राज्यसत्ता देशाला अखेर हानीकारकच ठरते. व ती फार काळ टिकू शकत नाही. म्हणून दोघांचा संगम व समन्वयच देशाचा भाग्यविधाता ठरेल.

हेरगिरीत हेराला अनेक भयंकर दिव्यातून जावे लागते. कसलेला हेर देखील खचून पिचून जाण्याची शक्यता असते. आपला एखादा हेर पिचेल फुटेल हे गृहीत धरावेच लागते. अमेरिकेत हेरगिरीच्या अनेक शाला प्रशाला आहेत; व तेथे अनेंक प्रकारचे अभ्यासक्रम आहेत. निःशस्त्र युद्ध (Judo) हत्यारांचा उययोग घातपाताचे तंत्र, वाहतूकी साधने, बिनतारी संदेश, नकाशे वाचणे (Map Reading) छायाचित्रे वाचणे ( Photo Reading ) व घेणे, सांकेतिक संदेश वाचणे व पाठविणे, दुसऱ्यांचे तसे संदेश पकडणे, व फोडणे (De code) तसेंच ज्या देशात नियुक्ती होणार असेल त्या देशाचा इतिहास, संस्कृती, राहणी, चालीरीती, भौगोलिक परिस्थिती, विचारप्रणाली धार्मिक आणि वांशिक वैशिष्टे इत्यादींचे शिक्षण दिले जाते. या शिवाय प्रत्येकाची कष्ट व यातना सहन करण्याची शक्ती वाढविली जाते. त्याच्या वैय्यक्तिक गुणावगुणांची छाननी व चाचणी घेऊन त्यात जरुर त्या सुधारणा करविल्या जातात. त्याची असत्य ओळखणाऱ्या (Lie Detecter Polygraph) यंत्रांनो परिक्षा घेतली जाते. मनुष्य स्वभावाची परिक्षा घेणे व दुसऱ्यावर प्रलोभने, लाच वगैरेचा कसा प्रयोग करावा व कसे फितुर करावे हेहि शिकविले जाते.

या शिवाय आणखीही विशेष प्रकारचे खास हेर व ‘ तोतये ’ तयार केले जातात. यात निवडक उमेदवारांची एक पूर्णपणे नवीनच व्यक्ती बनविण्यात येते. नाव, गाव, पूर्वेतिहास, चेहेरा, मोहोरा, खुणा, खाणा, सवयी, लकबी, भाषा पोषाक, आवडी निवडी, संपूर्ण नव्या करुन त्याला कोणतेहि पूर्व स्मरण कशानेहि आणि कोणत्याही प्रसंगी होऊ नये इतकी बेमालूम तोतयेगिरी तयार करुन अशांची अतीशय कठीण परिक्षा घेऊन ताऊन सुलाखून पास झालेल्यांनाच त्या विशिष्ट कामगिरीवर पाठविले जाते.

या शिवाय परदेशांत जाणाऱ्या ‘ हिप्पी ’, बीटल, हिंदू योगी-स्वामी वगैरेचे स्त्री पुरुष शिष्य यांच्यापासून तो राजदूत, वकील येथपर्यंत सरकारी, खासगी, पथिकापर्यंत हेरगिरी करण्याच्या उघड वा प्रछन्न सूचना (Briefing) दिल्या जात असाव्यात असा जबरदस्त संशय उत्पन्न होण्यास जागा आहे. याने हेरगिरी व प्रतिहेरगिरी या दोन्ही गोष्टी साधल्या जातात. परका इसम कोणी का असेना संशियीत नजरेनेच लेखणे इतकी सावधता बाळगणे आपल्या एकाकीपणाला आवश्यक आहे. या उलट आपल्या देशातून परदेशात जाणारे किती बेसावध

आणि आपल्या देशाविशषी किती अल्प व विपर्यस्त माहिती तिकडे देऊन आपल्या देशाची असत्य प्रतीमा उभी करीत असतील याची कल्पना करता येत नाही. याचा पुरावा इकडील उमेदवारांनी चाचण्यात दिलेल्या अजब हास्यास्पद व मूर्ख उत्तरावरुन करता येईल.

सुराज्य आणि राजकीय स्वास्थाकरता देशांतर्गत हेरगिरीही तितकीच मोलाची आणि आवश्यक असते. आपल्याच पायाखाली काय जळते आहे हे पाहण्याचे कित्येक वेळा भान राहात नाही. देशातील प्रत्येक अंतः प्रवाहाची खडान् खडा माहिती शासनाला झाली पाहिजे. हे काम राज्यातले तसेच केंद्राचे विशेष पोलिसखाते करीत असते. काही देशात 'राजकीय पोलिस' (Political Police) दल या कामाकरता नियुक्त केलेले असते. एका सामान्य धोबी पती-पत्नीच्या खासगी संवादात सीतेचा विशिष्ट अर्थाने केलेला उल्लेख हे पौराणिक व पुरातन अंतस्थ हेरगिरीचे उत्तम उदाहरण आहे.

हेरगिरीचे प्रकार अथवा विषय मुख्यत्वेकरुन पाच असतात.

१ **लष्करी.** यात नुसत्या शत्रूच्या (उघड) नव्हे तर मित्रांच्या आणि संभाव्य शत्रूंच्या आणि काही प्रमाणात तरी इतर संबंध येऊ शकणाऱ्या देशांच्या सामरिक सामर्थ्याची माहीती मिळवून, जगात काय चालले आहे हे समजून घ्यावयाचे असते.

२ **डावपेचांची.** यात शत्रू-प्रतिपक्षी काय करणार आहे आणि करु शकेल-म्हणजे त्याच्या योजनांची व 'लक्ष्यां'ची माहिती मिळवावयाची असते.

३ **वैज्ञानिक.** यात सर्वच देशांच्या वैज्ञानिक सामर्थ्याची व प्रगतीची माहिती मिळविणे हा उद्देश असतो. याच्या योगाने नव्या शस्त्रास्त्रांची व युद्ध साहित्याची माहिती मिळून आपल्या प्रगतीचा वेग व विस्तार वाढविता येतो.

४ **आर्थिक व औद्योगिक.** यात जागतिक आर्थिक घडामोडी, चलन व्यवहार त्याचे व्यापारावर होणारे परिणाम, नव्या वस्तूंची निर्मिती, कामगारांची क्रिया प्रतिक्रिया अशा गोष्टीची माहिती मिळवावयाची असते.

५ **राजकीय.** यात आपल्या देशाशी संबंधित आणि दुसऱ्या महत्वाच्या व आपल्या देशावर 'लक्ष' ठेवणाऱ्या देशातील, राजकीय परिस्थिती, पक्षांचे बलाबल, त्यांच्या मत व ध्येय प्रणालीचे भेद (जसे रशियन कम्यूनिझम व चिनी कम्युनिझम) अशा सारखी माहिती मिळवावयाची असते.

ही सर्व प्रकारची माहीती जितकी उघड तितकीच गुप्त असलेली महाप्रयासाने आणि गुप्तपणे मिळवून गुप्तच ठेवली गेली पाहिजे. आणि शेवटी प्रतिहेरगिरीची प्रतिकारात्मक झुंज देत राहिले पाहिजे. आणि प्रतिहेरगिरीत इतरांची दिशाभूल करण्याचीही प्रसंगोपात् आत्म संरक्षणाकरता तजवीज करावी लागते.

आता युद्धाचे तीन प्रकार झाले आहेत. पहिल्या 'गरम' प्रकारात हिंसात्मक युद्ध उघड उघड शस्त्रास्त्रांनी लढले जाते दुसऱ्या 'थंड' प्रकारात आर्थिक, वाणिज्य, व्यापारी आणि औद्योगिक अहिंसक युक्त्या प्रयुक्त्यांनी निराळ्या प्रकारची हानी केली जात असते. गरम युद्धाची आयुधे चर्मचक्षूंना दिसतात. थंड युद्धाची आयुधे दिसत नाहीत. 'गरम' युद्धात होणाऱ्या जखमा दिसतात व सद्य। परिणामी असतात. थंड युद्धाच्या जखमाहि अदृश्य असतात आणि त्यांचे परिणाम काही काळानंतर भोवतात. 'गरम' युद्धातली शस्त्रे म्यान केल्याने ते युद्ध संपते. थंड युद्धाच्या शस्त्रांना म्यानच नसते. थंड युद्धातून गरम युद्ध भडकू शकेल. गरम युद्धाचा अग्नी शमतो. थंड युद्ध धुमसत राहते. गरम युद्ध चालू असतांनाच थंड युद्धाला पोषक परिस्थिती उत्पन्न होत असते. तिसरा सर्वंकश ( total war ) हा प्रकार आहे. या प्रकाराचे जनकत्व अमेरिकेकडे जाते. गेल्या महायुद्धात दोन अणूबाँब टाकून या युद्ध प्रकाराची झलक अमेरिकेने दाखवून दिली. सर्वंकष युद्ध म्हणजे प्रलय. प्रलयाची कोणीही इच्छा करणार नाही. कारण नंतर कोणीच शिल्लक उरणार नाही. प्रलय होवो अथवा न होवो! त्या क्षणापर्यंत युद्ध होणारच. मग शांततेचा ढोल कोणीही कितीही पिटीत राहो. दोन युद्धांचा मध्यंतराचा काळ कमी अधिक होईल इतकेच. म्हणून प्रत्येकाला आत्म संरक्षणाकरता हुश्शार व तय्यार राहावेच लागेल.

या पुस्तकाचा 'गरम' युद्ध हा विषय आहे. युद्धासंबंधीच्या हेरगिरीचे इंग्रजी भाषेत दोन शब्द आहेत एक Tactical Intelligence व दुसरा Strategical Intelligence. इंग्रजीतल्या Tactics व strategy या दोन शब्दांना डावपेच हा एकच मराठी शब्द आहे. हे दोन इंग्रजी शब्द युद्धाची निरनिराळी व्याप्ती दाखवतात. एखाद्या प्रसंगात (Action ) किंवा लढाईत ( Battle ) योजलेल्या डावपेचांना आणि केलेल्या हालचालींना Tactics म्हणतात. अनेक लढाया मिळून मोहीम (Campaign) होते. एखाद्या दुसऱ्या प्रसंगातल्या अथवा लढाईतल्या अपयशाने मोहीम अयशस्वी ठरत नाही. अंतिम उद्दिष्ट साध्य होणे हेच यशाचे गमक असते. मोहिमेत योजलेल्या डावपेचांना strategy म्हणतात. अमुक एका लढाईत असे असे Tectics उपयोगी पडले. 'अमुक' मोहिमेत सेनापतीने अशी strategy लढवली असे इंग्रजी भाषेत बोलले जाते. युद्धाच्या या दोन्ही संलग्न आणि परस्पर संभूत अवस्थांत कराव्या लागणाऱ्या हेरगिरीला Tactical intelligence व strategical intelligence अशी दोन नावे असली तरी त्याचा गाभा एकच आहे. पहिल्यातून दुसरा परिणाम होणारा आणि संलग्न असणाराच असे हे दोन्ही प्रकार. पद्धति आणि कार्य एकच; फक्त तपशील व व्याप्ती यात फरक.

आगेकूच सेनेचे निरनिराळ्या केंद्रात एकत्रिकरण निरनिराळ्या जातीच्या पथकांची विभागणी, रचना, शत्रूची सलामीची 'मुतभेड' त्या करता बिनीची व

त्याच्या लगतची, समोरची व उभय बाजूची संरक्षात्मक रचना; मुख्य फौजेची रचना, प्रसंग पाहून व टिपण साधून 'एलगार' कापाकापी, पळत्या शत्रूचा पाठलाग, जिंकलेल्या भागाची मजबूती व संरक्षण योजना व आपल्या सेनेची पुनर्व्यवस्था व पुनर्रचना इत्यादी हालचाली लढायात व मोहिमात शत्रू शरण येईपर्यंत कराव्या लागतात. यांत शत्रूकडच्या माहितीची फार गरज असते. अशा माहितीला ( Tactical व strategical ) लढाईतली हेरगिरी म्हणतात. या करता सैनिकांना एकट्याने अथवा जोडीजोडीने आणि छोट्या छोट्या निरनिराळया प्रकारच्या तुकड्यांना मुक्रर केले जाते.

यांनी रणभूमीवरची भौगोलिक माहिती, मोसमी परिस्थिती, नद्या नाले, त्यांतली ते पार करुन जाता येतील अशी ठिकाणे, दलदलीच्या जागा, जंगले वाहतुकीचे व दळणवळणाचे मार्ग, शत्रूची निरनिराळ्या प्रकारची पथके, त्यांची संख्या त्याचे डावपेच, त्याचे कागदपत्र, नकाशे, हुकुम व सूचना, परवलिचे शब्द' व सांकेतिक भाषा, त्यांची केंद्रे, तळ, आघाडीवरील यंत्र दुरुस्तीचे कारखाने रसद पुरवठयाची केंद्रे व व्यवस्था इत्यादी अगणित बाबीतली माहिती गोळा करावयाची असते. कित्येक वेळी शत्रूचे सैनिक जिवंत पकडून आणावयाचे असतात. त्यांच्याकडून, त्याना फोडून शत्रूची महत्वाचो माहिती मिळू शकते. "शत्रूच्या शंभर सैनिकांना ठार मारण्यापेक्षा एक जिवंत सैनिक पकडून आणणे फार मोलाचे आणि उपयुक्त असते" असा फौजी भाषेत अर्थपूर्ण वाक्प्रचार आहे. अशी मिळत राहिलेली माहिती संकलित करून तिचा अन्वय-अर्थ लावून निवडून पारखून घेऊन आपले डावपेच व युक्त्या प्रयुक्त्या आखावयाच्या असतात. आणि हे सर्व क्षणाक्षणाला लढाईचा रंग पालटत जात असता चित्ताच्या अत्यंत व्यग्र अवस्थेत लहान मोठया सेनाधिकाऱ्यांना करावयाचे असते. ही स्थितप्रज्ञता सोपी नाही. याला श्रेष्ठ दर्जाची बुद्धीमत्ता, चातुर्य, धाडस, शौर्य, सहनशीलपणा, खंबीरपणा व शांत स्थिर वृत्ती लागते. माहिती दोन प्रकारची असते. एक उघड व दुसरी गुप्त. उघड माहितीपेक्षा गुप्त माहितीचे मोल अधिक असते हे उघड आहे. माहिती ताजी वेळेवर व विश्वसनीय असली पाहिजे व तिचा ओघ खंडित होता कामा नये.

इंग्रजीतल्या स्ट्रॅटेजी Strategy या शब्दाला आणखी एक विशेषण लावून Grand strategy असा एक जोड शब्द उपयोगात आणला जातो. मराठीत त्यालाही समर्पक प्रतिशब्द आढळत नाही. यात देशाच्या परराष्ट्रीय धोरण आणि रणनीती या दोहोचा अंतर्भाव होतो. कारण परराष्ट्रीय धोरण यशस्वी होणे न होणे, हे देशाच्या सामरिक सामर्थ्यावर अवलंबून असते. युद्ध हा परराष्ट्रीय धोरण यशस्वी करण्याचा निराळा आणि निर्वाणीचा उपाय असतो.

देशाची Grand strategy ठरविणे लोकशाही राज्य पद्धतीत एकाच सत्तारूढ पक्षाच्या हातात असणे देशाला अनहितकारक ठरते. लोकशाहीत

सत्ता एकाच पक्षाची वंशपरंपरेची मिरास होऊ शकत नाही. देशावर प्रत्येकाचा हक्क आहे. देशहित प्रत्येकालाच हवे असते. व प्रत्येक कमी अधीक प्रमाणात का असेना (देशद्रोही करंटे पंचमस्तंभी वगळून) नाना प्रकारांनी देशसेवा करीत असतो म्हणून आणीबाणीच्या प्रसंगीतरी पक्षांचे प्रश्न बाजूला ठेवून 'सर्वांच्या देशाचे सर्वोत्तम हित' हेच अंतिम ध्येय व हीच देशाची Grand strategy ठरविली गेली पाहिजे.

स्वदेशाविरुद्ध केलेल्या हेरगिरीला 'फितुरी' म्हणतात. आपल्या देशाला फितुरीचा कायम शाप आहे. हा कलंक फार पुरातन कालापासून फासला गेला आहे. याच्यामुळे देशाचे किती नुकसान झालेले आहे, व या क्षणीही होत आहे, याचे वर्णन अशक्य आहे. इतकी फितुरी पृथ्वीच्या पाठीवर कोठेही नसेल! स्वदेशाची हेरगिरी ही देशसेवा असते. फितुरी हा देशद्रोह होतो. हे सांगायला नको. युद्ध भूमीवरील हत्यार-बंद सैनिकाला पूजा मिळते. कारण त्याचे कार्य दिसते. ते आकर्षक व नेत्रदीपक असते. परंतु देशाच्या हेराला पूजा दूरच राहिली; अवहेलनाही मिळते. त्याचे कार्यक्षेत्र व कार्य दिसत नाही. बहुतेक तो हत्त्यारबंद नसतो आणि असलाच तर अगदी जुजबी हत्त्यार बाळगतो. लढाईवर सैनिकाच्या अन्नाची व शरीर स्वास्थाकरता व्यवस्था असते. हेर हा फक्त देवावर विश्वास ठेवून वावरतो. त्याच्या बलिदानाकडे कोणी पाहात नाही.

आता सैनिक व नागरिक हा भेद नष्ट झाला आहे. दोघांनाही निरनिराळ्या अर्थाने व पद्धतीने गणवेश घालून किंवा साध्या कपड्यात लढावे लागते. तसेच आता अमूक एक बाजू वा दिशा अशा आघाड्या जाऊन, वर्तूळ झाले आहे. व हे नुसते वर्तुळच नाही. त्याचा 'गोल' झाला आहे. आकाशातून, जल व स्थल पृष्ठाखालून सगळीकडून मारगिरीत हा 'गोल' सापडतो. परंतु हेरगिरी युद्ध कालापुरतीच मर्यादित नसते. ती अखंड असली पाहिजे. व त्याची नागरिकावर विशेष जबाबदारी असते.

फौजदारी कायद्याच्या संहिते प्रमाणे संबंध असो वा नसो, नजरेस आलेल्या प्रत्येक गुन्हयाची व अपकृत्याची नजीकच्या पोलीस ठाण्यावर खबर दिली पाहिजे. चारदोन व्यक्तींना अपाय अथवा हानी होणे, आणि एखाद्या क्षुल्लक दिसणाऱ्या व वाटणाऱ्या अपकृत्याने संबंध देशाला क्षती पोहोचणे यातले अंतर समजून सांगण्याचे कारण पडू नये. म्हणून प्रत्येक नागरिक जसा सैनिकही असतो तसा तो देशाचा हेरही झाला पाहिजे. प्रत्येक नागरिकाने प्रत्येक 'परदेशा'कडे आणि जरूर वाटल्यास, संशय आल्यास आपल्याही देशबांधवाकडे अतीशय बारीक नजरेने पाहिले पाहिजे. जागरूक राहिले पाहिजे. आपल्याच देशातून उत्पन्न केल्या गेलेल्या आणि आपला शत्रू ठरलेल्या पाकीस्तानी परदेशाला ओळखणे केवळ अशक्य आहे. त्याच्यात व आपल्यात वस्त्रे प्रावरणे, बाह्य-

स्वरूपाच्या इतर बाबी, रीतीभाती, वागणे सवरणे, भाषा इत्यादीतले भेदभाव व फरक ओळखणे ब्रह्मदेवालाही शक्य नाही. म्हणून या 'परदेशा'वर नजर ठेवणे फारच बिकट काम आहे. म्हणून त्यांच्यावर नजर ठेवण्याची अधीकच जबाबदारी उत्पन्न झालेली आहे. आपल्या जागरूकतेची ती अंतिम परीक्षाच होय. गुन्ह्याची शाबिती होईपर्यंत प्रत्येक संशयित आरोपी निर्दोष समजला गेला पाहिजे आरोपीला आपला निरपराधीपणा सिद्ध करावा लागत नसून फिर्यादीवर आरोप शाबित करण्याची जबाबदारी असते. हेरगिरीत याच्या उलट आहे. प्रत्येक परदेशी, इकडे बरेच दिवस राहिलेला असो अथवा त्याने हिंदुस्थानचे नागरिकत्व पत्करलेले असो तो संशयीतच समजला जावा; व आपले निर्दोषीत्व सिद्ध करण्याची त्याची जबाबदारी ठरविली जावी. कारण आपल्या देशाइतका या बाबतीतला भोळेपणा कोठेही नसेल. हे विपरीत व अतिशयोक्त वाटेल परंतु पूर्व-सूचना, पूर्व सशस्त्रता असते (Forewarned is fore-Armde) हीच हेरगिरीची सांगता होय.

---

# युद्धाचे अदृश्य शस्त्र

परराष्ट्रीय राजकारणात शेवटी युद्ध अपरिहार्य असते. आपले म्हणणे शत्रूला मान्य करावयास लावणे हा युद्धाचा तात्कालिक हेतू असतो. भविष्यात शत्रू उपद्रवकारी होऊ नये म्हणून त्याला शक्य तितके दुर्बल व परावलंबी करून सोडणे, हा दीर्घकालीन हेतू असतो.

युद्धातले यशापयश क्षणभंगूर असते. आणि म्हणूनच युद्धे होतात. आणि कोणच्याहि युद्धात 'पूर्णजय' मिळणे दुरापास्त असते. हे दुष्ट चक्र असेच फिरत राहणार आहे. आता तर वेग वाढला आहे. सामरिक सामर्थ्याने मिळालेला लष्करी जय 'राजकीय जय' मिळण्याकरता उपयुक्त ठरतोच असे नाही. याचे कारण जगाची वाढती अंतर्बाह्य गुंतागुंत. जागतीक लोकमत नव्या विचार-धारा, मते आणि तत्वप्रणाली यांच्या अधिष्ठानावर राजकीय जयाचा ताबूत उभा असतो. आता सशस्त्र युद्ध पद्धती' आणि 'मानस-शास्त्रीय युद्ध पद्धती' अशा दोन पद्धतीनी युद्धे लढली जाऊ लागली आहेत. या दुधारी युद्ध पद्धतीनेच देशाची लष्करी आणि राजकीय उद्दिष्टे साध्य करता येतील. मानसशास्त्रीय युद्धे हा राजकारणाचा अविभाज्य आणि महत्वाचा भाग झाला आहे. मानसिक युद्धाचे 'प्रचार' हे शस्त्र दोन्ही प्रकारच्या युद्धाचे अदृश्य शस्त्र सिद्ध झाले आहे. दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं या शस्त्राकडे प्रथम लक्ष आकृष्ट झाले व त्याच्या सामर्थ्याची खात्री पटली. तेव्हापासून प्रत्येक देश 'गरम' आणि 'थंड्या' अशा दोन्ही युद्धात या मानसशास्त्रीय शस्त्राचा सर्रास धूर्ततेने आणि कौशल्य-पूर्वक उपयोग करु लागला आहे.

शांततेच्या काळात युद्धाची सारखी तयारी सैन्य करीत असते. परंतु प्रत्यक्ष युद्ध झाल्याशिवाय या तयारीचे प्रत्यंतर येत नाही. दोन युद्धातला काळ प्रदीर्घ असला तर सैनिकांची पिढीची पिढी ह्या तयारीचे प्रत्यंतर देण्याची संधी न मिळाल्यामुळे 'बाद' होते. अस्वस्थतेच्या काळात आपल्या सामरिक सामर्थ्यावर लोकांनी निर्धास्त रहावे म्हणून शासनाला आपल्या सुसज्जतेच्या वारंवार घोषणा कराव्या लागतात. देशातील यच्चयावत् प्रजेचे मनोधैर्य मजबूत राखणे हे शासनाचे आद्य कर्तव्य असते.

'मानसिक-युद्ध' या शब्दाला आता आगळा अर्थ, विशेष वजन व शास्त्रीय दर्जा प्राप्त झाला आहे. दुसऱ्या महायुद्धा पूर्वी 'नाझीझम' आणि 'फॅसीझम' यांच्या अविवेकी आणि अतिरेकी प्रचारामुळे प्राप्त झालेल्या सामर्थ्याच्या उन्मादाने दुसरे जागतिक युद्ध पेटले. आता साम्यवादाच्या विषामुळे साम्यवादी आणि

' इतर ' ( others ) अशी जगाची विभागणी झाली आहे. व तिसऱ्या जागतिक युद्धाचे वेध लागले आहेत.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक रंगमेंचावर अनेक उलथा पालथी झाल्या. त्यातल्या दोन सर्वात महत्वाच्या आणि दूर परिणामी आहेत. हिंदुस्थान पोखरून त्यातून काढलेले पाकिस्तान आणि शेष- हिंदुस्थान या दोघांचे स्वातंत्र्य ही पहिली आणि पॅलेस्टाईन व अरब देशांचे तुकडे पाडून त्यातून कोरून काढलेल्या इस्रायल या नव्या को-या देशाची निर्मिती ही दुसरी. पहिल्या घटनेचे पितृत्व म्हणा-श्रेय म्हणा अथवा हिंदी लोकांच्या प्रखर प्रयत्नांचे यश म्हणा ब्रिटिशाकडे जाते. १९१७ च्या ' बालफोअर घोषणेनुसार ' यहुदी लोकांना एक ' मातृ-पितृ-भूमी ' निर्माण करून देण्यास इंग्रज वचनबद्ध होते. त्या वचनाची पूर्ती ' यूनोच्या जनरल असेम्ब्ली ' वर आपला प्रभाव पाडून इंग्रजांच्या सॅम काका करवी झाली. ' इस्रायल ' निर्मितीचे श्रेय या काका पुतण्याकडे जाते. १५ आगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थान स्वतंत्र झाला आणि १४ मे १९४८ रोजी इस्रायल हा नवा कोरा देश जगाच्या सारीपाटावर उभा राहिला. या दोन्ही घटनांचा मूलाधार प्रचार हाच होता. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न फक्त हिंदी जनता आणि इंग्रज राज्यकर्ते यांच्यातलाच होता. कोणताही दुसरा देश हिंदी लोकांच्या प्रयत्नात आणि चळवळीत सहभागी झाला नव्हता. इस्रायलच्या बाबतीत निराळी परिस्थिती होती. हिटलरच्या ज्यू द्वेशामुळे अनुकुल वातावरण निर्माण झाले होते. सर्व जगभर ज्यू पसरले आहेत. प्रचाराने जागतिक मत ' तयार ' झाले. म्हणूनच अमेरिकेला यूनोत यश मिळाले. दोन वेगळाल्या परिस्थितीत प्रचाराचा वेगळा वेगळा प्रभाव पडला. हिंदुस्थानात प्रचाराने स्वातंत्र्याची विझलेली ज्योत पुन्हा प्रदीप्त झाली. प्रचारानेच ज्यू लोकाविषयी जागतिक सहानुभूती निर्माण झाली. दुसऱ्या महायुद्धाने पार्थिव जगताचा अंत करू शकणारे वैज्ञानिक सामर्थ्य मानवाला दिले; तसेच त्याचा मानसिक संहार करू शकणारे प्रचार हे मानसशास्त्रीय युद्धाचे भस्मासुरी शस्त्रही दिले. या शस्त्राचा विशेष हा आहे की ते दोन्ही प्रकारच्या युद्धात उपयुक्त आणि प्रभावी ठरते. आता हत्यार आणि प्रचार यांच्यावरच युध्दाची मदार असते लेखकाची लेखणी, वक्त्याची वाणी आणि चित्रकाराची कुंचली हा या अदृश्य शस्त्राचा ' त्रिशूल ' होय.

सत्य हे प्रचाराचे बिरूद असल्याचे सांगितले जाते. प्रचार सत्याधिष्ठित असला पाहिजे असा प्रचारशास्त्राचा सिध्दांत आहे प्रेमात आणि युध्दात निषिध्द असे काहीच नसल्याने त्यांच्या बाबतीत हा सिध्दांत अपरिवर्तनीय असा मानला जात नाही. प्रसंगाप्रमाणे त्यात श्लेश पर्याय आणि ' तर-तम ' काढले जात असतात. प्रचारमहर्षी गॉबेल्स याच्या प्रचाराचे असत्य हेच अधिष्ठान होते. निरलस प्रयत्नाने धादांत असत्य निर्भेळ सत्यासारखे वाटू लागते.

आयव्हर टॉमस या लेखकाच्या मते लवकर संपण्याची शक्यता असलेल्या युध्दातला प्रचार सत्यावर आधारलेला असला पाहिजे असे नाही. झंझावाती युध्द तंत्राने अचानक चढविलेल्या हल्ल्यात गर्भगळीत शत्रूवर मिळविलेला विजय आकर्षक नेत्रदीपक आणि अनपेक्षित असल्याने जगाला सत्य समजण्यापूर्वीच तो मिळालेला असतो. म्हणून सत्य शोधण्याचा किंवा कोणाच्या मनावरील परिणामांचा प्रश्नच उत्पन्न होणार नाही. कारण यशासारखे दुसरे काहीच यशस्वी होत नसते. अशा यशाची फारशी चिकित्सा केली जात नाही. सर्वत्र कौतुकच दिसून येते. या उलट दीर्घकालीन युद्धातील प्रचारात सत्यांश अधिक असलेला बरा ! कारण स्वतः शत्रू, तटस्थ व प्रेक्षक अशा सर्वांना तेव्हा फुरसत असते. दीर्घकालीन युद्धातला जय विस्मयकारक नसल्याने त्यांच्या चिकित्सेला पुष्कळ वाव आणि अनेक वाटा मोकळ्या असतात. दुसऱ्या महायुद्धातले सुरुवातीचे जर्मनीचे जय झंझावाती आणि विस्मयकारक असल्याने त्या घाईगर्दीत जग दिपल्यासारखे झाले. तेंव्हा चिकित्सेला अवसर मिळाला नाही. परंतु पुढच्या मोहीमात अनेक कारणांनी शैथिल्य आल्यामुळे जर्मनीच्या यशापयशाच्या रहस्याकडे आणि त्याच्या प्रचाराच्या नागड्या असत्याकडे जगाची दृष्टी आकृष्ट होऊन त्याच्या शवच्छेद-नाला सुरुवात झाली.

'माहिती' हे प्रचाराचे सोज्वळ नाव आहे. माहितीचा '**प्रसार**' करावयाचा असतो; **प्रचार नव्हे**. माहिती सत्यच असली पाहिजे. ती खरी नसली तर थापेबाजी ठरते. आपल्या देशाविषयी, दृष्टीकोनाविषयी आणि हेतू विषयी दुसऱ्या देशांना माहिती करून देणे आणि आपल्या देशाचा प्रचार करणे वेगळे. डॉ. आंबेडकर एके ठिकाणी म्हणतात ("What is education? what is propaganda? Education is that which tells you of both sides; while propaganda tells you of any one side.") शिक्षण म्हणजे काय? प्रचार म्हणजे काय? शिक्षण दोन्ही बाजू सांगते. प्रचार फक्त एकच बाजू सांगतो.

प्रोपागॅण्डा या इंग्रजी शब्दाला प्रचार हा मराठी प्रतिशब्द वापरला जातो. (spreading informating and ideas to advance a cause) एखाद्या ध्येयाला अनुकूलता मिळविण्याकरता माहिती आणि विचारांचा प्रसार करणे हा या शब्दाचा इंग्रजी शब्द-कोषात अर्थ सांगितलेला आहे. प्रचार हा शब्द 'चर' या धातूपासून बनलेला आहे. चर याचा अर्थ चालणे, पुढे जाणे, मार्ग, रीती असा शब्द कोषात दिलेला आढळतो. म्हणून मार्गक्रमण असा या शब्दाचा मराठी भावार्थ होईल. परंतु हा शब्द इंग्रजीतल्या व्यापक अर्थाने वापरला जात असतो. असत्याला, किमानपक्षी अर्ध-सत्याला, अतिशयोक्ती, शब्दच्छल, वैचारिक व भाषिक कसरत इत्यादी उपायांनी 'मुलामा' देऊन,

बुद्धि–भेद आणि सत्त्याचा 'आभास' उत्पन्न केला जाऊ शकतो. प्रचाराने दुसऱ्या देशाशी मैत्री, आर्थिक आणि व्यापारी फायदे व सवलती, सांस्कृतिक देवाण-घेवाण, धार्मिक सहिष्णुता आणि सामंजस्य इत्यादी अनेक बाबतीत स्वदेशहित साधणे सुलभ होते. शांतता कालीन प्रचार सद्यःफलदायी होऊ शकत नाही यात इतरांना आपल्या देशाविषयी–'शिक्षण' द्यावयाचे असते. म्हणून तो सतत चालू राहिला पाहिजे. हा प्रचार हमरी तुमरीवर न येता, मिळते घेऊन, पोटात शिरून, नम्रतेने–परंतु लाचारीने नव्हे, तर स्वाभिमान व अस्मिता जागृत ठेऊन-धीमेपणाने आणि कौशल्याने केला तरच त्याचे परिणाम खोल आणि टिकाऊ होतील.

कमीत कमी वेळात आणि शक्य तितक्या स्वस्तात जय पदरात पाडून घेणे, हे युद्धाचे अंतःसूत्र असते. त्या वेळचा उद्दिष्ट–परिघ आकुंचित आणि केंद्रित असणे अपरिहार्य असते. म्हणून यूद्ध–कालीन प्रचार चढाईचा, झंझावाती आणि अंतर्भेदी असावा लागतो.

युद्धकालीन प्रचाराची चार 'लक्ष्ये' किंवा हेतू असतात. (१) **शत्रू-सैन्य आणि शत्रू–देश यांचे मनोधैर्य खच्ची करणे**, शत्रु–सैन्यात भय–गंड, पराभूत-वृत्ती आणि विजयाविषयी साशंकता उत्पन्न करून शत्रू-जनतेचे युद्धावरील लक्ष विचलित करणे. यामुळे युद्ध साहित्याच्या उत्पादनावर आणि पुरवठ्यावर अनिष्ट परिणाम होऊन, त्याच्या सामर्थ्यावर आघात करता येईल. शत्रू हे नर–राक्षस अथवा क्षुद्र किळसवाणे आणि उपद्रवी प्राणि असल्याचे दाखवून, उर्वरित जगाने त्यांचा तिरस्कार अथवा उपहास करावा, अशी त्यांची प्रतिमा उभी करणे, गेल्या महायुद्धात जर्मनांना भयंकर, दुष्ट, रक्तपिपासू राक्षस रंगविण्याची पराकाष्ठा केली व युद्धसमाप्तीनंतरच्या 'नुरेनबर्ग मुकदम्यात' अनेकांना दोषी ठरवून अमानुष शिक्षा ठोठावल्या. जपानला क्षुद्र तिरस्करणीय आणि उपद्रवी उंदीर बनवून टाकले होते. जपानला चष्मा घातलेला उंदीर चितारणाऱ्याला मोठे बक्षीस दिले गेले होते. असा उंदीर हे दोस्तांनी जपानचे 'बोध चिन्ह' ठरविले होते. श्रीछत्रपती शिवाजीमहाराजांनाहि हेच क्षुद्रत्व–दर्शक आणि घृणास्पद नामाभिधान मोगल मुसलमानांनी दिले होते. नेताजीच्या आझाद हिंद सैनिकांची वृत्ती विचलित व्हावी म्हणून त्यांच्यावर–विमानातून 'अभय–पत्रके' (Safe Conduct Passes) टाकण्यात आली होती. हिंदी आणि इंग्रज सैनिकांचा बुद्धि–भेद व्हावा म्हणून, जपान रेडिओद्वारा, प्रचाराचा सारखा मारा करीत होता. "तुम्ही इंग्रजातर्फे आमच्याशी लढून आपले पारतंत्र्य अधिकाधिक पक्के करीत आहात, हे तुम्हाला कसे समजत नाही? शस्त्र खाली ठेवा, किंवा तुमच्या नेताजीच्या फौजेत दाखल होऊन तुमचा व आमचाही शत्रू जो इंग्रज त्याच्यावर आपले हत्यार चालवा. आम्ही तुम्हाला स्वतंत्र होण्यास मदत करू." असा प्रचार हिंदी सैन्याकरता होता. "तुम्ही इकडे आमच्याशी लढता आहात, परंतु तिकडे तुमच्या

मायदेशात कनेडियन, अमेरिकन, ऑस्ट्रेलियन सैनिक तुमच्या आया बहिणी व बायका भ्रष्टवित आहेत ! परत जाऊन त्यांची अब्रू वाचवा व दुष्टांचा समाचार घ्या, आमच्याशी लढून आपले प्राण नाहक का गमावता ? जय आमचाच आहे" हा ब्रिटिश सैन्याकरता जपानचा प्रचार होता.

(२) **आपल्या सैन्याचे आणि देशाचे मनोधैर्य वृद्धींगत करणे.** गेल्या महायुद्धात जपानने अमेरिकेच्या 'पर्ल' बंदरावर अचानक हल्ला चढवून अमेरिकेला युद्धात खेचले, तोपर्यंत आपल्या सर्वांगीण सामर्थ्याची अमेरिकेला घमेंड होती. 'पर्ल'च्या दाणादाणीमुळे अमेरिकन सैन्याला आणि जनतेला धक्का बसला. त्याचे परिणाम दूर करण्याकरता "विजयी होऊन, नाताळचा येता सण तुम्ही आपल्या मुला-माणसात परत येऊन मोठ्या आनंदात घालवाल. जपान किस झाडकी पत्ती !" असे आश्वासन अमेरिकन प्रशासन आपल्या सैन्याला देऊ लागले होते. चर्चिलची आत्मविश्वासाची परमोत्तेजनक भाषणे व घोषणा आणि त्याची दोन बोटांची इंग्रजी 'व्ही' या अक्षराची विजयाची सांकेतिक खूण, (V for Victory) इंग्रजांचे मनोधैर्य वाढविण्यास आणि टिकवून धरण्यास कारणीभूत झाली. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर आपला स्वतंत्र राष्ट्रध्वज उभारण्याकरता 'चलो दिल्ली' (Onward to Delhi) असे नेताजी आझाद हिंद सेनेला आवाहन करीत असत. भावनोत्तेजक, काळजाला हात घालणाऱ्या प्रचाराने, सैन्याचे मनोधैर्य वाढते; जनता वाटेल त्या पराकाष्ठेच्या त्यागाला तयार होते; 'पट्टे आवळा' (Tighten your Belts) या हाकेला आनंदाने प्रतिसाद मिळतो.; सैन्य अधिक त्वेषाने लढते. सर्व प्रकारच्या सर्व समावेशक युद्ध-प्रयत्नांना (wareffort) अमर्याद उधाण येते आणि जय अधिकाधिक जवळ येतो.

(३) **तटस्थ देशांची सहानुभूती आणि साह्य मिळविणें.** याकरता करावयाचा प्रचार सर्वात कठीण असतो. युद्धाचे अंतरस्थ कारण काहीही असले तरी जाहीर रीतीने त्याला एखाद्या आकर्षक आणि उदात्त हेतूचे बेगड आणि रंगरंगोटी द्यावी लागते. अन्यायाचा प्रतिकार, रंजल्यागांजल्यांचा उद्धार येथपासून, स्वातंत्र्य (इतरांचे) पुनर्प्रस्थापित करण्याच्या (War of liberation) आणि (इतरांना) मुक्त करण्याच्या जागतिक 'धर्मयुद्धा'पर्यंत (धर्म-मानवधर्म या अर्थाने) युद्ध हेतू जाहीर होत असतात. आणि अशी दवंडी पिटली गेली म्हणजे त्या परोपकारी धर्म-युद्धाला साजेसा आणि सोज्वळ प्रचार करून जगाच्या डोळ्यात स्वतःच्या स्वार्थी हेतूविषयीचे निराकरण करण्याचे प्रयत्न केले जातात. लढाईत धुराचा पडदा (Smoke Screen) उभा करून त्याच्या आड शत्रूला दिसू नये म्हणून हालचाली करीत असतात. तसाच हा प्रचाराचा प्रकार आहे. कृत्रिम उत्पन्न केलेला धूर लवकरच वातावरणात विरून जातो. तसेच हे भव्य, दिव्य आणि उदात्त युद्ध-हेतू विरून जाऊन त्यातले पितळ उघडे पडते. म्हणून अशा प्रकारचा प्रचार अतिशय कौशल्याने करावा लागेल.

४ **शत्रूच्या मित्रांना फोडणे.** शत्रूला अनुकूल असलेल्या देशांना शत्रू-मंडळाच्या (Axis) मधून फोडून ते मंडळ खिळखिळे करणे व शत्रूला एकटे पाडणे. येथे महत्वाची गोष्ट ही असते की, उभय पक्षाची अशी मंडळे ही क्षणिक आणि एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच टिकू शकतात. प्रत्येक देशाची वेगवेगळी वैशिष्टये असतात. प्रत्येक देश काही विशिष्ट मर्यादेपर्यंतच अशा कोणत्याही 'युक्तीच्या' उद्घोषित ध्येयपूर्तीसाठी सहयोग देत असतो. म्हणून त्या त्या देशाला अलग करण्याकरता वेगवेगळ्या भूमिकेवरून प्रचार करावा लागेल. व त्याकरता शत्रू-मंडळाच्या प्रत्येक सभासद देशाची सर्वांगीण माहिती असली पाहिजे. त्यांची कमजोरी हेरता आली पाहिजे. आणि त्या त्या देशावर परिणाम होऊ शकणारी प्रचारपद्धती उपयोगात आणली पाहिजे.

लष्करी, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, वांशिक इत्यादी अनेक बाजू अथवा विषय प्रचाराच्या कक्षेत येतात. त्यातल्या काही दुतर्फी व काही एकतर्फी असतात. युद्धकाळात प्रत्येक छोटया मोठया घटनेला एक आगळा अर्थ आणि महत्व प्राप्त होत असते. उभय पक्षाला दरएक गोष्टीचे आकर्षण व औत्सुक्य वाटत असते. प्रत्येकाला आपआपल्या लाभ-हानीची माहिती समालोचन आणि मूल्य मापन तत्क्षणीच हवे असते. लढाईचा 'आखो देखा हाल' पाहिजे असतो. शत्रूच्या अपयशाचे व अडचणीचे वर्णन स्वपक्षाचे मनोधैर्य वाढवीत असते. स्वपक्षाच्या लंगडया बाजूचे परिमार्जन आणि अपयशाचे यशात परिवर्तन ही यशस्वी व चतुर प्रचाराची कसोटी ठरते.

शत्रूच्या लष्करी विजयाचे क्षुद्रत्व, त्याच्या मुत्सद्देगिरीची दिवाळखोरी, आर्थिक परिस्थितीचे भेसूर चित्रण, वांशिक व सांस्कतिक हीनत्व इत्यादी वरील आघातांनी, त्याच्या मनोधैर्यावर अनिष्ट परिणाम करता येतात. स्वपक्षा-विषयीच्या या बाबतीतले सर्व वैशिष्ठच आणि तुलनात्मक श्रेष्ठत्व याच्या प्रचाराने स्वदेशच्या सैन्याचे आणि जनतेचे मनोधैर्य वाढविता येते. या करता पूर्व तयारीची आणि अद्यावत माहितीची आवश्यकता असते.

१) उभय पक्षाच्या सेनांची, युद्धाच्या तयारीची, युद्ध–पद्धतीची, युद्धो-पयोगी साहित्याच्या निर्मितीची आणि पुरवठा व्यवस्थेची, राजकीय आणि आर्थिक स्थैर्याची माहिती.

२) शत्रूपक्षाचे सेनापती आणि मुत्सद्दी यांच्या पूर्वेतिहासाची आणि गुण-दोषांची माहिती.

३) युद्धाच्या प्रगतीची आणि यशापयामुळे शत्रुपक्षावर होणाऱ्या परिणामांची माहिती.

४) शत्रुपक्षाच्या वांशिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय वैशिष्टयांची माहिती. अशीच त्याच्या मित्र–मंडळाविषयीची माहिती.

५) उभय पक्षाच्या वृत्तसंस्था, माहिती आणि प्रसिद्धी याच्या खासगी आणि सरकारी व्यवस्था इत्यादीची माहिती.

कमीतकमीं या वरील पाच बाबतीतली ताजी व विश्वसनीय माहिती प्रचार परिणामकारक होण्याला उपयुक्त ठरेल.

युद्ध कालीन प्रचार 'आक्रमक' असला पाहिजे, त्याच्या माऱ्यात शैथिल्य येता कामा नये. तो सरळ व विनासायास पचनी पडण्यासारखा असला पाहिजे. त्यातली अतीशयोक्ती आणि अतिरंजितपणा नाट्यपूर्ण, समयोचित आणि संयमित असला पाहिजे. त्याची पद्धत भावनोत्तेजक आणि कळकळीची निदर्शक असली पाहिजे. शत्रुपक्षाचा कनिष्ठपणा आणि स्वपक्षाचे श्रेष्ठत्व याचे वर्णन हास्यास्पद न होऊ देण्याची खबरदारी घेतली गेली पाहिजे. प्रचारात तोच तो पणा, ठराविक साचा आणि ठोकळेबाजपणा, कटाक्षाने टाळला पाहिजे. युद्धाच्या प्रगती बरोबर बदलते डावपेच यशापयाचे प्रसंग मनोधैर्याचा चढउतार यांच्या परिणामाला अनुलक्षून प्रचार जरूर तितका लवचिक असला पाहिजे.

आता प्रचाराची अनेक साधने आणि माध्यमे उपलब्ध झालेली असली तरी कल्पकतेला नेहेमीच वाव असतो. नवीन युक्त्या प्रयुक्त्यांच्या शोधात आणि प्रयोगात राहिले पाहिजे. तोच तो पणा नुसता कंटाळवाणाच नव्हे, तर हास्यास्पद ठरतो. भित्ती पत्रके, व्यंगचित्रे, हस्त-पत्रके, पोवाडे लावण्या, संगीतिका इत्यादी गायन प्रकार, कोपऱ्या कोपऱ्यावरील छोटी भाषणे, सोंगे, नाटुकली, घोषणा, मिरवणुकी, कथा कीर्तने, प्रवचने, प्रभात व सायंफेऱ्या, घरोघरी भेटी, आकर्षक बातम्या व वर्णने, स्फुट आणि लेख, खास अंक, रेडिओ आणि दूर चित्रवाणी ही प्रचाराची 'चालू' साधने आहेत. या साधनापैकी काही घरच्या उपयोगाकरता (Home consumption) व काही बाहेरच्या बाजारपेठेत (Foreign market) खपवावी लागतात. काही फक्त बाहेरच्या करताच असतात. देशांतर्गत आणि परदेशात करावयाच्या प्रचाराची यंत्रे वेगळी असली पाहिजे. प्रत्येक देशाची परिस्थिती वेगळी असते. सर्व प्रकारचे 'हवापाणी' जोखून कुशल वैद्याप्रमाणे त्या त्या ठिकाणी रुजेल व खपेल त्या त्या प्रकारची प्रचार योजना केली पाहिजे व जरुर ती पथ्ये पाळली पाहिजेत. प्रचार हे शस्त्र मनावर चालवावयाचे असते. मनुष्याचे मन, दृष्टीगम्य नाही. मनोव्यापार कोणालाही दिसू शकत नाहीत. परंतु मानसिक क्रियांचे परिणाम दिसतात अनुभवास येतात. या अदृश्य मनावर अदृश्य अशा 'प्रचार' या शस्त्राचे आघात करून स्वपक्षाला उपकारक मनोव्यापाराचे दृश्य परिणाम घडवून आणता येतात.

इतर अनेक शास्त्रे व कला यांच्याप्रमाणे प्रचार शास्त्र बनले आहे. शिवाय प्रचार ही कलाही आहे. प्रत्येक देश हे शास्त्र आणि ही कला यांच्या प्रशिक्षणाची आता व्यवस्था करू लागला.

———

# कालच्या आणि उद्याच्या महायुद्धाचे निर्णायक शस्त्र

" In our age of terrifying, lethal gadgets, which supplanted, so swriftly the old one, the first great aggressive war, if it should come, will be launched by suicidal little mad-men, pressing an electronic button. Such a war will not last long and none will ever follow it. There will be no conquerors and no conquests, but only the charred bones of the dead on an unhibited planet "

—*William L. Shirer*

विज्ञानाचा आणि युद्धाचा युगायुगांचा दृढ संबंध आहे. शास्त्रीय शोध युद्धाकरताच लावले जातात असेही म्हणणारे काही पंडित आहेत. ही अतिशयोक्ती असू शकेल. परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे; ती ही कीं विज्ञानच जगाला एकापेक्षा एक वरचढ आणि अधिकाधिक संहारकारक शस्त्रास्त्रे पुरवीत आलेले आहे. किंवा युध्दाने विज्ञानाला आपल्या करता सदैव राबविलेले आहे. हिंदुस्थानातील प्राचीन काळचे शापादपी शरादपी ऋषी, मुनी, मंत्र द्रष्टे, यांच्या पासून पुढे आर्किमिडीज, गॉलिलिओ आणि त्याच्याहि पुढे अगदी आजच्या ताज्या दमाचे शास्त्रज्ञ ध्या; त्यांच्या शोधांचा युध्दाला अतीशय उपयोग होतो आहे. आणि हे असेच चालू राहणार आहे. जार्ज जुअेंगर (George Jueuger) हा जर्मन लेखक म्हणतो. Technical progress and conduct of war today are merging. We have reached a state of affairs where the technical potentialities of a state is the determining factor in the event of war. Superior technology means victory; inferior technology means defeat." याचा थोडक्यात अर्थ हाच की " युद्ध झाले तर युद्धयमान देशाची तांत्रिकी संभाव्य शक्ती निर्णायक ठरेल. तांत्रिकी श्रेष्ठत्व म्हणजे जय, आणि निःकृष्टपणा म्हणजे पराजय."

हर्बर्ट मिट गॉ या लेखकाला आणखी एका जागतिक युद्धाची खात्री वाटत असल्याने गेल्या महायुद्धाला तो उपान्त्य युद्ध म्हणतो. प्रत्येकच देश विज्ञानाला लष्करी सेवेत राबवित असतो. कारण विज्ञानावरच देशाचे सर्व सामर्थ्य अवलंबून असते. हिंदुस्थानच फक्त याला अपवाद आहे. " अणुपरमाणू शक्ती आम्ही मिळवू शकतो; परंतु तिचा युद्धाकरता, विनाशाकरता आम्ही केंव्हाही उपयोग

करणार नाही." अशा अनाहूत सरकारी घोषणा मधून मधून होत असतात. अणु-बाँब गेल्या महायुद्धाचा पूर्ण विराम ठरला. आता त्याहीपेक्षा अधिक महाभयंकर शस्त्राचे उत्पादन आणि अधिक संशोधन चालू आहे.

श्रद्धा आणि पूजास्थाने, रूग्णालये, युद्धाशी संबंध नसलेल्या संस्था, मुलकी आणि गैरलष्करी नागरिक इत्यादींना पूर्वीच्या युद्धात बरीच सुरक्षितता मिळत गेली असल्याने त्यांना सुसंस्कृत युद्धे ( Civilised Wars ) म्हणता येईल. परंतु आता कित्येक किलोमीटर लांब पल्ल्याच्या तोफा, दूरदूरच्या गुप्त ठिकाणावरून प्रक्षेपित करता येणारी गाईडेड मिसाईल्स, हवाई मारगिरी इत्यादी फक्त लष्करी लक्षावरच निशाणबाजी करीत नाहीत. शत्रुची प्रतिकार शक्ती नष्ट करून त्याला आपले म्हणणे, अटी वगैरे मान्य करायला लावून जखडून टाकणे हा आतापर्यंत युद्धाचा हेतू असे. परंतु आता शत्रूचा संपूर्ण नाश करून त्याची नाव-निशाणीही पुसून टाकण्याइतका तो राक्षसी झाला आहे. कारण हा हेतु साध्य करण्यास जशी शस्त्रास्त्रे हवीत तशी आता उपलब्ध झाली आहेत. म्हणून ज्या युद्धात अशा प्रकारचा प्रलय करणारी शस्त्रे वापरली जातील त्या युद्धाला सुसंस्कृत युद्ध केंव्हाही म्हणता येणार नाही.

वैज्ञानिक प्रगतीबरोबर शस्त्रेहि बदलून ती चढी होत जातात. ज्या काळात जी शस्त्रे चालू असतात त्या वेळी त्यांना रूढ शस्त्रे (Conventional Weapons ) म्हणतात. गेल्या महायुद्धात अमेरिकेने अण्वास्त्र वापरीपर्यंत झालेली युद्धे रूढ युद्धे होती; तशीच ती युद्धे सुसंस्कृतही (civilised)-क्वचीत प्रसंग वगळून होती. परंतु आता विज्ञानाच्या अफाट आणि वेगाच्या प्रगतीमुळे शस्त्राचा रुढ राहण्याचा काळ कमी कमी होत चालला आहे. आता अणूपरमाणू शक्तीची शस्त्रे रुढ होण्याच्या मार्गावर आहेत. परंतु ती इतक्या लवकर आणि सहजा सहजी रुढ न होऊ शकण्याचीही अनेक कारणे आहेत. त्यांची निर्मिती व साठा ( stock pile ) करणे प्रत्येक देशाला परवडणार नाही. हे भयंकर खर्चाचे काम आहे. प्रत्येक देशात इतक्या वरच्या दर्जाचे शास्त्रज्ञही नाहीत. त्यांची संहार शक्ती कल्पनातीत असल्याने उभय-पक्षी ती सारखीच भीतीप्रद आहेत. त्यांचा आकार अवजडपणा आणि त्यांच्या उत्पादनाला व प्रक्षेपणाला लागणारी क्षेत्रे फार मोठी असावी लागतात. म्हणून त्यांची निर्मिती आणि प्रक्षेपण केंद्रे नेहमीच गुप्त आणि अज्ञात राहू शकणार नाहीत. त्यांच्यावर अंतराळातून वायूसेनेची तलवार टांगती राहील. परंतु टेबलावरील एखादे बटन दाबून दूर अंतरावरील मोठमोठ्या प्रकल्पाचे उद्‌घाटन आपल्या श्रेष्ठी आणि मंत्र्याकडून केले जाते; तसे सहस्त्रावधी किलो मीटर अंतरावरील 'लक्ष्यां' वर यांत्रिकी आणि वैज्ञानिक कळसूत्राचे बटन दाबून या नव्या शस्त्रांचे प्रक्षेपण करता येते. युद्ध शस्त्रांनी लढले जाते. आजच्या युगात अनेकानेक **स्वयंचलित गोष्टी**

निर्माण झाल्या आहेत परंतु स्वयंचलित म्हणजे 'स्वयंभू' नव्हे. स्वयंचलित यंत्रालाही प्रारंभीचे चलन द्यायलाच मनुष्य लागतो. गुप्त निर्जन ठिकाणावरून नुसते बटन दाबायला, किंवा एकादा दांडा खालीवर, मागेपुढे किंवा बाजूला सरकावयाला फारशा शारिरीक शक्तीची किंवा मनोधैर्याची मुळीच आवश्यकता नसते. किंवा दुसऱ्या कोणत्या विशिष्ट मनोवृत्तीचीही गरज नसते. असे 'बटन दाबू' (Push Button War) युध्द कालांतराने 'रूढ' (Convantional) होईल काय ? हा मोठा गंभीर प्रश्न आहे. परंतु असे युध्द 'सुसंस्कृत युध्द (Civilisied war) मात्र केंव्हाही म्हटले जाणार नाही.

गेल्या महायुद्धातल्या अमेरिकेच्या अणु बाँबनी जितका हाहा:कार उडविला तितका पौराणिक मंत्रयुगातील अस्त्रांनीही उडविला नसेल! पर्वतास्त्राने शत्रूच्या सैन्यावरच फक्त फत्तरांची बरसात झाली असेल, इतरत्र नाही. मंत्र-चलित अस्त्र समोरासमोर उभे राहिलेल्या परस्पर शत्रूवर आणि युद्ध भूमिवर प्रक्षेपित केले जात असे. इतरत्र नाही. राष्ट्राराष्ट्रातील शस्त्र शर्यतीवरून भावी युद्धाची 'प्रसाद चिन्हे' दिसू लागत असतात.

अणुपरमाणूंचा स्फोट करून भयंकर शक्ती निर्माण करता येते हे १९४० साली सिद्ध केले गेले होते. एका किलोग्रॅम (U-235) युरेनियमने वीस हजार टन 'टी. एन्. टी.' इतकी स्फोटक शक्ती निर्माण होऊ शकते हे १९४१ साली सिद्ध झाले. अमेरिकेतल्या प्रयोग शाळेत यावर अधिकाअधिक संशोधन चालू राहिले. अमेरिका युरोपात सुरु झालेल्या युद्धात अजून सामील झाली नव्हती. परंतु जपानने 'पर्ल हारबार'वर अचानक हल्ला करून अमेरिकेला हादरा दिला व युद्धात ओढले. युरोपात हिटलरने जसा एकदम धुमाकूळ माजविला होता; तसाच जपानने इकडे माजविला. ब्रह्मदेश जिंकून आसामात प्रवेश केला. चांग काय शेक जपानला अमेरिकेच्या मदतीनेही पायबंद घालू शकला नाही. सिंगापूर सोडून दिले होते. ब्रिटिश साम्राज्याची फौज मार खात होती; आणि परिस्थिती फारच बिकट होऊन दोस्त मोठ्या पेचात पडले होते. शेवटी अमेरिकेने निर्णय घेतला; आणि सुमारे वीस हजार टनाचे दोन अणुबाँब तीन दिवसांच्या अंतराने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या प्रदेशावर टाकून ते बेचिराख केले. या प्रत्येक बाँबला सातशे कोटी रुपयांच्या वर खर्च लागला होता. त्यातून प्रसरण पावलेल्या 'रेडिओ ॲक्टीव्ह' किरणोत्सर्गाने कल्पनातीत दूरगामी दुष्परिणाम झाले. "अणुबाँबमुळे झालेली मनुष्यहानी इष्टापत्तीच समजली पाहिजे. नाही तर युद्ध तसेच चालू राहून उभयपक्षाची जी हानी झाली असती ती अधिकच ठरली असती. अणुबांबमुळे युद्ध थांबले आणि अनर्थही थांबला" असे म्हणून पोर्टवे या लेखकाने अणुबांबचे बिनदिक्कत समर्थन केले आहे.

अणुबाँबचा हैड्रोजन बाँब हा दुसरा आणि कोबाल्ट हा बांब तिसरा प्रकार आहे. हे प्रकार संहार कार्यात एकाहून एक वरचढ आहेत. 'सैनिकाची स्वाक्षरी'

या आपल्या ग्रंथात अण्वास्त्र किती विध्वंस करू शकेल याचे वर्णन जनरल **परांजपे** यांनी केले आहे. ते लिहितात "एकवीस मेगॅटन बाँब पुणे शहराच्या मध्य भागावर (शनिवार वाड्यावर) टाकला तर जमीनीत अर्धा मैल खोल व तीनशे फूट त्रिजेचा वर्तुळाकार खोल खड्डा पडेल. नंतर अकरा मैल त्रिजेच्या वर्तुळात एकही इमारत किंवा प्राणी शिल्लक उरणार नाही. पंचवीस मैलाच्या वर्तुळात सर्व प्राणी 'किरणोत्सर्गाने' काही मिनिटात मरतील. प न्नास मैलपर्यंतच्या प्रदेशात कित्येक आठवडे घातक हवामान राहील. व या भागातील जमीनीत पंचवीस ते तीस वर्षे पीक पेरणे धोक्याचे होईल. (शनिवार वाड्याच्या ऐवजी नागपूरच्या भोसल्यांच्या महालाची कल्पना केली तर नागपूरचा उध्वस्त परिसर मनःचक्षुपुढे उभा करता येईल.) ही नुसती एक 'झलक' आहे. शास्त्रज्ञ या विषयींचे संशोधन जेव्हा पूर्णत्वाला नेतील तेव्हा 'जगबुडीच' होईल. १९४५ पासून आज १९७१ वर्षाच्या या २६ वर्षांत १९४० ते १९४५ या पांच वर्षापेक्षा कमीत कमी पाचपट प्रगती झालेली असणारच. अण्वास्त्रे आता एकट्या अमेरिकेची मत्ता नाही. रशिया, फ्रान्स, चीन आणि हिंदुस्थानही ती बनवू शकतो. पहिल्या तिघांनी ती बनविली आहेत. अधिक प्रयोग चालू आहेत आणि त्यांचे साठे (Stock piles) ही तेथे होत आहेत. हिंदुस्थान तसे कधीही करणार नाही. तशा सरकारी घोषणा अनाहूतपणे होत असतात.

अण्वास्त्रे वजनात हलकी, आटोपशीर परंतु अधिक संहारक्षम बनवून त्यांचे प्रक्षेपणही अधिक सोपे होणे शक्य आहे. तसे प्रयत्न चालू असतीलच. दूर-नियंत्रणाच्या (Remote control) तंत्राने ती टाकता-उडवता यावीत असेही प्रयोग सुरू आहेतच. आकाशातून, जलपृष्ठावरून आणि खालून व अणुशक्ती प्रेरित पाणबुडीचा शोध सिद्ध झालेला आहे. आकाशातून, भू व जल-पृष्ठावरून, वरून व खालून सर्व प्रकाराने अण्वास्त्रांचे प्रक्षेपण होऊ शकेल. पुढच्या महायुद्धात हे दिसेलच.

अण्वास्त्रापासून बचावाची साधने अजूनपर्यंत उपलब्ध झालेली नाहीत. अणुबाँब टाकणाऱ्या विमानावर बारा मैल उंच आकाशात पन्नास पौंड वजनाचा गोळा राडारच्या साहिय्याने सोडू शकेल अशी 'स्ट्रटोस्फीअर कॅनन' अमेरिकेने तयार केली आहे. परंतु हा गोळा त्या अणुबाँबवाहू विमानाला वर आकाशात अचूक अडथळा करीलच याची खात्री नाही. कारण ते विमानही स्वनातीत वेगाने उडत असणार; आणि अंदाजाने काढलेले गणिताचे उत्तर चूक ठरू शकेल आणि यदाकदाचित हा गोळा त्या विमानावर आदळलाच तर त्या विमानाबरोबर त्यातला अणुबांब पेटून त्याला 'वत्ती' मिळेल आणि जमीनीवर पडून तो आपले संहार कार्य पुरे करीलच. राडार कशाचीही पूर्वसूचना देऊ शकला तरी स्वनातीत वेगाने स्ट्रटोस्फीयर मधून उडणाऱ्या यानाची अचूक माहिती आगावू

देईलच देईल असे ठामपणे म्हणता येत नाही. प्रत्येक गोष्टीला मर्यादा ही असतेच. आणि त्यातूनही अशी पूर्वसूचना मिळालीच तर तो काळ पाचसात मिनिटापेक्षा अधिक असणार नाही असे तज्ञ सांगतात. तेवढ्या अवधीत आपल्या विमानविरोधी तोफेचा गोळा सुटून अचूक लक्ष्यवेध अशक्य आहे. म्हणून अण्वास्त्रांचा प्रतिरोध शक्य नाही.

अण्वास्त्राच्या किती तरी पूर्वी विषवायू (gas) हे रासायनिक शस्त्र उपलब्ध झाले आहे. परंतु ते अजूनपर्यंत 'रूढ' झाले नाही. ग्रीस आणि रोम या देशांनी विषवायु नसला, तरी सडलेला पाला-पाचोळा, कचरा किंवा दुर्गंधी पसरविणाऱ्या वस्तू पेटवून लढाईत धूर पसरविल्याचे एक दोन दाखले आढळतात. आपल्या इकडे, पौराणिक मंत्रयुगात विषवायू प्रेरक अस्त्रे कदाचित असतीलही. 'सर्पास्त्राने' सर्पाचा पाऊस, किंवा 'पर्वतास्त्राने' मोठमोठ्या शीलांची शत्रू वर बरसात केली जात असे अशी वर्णने आढळतात.

आधुनिक काळात, विषवायूचा प्रथम उपयोग केव्हा केला गेला हे नक्की सांगता येत नसले तरी सन १८८९ साली भरलेल्या 'हेग' परिषदेत सर्व पाश्चिमात्य प्रमुख राष्ट्रांनी, विषवायु न वापरण्याचे कबूल केले होते. याशिवाय धर्मयुद्धाची काही बंधनेहि, आपल्यावर लादून घेतली होती. यावरून सन १८८९ पूर्वी युद्धात विषवायु वापरला गेला होता असे जरी पक्के समजले नाही; तरी निदान प्रमुख देशांच्या शस्त्र संभारात हे शस्त्र होते, व ते वापरले जाण्याची धास्ती होती हे सिद्ध होते. पहिल्या महायुद्धात ता. २२ एप्रिल १९१५ रोजी 'यीप' जवळच्या खंदकात जर्मनीने 'क्लोरिन' वायू प्रसृत केला होता. या 'मुहूर्ताच्या विषवायू'मुळे, पंधरा हजार फ्रेंच, कनेडियन आणि अल्जेरियन सैनिक मृत वा निकामी झाले, अशी नोंद आहे. प्रत्युत्तरादाखल दोस्तांनी त्याच वर्षाच्या सप्टेंबरमधे व नंतर पुनः १९१७ साली विषवायू सोडला होता. परंतु दोन्ही वेळी वारा उलट वाहिल्यामुळे हे प्रयोग, कर्त्यालाच बाधले. नंतर त्या युद्धात विषवायू वापरला गेला नाही. पुढे १९२५ साली 'गॅस प्रोटोकोल'वर सह्या करून गॅस न वापरण्याचे प्रमुख राष्ट्रांनी मान्य केले. या करार-पत्रकावर जपान व अमेरिका यांनी सह्या केल्या नव्हत्या. इटालीने सही करूनही ॲबीसिनियाच्या विरुद्ध विपुल प्रमाणात विषवायूचा उपयोग केला ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

विषवायूचा उपयोग, हवा आणि वातावरण यावर अवलंबून असतो. प्रतिकूल हवेत, वापरणारालाच तो अपायकारक होतो. जर्मनीने गॅसचा उपयोग बंद केला, याचे कारण, हे आहे की फ्लँडर्समधे वारे उलटे वाहात होते. व फ्रान्स व इंग्लंड गॅस विपुल प्रमाणात तयार ठेवला होता, व त्याच्यापासूनच्या बचावाची अनेक साधनेही तयार केली होती. आणि त्यांना वाराहि अनुकूल असल्याने जर्मनीचे

फार नुकसान झाले असते. गॅस वाऱ्याबरोबर प्रसरण पावतो. विरुद्ध दिशेने येत असलेला वारा जास्त वेगाने धावत असेल तर तो जास्त प्रसरण पाऊन विरळ होऊन जाईल व उपद्रवकारी होणार नाही किंवा झपाट्याने डोक्यावरून निघून पुढे जाईल.

डॉक्टरी क्लोरोफॉर्म व 'हास्य वायू' आणि पोलिसी 'अश्रुधूर' हेच काय ते रासायनिक वायूचे प्रकार, ऐकून व क्वचित् अनुभवाने सर्व साधारण माहीत आहेत. विषवायूचे मुख्य भेद दोन आहेत एक रक्तात भिनणारे (Blood Gasses) व दुसरा मज्जातंतूवर (Nerve Gasses) परिणाम करणारे. त्यातही तीन प्रकार आहेत एक विष–वायू (Poison Gas) दुसरा आग लावणारा (Incendiary) आणि तिसरा धूर (Smoke). अवस्था विशेषावरूनही तीन प्रकार आहेत. एक द्रव रूप, दुसरा घनरूप, आणि तिसरा बाष्परूप. धूर (Smoke) तसा अपायकारक नाही. कदाचित काही किंचित् परिणाम झालाच तर अल्पजीवी असतो. धुराचा उपयोग 'पडदा' (Screen) किंवा आवरण (Cover) उभे करून नजरबंदी करणे, व त्याच्याआडून हुलकावण्या देणे व हालचाली करणे हा असतो. रोगजंतूही रासायनिक प्रक्रियेने उत्पन्न करून त्यांचा शत्रूवर मारा करता येतो. या शस्त्राला 'जन्त्वास्त्र ) (Bilogical weapon) हे नाव शास्त्रज्ञांनी दिले आहे. या दोन्ही शस्त्रांना Chemical and Biolgical weaponary असे संयुक्त नाव मिळाले आहे. या नावाची आद्याक्षरे घेऊन त्याला 'सबिडिक्ल्यू' हे छोटे नाव तयार झाले आहे व ते प्रचलित झाले आहे.

विष वायूचे घातक परिणाम स्पर्शाने, पोटात गेल्याने, श्वासावाटे फुफ्फुसात गेल्याने होतात. ते रक्तात भिनू शकतात. ते लवकर विरल होणारे (Volatile) किंवा दीर्घकाळ रेंगाळत राहणारे (Persistant) असेही असतात. याशिवाय परिणामावरूनही त्यांचे अनेक प्रकार ठरविले गेले आहेत. एक, अश्रुधूर (Teargas) डोळ्यात पाणी आणून त्रासदायक होणारा, दुसरा, त्वचेवर परिणाम करणारा, तिसरा–गुदमरविणारा (Choking) चौथा, फोड (Blisters) आणणारा, पाचवा मज्जातंतूवर (Nerves) परिणाम करणारा इत्यादी या सर्वांची शास्त्रीय नावे व सविस्तर परिणाम येथे सांगण्याची आवश्यकता नाही. याशिवाय 'मानस–रासायनिक' (Psycho–Chemical) शस्त्रही शोधून काढले गेले आहे. याच्या योगाने मनावर आणि बुद्धीवर विलक्षण विपरीत परिणाम होऊ शकतात. शौर्यांच्या जागी भ्याडपणा येणे, तीव्र आणि उत्तेजक भावना नष्ट होऊन, प्रेरक शक्ती नाहीशी होणे, विनावेदना दुर्बलता येणे, भयंकर सुस्ती येणे, शरीर बधिर वाटणे, असे अनेक परिणाम या योगाने होतात. अश्रुधूर हा सर्वात कमी उपद्रवी आहे. तो फक्त थोडा वेळ डोळ्यावर

परिणाम करतो. म्हणून युद्धात वापरला जात नाही. पोलीसच त्याचा उपयोग करतात. आगलाव्या गॅस-बाँबमधे निरनिराळ्या प्रकारच्या, आपोआप पेट घेणाऱ्या ज्वालाग्रही वस्तु असतात. ते उखळी (Mortors) शत्रूवर फेकता येतात. या शिवाय तोफातून निरनिराळ्या साधनानी आगीचे झोत (flame throwers) शत्रूवर सोडता येतात. गेल्या महायुद्धात हॅम्बूर्गचा आणि टोकिओचा अशा आगी फेकून वराच विध्वंस केला गेला होता.

कोणत्याही इतर कारणापेक्षा, रोगामुळे सर्वात अधिक प्राणहानी होत असते. रोगजंतू आपोआप उत्पन्न होतात; तसेच रासायनिक प्रक्रियेने उत्पन्नही करता येतात. त्यांना युद्धात शस्त्र म्हणून निश्चित स्थान प्राप्त झाले आहे. पहिल्या महायुद्धाचे वेळी दोस्तांना जर्मनीपासून तशी भीती वाटत होती. परंतु ती निराधार ठरली. (विषवायूही बंद केला गेला) दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी जपानने चीनशी केलेल्या युद्धात' चांग हे ' या चिनी शहरावर 'विषाणू 'चा मारा केला होता. परंतु अधिक माहिती बाहेर आली नाही.

'जन्त्वस्त्र ' 'अण्वास्त्रा 'पेक्षा भयंकर ठरु शकेल, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. याच्या योगाने उत्पन्न करता येणार नाही, असा एकही रोग नाही. तत्काळ मृत्यू आणणारे, हळू हळू जीव घेणारे, अंथरूणाला खिळवून टाकणारे, पिढयान् पिढया पीच्छा करणारे, असे सर्व प्रकारचे रोग उत्पन्न करता येतात. साधारणपणे हे शस्त्र एकदम प्राण घेणारे ( Lethal) नसले, तरी त्याचे परिणाम कोणत्याही शस्त्राच्या आघातापेक्षा विस्तृत, आणि जवळ जवळ कायमचेच, असे होऊ शकतात. त्याविषयी एका ब्रिटिश शास्त्रज्ञाने म्हटले आहे. "या मुळे प्रत्येक घर जरी एकदम स्मशान झाले नाही, तरी रुग्णालय खात्रीने होईल. व या रुग्णालयातील एकही रोगी कधीच बरा होणार नाही."

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यानच्या काळात बहुतेक सर्व देशांनी आपआपल्या शस्त्र संभारात विषवायूची भर घातली होती. आणि सेनेला त्याच्या उपयोगाचे, आणि त्यापासून बचावाचे शिक्षण दिले होते. पहिल्या महायुद्धानंतर हिंदुस्थानात बेळगाव येथे 'विषवायु निरोध कक्ष, (Anti gas wing) स्थापन झाला होता. दुसऱ्या महायुद्धाचे वेळी देवळाली येथे " रासानिक युद्ध प्रशाला " (Chemical warfare school ) उघडली गेली. त्याच युद्ध काळात कॅनाजोर येथे समुद्र किनाऱ्याचर 'जन्त्वास्त्रा 'ची (Biological Weapons) एक प्रयोगशाला व केंद्र उघडले गेले होते. अर्थात ते "गुप्त व सुरक्षित" होते. तेथे लढाईत उपयोगी पडणारे पशू-जसे खेचरे, घोडे आणि सैन्यातले निरनिराळ्या हवामानातले, निरनिराळ्या अन्नपाण्याच्या पिंडाचे, आणि पेशींचे, तसेच रक्त गटांचे (Blood Group) सैनिक, यांच्यावर विशेष प्रकारचे प्रयोग होत असत. व या सर्वांची विशिष्ट प्रकारची खास निगा ठेवली जात होती. व त्याना विशेष भत्ताही मिळत होता. तेथे काळे, गोरे,

शिट्टी सर्व प्रकारचे सैनिक तसेच दोस्तांच्या देशातली खेचरे व घोडेही होते. युद्ध समाप्त होताच, तोफांच्या गोळ्यातून उडवून, आणि अन्य मार्गांनी, हे सर्व लगतच्या समुद्रात बुडविण्यात आले पुढे बरेच दिवस समुद्राच्या पृष्ट भागावर अनेक प्रकारच्या मृत जलचरांचे जाड तवंग पसरले होते.

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा पराभव करून दोस्त जर्मनीत घुसले तेंव्हा त्यांना तेथे गॅसची मोठमोठी कोठारे सापडली. दोस्तांनी अर्थातच ती वाटून घेतली. ब्रिटिश व अमेरिकनांनी आपले हिस्से नष्ट केले असे म्हणतात ! रशियाने मात्र आपला संपूर्ण वाटा उपकरणे इतर सामग्री, आणि तेथले शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञही उचलून आपल्या देशात नेले; असेही सांगितले जाते.

'सीबीडब्ल्यू' शेल-तोफेचा गोळा, उखळी तोफ, हात बाँब (Grenade) इत्यादी माध्यमातून आणि विमानातून, हवाई छत्र्या, फुगे इत्यादीतून अनुकूल वारा पाहून सोडता येतात. नद्या, तलाव, पाणवठे अशा ठिकाणी फवारता येतात. शत्रू देशात दूरवर आत गावे, शहरें, कारखाने, छावण्या, तंबू, इमारती, आडोसे, खंदक, मोर्चे, बंकर्स इत्यादी कोठेही त्यांचा न समजून येणारा, अति सूक्ष्म प्रवेश होऊ शकतो. विष आणि रोग जन्तूचे परिणाम दीर्घकाल टिकणारे व सांसर्गिक असल्याने, रोगांच्या साथींचा सैनिक, नागरिक आणि पशुपक्षी इत्यादी सर्वांवर परिणाम होऊन जो एक प्रकारचा प्रलय माजेल त्याला पायबंद घालणे शक्य होणार नाही.

मुखवटे घातल्याने, कान डोळे नाक या मार्गांनी त्यांच्या शरीर प्रवेशाला प्रतिबंध करता येतो. गेल्या महायुद्धाचे वेळी, सर्व सैनिकांना अहोरात्र मुखवटे जवळ बाळगावे लागत असत. इंग्लंडमधे मुलकी नागरीकही मुखवटे बाळगीत असत. खेचरे व घोडे यांच्या करताही मुखवटे होते. तसेच संरक्षक कपडे, अंगाला लावण्याची औषधे, वगैरे दुसरी साधनेही बनविली होती. लढाईत जवळ बाळगावयाच्या प्रथमोपचार पट्टया (First Field Dressing) प्रमाणे एका बटव्यात अॅट्रोपीन किंवा तसे औषधी द्रावण भरून तयार ठेवलेली, स्वत:ला टोचून घ्यायची 'टोची' (Syringe) प्रत्येक रशियन सैनिकाजवळ असे. यांच्यापासून सर्वांचेच संरक्षण करण्याची रशियाने व्यवस्था केली होती. टेरिलिन शर्ट आणि नायलान साडीच्या किमतीत संरक्षण संच (Set) रशियात मिळत असे.

'सीबीडबल्यू' निर्मितीला स्वस्त, बाळगायला सोईची, वजनाला हलकी, वापरायला सोपी व सहज लपविता येणारी, आणि अण्वस्त्रापेक्षा काकणभर, अधिक परिणामकारी (निराळ्या प्रकाराने) असल्याने, ती अण्वस्त्रांची जागा घेतील काय ? असा प्रश्न उत्पन्न होऊ शकतो. जड सृष्टीला, तशी ती हानी-कारक नसली, तरी सचेतन सृष्टीला ती मृत्यूसारखीच आहेत. त्याचे प्रसरण आणि संसर्ग न दिसणारा, न ऐकू येणारा किंवा परिणाम सुरु होईपर्यंत

जाणवणारा असतो. **कोरियाच्या** युद्धात असेरिकेने त्यांच्या उपयोगाच्या केलेल्या आरोपाचा तिने इनकार केला होता. परंतु अमेरिकेला आता घरचाच अहेर मिळाला आहे. मान्यता प्राप्त अशा बावीस अमेरिकन शास्त्रज्ञांनी, सह्या करुन, ता. १९ सप्टेंबर १९६६ रोजी आपल्या देशाच्या राष्ट्रपतीला, एक पत्र पाठविले. त्यात अमेरिकेने व्हिएटनाम मध्ये शेतमालाला अपायकारक (Anti Crop) परंतु प्राणघातक नसणारी (Non Lethal) मानवाविरुद्ध (Anti-personal) आयुधे, वापरली असल्याचे उघड करुन त्यांचा वापर थांबविण्याची आणि 'सीबीडब्ल्यू'वर जागतिक बंदी घालण्याच्या भूमिकेवर अमेरिकेने ठाम राहण्याची कळकळीची विनंती केली आहे.

ब्रिटिश निःशस्त्रीकरण मंत्री (Disarmament minister) लॉर्ड **चाल्फंट** यांनी अलीकडेच बी. बी. सी. वरुन सांगितले, "नवीन शोधामुळे 'सीबीडब्ल्यू' अधीक सोयीची आणि स्वस्त होतील. व आंतरराष्ट्रीय संघर्षात त्याना विशेष महत्वाचे स्थान प्राप्त होईल. अण्वास्त्रे न परवडणारे देश, त्यांनी सुसज्जित होतील. कदाचित अणुशक्ती-संपन्न देश, परस्पर संहाराच्या सारख्याच भीतीमुळे, त्या शक्तीचा उपयोग करु धजण र नाहीत. तरी पण, आपल्या विरुद्ध, कोणीही त्यांचा वापर करण्याचे धाडस करुं नये म्हणून, आपल्या देशाने (Great Britain) 'सीबीडब्ल्यूज्'ची जय्यत तयारी ठेवली पाहिजे." हे निःशस्त्रीकरण मंत्र्याचे जाहीर उद्‌गार आहेत. असे हे निःशस्त्रीकरण जागतिक शांततेच्या प्रस्थापनेकरता केले जात आहे !

**अमेरिकेची** लष्करी रासायनिक संघटना (U. S. A. Army Chemical Corps) तयार आहे. **कानडाने** तेच केले आहे. **फ्रान्सचीही** तयारी आहेच. **रशियाचा** प्रश्नच नाही. **चीनही** मागे राहिला असेल असे समजण्याचे कारण नाही. सर्वच देश परवडेल त्या प्रमाणात अण्वास्त्रांच्या आणि सरसिपणे 'सी बी डब्ल्यूच्या' शस्त्र-सामर्थ्याने स्वतःला सुसज्जित करुन स्वदेश रक्षणासाठी झटत आहेत. हे काही सिद्ध करण्याची आणखी आवश्यकता नाही. **यहूदी अरब** युध्दासारख्या अजून तरी स्थानिक (Local) असलेल्या युध्दात 'सी बी डब्ल्यूच्या' उपयोगाची शक्यता आहे. हिंदुस्थानपुरता, अण्वास्त्रांचा प्रश्न निकालात काढला गेला आहे. प्रत्युत्तराकरता युध्दही, आम्हाला वर्ज आहे. परंतु 'सी बी डब्ल्यूच्या' शस्त्रसंपन्नतेविषयी (प्रत्युत्तराकरता तरी) आमची तयारी का असू नये ? 'अणुशस्त्राच्या' प्रश्नाच्या गदारोळात 'सी बी डब्ल्यूच्या छत्रीची' म्हणजे, आपल्या, त्यांच्यापासून बचावाची योजना आणि तरतूद, यांचा, आमच्या संरक्षण-मंत्रालयात आणि प्रधान मंत्र्यांच्या मनात काही निश्चित विचार असेल काय ? आणि आमचे वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, आणि तंत्रज्ञ आपआपल्या प्रयोगशाळांत, या विषयाच्या संशोधनात, निमग्न झालेले असतील काय ? प्रश्नांची उत्तरे 'अस्ति'पक्षी असतील तर ते परमभाग्याचे होईल.

उद्याचे युध्द सर्वंकश (Total) युध्द होईल असे म्हटले जाते. ते केंव्हाही सुरु होण्यासारखी जागतिक परिस्थिती झाली आहे; असेहि म्हटले जाते. आणि या युध्दात अण्वस्त्रांचा उपयोग होऊन जित आणि जेते हा भेदही उरणार नाही. म्हणजे महाप्रलय होईल; असेहि म्हटले जाते. हे होवो किंवा न होवो ! परंतु सर्व जगाचाच संहार होईपर्यंत लहान मोठी आणि स्थानिक युध्दे होतच राहणार. हेही सत्य आहे. छोटया देशांना अण्वास्त्रे परवडणारी नसल्याने अशा युध्दात त्यांचा उपयोग होण्याची शक्यता क्षणभर बाजूला सारली, तरी 'सी बी डब्ल्यूचे' काय ? हा प्रश्न पुढे उभा आहेच.

अणुशक्तीच्या परिणामांचे रौद्ररूप क्षणार्धात पुढे उभे राहात असल्याने ती अतीशय भीतीप्रद वाटते. ( आहेही ) सीबीडब्ल्यूचे दृश्य-ताबडतोबीचे परिणाम दिसत नसल्याने त्या शक्तीची भीती तशी वाटत नाही. म्हणून तिच्याकडे दुर्लक्ष करून चालेल काय ? एक महायुद्ध अणुशक्तीने अकस्मात थांबवून ती शक्ती निर्णायक ठरली. 'सीबीडब्ल्यूची' शक्तीही तितकीच किंवहुना अधीक असली, तरी ती कालांतराने प्रभाव गाजविणारी आहे. म्हणूनही तशीच निणार्यक आहे. परंतु निर्णय नंतर लागणार आहे. एकीला तात्कालिक 'बत्ती ( Instant fuse ) जोडलेली आहे. दुसरीला मुदतीने परिणाम करणारी 'बत्ती' ( Delayed Action fuse ) जोडलेली आहे. फरक इतकाच. परिणाम तोच. म्हणूनच 'सीबीडब्ल्यू' हेही उद्याच्या युद्धाचे निर्णायक शस्त्र होऊ शकेल. कालच्या युद्धाचे अणुशक्ती हे होते.

---

# गनिमी युद्ध

हिंदुस्थानात गनिमी युद्ध-तंत्राचे पितृत्व छत्रपती श्री शिवाजी महाराजांकडे जाते. या युद्ध प्रकाराला ईग्रजीत 'गुरीला वॉर फेअर' म्हणतात. गनीम हा शब्द जसा मराठी नाही तसाच गुरीला (Guerilla) हा शब्द इंग्रजी नसून तो स्पॅनिश भाषेतला आहे. त्याचा मूळ अर्थ छोटा, लहान असा आहे. गुरीला युद्ध म्हणजे छोटे युद्ध. युरोपमधे नेपोलियनच्या आईबेरियन द्वीपकल्पाच्या मोहिमेत या प्रकाराचा प्रथम उपयोग केला गेला. स्पॅनिश लोकांचे युद्ध सामर्थ्य तोकडे असल्याने, त्यांनी भुरटे हल्ले केले; रसद मारली; 'मारो और भागो' अशा पळत्या लढाया केल्या. यामुळे बेजार व हैराण झालेल्या नेपोलियनला ती मोहीम सोडून द्यावी लागली. हे सर्व पेशाने सैनिक नसलेल्या युद्धाचे शिक्षण न मिळालेल्या, सामान्य गावकऱ्यांनी केले.

ज्यांना इंग्रजीत Partisans ( सहोत्थायी ) म्हटले जाते, असे लोकही या युद्ध-तंत्राचा अवलंब करतात. 'सहोत्थायी' दोन प्रकारचे असतात. एक 'तसे' देशद्रोही नसणारे परंतु विशिष्ठ मतप्रणालीचे पुरस्कर्ते, राजकीय

(अंतर्गत) आक्रमणाला किंवा विशिष्ठ सत्तागटाला उखडून टाकण्यास प्रवृत्त झालेले. दुसरे परप्रत्यनेय, परकीयांना मदत करणारे. (यांना फितूर–देशद्रोही मानता येईल.) सहोत्थायीच्या या दोन प्रकारातला भेद स्पष्टच आहे; तरीही वरवर पाहता तो विसरला जाण्याची शक्यता असते. सहोत्थायी आणि गनीम गुरीला यांचीही गल्लत होऊ शकते. या सर्वांचे तंत्र सारखेच असले तरी गुरीला फितूर नसतो. सहोत्थायी फितूर असू शकतो.

हे कमजोरांचे युद्ध तंत्र आहे. याला समरभूमी नसलेले युद्ध म्हणतात. ( War without battlefield ) यात कठीण कवच फोडावयाचे नसते. वरवर आणि कडांना कुरतडायचे असते. ( "Not to crack the Nut but to gnaw on the surface and border" Clauswitez.) झटपट छोटे चावे आणि पटपट समझोता. (Small bites quickly made, and as quickly followed by offers to negotiate" ) असे याचे लिडल हार्ट याने वर्णन केले आहे. गुरीला विध्वंस करु शकतो परंतु जिंकू शकत नाही. "Gureilla can destory but not win.") असे हंटिंग्डन याने ह्या तत्त्वांचे मर्म सांगितले आहे. शिवाजी महाराजांनी हेच केले.

गनिमी युद्ध तंत्र जरी 'कमजोरांचे–सामर्थ्य' असले तरी मोठ मोठे शक्ति-संपन्न देश या तंत्राचा वापर करू लागले आहेत. हे तंत्र पूरक ठरले आहे. युद्ध 'रूढ' (Conventional) असो अथवा विशिष्ठ पद्धतीने लढले जावो (un-conventional) ते कोठेहि, केंव्हाहि होवो किंवा त्याची व्याप्ती केवढीही असो– या तंत्राचा कमी अधिक उपयोग केला जात असतो.

आपल्या देशातली लोकशाही आता निराळे वळण घेते आहे. एकाच पक्षाची राजकीय मक्तेदारी डळमळीत झाली आहे. अशा संक्रमणाच्या काळात देश विघातक तत्त्वांना मूळ धरण्यास वाव मिळू शकतो. अराजक, अशांतता, फुटीरपणा इत्यादींचे परकीयांकडून आणि सहोत्थायी फितूर स्वकीयांकडून नको ते 'तण' वाढीस लागणार असे दिसते. परकीय विषमय मत–प्रणालींची केंद्रे ( cells ) स्थापित होऊन, त्या विषबीजांना अंकुर फुटत आहेत. त्याचीही कार्यपद्धती गनीमी तंत्राचीच आहे. त्यातले उत्पात, विध्वंस, बुद्धी–भेद, मानसिक आणि वैचारिक भ्रष्टपणा इत्यादींची प्रतीती आणि परिणाम दिसू लागले आहेत.

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत हिंदुस्थानात १८५७ च्या उघड सशस्त्र उठावानंतर 'वंगभंगाच्या' आंदोलनाचे वेळीं या 'कमजोरांच्या युद्ध पद्धतीने' हैराण झालेल्या सरकारला वंगभंग रद्द करावा लागला. १९४२ च्या 'चलेजाव' आंदोलनाचे वेळीही भूमिगतांनी हे तंत्र वापरले होते. पुढे इंग्रज येथून निघून गेला. परंतु ते 'चलेजाव' चे यश होते असे म्हणता येणार नाही. त्याची दुसरीच कारणे होती.

दुसऱ्या महायुद्धाचे वेळी बंदिस्त सुभाषचंद्र बोस सरकारच्या हातावर तुरी देऊन निसटले ते जर्मनीत प्रकट झाले. त्या वेळी हिटलरने 'हिंडेनबर्ग डिव्हिजन' या नावाचा एक गनीमांचा सेना-विभाग उभारला होता. निरनिराळ्या देशातले तसेच हिंदुस्थानातले जर्मनीत वास्तव्य करीत असलेले 'सहोत्थायी' एकत्र केले होते. त्यात जर्मनीतल्या 'इंडियन लीजियन' चे लोक सामिल होते. यांना हिंदुस्थान-अफगाणिस्तान यांच्या सरहद्दीवर, आणि शक्य तितके आंतही, हवाई छत्र्यांद्वारे उतरवून त्यांच्या कडून दोस्तांच्या विरुद्ध प्रचार, लहान मोठे उत्पात, घातपात इत्यादी कृत्ये करवून घ्यावयाची होती. परंतु पुढे ही योजना बारगळली.

पहिल्या महायुद्धाच्या वेळच्या **लॉरेन्स** या नावाच्या, इंग्रजांनी तुर्कस्तानच्या विरुद्ध गनीमी तंत्राने युद्ध करण्यास पाठविलेल्या, बिन लष्करी धाडसी व चतुर माणसाने, तिकडचेच 'सहोत्थायी' जमवून तुर्कांचे फार नुकसान केले होते. रसद मारली, दळणवळणाचे मार्ग उध्वस्त केले, एकटी दुकटी तुर्की ठाणी कापून काढली व तुर्कांना सळो की पळो करुन सोडले. हा **लारेन्स** पुढे कथा कादंबऱ्या व चित्रपटांचा नायक बनला.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी, इंग्रजांनी 'चिनडिटस्' कमांडो, इथियोपियन-गुरिला, नागा व काचीन–गुरिला 'डाह' फोर्स इत्यादी गनीमी तुकड्या उभ्या केल्या होत्या. शिवाय खास ग्रेट ब्रिटनमधेहि 'ब्रिटीश सहोत्थायी' खास तुकड्या तयार केल्या होत्या. त्यांना सुरंग पेरण्या–उडवण्याचे, अन्न-पाणी दूषित करण्याचे, घातपात व विध्वंस करण्याचे खास शिक्षण दिले होते. यात प्रामुख्याने ब्रिटिश **होमगार्डस** होते. आसाम, ब्रम्हदेश आघाड्यांवर 'व्ही' फोर्स, 'फँटम' फोर्स अशी पथके याच कामा करता तयार केली होती. दुसऱ्या महायुद्धाचे वेळी जर्मनी, रशियन राजधानीला वेढा घालून बसला असतांना त्याची दळणवळणाची साखळी ( Line of Communications ) रशियन गनीमांनी उध्वस्त करून टाकली होती. 'दग्ध भूमी' ( Scorched Earth ) मुळे रशियाला रसद मिळाली नाही. त्यांनी आपलीच धरणे फोडून टाकली. परिणाम हा झाला की जर्मनीला माघार घ्यावी लागली. मान्चूरिया, कोरिया, युगोस्लाव्हिया इत्यादी देशात गनीमी तंत्रच वापरले गेले.

गनीमी युद्ध–तंत्र लष्करी डावपेचापुरतेच मर्यादित नाही. राजकीय, आर्थिक, सामाजिक अशा सर्व आघाड्यावर या तंत्राचे खुल्या सशस्त्र युद्धापेक्षा अधीक घोर परिणाम होऊ लागले आहेत. "या अभिनव शस्त्राची जखम आज बेचैन करते, उद्या कष्टदायक होते, महिन्या भरात शक्तीपात करते आणि योग्य उपायांच्या अभावी थोड्याच काळात प्राण घेते" असे याचे एक लेखक वर्णन करतो.

सन एत झ्रू नावाच्या चिनी लेखकाच्या आता उपलब्ध झालेल्या लिखाणावरुन असे दिसते की, सर्वांच्या किती तरी वर्षे अगोदर चीनला हे तंत्र अवगत होते. "मला मुठभर तरबेज गुरिला द्या; मी कोणतेहि सुप्रतिष्ठित सरकार उलथवून टाकीन" ही दर्पोक्ती त्याच्या नावावर मोडते. बोल्शेव्हिझम आणि कम्यूनिझम यात काय भेदाभेद असतील ते असोत; परंतु दोघांचेहि मंत्र व तंत्र सारखेच आहेत. माओने या विषयावर विपुल लेखन केले आहे. तो शस्त्रादिकांना महत्व देत नाही. त्याची पर्यायांची एक लांबलचक यादी आहे. तोफाऐवजी प्रचार, हवाई सामर्थ्याएवजी घातपात, यंत्राऐवजी कामगार, औद्योगिक शक्तीऐवजी अराजक इत्यादी.

लिडल हार्ट हा इंग्रज लेखक या तंत्राविषयी म्हणतो. ("It is the only kind of war that fits the conditions of modern age, while being at the same time well suited to take advantage of social discontent, racial ferment and nationalised fervour".) सामाजिक असंतोष, वांशिक उत्कट भावना आणि राष्ट्रीयत्वाचा उत्साह यांचा योग्य तो फायदा घेऊन आधुनिक परिस्थितीशी जुळणारा हा (गनिमी) एकच युद्ध प्रकार आहे.

डाकू आणि दरवडेखोरही हेच तंत्र वापरतात. ते अंधाराचा फायदा घेतात. त्यांच्याजवळ हलकी शस्त्रे असतात. जे हाताला येईल त्याचा हत्यारासारखा उपयोग करतात. जंगले, गुप्त जागा अशा ठिकाणी लपतात. गावातील लोकातही मिसळून जातात. ओळखून काढण्यासारखी काही स्पष्ट खूण त्यांच्यात नसते. त्याच्यात कडक शिस्त असते. ओळखले गेले तरी धास्तीमुळे त्यांच्या कोणी 'तसे' वाटेस जात नाही. कित्येक प्रसंगी त्यांना लोकांकडून आश्रय व मदतही मिळते. कारण ते दरिद्र्याच्या विनाकारण वाटेस जात नाहीत.

गनिमाला व्यक्तीगत स्वार्थ नसतो. तो एखाद्या विचार-आचार धारेत वाहवलेला, ध्येयनिष्ट 'वेडा' असतो. डाकूच्या शौर्याला क्रौर्याचा कलंक असतो. गनीमाचे शौर्य ध्येयवेडे असते. स्वभावतः कोणी डाकू अथवा गनीम नसतो. त्याचा 'हृदय पालट' झाल्याने तो तसा होतो. गनीमी उत्पाताला उद्युक्त होण्याला वाट चुकलेली, मूर्खपणाची, विपरीत ध्येय-निष्ठा किंवा विशिष्ट मतप्रणालीचा प्रभाव व तिचे संस्करण, ( Indoctrination— Brain washing ) तथाकथित विषमता आणि काल्पनिक अन्याय अशा सारखी कारणे असतात.

युद्धाच्या अनेक प्रकारापैकी 'यादवी युद्ध' हा एक प्रकार आहे. तो देशातला आपसातला संघर्ष असतो. जगाच्या आतापर्यंतच्या इतिहासात अठरा दिवसात अठरा अक्षौहिणी सैन्य गारद झालेले दुसरे यादवी युद्ध झालेले नाही.

गेल्या महायुद्धापासून देशांचे तुकडे आणि वाटण्या करण्याचे नवे पर्व सुरु झालेले आहे. म्हणूनच प्रखर, दीर्घ व विपुल यादवी युद्धेहि चालू झाली आहेत. व त्यात घुसून किंवा ती सुरु करवून बडे देश राजकारणाचे खेळ खेळत आहेत आणि त्यांना मुक्ति युद्ध (War of Liberation) न्याय्य युद्ध ( just war ) अशी उदात्त नावे देत आहेत.

' बंड ' हाही युद्धाचा एक प्रकार आहे. जुलमी अनियंत्रित सत्तेविरुद्ध व्यक्तींनी किंवा समूहांनी केलेल्या उठावाला बंड म्हटले जाते. यशस्वी बंडाला क्रांती म्हणतात. बंडात तसेच क्रांतीत गनीमी युद्धतंत्र फलदायी होऊ शकते कारण हे सर्वात स्वस्त युद्ध असते. ( Cheapest War ) वैधानिक मार्गांनी राज्य व्यवस्था आणि सरकार बदलण्याला ' क्रांती ' म्हणत नाहीत.

विशिष्ट आणि नेमक्या उद्दिष्टांशिवाय गनीमी तंत्र यशस्वी होऊ शकणार नाही. ते उद्दिष्ट जन–साधारणाच्या आकांक्षा व भावनांशी सुसंगत असले पाहिजे. सुशिक्षित पांढरपेशा तरूण गनीमी तंत्रात भाग घेतो, तो गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे नव्हे. केविलवाणे, विफल, लाचार जीवन जगणाराला, उज्वल भविष्याच्या दिलाशावर, तोंडभर कोरड्या आश्वासनांच्या भरवशावर, नुसते झुलवीत ठेवता येणार नाही. पोटभर अन्न, अंगभर कपडा, निवाऱ्याकरता आसरा, रोगराईपासून बचाव, उदरभरणाची संधी व साधने या प्रत्येकाच्या किमान गरजा असतात. त्यांचा अभाव क्रांतीला पोषक होऊ शकतो. गमवायला ज्याच्याजवळ काही नसते असे, आणि परप्रत्यनेय बुद्धीचे धूर्त, असंतोषाचा अग्नी भडकवू शकतात.

बिन लष्करी गनीमी युद्धाला विस्तृत प्रदेश, लोकांचा मागासलेपणा, दळणवळणाची तोकडी साधने, आणि लोकांची असंतुष्ट वृत्ती हे साहित्य उपयोगी पडते. जनतेच्या नावावर, खऱ्या खोट्या मुद्दाम उपस्थित केलेल्या प्रश्नाकरता, आघाड्या उघडून लोकांच्या नावावर घातपात, संप, धरणे, घेराव इत्यादी उपायांनी अस्वस्थपणा आणि असुरक्षितपणा उत्पन्न करणे म्हणजे गुन्हेगारी उत्पन्न करणे होय. गुन्हेगारी वृत्ती वाढण्याला आणखी बरीच कारणे आहेत.

जागतिक वातावरण ' धड युद्धही नाही आणि शांतीही नाही ' ( No War No Peace ) अशा चमत्कारिक अवस्थेत आहे.. ही परिस्थिती बिन लष्करी गनीमी युद्धाला फार पोषक आहे. बोल्शेव्हिझम, कम्युनिझम ( रशियन व चिनी ) इत्यादी इझमांच्या दृष्टीने त्यांच्या ' बरोबर नसणारे ' बायबलच्या आधाराने ' शत्रू ' ठरतात. ( " Those who are not with me are against me " ) गनीमी युद्ध हा युद्धांचा ' अंतर्भेदी ' भयंकर प्रकार आहे.

---

क्र. ९८९५

REFBK-0018178

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रमांक ५८४०६ वि: मिश्र
क्रमांक २९५१ नोंद दिनांक ३१-३-६७

## ( माजी ) ले. कर्नल भा. त्र्यं. परांजपे

ले. कर्नल परांजपे ह्यांनी सैन्यात व सशस्त्र पोलीस दलात जबाबदारीच्या विविध अधिकार-पदांवर काम केले आहे. सैन्यातले Intelligence school, Chemical Warfare school, Combined operations, Tactical school Jr. and Sr. wing इत्यादी अनेक शिक्षणक्रम त्यांनी पूर्ण केले आहेत. हल्लीच्या महार रेजिमेंटच्या पहिल्या कंपनीचे ते कमांडर होते. तसेच युद्धकालीन लिगायत बटालियन ( जे पुढे तोफखाना झाले ) याची उभारणी त्यांनी केली होती

त्यांनी दुसऱ्या महायुद्धात प्रत्यक्ष भाग घेतलेला आहे. अशा अनुभवी लष्करी अधिकाऱ्यानं युद्ध विषयक समग्र माहिती देणारा प्रस्तुत ग्रंथ मराठी वाचकांसाठी खास लिहिला आहे. त्यांचे युद्धविषयक लिखाण विविध नियतकालिकांमधून व वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध होत असल्यामुळे ते मराठी वाचकांना सुपरिचित आहेत.

सैनिकी शिक्ष[illegible] भारतीयांना सतत दूर ठेवण्याच्या ब्रिटिशांच्या धोरणा[illegible]यांना सैन्य, सैनिकीजीवन, शस्त्रास्त्रे, युद्ध ह्यांची पुरेश[illegible] नाही. स्वतंत्र भारतातील नागरिकांना ह्या संबंधी माहिती असणे अगत्याचे आहे. मराठी साहित्यात ह्या विषयावर फारसे लिखाण नाही. ही उणीव भरून काढण्याकरितां हा खास ग्रंथ लिहिला आहे.